# एम.ए. भाग - २

# अभ्यासपत्रिका क्र .४

# गट - ई

# तौलनिक राजकीय विश्लेषण

**डॉ.संजय देशमुख**
**कुलगुरू**
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ.अंबुजा साळगांवकर**
**प्रभारी संचालक,**
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ.धनेश्वर हरिचंदन**
**प्रभारी, अभ्यास साहित्य विभाग ,**
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक :**
**डॉ.संजय रत्नपारखी**
सहाय्यक संचालक (शैक्षणिक),
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादन व लेखक :**
**डॉ.श्रीराम येरणकर**
प्राचार्य
जनता कला-वाणिज्य महाविद्यालय,
मलकापूर, जि. बुलढाणा

**: लेखक :**

१. **डॉ.श्रीराम येरणकर**
प्राचार्य
जनता कला-वाणिज्य महाविद्यालय,
मलकापूर, जि. बुलढाणा

२. **डॉ.अलका देशमुख**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
श्री बिंझाणी सिटी कॉलेज, नागपूर

३. **डॉ.संदिप तुंडूरवार**
श्री.बिंझाणी सिटी कॉलेज, नागपूर

४. **डॉ.शुभांगी राठी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
कोटेचा महिला महाविद्यालय,
भुसावळ जि.जळगाव

५. **डॉ.संतोष कायंदे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
डॉ.एच.एन.सिन्हा कला,वाणिज्य,
महाविद्यालय, पातुर जि. अकोला

६. **डॉ.बाळासाहेब जोगदंड**
सिताबाई कला महाविद्यालय,
अकोला

**मार्च, २०१७, एम.ए. भाग - २ तौलनिक राजकीय विश्लेषण, अभ्यासपत्रिका क्र.४, गट-ई**

**प्रकाशक :**
**प्रभारी संचालक**
**दूर व मुक्त अध्ययन संस्था,**
**मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.**

**अक्षरजुळणी :**
**श्री ग्राफिक सेंटर**
२८, मंगल वाडी,
मुंबई - ४०० ००४

**मुद्रण :**

## अनुक्रमणिका


| क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | तुलनात्मक राजकारण: अर्थ, स्वरूप आणि व्याप्ती | १ |
| २. | सैद्धातिक मांडणीः व्यवस्था सिद्धांत, रचनात्मक कार्यवाही सिद्धांत, पराधीनता सिद्धांत, विशेष साम्य आणि भेद दर्शविणारे तुलनात्मक प्रारुप | १६ |
| ३. | राज्य | ४३ |
| ४. | राजकीय संस्कृती, राजकीय सामाजिकीकरण व राजकीय भरती | ६३ |
| ५. | राजकीय आधुनिकीकरणाचा सिद्धांत, राजकीय विकासाचा सिद्धांत आणि राजकीय ऱ्हास | ९२ |
| ६. | अभिजन, वर्ग आणि जनता<br>बहुलवाद<br>सहवर्तनमुलकवाद<br>मार्क्सवादी दृष्टीकोण | १२२ |
| ७. | राजकीय सहभागाचा सिध्दांत | १४४ |
| ८ | राजकीय संघर्ष आणि सहकार्य | १६३ |
| ९. | राजकीय स्थैर्य आणि बदल | १८३ |
| १०. | राष्ट्र, राष्ट्रवाद आणि विभक्त होण्याचा अधिकार | २०२ |

# SYLLABUS

## Paper IV - Comparative Political Analysis

1. Comparative Politics : Meaning, Nature and Scope.
2. Theoretical Framework : Systems theory, Structural Functionalism, Dependency theory, Strategies of Comparison : Most Similar Systems and Most Different Systems Designs.
3. The State : Its Nature, Development and Functioning : Welfarism, Corporatism and Neo-corporatism; Constitutionalism : Its theory and practice.
4. Patterns of Political Culture, Socialisation and Recruitment.
5. Theories of Political Modernisation, Development and Decay.
6. Elites, Classes and Masses Pluralist, Elitist, Marxist and Consociationalist Perspectives.
7. Theories of Political Participation; Role of Leadership, Parties, Interest Groups and People's Movements.
8. Political Conflict and Cooperation : Functionalist and Dialectical Perspectives.
9. Political Stabilty and Change : Theories of Order and Revolution
10. Nation, nationalism and the right to secession.

## Suggested Readings


1. Almond, G A. and S. Verba, The Civic Culture, Boston, Little Brown and Company, 1983.
2. Almond, Gabriel and Sidney Verba, The Civic Culture Revisited, New Delhi, Sage Publications, 1989.
3. Almond, Gabriel, A Discipline Divided : International and Comparative Perspectives, New Delhi, Sage Publications, 1989.
4. Armstrong, David, Revolution and World Order, Oxford, Clarendon Press, 1993.
5. Auroi, Claude (Ed.). The Role of the State in Development Processes, London, Frank Cass Publishers, 1993.
6. Ball, Alan, Modern Politics and Governments, London, Macmillan, 1985.
7. Benjamin, R. and S.I . Elkin (Eds.), The Democratic State, Lawrenceville, Kansas State, University Press of Kansas, 1985.
8. Budge, lan, Parties and Democracy-Coalition Formation and Government Functioning in Twenty States, Oxford, Oxford University Press , 1993.
9. Cawson, A., Organised Interests and the State : Studies in Mesocorporatism, London, Sage Publications, 1985.
10. Cawson, Alan, Corporatism and political Theory, Oxford, Basil Blackwell, 1988.
11. De Soto, Hernando, The other Path: The invisible revolution in the Third World, New York, Harper and Row, 1989.
12. Di Palma, Guiseppe, To Craft Democracies : An Essay on Democratic Transitions, Berkeley, University of Califonia Press, 1990.

13. Diamond, Larry J., and S.M. Lipset (Eds. ), Democracy in developing countries, Volumes I-IV, Boulder, Colorado, Lynne Rienner, 1988.
14. Dogan, M. and Pe1assy, D., How to compare nations, New Jersey, Chatham House Publishers, 1984.
15. Easton, David, The Analysis of political Structures, New York, Routledge, 1990.
16. Esping, Anderson, Gosta, The Three Worlds of Welfare CapItalism, Princeton, Princeton University Press, 1990.
17. Evans, Peter and T. Skocpol(Eds.), Bringing the store bock in. New York, Cambridge University Press, 1985.
18. Fitzpatrick, Peler, Modernism and the Grounds of Law, Cambridge, Cambridge University Press, 2000.
19. Geras, Norman and Rbert Wokler(Eds.), Enlightenment and modernity London, Macmillan,1999.
Goldthorpe, John(Ed.) Order and Conflict in Contemporary Capitalism London Oxford University Press,1984.
20. Greenberg.Douglas(Eds.) Communalism and Democracy Transitions in the ContemporaryWord New York Oxford University Press 1993.
21. Harrison M.E.(Eds.) Optimism in Welfare States Aldershott Gower 1984.
22. Hay Colin Political Analysis contemporary controversies London Macmillan 2001.
23. Hudson Robert (Eds.) Politics of Identity mygrants and minorities in multicultural states, London Macmillan 1999.
24. Jackson. Robert M .....States in a changing world, Oxford, Oxford University Press,1993.
25. Kamrava. Mehran. Politics and Society in the Third World. London Routledge, 1993.
26. Keene, John, Civil Society and the Stales, London, Verso Publications, 1988.
27. Laver, Michael, .Mulitiparty Government - The Politics of Coalition in European States, Oxford, Oxford University Press, 1991 .
28. Lehmbuch, G. and P. Schmitter (Eds.), Patterns of Corporatist Policy Making, Beverley Hills, California, Sage Publications, 1982.
29. Leibfried, Stephan and Herbert Oblinger (Eds.), Welfare State Futures, Cambridge, Cambridge University Press, 2000.
30. Lijphart, Arend, Democracy in Plural Societies : A Comparative Exploration, Bombay, Popular Prakashan, 1989.
31. Linz, Juan, The Breakdown of Democratic Regimes, Baltimore, Johns Hopkins University Press, 1978.
32. Mantzabinos C., Individuals, Instituions and Markets, Cambridge, Cambridge University Press, 2000.
33. Meredyth, Dennis and J. Paul Manson (Eds.), Citizenship and Cultural Policy, New Delhi, Sage Publications, 2001 .
34. Meyer, Lawrence C., Redefining Comparative Politics, New Delhi, Sage Library of Social Research. Volume 173, 1989, Sage Publications, New Delhi.

35. Munck, Ronaldo (Ed.), Postmodern - Insurgencies : Political Violence. Identity Formation and Peacemaking in Comparative Perspective. London, Macmillon, 1999.
36. Parekh, B., A Theory of Multicultural Society, London, Macmillan, 2000.
37. Parry, G. and Michael Moran, Democracy and Democratisation, London, Routledge, 1993.
38. Peters, Guy B. and Others (Eds.), Political Analysis, London, Macmillan, 2000.
39. Pierre, Jon and B. Peters (Eds.), Governance, Politics and The State, London, Macmillan, 2000 .
40. Poggi, D., The State : Its Nature, Development and Prospects, Stanford, Stanford University Press, 1 990.
41. Porter, Michael, E .. The Comparative Advantage of Nations,New York, Free Press of Glencoe. 1990.

42. Prezeworski Adam and others (Eds.) Democracy and Development, Political Institutions and Wellbeing in the World 1950 - 1990, Cambridge, Cambridge University Press, 2001
43. Rasler, K. and Thompson, W .. War and State Making The shaping of the global powers, London, Unwin Hyman. 1989.
44. Renshon, S.A.(Ed.), Political Psychology Cultural and Cross Cultural Foundations, London, Macmillan, 1999.
45. Schechter, M.G.(Ed.), The Revival of Civil Society , Global and Comparative perspectives, London, Macmillan. 1999.
46. Scholten, ja (Ed.), Political Stability and Neocorporatism, New Delhi, Sage studies in Neo Corporatism, 1987.
47. Spicker, Paul, The Welfare State A General Theory, New Delhi. Sage publications, 2000.
48. Steinmo, Sven, Structuring Politics, Historical institutionatism in Comparative Politics, Cambridge, Cambridge University Press, 1993.
49. Torfing, Jacob, Politics, Regulation and the Modern Welfare State, London. macmillan, 1 998.
50. Tornquist, Olle, Politics and Development - A Critical introduction. New Delhi. Sage Publications, 1999.
51. Walton. J., Reluctant rebels Comparative studies of Revolution and underdevelopment, New York, Columbia University Press, 1984.
52. Zucker, Ross, Democratic Distributive Justice, Cambridge, Cambridge University Press, 2000.

# १

# घटक १ - तुलनात्मक राजकारण: अर्थ, स्वरूप आणि व्याप्ती

**अनुक्रमाणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ तुलनात्मक राजकारणाचा अर्थ व व्याख्या

१.२.२. राजकारणाची व्याख्या

१.२.३ तुलनात्मक राजकारणाचा विकास

१.२.४ तुलनात्मक राजकारणाची व्याप्ती

१.२.५ तुलनात्मक राजकारणाच्या अध्ययनाचे महत्व

१.२.६ तुलनात्मक राजकारणातूल तुलनेचे आधार

१.३ सारांश

१.४ सरावासाठी प्रश्न

१.५ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला :

- तुलनात्मक राजकारणाचा अर्थ स्पष्ट करता येईल.
- तुलनात्मक राजकारणाचा विकास सांगता येईल.
- तुलनात्मक राजकारणाची व्याप्ती स्पष्ट करता येईल.
- तुलनात्मक राजकारणाच्या अध्ययनाचे महत्व सांगता येईल.
- तुलनात्मक राजकारणातील तुलनेचे आधार स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रास्ताविक

तुलनात्मक राजकारण म्हणजे काय हे समजण्यासाठी राजकारणाचा व्यापक अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. प्राचीन काळापासून माणसाच्या स्वभावाचा निरनिराळ्या आयामातुन समाजशास्त्रज्ञांनी, राज्यशास्त्राज्ञांनी अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. त्या अभ्यासाच्या अनुषंगाने माणूस हा तुलना करणारा प्राणी असून तो आपली तुलना आपल्या सभोवतालच्या मित्रांसोबत सतत करतो, तसेच आपल्या व्यतिरिक्त अन्य समाजातील लोक कसे राहतात, कसे व्यवहार करतात, त्यांच्या चालीरिती प्रथा, परंपरा, संकेत नियम कोणते आहेत? या सर्व घटकांचे पालन ते कशाप्रकारे करतात? हे जाणून घेण्याची उत्सुकता माणसांमध्ये असल्याचे अभ्यासकांच्या निदर्शनास आले.

माणसाच्या मनात तुलना करण्याची प्रवृत्ती त्यांच्या तीन प्राथमिक इच्छाद्वारे निर्माण होत असते.

१) दुसरे लोक कोणत्या प्रकारे राहतात व व्यवहार करतात हे जाणण्याची इच्छा

२) आपल्यातील आणि दुसऱ्यातली समानता-असमानता शोधण्याची इच्छा की, ज्यामुळे आपण स्वत: योग्यरित्या समजु शकू

३) दुसऱ्यांमध्ये जे सर्वोत्तम आहे ते स्वीकारण्याची इच्छा म्हणजेच स्वत: सुधार करण्याची इच्छा

## १.२ विषय विवेचन

हया तीन मनुष्यसंबंधित इच्छा त्याच्या कृतीलाही लागु पडतात. आणि शासन जरी मनुष्याची सर्वोत्तम कृती नसली, तरी ते सर्वोत्तम कृतीमधील एक आवश्यक अंग आहे. आणि म्हणूनच तौलनिक शासनाचा एक फार मोठा इतिहास असून राज्यशास्त्राच्या सर्व उपांगांचा त्यात समावेश आहे. त्याचबरोबर तौलनिक राजकारण हा विषय सर्व देशांमध्ये राजकीय व्यवस्थांची माहिती प्राप्त होण्यास मदत होते. या दृष्टीनेच तौलनिक राजकारणाच्या अभ्यासास सुरूवात होऊन हे अध्ययन वैज्ञानिक स्तरावर पोचवण्याचा अभ्यासकांचा उद्‌देश सफल झाला आहे.

तुलनात्मक राजकारण हा इतर विषयांच्या तुलनेत नवीन विषय आहे. या विषयाने राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या कक्षा निश्चितच विस्तारित केल्या आहेत. तौलनिक राजकारणाच्या अभ्यासाने आपले लक्ष राजकीय वास्तविकतेवर तसेच राजकीय प्रक्रियांवर केंद्रित केले. दुसऱ्या महायुध्दांनंतर अभ्यासकांनी आपले मत व्यक्त करातांना असे प्रतिपादन कले की, तौलनिक राजकारण हा अभ्यासविषय केवळ स्वायत्त अनुशासनाच्या रूपात प्रतिष्ठित होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. त्यामुळे या अभ्यासशाखेचे महत्व वाढलेले आहे. या विषयाचे वाढते महत्व लक्षात घेऊन एका विद्वान अभ्यासकाने असे म्हटले आहे की, ''तुलनात्मक राजकारणाचे अध्ययन समकालीन राज्यशास्त्रात सर्वोधिक महत्वाचे ठरले आहे. या अभ्यास विषयाला लोकप्रिय आणि व्यापक बनविण्यासाठी गॅब्रिअल अल्मंड, कौलमैन, पॉवेल, शिल्स, ऑप्टर या अमेरिकन राज्यशास्त्रज्ञानी महत्वपूर्ण भूमिका वठविली आहे.''

राजकीय वास्तविकतेचा शोध घेण्यासाठी नवीन तंत्र आणि दृष्टिकोनाची आवश्यकता निर्माण झाली. कारण जुन्या दृष्टिकोनामुळे संपूर्ण 'राजकारण' अभ्यासणे शक्य नव्हते.

पारंपरिक राज्यशास्त्र राज्य, शासन आणि राजकीय संस्था यांचा अभ्यास करीत होते. पण संपूर्ण राजकीय वास्तविकता व राजकीय प्रक्रिया याकडे दुर्लक्ष होत होते. परंतु १९ व्या शतकाच्या शेवटी मात्र या अभ्यासाला राजकीय पक्ष आणि दबावगट यांच्या अभ्यासाची जोड दिली गेली. कोणतेही विधेयक विधिमंडळात प्रस्तुत करण्यापुर्वी ते विधेयक संबंधित समितीकडे का सोपवावे, त्यावर वादविवाद करतांना व्यक्तिगत मतापेक्षा सामाजिक आणि आर्थिक आंतरक्रिया प्रक्रिया स्पष्ट कां करावी, याचा विचार राज्यशास्त्रांनी करण्यास सुरूवात केली. एखादे विशिष्ट धोरण सरकार का स्विकारते किंवा ते कां नाकारते, सरकारच्या धोरणनिर्णय प्रक्रियेवर कोणाचा आणि कसा प्रभाव पडतो याचा अभ्यास राज्यशास्त्रात होऊ लागला. त्यानुसार राज्यशास्त्राची व्याख्या बदलत गेली.

## १.२.१ तुलनात्मक राजकारणाचा अर्थ व स्वरूप -

तौलनिक राजकारणाचा अर्थ समजुन घेण्यासाठी दोन गोष्टीचा अभ्यास प्रामुख्याने लक्षात घेतला जाऊ लागला.

१) तुलनात्मक राजकारण म्हणजे काय?

२) तुलनात्मक शासन आणि तुलनात्मक राजकारण यांत काय फरक आहे.

अनेक राज्यशास्त्रांज्ञानी आपल्या अभ्यासातून असा निष्कर्ष काढला की, राजकीय संस्था जे कार्य करतांना दिसतात ते कार्य ठरलेल्या नियमांपेक्षा वेगळ्या स्वरूपाचे असते. तेव्हा प्रश्न असा निर्माण होतो की, असे घडण्यामागची कारणे कोणती? यांचा शोध घेण्यात येऊ लागला आणि त्यातून धोरणाची निश्‍चिती ही गोष्ट महत्वाची ठरली. धोरण ठरविण्यापर्यंत औपचारकि गोष्टींना महत्व देण्यात येत असे. मात्र प्रत्यक्ष नितिनिर्धारणाच्या प्रक्रिया स्पष्ट करणाऱ्या गोष्टी जास्त महत्वाच्या ठरल्यात उदा. विधीमंडळात विधेयक मांडणे, समीतीकडे सोपविणे, त्यावर वादविवाद व चर्चा होणे, मतदान इत्यादी बाबतीत जे औपचारिक नियम आहे त्यांचे पालन करूनही यापेक्षा काही वेगळे मुददे लक्षात घेण्यात येऊ लागले.

उदा. विधेयक कोणत्या कारणांमुळे पारित केले जाते. ते पारित होत असतांना काही व्यक्तिगत, सामाजिक, आर्थिक व अन्य अशा कोणत्या क्रिया प्रक्रिया कारणीभूत ठरतात, याचा विचार अधिक प्रकर्षाने होऊ लागला.

राजकारण्यांसमोर काही महत्वाचे प्रश्न उपस्थित झालेत ते असे की, शक्ती कोण धारण करतो? ती व्यक्तीला कशी प्राप्त झालेली असते? झालेल्या शक्तीचा उपयोग तो कसा करतो. या अनुषंगाने अभ्यास करतांना राजकीय विचारवतांनी आपले लक्ष धोरण प्रक्रियेवर अधिक केंद्रित केले. धोरणांचा प्रभाव पडला, आणि कोणती हितं असफल राहिली या सर्वाचा अभ्यास करणे आवश्यक ठरले.

## १.२.२. राजकारणाची व्याख्या -

निरनिराळ्या राजकीय विचारवंतांनी राजकारणाची व्याख्या देऊन त्याचे स्वरूप व अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात बानाफिल्ड या राजकाय विचारवतांच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू व्यक्ती आणि औपचारिक सघटन हा होता आणि हया दोन्ही गोष्टी काही उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. त्यादृष्टीने त्याने केलेली राजकारणाची व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

बानफिल्ड – ''राजकारण ही अशी विकसीत प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे कोणत्याही प्रश्नावर आंदोलन केले जाते व अंतिमत:निर्णय घेतल्या जातो.''

याप्रक्रियामध्ये – माहिती देणे, तर्क करणे, वादविवाद करणे, शक्तीचा प्रयोग करणे, समजावणे, धमकावणे, मतपरिवर्तन करणे, वाटाघाटी, युक्तीवाद, चर्चा, जन आंदोलन अशा कितीतरी गोष्टी केल्या जातात. या सर्व विकास प्रक्रियांमध्ये राजकीय नेत्याचे फार महत्व असते. वरील सर्व प्रकारच्या मार्गाद्वारे एखादा प्रश्न सोडवण्याची प्रक्रिया म्हणजेच राजकारण होय.

काही राजकीय विचारवंत म्हणतात – राजकारण म्हणजे मानवी संबंधाची अशी प्रतिमाने (झरींशीप) की ज्यात शक्ती, शासन आणि सत्ता या गोष्टी अंतर्भुत असतात. तर काही विचारवंत तौलनिक राजकारणाचा संबंध राजकीय व्यवहाराच्या संपूर्णतेच्या अभ्यासाशी असतो असे म्हणतात. येथे राजकीय व्यवहार म्हणजे शासनाची विभिन्न रूपे, शासकीय संस्था यांचा अभ्यास अपेक्षित आहे. पंरतु त्यात औपचारिक कायद्यांचे संघटन आणि नियम यांच्याकडे विशेष लक्ष दिल्या जात नाही. यात शासनाची धोरणप्रक्रिया, शासकीय निर्णय, प्रक्रियांच्या मागील राजकारण, नितिनिर्धारण करणारे आणि त्यांच्याशी संबंधित असणारे शासकीय उच्चाधिकारी म्हणजेच की, राजकीय शक्ती धारण करणारे या सर्वाचा अभ्यास केला जाते. यामुळे तुलनात्मक राजकारणाचे अध्ययन क्षेत्र तुलनात्मक शासनापेक्षा कितीतरीपटीने व्यापक आहे असेच म्हणावे लागेल.

रॉबर्ट ढाल्ह म्हणतो की, आजचा नागरिक – देश, शाळा, चर्च, व्यापारी फर्म नागरिकांचे संघ व अशाप्रकारच्या अनेक संघटनांमध्ये राजकारण पहात असतो. राजकारणाने मानवी जीवनात असे स्थान पटाकावले आहे की, त्यातून कोणीही मानव सुटू शकत नाही. प्रत्येक वेळी कोणत्या ना कोणत्या रूपात राजकारणात ओढल्या जात असते. राजकारण ही अत्यंत प्राचीन व सर्वव्यापी अनुभवाची गोंष्ट सिध्द झालेली आहे. ''राजकारण ही मानवी संबंधांमध्ये कायमस्वरूपी अस्तित्वात असलेली अशी संकल्पना आहे की, ज्यात शक्ती, नियम व सत्ता यांच्याशी संबंधित व्यवहार सतत होत असतात.''

एंकदरीत रॉबर्ट ढाल्हने मानवाच्या जीवनातील विविध समस्यांचा संबंध राजकारणाशी कसा येतो? राजकारणाच्या पध्दतीत कोणत्या गोष्टी सामान्य असतात? तिचा प्रत्येक पैलू दुसऱ्या पैलूपासून कशाप्रकारे भिन्न असतो, राजकारणामध्ये सत्तेची भूमिका कोणती असते, त्यामुळे मानवी व्यवहार कसे बदलत जातात, विभिन्न प्रकारच्या राजकारण प्रक्रियांमध्ये स्थायित्व, परिवर्तन आणि क्रांती होण्यासाठी कोणत्या गोष्टी आवश्यक असतात, त्यावरून कोणत्या प्रकारचे राजकारण श्रेष्ठ ठरते? ते कसे व कां श्रेष्ठ ठरते, या सर्व समस्यांचा अतंर्भाव राजकारणात केला जातो. असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

जेम्स चार्लवर्ड राजकारणाचे स्वरूप स्पष्ट करतांना म्हणतो की, सामान्यत: राजकीय प्रश्न का निर्माण होतात? असे राजकीय प्रश्न कोणते राजकीय नेतृत्व उचलून धरतात? त्यासाठी लोकांसमोर असे नेतृत्व कोणते पर्याय ठेवतात? प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी कोणत्या प्रकारचे संघर्ष होतात, त्यासाठी शासनावर कोणत्या आणि कशाप्रकारचा प्रभाव पाडला जातो? असे संघर्ष निर्माण होण्यापूर्वीच कधी कधी शासनसंस्था त्यांचे निराकरण कशाप्रकारे करते? या सर्व गोष्टींचे किंवा प्रक्रियांचे नाव राजकारण आहे.

## तुलनात्मक राजकारणाची व्याख्या –

पॉल बी लेविस यांच्या मते, राजकारणामध्ये शक्ती, शासन आणि सत्ता यांचा अभ्यास केला जाते. या अभ्यासातून योग्य धोरण आणि सैध्दांतिक दृष्टिकोन यांचा उपयोग करून सामान्य नियमांचा शोध घेतला जातो. हा शोध विशिष्ट समस्या किंवा विशिष्ट प्रश्नांच्या संदर्भात योग्य स्पष्टीकरण देतो. यालाच तौलनिक राजकारण म्हटले जाते.

ॲरिस्टॉल म्हणतो, ''राजकारणाच्या संबंधात सत्ता किंवा शासनाची शक्ती अंतर्गत असते.''

हेरॉल्ड लॉस्वेल म्हणतो, ''राज्यशास्त्र हे एक असे अनुभवमुलक शास्त्र आहे की, ज्यामध्ये शक्तीची भागीदारी असते आणि शक्तीला आकार देण्याचा अभ्यास केला जातो मात्र दृष्टिकोन राजकारणाच्या कार्यशक्तीचे ध्येय समोर ठेवून करणे हाच असतो.''

एकंदरीत राजकीय वास्तविकतेचे, पारंपारिक राज्यशास्त्राच्या अभ्यास दृष्टिकोनामुळे आकलन होत नसल्यामुळे अनेक बुध्दिवंत निराश झाले होते. यातुन बाहेर पडण्यासाठी राजकारणाच्या अभ्यासकांनी केलेले प्रयत्न म्हणजेच तौलनिक राजकारण होय. राजकारण ही न संपणारी व कायम बदलणारी जागतिक कृती आहे. ही कृती निर्णयातून प्रगट होत असते. साधारणत: अतिशय त्रासदायक, राजकारणाशी संबंधित निर्णय राजकारणात घेतले जातात. राज्याच्या सत्तेवर परिणाम करणारी प्रत्येक कृती ही राजकारणाशी संबंधित असते. रॉबर्ट ढाल्ह म्हणतो, ''जेथे जेथे राज्याचा संबंध येतो, तेथे राजकारण असते, राजकारण म्हणजे समाजावर व्यापक परिणाम करणारी निर्णय प्रक्रिया असून ही निर्णय प्रक्रिया कधीही न संपणारी असते.''

तुलनात्मक राजकारणात राजकारण हा शब्द प्रामुख्याने तीन अर्थाने वापरला जातो.

१) राजकीय कृती किंवा हालचाली २) राजकीय प्रक्रिया ३) राजकीय सत्ता किंवा शक्ती

१) **राजकीय कृती किंवा हालचाली** – राजकीय कृतीमध्ये परिस्थितीचा समावेश होतो. ज्यामुळे संघर्ष होतो व मिरविला जातो. ही कृती करतांना जनतेच्या हितसंबंधाना प्राधान्य दिले जाते. राजकीय कृतीमध्ये 'सत्तेसाठी संघर्षाचा' समावेश होतो. समाजातील तणाव कमी करण्याच्या प्रयत्नाचा समावेश होतो. राजकारणातील तणाव निर्मुलनासाठी शासन कृतीशील असते. उदा. जेव्हा यादवी युध्द सुरू होते तेव्हा राजकारण थांबते कारण या काळात शासनाच्या कृती तणाव संपवण्यात कमी पडत असतात. यादवी युध्दाच्या काळात राजकीय कृती थांबते असा त्याचा अर्थ होतो. म्हणून अशा प्रकारची स्थिती निर्माण होऊ नये म्हणून राजकीय कृती करावयाची असते. एकंदरीत राजकीय हालचालीमध्ये ज्यातुन संघर्ष उत्पन्न होतात. त्यातुन मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला जातो.

२) **राजकीय प्रक्रिया** – राजकीय प्रक्रियेमध्ये निर्वाचन प्रक्रिया, कायदेविषयक प्रक्रिया, न्यायविषयक प्रक्रिया, प्रशासकीय प्रक्रिया, यांचा संबंध येतो, या सर्व प्रक्रियांमध्ये सर्वात महत्वाची प्रक्रिया म्हणजे निर्णय करण्याची प्रक्रिया होय की, ज्यात अशासकीय घटकांच्या निर्णयांचा समावेश होतो. जे अशासकीय घटक

शासनास निर्णय  घेण्यास भाग पाडतात त्यांचा समावेश राजकीय प्रक्रियेत होतो. राजकीय प्रक्रिया म्हणजे अशासकीय संघटनांच्या मागण्या ज्या शासनाकडे येतात. त्यावर शासन विचार करते, निर्णय घेते. या प्रक्रियेत आदान,  रूपांतर प्रक्रिया व प्रदान प्रक्रिया त्यानंतर पुन्हा प्रत्यादान यांचाही समावेश होतो. तसेच निर्णयांच्या अंमलबजावणीचा समावेश देखील राजकीय प्रक्रियांमध्येच होतो.

३) **राजकीय शक्ती किंवा सत्ता** – संपूर्णपणे निर्णय करण्याची क्षमता किंवा शक्ती म्हणजे राजकाय शक्ती होय. राजकीय सत्तेमध्ये इतरांचे वर्तन नियंत्रित करण्याची क्षमता यांचा समावेश असतो. तसेच काही अभ्यासंकाच्या मते, राजकीय सत्ता म्हणजे विशिष्ट प्रकारच्या व्यक्ती–व्यक्तीतील संबंध होय.

तुलनात्मक राजकारणाचे स्वरूप लक्षात घेतल्यानंतर तौलनिक राजकारण यातील भेद.

राजकारण एक प्रकारचा मानवी व्यवहाराचा भाग आहे. ज्याप्रमाणे कोणत्याही समाजात धोरणासंबंधीच्या हालचाली, क्रिया प्रक्रिया या सतत सुरू असतांना त्यांचे स्वरूप शासकीय असतेच असे नाही, त्याचप्रमणे शासनाकडून होणाऱ्या सर्व क्रिया प्रक्रियात राजकारण असतेच असेही नही तर राजकारण एक प्रकारचे मानवी तसेच सामाजिक व्यवहाराचा महत्वाचा भाग आहे. तुलनात्मक शासनात राजकीय पध्दती, त्यानुसार विभिन्न संस्था, त्यांनी केलेली कार्ये यांचा तुलनात्मक अभ्यास होत असतो. परंतु तौलनिक राजकाणाचे क्षेत्र मात्र अधिक व्यापक आहे. तौलनिक राजकारणामध्ये तौलनिक शासनात ज्या  गोष्टींचा अंतर्भाव होतो त्या तर समाविष्ट असतातच शिवाय त्या व्यतिरिक्त अराजकीय किंवा राजकारण विरहित गोष्टींचाही समावेश व अंतर्भाव होत असतो. याच अर्थाने तौलनिक राजकारणाचे क्षेत्र तौलनिक शासनापेक्षा अधिक व्यापक आहे.

जी.के. रॉबर्ट यांच्या मते, तौलनिक शासनाचा अभ्यास करतांना राज्य त्याच्या संस्था आणि त्यांची कार्ये व कार्याच्या संबंधात येणारे काही समूह उदा. राजकीय पक्ष, हिसंबंधी गट यांचाही अभ्यास उपयुक्त ठरतो. परंतु तुलनात्मक राजकारणाचे लक्ष, अभ्यासविषयक आणि ध्येय अधिक व्यापक असल्याने त्यात अराज्यीय राजकारण, जनजातीचा अभ्यास, खाजगी संस्थांचा अभ्यास, सामाजिक पर्यावरणाचा अभ्यास समाविष्ट आहे. तुलनात्मक राजकारणाचा अभ्यास विभिन्न राजकीय पध्दतीने नियम बनविणे, नियमांची अंमलबजावणी करणे त्यानुसार न्याय देणे इत्यादीशी संबंधित आहे. आणि इथेही तौलनिक राजकारणाचा अभ्यास थांबत नाही तर पुढे जाऊन तौलनिक राजकारणाच्या क्षेत्रात अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानवशास्त्र यांचाही अभ्यास केला जातो.

फ्रीमनच्या मते, तुलनात्मक राजकारणात सरकारच्या विभिन्न रूपाचाच तौलनिक अभ्यास अंतभूर्त होत नाही तर त्यात विभिन्न राजकीय प्रक्रिया आणि त्यांच्याशी संबंधित असणाऱ्या राजकीय व गैरराजकीय संस्थांचांही अभ्यास समाविष्ट आहे.

सिडनी व्हर्बा च्या मते, तुलनात्मक राजकारणात अनेक शासनपध्दतीचे अनुभव संस्थाचे व्यवहार आणि प्रक्रिया यांचा विस्तारपूर्वक पध्दतीने अभ्यास केला जातो. तसेच संविधानाच्या बाहेरील अशा माध्यमांचा व अशा संस्थांचाही अभ्यास केला जातो की,

ज्याचा शासनाच्या औपचारिक अंगाशी काहीही संबंध नाही. तौलनिक राजकारणाच्या अभ्यासामुळे एकप्रकारच्या राजकीय हालचालींचा, कृतींचा बोध होतो. या कृतीचा संबंध राजकीय व्यवहारांशी असतो. राजकीय व्यवहार धर्म, नैतिकता, आर्थिक समस्या इत्यादीमधून उत्पन्न होतो.

एकंदरीत तौलनिक राजकारण, अभ्यास करतांना सत्तेला केंद्रबिंदू मानून अभ्यास करते यात शासनाचा त्यांच्या हालचालींचा त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या सर्व प्रकारच्या गोष्टीचा अभ्यास केला जातो. राजकारण हे सत्ता, अधिकार आणि अधिमान्यतेशी संबंधति असते. या भूमिकेतून राजकारणाकडे तुलनात्मक राजकारण पाहत असते. तौलनिक राजकारणाने राज्यशास्त्राला मूल्याधिष्ठित विश्लेषणापासून मुक्त केले व मूल्यरहीत अनुभवजन्य अभ्यासास महत्व देण्यात आले.

## १.२.३ तुलनात्मक राजकारणाचा विकास -

राज्यशास्त्राचा जनक असणाऱ्या ॲरिस्टॉटलपासून या तुलनात्मक शासनाच्या अभ्यासाचा प्रांरभ झाला असे समजले जाते. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत या ज्ञानशाखेचा विकास हळुहळू होत गेला. या ज्ञानशाखेच्या विकासासाठी बराच कालावधी लागला. राजकीय विचारांचा इतिहास जितका प्राचीन आहे तेवढाच तुलनात्मक राजकारणाच विकास प्राचीन आहे असे हेन्री एकेस्टीन याने आपल्या (A perspective on Comparative poitics - past and present) या ग्रंथात म्हटले आहे त्याने राजकारणाच्या विकासाचे तीन भाग पाडले.

१) असंस्कृत, कृत्रिम किंवा अपरिष्कृत

२) सुसंस्कृत अत्याधुनिक किंवा परिष्कृत

३) अधिक सुसंस्कृत किंवा बुध्दीपूर्ण परिष्कृत

पहिल्या भागात ॲरिस्टॉल, मॉटेस्क्यू, मॅकेव्हेली, ब्राईली इत्यादी शास्त्रज्ञांचा समावेश होतो. दुसऱ्या भागात व्हीयर, मॅक्रेडीज आणि उलम या शास्त्राज्ञांचा समावेश होतो. आणि तिसऱ्या भागात डेव्हिड ईस्टन, रॉबर्ड ढाल्ह, कौलमेन, अल्मंड, पॉवेल, डयूस आणि ब्लॉन्डेल या राज्यशास्त्रज्ञांचा समावेश होतो.

अशाप्रकारे तुलनात्मक राजकारणाच्या विकासाचा विचार करतांना या विषयाची उत्क्रांती तीन अवस्थांमधुन झाल्याचे दिसून येते.

१) पहिल्या महायुध्दापूर्वी झालेला विकास- प्राचीन ग्रीक विचारवंत ॲरिस्टॉटल इ.स पूर्व ३८४ ते ३२७ वर्षे या कालखंडात The Politics ग्रंथात राज्याच्या तौलनिक अध्ययनास सुरूवात केली. त्याने राजकीय निर्णय घेणाऱ्यांची संख्या आणि सत्तेचा वापर करण्याचा उददेश या आधारे राज्याचे तीन शुध्द प्रकार आणि तीन अशुध्द प्रकार असे एकूण सह प्रकार पाडले. राजतंत्र, महाजनसत्ता आणि प्रजातंत्र तीन शुध्द प्रकार तर हुकूमशाही, अल्पजनसत्ता आणि समूहतंत्र हे तीन अशुध्द किंवा विकृत प्रकार त्याने मानले होते. लिपसेटने १९६० मध्ये आपल्या Political Man या ग्रंथात याचाच सखोल अभ्यास केला.

ॲरिस्टॉलनंतर इ.स पूर्व २०१ ते १२० या कालखंडात पॉलिबिअस आणि सिसेरोने तुलनात्मक राजकारणाचे क्षेत्र अधिक व्यापक केले मात्र उल्लेखनीय अशी भर त्यांनी अभ्यासात घातली नाही. इ.स. १४६१ ते १५२७ च्या दरम्यान युरोपच्या पुनर्जागरण कालखंडात मॅकॅव्हेलीने इटली व इतर राज्याच्या राजकारणाचा तुलनात्मक अभ्यास केला. त्याने (Political Behaviour) राजकीय व्यवहार हया शब्दाचा स्पष्ट उल्लेख करून अनुभवाच्या आधारावर ढहश झीळपलश या ग्रंथातून तौलनिक राजकारणाचा सखोल अभ्यास केला.

१६ व्या शतकात फ्रेच राज्यशास्त्रज्ञ जीन बोडीन ने इ.स. १५३० ते १५९६ मध्ये ॲरिस्टॉटल आणि मॅकॅव्हेलीच्या तुलनात्मक राजकारणाच्या अभ्यासाचा विस्तार केला. मॉटेस्क्युने व्यवहारवाद आणि बुध्दीवादाच्या आधारवर असे स्पष्ट केले की, मानवी संस्था, परंपरा आणि कायदा यांची निर्मिती दैवी सिध्दांतानुसार झाली नाही. या प्रक्रियांचा विकास होतांना त्याच्या यशापयशाच्या अभ्यासासाठी तुलनात्मक पध्दतीचा आधार का व कसा घ्यावा लागतो हे मॉटेस्क्यूने स्पष्ट केले. तसेच तौलनिक विश्लेषणाच्या आधारावरच राजकीय पध्दतीचे वर्गीकरण करता येते. राजकारण हे समाज व अर्थव्यस्थेशी प्रत्यक्ष संबंधित असते या गोष्टीचाही त्याने तौलनिक राजकारणाच्या अभ्यासात विचार केला. मॉटेस्क्यूनंतरच्या इतिहासवादाच्या काळात इतिहासाचे सुक्ष्म निरिक्षण करून आदर्शवादी विचारवंत हेगेलने ऐतिहासिक परिस्थिती व तत्कालीन शासन व्यवस्था यांचे अध्ययन करून भविष्यकाळात प्रजातंत्र पध्दतीचा उदय होण्याची शक्यता वर्तविली होती.

रॉय मॅक्रिडिज, ऑगस्त कॉम्ट, लेमार्क, डार्विन, बेजहॉट, सेव्हिनी हर्डर या निरनिराळ्या देशातील शास्त्रज्ञांनी राजकारणाच्या तौलनिक अभ्यासाला चालना दिली. एकोणिसाव्या शतकात अमेरिकन शास्त्रज्ञांनी आदर्शात्मक आणि वर्णनात्मक दृष्टीने फरक करून विभिन्न देशातील सरकारांच्या तौलनिक अभ्यासाला सुरूवात केली.

२) पहिल्या महायुध्दानंतर झालेला विकास – तुलनात्म राजकारणाच्या अध्ययनाला खऱ्या अर्थाने परिपक्वता पहिल्या महायुध्दानंतर आली. या काळात या अभ्यासशाखेचे अध्ययन केवळ युरोप खंडांपुरतेच न राहता पूर्व आणि लॅटिन अमेरिका, चायना, जपान ब्रिटिश राष्ट्रकुल संघातील देश या सर्वच क्षेत्रात सुरू झाले. फायनर, सेंट, फ्रेडरिच यांच्या ग्रंथामधून तुलनात्मक अध्ययनाच्या वाढत्या विकासाचे महत्व कळते. कालांतराने फिनलॅड, घाना, चिली, थायलंड या नव्या देशातील शासनपध्दतीचा तौलनिक दृष्टया अभ्यास करून हेचर आणि लिव्ही या राज्यशास्राज्ञांनी तौलनिक राजकारणाच्या अभ्यासात मोलाची भर घातली.

आधुनिक राजकीय समाजशास्त्रज्ञ गटानु मोस्का, विल्फ्रेड पॅरेटो, मिचेल्स यांनी विश्लेषमात्मक पध्दतीचा वापर करून तौलनिक कायदे अंमलात आणण्यासाठी नविन तंत्राचा विकास केला आणि दबावगट, राजकीय पक्ष, हितसंबंधीगट या नवीन संकल्पनांच्या अभ्यासाला महत्व दिले. राजकीय सिध्दांत मांडण्यासाठी आधुनिक संशोधनाच्या तंत्राचा वापर करण्याची गरज या विचारकांनी प्रतिपादन केली.

३) दुसऱ्या महायुध्दानंतर झालेला विकास – नव्यानेच स्वतंत्र झालेल्या राज्यामध्ये लोकशाही शासनव्यवस्था अयशस्वी ठरण्याची कारणे कोणती? नविन उदयास आलेल्या

शासनव्यवस्था अस्थिर स्वरूपाच्या कां आहेत? त्या देशांमध्ये स्थिर किंवा कायम स्वरूपी शासन कसे निर्माण होऊ शकेल? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधणे अतिशय महत्वाचे होते. अभ्यासकांसमोर तौलनिक राजकारणापुढील हे एक आव्हान ठरले आणि दुसऱ्या महायुध्दानंतर राजकीय परिवर्तनास गती मिळली.

अमेरिकन शास्त्रज्ञ अल्मंड व पॉवेल यांनी दुसऱ्या महायुध्दानंतर औपचारिकतेच्या विरूध्द तौलनिक राजकारणाचा अभ्यास सुरू केला. त्याचाच परिणाम तौलनिक राजकारणाचा संरचानात्मक कार्यवाद उदयास आला. आणि राजकीय समाजशास्त्राचा प्रभाव तौलनिक राजकारणाच्या अभ्यासात वाढू लागला. त्याचबरोबर डेव्हिड ईस्टनने आदान-प्रदान-प्रत्यादन सिध्दात प्रस्तुत करून राजकीय दृष्ट्या तौलनिक अध्ययनास अतिमहत्व प्राप्त करून दिले. आणि तौलनिक राजकारण या अभ्यास शाखेला शास्त्रीय स्वरूप प्राप्त झाले.

वर्तमान स्थितीत तौलनिक राजकारणाचा अभ्यास करतांना हेन्री एकस्टिन म्हणतो या अभ्यास शाखेत खालील गोष्टींचा अंतर्भाव प्रामुख्याने करण्यात येतो.

१) राजकीय अध्ययनासाठी प्रयोग करता येणे शक्य आहे काय? तौलनिक विधी प्रक्रियांची उपयोगिता सीमीत आहे काय? तौलनिक अध्ययन कोणत्या प्रकारच्या अध्ययनाला म्हणावे आणि त्यापासून आपणास कितपत ज्ञान प्राप्त होते. इत्यादी प्रश्नांचा यांत समावेश होतो.

२) राजकीय निर्णय प्रक्रियेत भाग घेणाऱ्यांची संख्या किती आहे. यावरून तौलनिक राजकारणामध्ये राज्याच्या वर्गीकरणासंबंधीच्या प्रश्नांचे उत्तरे शोधणे. असे अनेक प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न या अभ्यास शाखेद्वारे होऊ शकतात.

वल्ड आणि मॉक्रिडीज यांच्या मते तौलनिक राजकारणाचा अभ्यास करतांना अमेरिका व युरोप यांनी प्रस्थापित केलेले साचे तितकेसे उपयोगी नाहीत तर तौलनिक राजकारणाच्या पध्दतीत गैरपाश्चात्य देशातील शासनपध्दती, त्यांनी निर्माण केलेल्या राजकीय प्रक्रिया त्यांचे राजकीय व्यवहार, त्यांची कार्ये यांचाही समावेश करावयास पाहिजे. त्यात राजकीय पध्दती, राजकीय संस्कृती व सामाजिकीकरण राजकीय आधुनिकीकरण व विकास राजकीय परिवर्तन व क्रांती, राजकीय सहभाग, हितसमुह व राजकीय पक्ष इत्यादी गोष्टींचा तौलनिक दृष्ट्या अभ्यास करण्यास येतो. किंबहुना तुलनात्मक राजकारणाच्या अभ्यासाचे हे महत्वाचे पैलू आहेत. यापैकी कोणताही एक पैलू घेऊन त्याचा अनेक राष्ट्रांची उदाहरणे समोर ठेवून त्यांच्यातील समानता आणि असमानतेच्या मुद्यांशी तुलना केली जाऊ शकते. व तुलना करतांना तथ्य आणि आकडे गोळा करावे लागतात. म्हणून तुलनात्मक राजकारणाचा अभ्यास वैज्ञानिक पध्दतीने केल्या जातो. वाल्ड आणि मॅक्रिडिज यांनी खऱ्या अर्थाने वर्तमान स्थितीतील शासनाचा अभ्यास करून तौलनिक राजकारणाच्या अभ्यासाला चालना दिली.

### १.२.४ तुलनात्मक राजकारणाची व्याप्ती -

तौलनिक राजकारणाच्या अभ्यासाचा मुख्य विषय राजकीय व्यवस्था हा असल्यामुळे तौलनिक राजकारणाने अभ्यासक्षेत्र शासनाकडून राजकीय व्यवस्थेंकडे विकसित केले. पारंपरिक राज्यशास्त्रज्ञ आणि आधुनीक राज्यशास्त्रज्ञांमध्ये या विषयाच्या व्याप्ती बाबत मत मतांतरे आढळतात. जीन ब्लॉण्डेलने या मतांतराशी दोन गोष्टी संबंधित असल्याचे मानले जाते.

१)  सीमा संबंधीचा विवाद – २) नियम, प्रमाणक आणि व्यवहारासंबंधीच्या विषयामधील वाद.

१)  सीमा संबंधीचा विवाद – परंपरावादी राज्यशास्त्रज्ञांनी विधीविषयक दृष्टिकोनाचे समर्थन केले आहे.या दृष्टिकोनानुसार तौलनिक राजकारणामध्ये संविधानाद्वारे स्थापित शासनाच्या विभिन्न अंगाची (घटकांची) तुलना कायदेशीर दृष्ट्या व्हावयास पाहिजे याउलट व्यवहारवादी दृष्टिकोनाचे समर्थक राजकीय व्यवस्थांच्या अभ्यासासाठी शासन संबंधी औपचारिक घटकांची तुलना आवश्यक न मानता गैरराजकीय व्यवस्थांच्या अभ्यासाला महत्व देतात. अनौपचारिक संस्थांचा, घटकांचा अभ्यास ते आवश्यक मानतात.

२)  नियम, प्रमाणके आणि व्यवहारासंबंधीच्या विषयांमधील विवाद – हा विवाद सीमासंबंधी विवादाशी संबंधित आहे. प्रमाणकांचा संबंध संविधानाद्वारे प्रमाण नियमांशी असतो, तर व्यवहाराचा संबंध नियमांच्या वास्तविक कार्यकारणाशी असतो, परंपरावादी राज्यशास्त्रज्ञ संविधानिक नियमांना या अभ्यासासाठी जास्त महत्व देतात तर तौलनिक राजकारणाचे नवे अभ्यासक प्रमाणकांपेक्षा, नियमापेक्षा वास्तविक राजकीय व्यवहारांना जास्त महत्व देतात, ज्याचा संविधानिक नियमांशी मेळ बसत नाही.

तौलनिक राजकारणाच्या व्याप्तीसंबंधी असा विवाद असला तरी वर्तमान परिस्थितीत या विवादाला महत्व राहिलेले नाही. सर्वसामान्यपणे या अध्ययन क्षेत्रात संविधान, शासनाच्या औपचारिक संस्था कायदेमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका याशिवाय राजकीय पक्ष, दबावगट, निर्वाचन प्रक्रिया, मतदारवर्तन, राजकीय संस्कृती, राजकीय परिवर्तन, राजकीय आधुनिकीकरण, लोकप्रशासन इत्यादी विषयांचा तौलनिक अभ्यास समाविष्ट आहे. याचाच अर्थ असा की, तौलनिक शासनाचा संबंध राज्याच्या कायदाक्षेत्राशी आणि प्रक्रियांशी तसेच अंत:र्क्रियांशी येतो. त्यामुळे या अभ्यासशाखेचे क्षेत्र अधिकाधिक विस्तारित झाले आहे. अलीकडे तौलनिक राजकारणाच्या अध्ययन क्षेत्रामध्ये बऱ्याच विषयाचा समावेश होऊन या विषयाची व्याप्ती वाढल्याचे दिसते.

राजकीय व्यवस्थेतील समस्या जाणून घेऊन सार्वजनिक हितांसाठी निर्णय घेतले जातात. व ते कार्यान्वित केले जातात. उदा. कोणत्याही राज्याचा, शासन हा राजकीय व्यवस्थेतील अविभाज्य भाग असल्यामुळे औपचारिक, अनौपचारिक दोन्ही घटकांचा शासनासंबंधीत प्रक्रियांमध्ये अंतर्भाव होत असतो. जसे समाजाचा ऐतिहासिक वारसा, भौगोलिक साधन संपत्ती, सामाजिक व आर्थिक संघटना, नेतृत्व रचना इत्यादी सर्वाचे मिळून जे पर्यावरण (वातावरण) बनते तोच राजकारणाचा आधार असते, राजकीय व्यवस्थेतील हे आधार व शासनाची अंगे यांच्यात ज्या आंतर्क्रिया होत असतात, त्यातूनच राजकारणाचे गतीविज्ञान (Dynamics of Politics) निर्माण होते.

तुलनात्मक शासनाच्या अध्ययनाचा संबंध पर्यावरणाशी येतो. कारण प्रत्येक राज्याच्या धोरणाच्या प्रक्रियेमध्ये त्या राज्याची भौगोलिक रचना, राजनैतिक मूल्य, विचारप्रणाली आणि राजकीय संस्कृती यांना महत्वाचे स्थान असते. हीच मूल्ये राजकीय पर्यावरणाशी संबंधित असतात. धर्म, शिक्षण, संसूचन माध्यमे याद्वारे ते कार्यान्वित होत असतात.

तुलनात्मक राजकारणाच्या अभ्यासात विविध राजकीय संरचनांच्या अभ्यासासोबतच अराजकीय संस्था आणि त्या संस्थाचा राजकीय व्यवस्थांवर होणारा परिणाम याचाही अभ्यास होतो. तसेच विकसनशील समाजाच्या अध्ययनावरही या अभ्यासशाखेने भर दिला आहे. तौलनिक राजकारण हे पाश्चिमात्य, गैरपाश्चात्य आणि साम्यवादी देशांच्या संविधानिक व्यवस्थांच्या अध्ययनांवरच जास्त भर देते.

या अभ्यासशाखेमुळे अनेक नवीन संकल्पना आणि सिध्दांत उदयास आले. सिध्दांत निर्मितीला आणि विकासाला संकल्पना पुरक ठरतात. अभ्यासक अशा संकल्पनांचा बौध्दिक दृष्ट्या उपयोग करतात व राजकीय सिध्दांताची मांडणी करतात. उदा. राजकीय श्रेष्ठजन सिध्दांन अनेक सत्तावादी सिध्दांत वगैरे, तसेच या अभ्यासाशाखेत राजकीय विचारप्रणाली आणि राजकारण याला महत्वाने स्थान प्राप्त झाले आहे. विचारप्रणाली आणि राजकारणाचा संबंध – असे लक्षात येते की, राजकीय संस्थांची संरचना आणि कार्ये हे त्या त्या देशातील राजकीय विचारप्रणालीवर आधारित असतात. त्याठिकाणी असलेल्या कायदानिर्मिती प्रक्रिया, प्रशासकीय आणि न्यायिक प्रक्रिया या सर्वाच्या मुळाशी राजकीय प्रक्रिया असते. राज्य आणि व्यक्ती यांच्यातील संबंध हाच या प्रक्रियांचा आधार असतो. मतदानव्यवहार, राष्ट्रीयीकरण सामाजिक कल्याण इत्यादी समस्यांचे निराकरण व्यक्ती आणि राज्य यांच्या परस्पर संबंधाच्या आधारे करता येते. अधिकृत विचारप्रणालीचा आधार घेऊनच संबंधित देशातील राजकारणाचा अभ्यास केला जातो. राजकारणाच्या संदर्भात राजकीय शक्ती, हितांचे संकलनीकरण, सत्ता, अधिमान्यता, राजकीय घडामोडी, राजकीय इतिहास, निर्णय निर्धारण प्रक्रिया, राजकीय श्रेष्ठजन इत्यादीचा अभ्यास तौलनिक शासनामध्ये होतो. याशिवाय समाजशास्त्र, अर्थशास्त्र, जीवशास्त्र इत्यादी विषयांचा अभ्यास या तौलनिक राजकारणाच्या अभ्यासात महत्वाचा मानून आंतरशास्त्रीय अभ्यासाच्या विकासाला चालना मिळाली आहे.

राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी या अभ्यासाद्वारे उपदेशात्मक कार्य न करता वस्तुस्थिती विश्लेषण करून समाजासमोर ठेवावी हा दृष्टिकोन समोर ठेवला आणि तौलनिक राजकारणाच्या अभ्यासाची व्याप्ती वाढवली. युरोप व अमेरिकेच्या अवर्तनातुन त्यास बाहेर काढले. राजकीय सिध्दांतास खऱ्या अर्थाने जागतिक, राजकीय सिध्दांत केले. व्यापकता आणण्यासाठी ज्या देशांचा अभ्यास केला तेथे काल्पनिकतेला स्थान नसून वास्तविकतेला महत्व आहे हे शास्त्रीय निष्कर्षानुसार सिध्द केले.

या शाखेच्या अभ्यासकांनी राजकीय तत्वज्ञानापेक्षा आपली स्वतंत्र ओळख दाखविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी राजकीय सिध्दांतातील अमूर्त संकल्पनांचा त्याग केला व त्या ऐवजी मूर्त तथ्यांवर लक्ष केंद्रित केले. पूर्वीची पारंपरिक अभ्यास पध्दती सोडून देऊन आधुनिक, शास्त्रीय प्रयोगात्मक पध्दतीचा स्वीकार केला. राज्यशास्त्र व प्रत्यक्ष राजकारण याचा संबंधच नव्हता कारण राज्यशास्त्र पुस्तकी होते तर राजकारण व्यवहारी होते. अभ्यासकांनी विश्लेषण पध्दतीद्वारे व्यवहारी राजकारणातील प्रवाह शोधून सिध्दांत मांडण्याचा प्रयत्न केला म्हणून तौलनिक राजकारणाच्या अभ्यासकांचा असा दावा आहे की, पूर्वीचे राज्यशास्त्र तत्वज्ञानात्मक होते तर आजचे प्रत्यक्ष अनुभवावार, पूर्वीचे काल्पनिक होते तर आजचे शास्त्रीय, पूर्वीचे संस्थात्मक होते तर आजचे कार्यात्मक, पूर्वीचे वर्णनात्मक होते तर आमचे विश्लेषणात्मक आहे आणि म्हणूनच शास्त्र या संज्ञेस ते पात्र आहे.

लोकशाही शासन व्यवस्थेत जनतेचा सहभाग वाढल्यामुळे सहभागामागील प्रेरणाचा अभ्यास करणे आवश्यक झाले आणि हा अभ्यास प्रत्यक्ष पाहणी  पध्दतीने करून निष्कर्ष काढणे आवश्यक झाले. यासाठी अभ्यासकांनी विश्लेषणात्मक पध्दती चा अवलंब केला व त्याद्वारे राजकारणातील आकार देणऱ्या घटकांची माहिती गोळा करून, त्याच माहितीचे विश्लेषण करून सर्वसाधारण विधाने तयार करण्यात येऊ लागली. त्यापैकी एक विधान किंवा प्रश्न घेऊन सखोल अभ्यास करणे सोयीचे झाले. अशा रीतीने या अभ्यासशाखेची व्याप्ती सतत वाढत गेली.

## १.२.५ तुलनात्मक राजकारणाच्या अध्ययनाचे महत्व -

या अध्ययन पध्दतीद्वारे विभिन्न प्रकारच्या शासन पध्दती शासनाचे निर्णय, निणर्याना प्रभावित करणारे घटक यांचा अभ्यास केला जातो. या अध्ययन शाखेमुळे राजकारणाच्या अभ्यासासाठी स्वतंत्र अशी निर्मिती तयार करण्यात आली. उदा. आदान, प्रदान, प्रत्यादान, मूल्ये, अधिकार, अधिमान्यता, प्रदत्त विधीविधान कायद्याची अधिसत्ता, नियंत्रण-संतुलन सिध्दांत, अधिसत्ता, संज्ञापन अशा अनेक नविन शब्दांचा वापर करण्यात आला. तौलनिक राजकारण मूल्यरहीत विश्लेषणावर भर देते. तसेच राजकारणावर परिणाम करणाऱ्या अराजकीय गोष्टींचीही दखल घेते.

या अभ्यास शाखेने शासनाच्या विश्लेषणाचे पूर्वीचे राज्यशास्त्रीय स्वरूप नाकारून वास्तविकता स्पष्ट करण्यास सुरूवात केली. म्हणजेच राजकारणाचे विश्लेषण करण्याचे कार्य तौलनिक राजकारणाच्या अभ्यासकांनी चालू ठेवले फक्त विश्लेषण करणे सोडून दिले. त्यामुळे त्याचे महत्व वाढले.

तुलनात्मक राजकारणाच्या अभ्यासात विकसित, विकसनशील व अविकसित अशा राष्ट्रातील सरकारे, त्यांची धोरणे यांचा शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करून राजकीय सिध्दांत मांडले जातात. हे सिध्दांत भविष्यकाळातही उपयोगी ठरत असतात. म्हणून शैक्षणिक तसेच व्यावहाहिक दृष्ट्या हा अभ्यास महत्वाचा ठरतो.

तुलनात्मक राजकाणाच्या अभ्यासामुळे विकसित देशातील नागरिक आज राजकीय क्षेत्रात मोठया प्रमाणात सक्रिय झालेले आहेत. राजकीय सहभागाचे प्रमाण सर्वत्र वाढल्याचे दिसू लागले आहे. जनता देखील स्वत:च्या मागण्या व समस्याचे निराकरण तत्परतेने व्हावे या भावनेने शासनाकडून अपेक्षा करू लागली आहे. त्यामुळेच राजकारणाच्या अभ्यासाला नवी दिशा मिळाली आहे.

राजकारणाला शास्त्रीय स्वरूप बहाल करणे, त्यात व्यवहार्यता आणणे, पूर्वी प्रस्थापित केलेले राजकीय सिध्दांत पडताळून पाहणे, त्याची यथार्थता सिध्द करणे, त्यासाठी आधुनिक संशोधन तंत्रांचा पध्दतीचा सामग्रीचा शोध लावणे, शासनाच्या प्रमुख अंगामध्ये पारस्परिक संबंध निर्माण करणे या दृष्टीने तौलनिक राजकारणाच्या अध्ययनाला अधिकधिक महत्व प्राप्त झाले आहे.

राजकारणामधील राजकीय घडामोडी, प्रक्रिया, राजकीय शक्ती यांचा अभ्यास तौलनिक राजकारणात केला जातो तो असा की, अन्य विविध देशांमध्ये राजकीय सामाजिकीकरणाच्या

विभिन्न पध्दती कशाप्रकारे कार्य करतात? निरनिराळ्या देशामध्ये अधिकाऱ्यांची भरती पदोन्नती पदावनती याच्या पध्दतीचा तौलनिक अभ्यास तसेच प्रजातंत्रीय देश, हुकुमशाहीवादी देश, अध्यक्षप्रधान देश यांच्यातील कायदे निर्माण करण्याच्या पध्दतीची तुलना, कायदे अमंलात आणण्याच्या पध्दतींची तुलना वादविवाद सोडविण्याच्या पध्दती यांच्यातील तुलनात्मक अभ्यास केला जातो.

विविध देशातील परिवर्तनाचे प्रकार, विकासाचे विविध दृष्टिकोन यांचा विश्लेषणात्मक पध्दतीने अभ्यास करणे तसेच या अभ्यासाला शास्त्रीय स्वरूप प्राप्त झाल्यामुळे काही प्रमाणात विश्लेषणात्मक व अनुभवजन्य पध्दतीमुळे भविष्यकथनही केल्या जाऊ शकते. विभिन्न सामाजिक संस्थामध्ये अंतर्गत संबंध प्रस्थापित करण्याची, त्यांच्यातील जे जे चांगले आहे ती स्वीकारण्याची प्रवृत्ती असल्यामुळे आणि इतर अनेक महत्वाच्या कारणामुळे तुलनात्मक राजकारण हा एक महत्वाचा अभ्यास विषय बनला आहे.

जसजसे राजकारणाचे महत्व वाढत आहे तसतसे तुलनात्मक राजकारणांच्या अभ्यासाचा वेग व महत्त्व वाढत आहे. विशेषत: तिसऱ्या जगातील नव्याने निर्माण झालेल्या राज्यांना असा अभ्यास मार्गदर्शक ठरत आहे. आपल्या देशातील समस्यासाठी दुसऱ्या देशाची पध्दती अभ्यासून आपल्या समस्यांचे उत्तर शोधणे हा प्रयत्न या शाखेच्या अभ्यासातून केल्या जाऊ शकतो.

## १.२.६ तुलनात्मक राजकारणातील तुलनेचे आधार –

तौलनिक राजकारणाने राजशास्त्रीय अभ्यासात स्वतंत्र अनुशास्त्राचे पद प्राप्त केले आहे. तौलनिक राजकारण कला नाही परंतु राजकारण मात्र कला आहे म्हणूनच तौलनिक राजकारणाचे अध्ययन क्षेत्र अतिव्यापक झालेले आहे. त्यात राजकारण सर्व पैलू, शासनाची विभिन्न अंगे, शासनाच्या क्रिया प्रक्रिया राजकीय पध्दतीची वैशिष्टये या सर्वांचा अभ्यास अंतर्भूत आहे. या अभ्यासात तुलना करण्यावर भर दिल्या जातो. त्यात पैलूंच्या रूपात अधिकाधिक राज्यांची सरकारे, राजकीय पध्दती, शासनाची अंगे, शासनावर प्रभाव टाकणारी परिस्थिती, सामाजिक आर्थिक व्यवस्था, राजकीय संस्कृती, सामाजिकरण, राजकीय पक्ष, दबावगट, जनसंचाराची माध्यमे, लोकमताची साधने, निर्णय निर्धारण पध्दती, राजकीय व्यवहार, निर्वाचन अभियान, मतदानाचे प्रकार आणि मतदानाच्या पध्दती इत्यादीचा अंतर्भाव होतो. मुख्यत: कोणत्याही एका विशिष्ट पैलूंच्या आधारे निरनिराळ्या देशात होणाऱ्या राजकीय व्यवहारांची तुलना करणे आणि त्या तुलनांमधून उपयुक्त असे निष्कर्ष काढणे अतिशय महत्वाचे ठरले आहे.

### तुलनेचे दोन आधार प्रामुख्याने सांगितले जातात.

१) लंबात्मक (Vertical) २) अलंबात्मक किंवा समस्तरीय या आधारावरच निरनिराळ्या देशातील सर्व प्रकारच्या संस्थांची तुलना करुन सर्व सामान्य निष्कर्ष काढणे हाच तौलनिक राजकारणाच्या अभ्यासाचा मूळ हेतू असतो. आणि ते निष्कर्ष शास्त्रीय पध्दतीने सिध्दांत रूपात मांडण्यावर अभ्यासकांचा भर असतो.

**तौलनिक राजकारणाची वैशिष्ट्ये -**

१) अधिक विस्तारपूर्ण क्षेत्र व वास्तविकतेचा शोध घेणे, की ज्यामुळे तुलनात्मक राजकारण हे वैज्ञानिक आहे याचेच द्योतक ठरते, कारण शास्त्रशुध्द विश्लेषणावर यात भर दिला जाते.

२) विश्लेषण पध्दती वापरून विवेचन केले जाते तसे अनुभवजन्य व व्यवहारवादी उद्दिष्टांचा अंगिकार केल्या जातो.

३) अन्य सामाजिक शास्त्रासोबत राजकारणाचा निकट संबंध प्रस्थापित करणे. म्हणूनच तौलनिक राजकारणाच्या अभ्यासात शासन हे एक महत्वापूर्ण अंग आहे. शासनाच्या कायद्याच्या प्रक्रिया आणि इतर प्रक्रिया यांचा अभ्यास राजकारणात समाविष्ट असतो. उदा. निर्वाचन मंडळ प्रशासन आणि न्यायालयीन कामकाजातील अंतरक्रिया शोधून काढणे व त्यांची उत्तरे शोधणे भुतकाळात राजकारणात लक्षात घेतल्या जात आहे. तौलनिक अभ्यासाचा आरंभच सामाजिक पर्यावरणापासून होतो ज्याला आपण राजकारणाची पार्श्वभूमी म्हणू शकतो.

एकंदरीत सामाजिक मूल्ये राजकारणावर परिणाम करतात. तसेच समाजरचना राजकारणास वळण देते या गोष्टी आता मान्यता पावत चालल्या आहेत. 'सामाजिक मान्यता बदलल्या शिवाय नागरिक होता येत नाही' हे सिध्द झालेले आहे. राजकारणाचे अभ्यासक आता राजकीय समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून अधिकाधिक अभ्यास करताना दिसतात.

## १.३ सारांश

राज्यशास्त्रात तुलनात्मक अभ्यास काही नवीन आणि क्रांतीकारी पाऊल नाही. जेंव्हापासून राजकीय व्यवहार व राज्यशास्त्राचा अभ्यास प्रारंभ झाला तेव्हापासून तुलनात्मक अभ्यास होत आहे. तुलनात्मक राजकारणाचा संबंध राजकीय व्यवहाराच्या संपूर्ण अभ्यासाशी संबंधित आहे. यामध्ये सरकार आणि राजकीय संस्थांचा तुलनात्मक अभ्यास समाविष्ट असतो. तुलनात्मक राजकारणात तुलनात्मक सरकार आणि गैरशासकिय राजकारण जात, संप्रदाय, आणि गैर-राजकीय संघटनांच्या राजकारणाचाही अभ्यास करण्यात येतो. तुलनात्मक राजकारणाच्या अभ्यासामुळे आपल्या देशातील, देशाच्या बाहेरील तसेच आंतरराष्ट्रीय राजकारण व राजकीय व्यवहार या संदर्भातील माहिति प्राप्त होण्यास मदत होते.

## १.४ सरावासाठी प्रश्न

१) तुलनात्मक राजकारणाचा अर्थ स्पष्ट करा.

२) तुलनात्मक राजकारणाचा विकास सांगा.

३) तुलनात्मक राजकारणाची व्याप्ती स्पष्ट करा.

४) तुलनात्मक राजकारणाच्या अध्ययनाचे महत्व सांगा.

## १.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) Almond, G.A.(1966) Comparative Politics : A Developmental Approach, Boston : Little Brown Co.

२) गेना, सि.बी.(१९७८) तुलनात्मक राजनीति एवं राजनीतिक संस्थाए, नई दिल्ली : विकास पब्लिशिंग

३) येरणकर, श्रीराम (२००५) तुलनात्मक शासन आणि राजकारण, नागपूर, साईनाथ प्रकाशन

४) देवगांवकर, एस.जी. (२०१४) तुलनात्मक शासन आणि राजकारण, नागपूर : साईनाथ प्रकाशन.

--------------

२

# घटक २ – सैद्धातिक मांडणीः व्यवस्था सिद्धांत, रचनात्मक कार्यवाही सिद्धांत, पराधीनता सिद्धांत, विशेष साम्य आणि भेद दर्शविणारे तुलनात्मक प्रारुप

**अनुक्रमाणिका**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय विवेचन
  २.२.१ व्यवस्था सिद्धांत
  २.२.२ रचनात्मक कार्यवाही सिद्धांत
  २.२.३ पराधीनता सिद्धांत
  २.२.४ विशेष साम्य आणि भेद दर्शविणारे तुलनात्मक प्रारुप
२.३ सारांश
२.४ सरावासाठी प्रश्न
२.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला :

१) व्यवस्था सिंध्दात म्हणजे काय हे स्पष्ट करता येईल.

२) रचनात्मक कार्यवाही सिद्धांताचे वर्णन करता येईल.

३) पराधीनता सिद्धांताचे प्रतिपादन करता येईल.

४) राजकीय व्यवस्थांमधील विशेष साम्य आणि भेद दर्शविणारे तुलनात्मक प्रारुप सांगता येईल.

## २.१ प्रास्ताविक

आधुनिक राज्यशास्त्रात शासन व राजकारण यांचा अभ्यास कसा करावा या दृष्टिने काही नव्या पद्धतींचा व सिद्धांतांचा अवलंब करण्यात आलेला आहे. यामध्ये विविध सिद्धांत आणि दृष्टिकोनांचा अभ्यास करण्यात येतो. प्रस्तुत घटकात व्यवस्था सिद्धांत, रचनात्मक कार्यवाही सिद्धांत आणि पराधीनता सिद्धांत यांचे विवेचन करण्यात आलेले आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ व्यवस्था सिद्धांत (System Theory)

व्यवस्था सिद्धांत हा राज्यशास्त्राचा खुप जुना सिद्धांत नसून त्याचा उदय द्वितीय महायुद्धानंतर विश्लेषणाच्या अनुषगांने झालेला दिसून येतो. मुख्यतः या सिद्धांताला अमेरिकन विद्वानांचे योगदान प्राप्त झाले. डेव्हिड ईस्टन, गॅब्रिअल अल्मंड आणि मिचेल हे राज्यशास्त्रज्ञ व्यवस्था सिद्धांताचे अभ्यासक मानले जातात.

राजकीय व्यवस्था ही एक वेगळ्या प्रकारची व व्यापक स्वरुपाची सामाजिक संघटना होय. समाजातील सर्व राजकीय क्रिया व घडामोडी यांच्याशी राजकीय व्यवस्थेचा संबंध येतो. अशा या क्रिया व घडामोडी यांचे स्थान समाजात कोठेही असु शकते.

**काही व्याख्या :-**

**डेव्हिड ईस्टन :-** अधिकृत निर्णय घेऊन त्याची बंधनकारक रितीने अमंलबजावणी करण्याचा अधिकार प्राप्त अशा कुठल्याही समाजातील क्रिया प्रतिक्रियात्मक व्यवस्थेला ''राजकीय व्यवस्था'' असे म्हणता येईल.

**गॅब्रिअल अल्मंड :-** राजकीय व्यवस्था ही अशी क्रिया-प्रक्रियात्मक व्यवस्था असते ही जिचा सर्व स्वतंत्र समाजात स्वीकार होत असून ती संकलन व जुळणीची कार्ये पार पाडीत असते व याकरिता मान्यताप्राप्त पाशवी बळाचा वापर किंवा कमी अधिक प्रमाणात त्याचा धाक निर्माण करण्याचा अधिकार तिला प्राप्त झालेला असतो.

**राबर्ट ढाल्ह :-** राजकीय व्यवस्था ही मानवी संबंधाची अशी अर्थपूर्ण निश्चित पद्धती होय की जिच्या घडणीत सातत्याने शक्ती, शासन व सत्ता ह्या गोष्टी अनुस्युत (अतंर्भूत - सामाविष्ट) झालेल्या असतात.

**मॅक्स वेबर :-** राजकीय व्यवस्था म्हणजे असा मानवी समुदाय की ज्यास विशिष्ट भूप्रदेशावर स्वाभाविक व मान्यतापूर्वक पद्धतीने बळाचा वापर करण्याची मक्तदारी प्राप्त झालेली असते.

**राजकीय व्यवस्थच्या कार्यपद्धतीचे स्वरुप :-** व्यवस्था विश्लेषणवादी दृष्टीकोनातून डेव्हीड ईस्टन आणि गॅब्रिएल एल्मंड यांनी दोन नमुने मांडलेले आहे.

**डेव्हिड ईस्टनचा नमुना (प्रारुप)** :- कोणत्याही देशातील राजकीय व्यवस्थेवर त्या देशात जे वातावरण असेल त्याचा परिणाम होत असतो. अशा परिस्थितीशी राजकीय व्यवस्था जुळवून घेत असते. राजकीय व्यवस्थेला स्वतःचे अस्तित्व टिकवायते असते, म्हणून त्यासाठी राजकीय व्यवस्थेची उद्दिष्टये व अंतर्गत रचना यात नेहमी बदल करण्याचा प्रयत्न व्यवस्था करित असते.

राजकीय व्यवस्थेला लोकांकडून कधी पाठींबा तर कधी विरोध केला जातो व आव्हाने दिली जातात. जनतेकडून मागण्यांची निर्मिती होत असते. अशा या मागण्यांना व पाठिंब्याला ''आदान'' म्हणतात.

या मागण्या राजकीय व्यवस्थेत शिरल्या की त्या मागण्याचे ''रुपांतर'' (Conversion) होण्याची प्रक्रिया सुरु होते. असे रुपांतर धोरण, कायदे, निर्णय या स्वरुपाचे असते याला ''प्रदान'' (Out put) म्हणतात. प्रदानाच्या स्वरुपात जे निर्णय बाहेत येतात, त्या संबंधात जनतेकडून नवीन प्रकारच्या मागण्या पुढे येतात व त्यांना आदानाचे स्वरुप प्राप्त होते. त्याला ''प्रत्यादान'' (Feed Back) म्हणतात.

अशारितीने राजकीय व्यवस्थेचे कार्य आदान-रुपांतर-प्रदान-प्रत्यादान या चार प्रकारच्या प्रक्रियेद्वारे चालत असते.

**गॅब्रिएल आल्मंडचा नमुना :-** आल्मंड यांच्या मते राजकीय व्यवस्थेला लोकांकडून मान्यता मिळालेली असल्यामुळे राजकीय व्यवस्था कायदेशीर बळ वापरत असते व त्याचा परिणाम समाजावर होत असतो.

राजकीय व्यवस्था ज्या सामाजिक वातावरणात कार्य करीत असते, त्याचा परिणाम राजकीय व्यवस्थेवर होत असतो. समाजातून ''आदान'' म्हणजे मागण्या ह्या राजकीय व्यवस्थेसमोर येऊन ठाकतात व निर्णयाच्या स्वरुपात ''प्रदान'' हे राजकीय व्यवस्थेतून बाहेर पडत असते.

आल्मंड यांच्या म्हणण्याप्रमाणे राजकीय व्यवस्था एका अर्थाने सर्वसमावेशक असते. कारण आदान-प्रदानाशी संबंधित सर्व क्रिया, प्रक्रिया, मोर्चे, आंदोलने, निदर्शने, पक्ष, प्रभावी गट, संसूचनाची साधने अशा सर्वच औपचारिक व अनौपचारिक रचनांचा परिणाम त्यावर होत असतो म्हणुन राजकीय व्यवस्था ही एक सर्वसमावेश स्वरुपाची संघटना मानली पाहिजे.

गॅब्रिएल आल्मंड याने रचनात्मक कार्यवादाच्या दृष्टीकोनातून दिलेले राजकीय व्यवस्थांचे वर्गीकरणः

१) पारंपारिक राजकीय व्यवस्था असलेले देश

२) परिवर्तनशील अवस्थेत असलेल्या राजकीय व्यवस्था

३) आधुनिक राजकीय व्यवस्था

एकंदरीत इंग्लंड व अमेरिका या देशातील राजकीय व्यवस्था ह्या तिसऱ्या प्रकारात म्हणजे आधुनिक राजकीय व्यवस्था या प्रकारात मोडतात.

## व्यवस्था सिद्धांताची व्याख्या आणि अर्थ :-

राजकारण हा शब्द सत्ता किंवा शक्तीचा सूचक असून कोणत्याही देशातील राजकीय व्यवस्थेत आज्ञापालना मागे एक सर्वाभौम शक्ती असते.

डेव्हिड ईस्टनच्या मते, ''राजकीय व्यवस्थेतील सामाजिक आंतरक्रिया आणि व्यवहार यांचा परस्पर संबंध निर्माण होऊन समाजासाठी एक सत्तात्मक मूल्य गठित केले जाते व त्यातूनच राजकीय सिद्धांत व्यवस्थेच्या सिद्धांताला चालना मिळते.'' असा अर्थ ईस्टनने सांगितला आहे.

लॉस्वेल आणि काप्लानच्या मते,''राजकीय व्यवस्था ही राजकीय व्यवस्था आणि इतर सामाजिक व्यवस्थांना विलग करणारी एक गंभीर विवेचना आहे की, ज्यामुळे राजकीय व्यवस्थेचा अभ्यास करणे आवश्यक ठरले आहे.

राजकीय व्यवस्थेची मुख्य वैशिष्ट्ये :-

**गॅब्रिअल अल्मंड नुसार :-**

**१) राजकीय व्यवस्थेची सार्वभौमता :-**

प्राचीन आणि आधुनिक, विकसनशील आणि विकसित, पाश्चात्य आणि गैर पाश्चात्य सर्व राजकीय व्यवस्थांची विशिष्ट राजकीय संरचना असते. त्याचा तौलनिकरित्या अभ्यास केला जातो.

**२) राजकीय संरचनाची सार्वभौमता :-**

राजकीय व्यवस्थेत काही समान संरचना असतात, त्या समान स्वरुपात कार्य करत असतात, राजकीय व्यवस्था विश्लेषणात या सर्व संस्थांच्या संरचनात्मक कार्याला निश्चित स्थान प्राप्त होत असते.

**३) राजकीय कार्याची सार्वभौमता :-**

तौलनिक राजकारणाच्या संबंधाचा अभ्यास केवळ कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ इतकाच सिमित न राहता, विविध उपक्रम संसूचन, प्राधिकरण, विशोधन (दुरुस्त्या), निषेधाधिकार, प्रतिनिधित्व राजकीय पक्ष आणि हितसंबंधी गट यांच्याही संबंधाचा अभ्यास करणे आवश्यक असते. या अभ्यासात व्यक्तिद्वारा राजकीय भूमिकांच्या संबंधाचाही अभ्यास केला जातो.

**४) राजकीय संरचनाची बहूकार्यात्मकता :-**

आल्मंड म्हणतो की, सर्व राजकीय संरचना या बहूकार्यात्मक असतात. उदा. न्यायालय केवळ न्यायिक कार्यच करत नाही तर कायदेसंबंधी कार्यदेखील करते प्रशासन आणि नोकरशाही संचलित करण्यासाठी न्यायव्यवस्था हे उत्तम साधन आहे.

**५) राजकीय व्यवस्थांचे डेव्हिड ईस्टनचे प्रतिपादन :-**

तौलनिक राजकारणाच्या क्षेत्रात व्यवस्था सिद्धांताची मांडणी करणारा डेव्हिड ईस्टन हा पहिला राज्यशास्त्रज्ञ आहे. त्याने १९५३ मध्ये "The Political System" या आपल्या पुस्तकात या सिद्धांताची निर्मीती केली. त्याने आपल्या "A Frame Work for Political analysis" या दुसऱ्या पुस्तकांत १९६५ मध्ये अशा काही उपविभागांची निर्मिती केली की, ज्यामुळे सामान्य सिद्धांताची उत्पत्ती होऊ शकली. "A System analysis of political life" या तिसऱ्या पुस्तकात विभिन्न संकल्पनांचा रचनात्मक स्वरुपात वापर करुन त्या वास्तवात कशा लागू करता येईल याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**ईस्टनच्या मतानुसार –**

१) राजकीय व्यवस्था केवळ सदस्यांचा समूह नसून सदस्यांच्या कृतीची संघटना आहे.

२) ''राजकीय जीवन व्यवहार'' ही अशी प्रक्रिया आहे की, जी राजकीय व्यवस्थेमध्ये निरंतर चालत राहते.

३) राजकीय व्यवस्था ही कोणत्याही सामाजातील आंतरक्रियांची अशी व्यवस्था आहे की, जिच्याद्वारे बंधनकारक आणि अधिकारात्मक निर्णय घेतले जातात. तसेच,

४) राजकीय व्यवस्था ही मुक्त आणि अनुकूलशील स्वरुपाची असते. असे स्पष्टीकरण ईस्टन ने दिले आहे.

ईस्टन म्हणतो की राजकीय व्यवस्थाची दोन मुख्य वैशिष्ट्ये सांगता येतात –

**वैशिष्ट्ये :–**

१) राजकीय व्यवस्था ही आदान–प्रदान आणि कार्याची अंमलबजावणी या स्वरुपाची प्रक्रिया आहे.


२) राजकीय व्यवस्था ही अंतर्गत व बाह्य संकट, आक्रमण आणि दबावाविरुद्ध संरक्षणात्मक कार्य करणारी संघटित व्यवस्था आहे.

ईस्टनच्या मतानुसार राजकीय व्यवस्थेमध्ये आदान–प्रदान ही प्रक्रिया दुहेरी स्वरुपाची असून परस्पर पुरक अशी आहे.

गॅब्रिअल अल्मंड ने राजकीय व्यवस्थेचे जे प्रारुप स्पष्ट केलेले आहे. तेच डेव्हिड ईस्टनने वेगळया पद्धतीने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

ईस्टन नुसार आदान प्रक्रियेत अशा मागण्यांचा समावेश असतो की, ज्याद्वारे अनेक घडामोडीचा रचनात्मकदृष्ट्या समर्थन प्राप्त होऊ शकते आणि त्या राजकीय जीवनाला प्रभावित करु शकतात तर प्रदान व्यवस्थेमध्ये पदाधिकाऱ्यांचे निर्णय अपेक्षित असतात. ईस्टन म्हणतो की, कायदे विभाग, कार्यपालीका आणि न्याय विभाग यांच्याद्वारे होणारे निर्णय हे राजकीय प्रदान व्यवस्थेत मोडतात. कारण हे निर्णय सत्तारुढ लोकांनी घेतलेले असतात. आदान आणि प्रदानामध्ये एक प्रत्यादान व्यवस्था असते. जीच्या आकलनाने आपण या सर्व क्रिया प्रक्रियांच्या व्याख्या करु शकतो, तसेच अर्थ देखील स्पष्ट करु शकतो की, ज्याद्वारे तणावाची स्थिती नाहिशी होऊ शकते. कोणत्याही व्यवस्थेला स्थिरता प्राप्त होण्यासाठी त्या व्यवस्थेद्वारे कायम प्रदान होणे आवश्यक असते. प्रदान प्रक्रियेद्वारे वयवस्थेची कार्ये स्पष्ट होत असतात.

**ईस्टन नुसार प्रदान प्रक्रियेचे प्रारुप खालील प्रमाणे :–**



उपरोक्त प्रारुपानुसार राजकीय व्यवस्था सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि भौतिक पर्यावरणात गुरफटलेली आहे. या गुरफटलेल्या अवस्थेमध्ये राजकीय व्यवस्था आहे. डाव्या बाजूला प्रत्यादान- मागण्या आणि समर्थनाच्या रुपात पर्यावरण दिसून येते. तर प्रत्यादान प्रक्रियेनुसार राजकीय व्यवस्था संसाधनाद्वारे धोरण आणि निर्णयाच्या रुपात राजकीय व्यवस्थेच्या उजव्या बाजूने दिसून पर्यावरणाकडे मार्गक्रमण करते आणि पर्यावरणाद्वारे प्रत्यादान प्रक्रियेच्या माध्यमातून जोडल्या जाते. अशाप्रकारे, राजकीय व्यवस्था आणि पर्यावरण यामध्ये एक प्रकारचा चक्रीय संबंध प्रस्थापित होतो. ईस्टनच्या मतानुसार, राजकीय व्यवस्था ही अनुकूलन क्षमतापूर्ण असून ही सजीव, सक्रिय आणि गतिशील स्वरुपात कार्य करते.

### ईस्टनच्या आदान-प्रदान-प्रत्यादान प्रक्रिया विश्लेषणाचे गुण किंवा महत्त्वः-

१) ईस्टनच्या व्यवस्था विश्लेषणाद्वारे सर्व राजकीय व्यवस्थांचे तुलनात्मक अध्ययन होऊ शकते.

२) ईस्टनचे हे विश्लषण राजकीय व्यवस्थेमध्ये होणारे परिवर्तन आणि व्यवस्थेमध्ये गतिशीलतेचे अध्ययन करण्यास उपयुक्त आहे.

३) आदान-प्रदान आणि प्रत्यादान प्रक्रियेद्वारे राजकीय व्यवस्था आणि पर्यावरण मध्ये यथार्थवादी संबंध प्रस्थापित करुन राजकीय विश्लेषण करण्याचा प्रयत्न केल्या गेला आहे.

त्यामुळे या सिद्धांताचे महत्व तौलनिक राजकारणच्या अध्ययनात अनन्य-साधारण आहे.

### दोष :-

१) ईस्टनचा राजकीय व्यवस्था सिद्धांत अमूर्त अध्ययनपेक्षा वेगळा आहे.

२) हा सिद्धांत सुरक्षा आधारभूत ध्येयाचा स्वीकार करतो मात्र राजकीय, व्यवस्थेच्या योग्य न्यायासंबंधी मौन बाळगतो.

३) हा सिद्धांत वर्तमानातील जटील प्रश्न समजण्यास अपात्र ठरला आहे.

४) ईस्टनने आदान-प्रदान-प्रत्यादान प्रक्रियेचे विवेचन केले असले तरी मागण्यांच्या रुपांतरण प्रक्रियेतील जटिलतेला स्पष्ट केलेले नाही.

काही टीकाकारांनी वरील प्रकारचे दोष ईस्टनच्या राजकीय व्यवस्थावादी सिद्धांताबाबत मांडले असले तरी एकंदरीत ईस्टनच्या या सिद्धांताने राज्यशास्त्राच्या तौलनिक अध्ययनाला विशिष्ट दिशा मिळालेली आहे.

## २.२.२ रचनात्मक कार्यवादी सिध्दांत :

एखाद्या व्यवस्थेतील रचना ती व्यवस्था टिकविण्याच्या दृष्टीने कोणती कार्ये पार पाडते या दृष्टीने जीवशास्त्रात ज्या कल्पना मांडल्या जातात त्याचा आधार घेऊन मॅलिनॉस्की व रॅडक्लिफ ब्राऊन हे मानववंशशास्त्रज्ञ व पार्सन, मर्टन, मेरियन लेव्ही हे समाजशास्त्रज्ञ ह्यांनी व्यवस्थेच्या संदर्भात रचना आणि कार्य ह्याच्या परस्पर संबंध दर्शविण्यासाठी ''रचनात्मक कार्यवादी दृष्टिकोन'' अवलंबिलेला आहे.

गॅब्रिअल एल्मंड व डेव्हिड ईस्टन ह्यांनी रचनात्मक कार्यवादी दृष्टिकोन प्रामुख्याने मांडला आहे तो राजकीय जीवनाचे विश्लेषण करण्याच्या दृष्टीने व त्या आधारे स्वतःचे स्वतंत्र आराखडे मांडून स्पष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

''रचनात्मक कार्यवाद'' हा ''व्यवस्था विश्लेषणवाद'' या नावानेही ओळखला जातो.

या दृष्टिकोनाच्या अभ्यासात ज्या संज्ञाचा वापर केला जातो त्या १) व्यवस्था २) रचना ३) कार्य. कार्याच्या संदर्भात रचनांचा अभ्यास आणि त्यावरुन व्यवस्थेचे स्वरुप लक्षात घेणे याला रचनात्मक कार्यवादी दृष्टीकोन म्हणतात. मर्टनने रचनात्मक कार्यवादाचा अर्थ सांगताना म्हटलेले आहे की – ''रचना कार्यावार परिणाम करते व कार्य रचनेवर परिणाम करते म्हणजेच व्यवस्थेच्या संदर्भात रचनेची उपयुक्तता आणि त्या दृष्टीने त्याचे कार्य असा केला आहे.

रचनात्मक कार्यवादी दृष्टीकोन हा संशोधकांमध्ये अधिक लोकप्रिय झाला कारण त्याचा फायदा निरनिराळया देशातील राजकीय व्यवस्थांचे तुलानात्मक अध्ययन करण्यास होऊ लागला. कोणत्याही व्यवस्थेत व्यवस्था टिकविण्याच्या दृष्टीने रचनांच्या द्वारे होणारी कार्ये कितपत पोषक किंवा विघातक ठरतात हे किंवा कोणत्या परिस्थितीत विशिष्ट व्यवस्था मोडकळीस आली हे सुद्धा या दृष्टकोनाद्वारे ठरविता येते.

रचनात्मक कार्यवादी दृष्टिकोनातून अनेक राज्यशास्त्रज्ञ विकसनशील देशांच्या राजकीय व्यवस्थांचे अध्ययन करु लागलेत. नवोदित देशातील राजकीय व्यवस्था, त्यांची अंतर्गत रचना, त्या रचनेतून निर्माण होणारी कार्ये, त्यांची त्या देशांनी आपल्यासमोर ठेवलेली ध्येये आणि उद्दिष्टये ह्याच्यांशी काय संबंध आहे असा या संशोधनाचा हेतू होता.

रचनात्मक कार्यवादी दृष्टीकोनातून संशोधन करत असतांना सर्व संशोधकांच्या प्रामुख्याने एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे पाश्चिमात्य समाजापेक्षा पौर्वात्य समाजाची उद्दिष्टये व संस्कृती ही फार भिन्न आहे.

नवोदित राज्यांच्या राजकीय व्यवस्थेसमोर देशांतर्गत व बाह्य परिस्थितीतून सतत आव्हाने निर्माण होत असतात व या नव्या संकटांना तोंड देऊन आपली राजकीय व्यवस्था कशी टिकवून ठेऊ असा गंभीर प्रश्न त्या समाजासमोर सातत्याने निर्माण होत असतो.

त्याचबरोबर देशातील समाजाची बदलती उद्दिष्टये साध्य करण्याकरिता त्या त्या राजकीय व्यवस्थेत अंतर्गत बदल कोणते करावयाचे म्हणजे ती उद्दिष्टये साध्य होऊ शकतील आणि अशा कोणत्या रचना पाहू शकतील असा विचार केल्या जाऊ लागल्या.

मार्क्सवादाला एक पर्याय म्हणून हा रचनात्मक कार्यवाद मांडण्यात आला असे रुसियन शास्त्रज्ञ म्हणतो. भांडवलशाही समाजरचना ज्वालामुखीच्या तोंडाशी उभी राहून ती वर्गयुद्धाच्या ज्वालात ती नष्ट होईल व नवीन समाजरचना निर्माण होईल असे जे मार्क्स ने म्हटले आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांनी रचनात्मक कार्यवादाचा सिद्धांत शोधून काढला आहे. प्रत्येक व्यवस्थेला आपले अस्तित्व टिकवायचे असते व त्यादृष्टीने ती व्यवस्था आपल्या अंतर्गत रचनेत आवश्यक ते बदल करीत असते व बाहेरुन येणाऱ्या संकटांना परतवू शकते. रचना व कार्य यात सुसंवाद असावा हे मान्य करण्यासारखे आहे. दोघांचाही एकमेकांवर परिणाम होत असतो.

संपूर्ण समाजाची निरनिराळया प्रकारची गरज पूर्ण करण्यासाठी उपव्यवस्था निर्माण होत असतात व उपव्यवस्थांची गरज पूर्ण करण्यासाठी कार्ये होत असतात आणि कार्ये पूर्ण करण्यासाठी रचना निर्माण होत असतात. कार्याच्या संदर्भात रचनांची उपयुक्तता लक्षात घ्यावी लागते.

**मर्टनने कार्याचे चार प्रकार सांगितले आहे.**

१) **व्यक्त कार्ये –** ज्या हेतूने कार्ये केले असेल तो अपेक्षित परिणाम घडून आला तर ते व्यक्त कार्य होय. त्यालाच स्पष्ट कार्य म्हणता येईल.

२) **अव्यक्त कार्ये –** कृती करण्याऱ्यांच्या मनात अपेक्षित नसलेले पण तो कृती करतांना अनायासे घडून आलेले परिणाम म्हणजे अव्यक्त कार्ये होत यांना सुप्त कार्येही म्हणतात.

३) **उपयुक्त कार्ये –** रचना टिकविण्यासाठी करण्यात येणारी कार्ये उपयुक्त कार्ये होत यांना पोषक कार्ये सुद्धा म्हणतात.

४) **विघातक कार्ये –** रचनेच्या अस्तित्वाला अपायकारक ठरणारी कार्ये म्हणजे विघातक कार्ये होत.

एखादी व्यवस्था टिकविण्याच्या दृष्टीने कार्याचा आवश्यकतेच्या स्वरुपात मेरियम व लेव्ही यांनी विचार केला. त्यापैकी अत्यावश्यक कार्याची एक यादी गॅब्रिअल आल्मंड याने खालीलप्रमाणे दिली आहे.

१) **रुपांतर कार्ये –** मागण्याचे रुपांतर निर्णयात करणे.

२) **क्षमतेची कार्ये –** मागण्या पूर्ण करणे व निर्णय अमंलात आणणे यांची क्षमता शक्ती.

३) **परिवर्तनशीलतेची कार्ये –** बदलत्या परिस्थितीनुरुप स्वतःत बदल करण्याची तयारी असणे.

४) **स्थैर्य टिकविण्याकरिता करावयाची कार्ये –** स्थैर्य टिकवणे महत्वाचे.

कोणत्याही देशातील राजकीय व्यवस्थेचे अस्तित्व टिकविण्यासाठी कोणती कार्ये पार पाडावयास पाहिजे या दृष्टीने गॅब्रिअल आल्मंड याने आदान प्रक्रियेतील चार व प्रदान प्रक्रियेतील तीन कार्य दिलेली आहे.

**आदान प्रक्रियेतील कार्ये :– (In-put Functions)**

१) हितसंबंधाचे प्रगटीकरण (Interest Articulation)

२) हितसंबंधाचे सुसूत्रीकरण (Interest Aggregation)

३) राजकीय संसुचन (Political Communication)

४) राजकीय सामाजीकीकरण (Political Socialisation)

**प्रदान प्रक्रियेतील कार्ये :– (Out-put Functions)**

१) नियम निर्मिती (Rule Making) कायदेमंडळ

२) नियम कार्यवाही (Rule Application) कार्यपालिका

३) नियमानुसार न्यायदान (Rule Adjudication) न्यायपालिका

प्रदान प्रक्रियेतील तीन्ही कार्ये शासनसंस्थेतील तीन विभाग करीत आलेली आहेतच. कायदेमंडळ, कार्यपालिका व न्यायपालिका या व्यवस्थेतून आदान प्रक्रियेतील हितसंबंधाचे प्रगटीकरण करण्याचे कार्य हितसंबंधी गट व दबावगट करतात. मागण्यांच्या स्वरुपात यालाच ईस्टन आदान म्हणतो व रुपांतरानंतर जे निर्णय होतात त्याला तो प्रदान म्हणतो, त्यानंतर त्यातून नवीन मागण्या आल्यास त्याला प्रत्यादान म्हणतो.

प्रगत देशात राजकीय समाजीकीकरणाच्या रचना कार्यशील असतात. अप्रगत देशात मात्र त्या अनियमित असतात व लोक भावनाविवशतेतूनच वागत असतात.

### आदान प्रक्रियेचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे देता येईल.

१) **हितसंबंधाचे प्रगटीकरण :-** ज्या प्रक्रियेनुसार व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह आपल्या मागण्या निर्णय घेणाऱ्या राजकीय श्रेष्ठीसमोर मांडतात. त्या प्रक्रियेला हिसंबंधांचे प्रगटीकरण म्हणतात. राजकीय व्यवस्थेच्या रुपांतर प्रक्रियेतील ही पहिली अवस्था असते. हितसंबंधी गट, दबावगट, राजकीय पक्ष इत्यादी हितसंबंधांच्या प्रगटीकरणच्या रचना होत.

२) **हितसंबंधाचे सुसूत्रीकरण :-** मागण्याचे रुपांतरधोरणासंबंधी पर्याय निर्माण करणे याला हितसंबंधांचे सुसूत्रीकरण म्हणतात. त्यासाठी सहयोग, तडजोड, देवाणघेवाण करण्यात येते. त्यातून धोरण ठरते. यावेळी विचारसणीचा व व्यावहारिक वस्तुस्थितीचा संदर्भ लक्षात घेतला जात असतो.

३) **राजकीय संसूचन :-** निर्णयाच्या दृष्टीने माहिती गोळा करणे व त्यावर अधारित घेण्यात आलेले निर्णय बरोबर अंमलात येतात किंवा नाही हे पाहणे, यादृष्टीने राजकीय व्यवस्थाच्या कार्यात संसूचनाला फार महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. वृत्तपत्रे, मासिके, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट ह्या आधुनिक राजकीय व्यवस्थेतील संसूचनाच्या रचना होत.

४) **राजकीय सामाजिकीकरण :-** लोकांचे राजकीय शिक्षण यालाच राजकीय सामाजिकीकरण म्हणतात. कुटूंब, शिक्षणसंस्था, राजकीय पक्ष, इतर सामाजिक संघटना, वृत्तपत्रे, रेडिओ, चित्रपट, दूरदर्शन, मासिके ह्या राजकीय सामाजिकीकरणाच्या रचना होत. तसेच सभा, सम्मेलने, शिबीर ह्याही तशाच रचना होत. राजकीय दृष्ट्या जागरुक नागरिक तयार करणे हे राजकीय सामाजिकीकरणाचे ध्येय होय.

रचनात्मक कार्यवादी सिद्धांताने आपल्या व्यवस्थेतील उणिवांना दूर सारुन राज्यशास्त्रामध्ये नवीन पर्यायी साधनांचा उपयोग करण्यास प्रारंभ केला आणि शासकीय व्यवस्था समृद्ध बनविण्यासाठी प्रयत्न केले या सिद्धांतामुळे राज्यशास्त्रातील वास्तवाला नवीन दृष्टी प्राप्त झाली आणि म्हणूनच तौलनिक राजकारणाच्या अभ्यासात या सिद्धांताचें महत्व अनन्य साधारण आहे.

## २.२.३ पराधीनता सिद्धांत किंवा अधिन सिद्धांत (Dependency Theory)ः

तिसऱ्या जगाचा उदय होण्यापुर्वी पराधिनता या विषयाकडे राज्यशास्त्रज्ञांचे लक्ष गेले नाही. त्यामुळे शास्त्रीय संशोधनाच्या दृष्टीने पराधिनता या सिद्धांताचे आगमन बऱ्याच उशीर झाले. खऱ्या अर्थाने लॅटिन अमेरिकेतील विद्वानांनी पराधिनता प्रारुपाचे विस्तृत अध्ययन केले. अध्ययन करतांना सर्वप्रथम त्यांनी आंतरिक लॅटिन अमेरिकेतील संरचना आणि आंतरराष्ट्रीय संरचनांमधील

परस्पर संबंधांच्या अभ्यासास सुरुवात केली हा अभ्यास जगातील पराधिन विकास प्रक्रियेला समजून घेण्यासाठी आधारभूत ठरतो.

अधिनत्व आणि पराधिनता ही संकल्पना साम्राज्यवादी सिद्धांताच्या संदर्भाशी निगडीत आहे. भांडवलवादी देशांना गंभीर आर्थिक संकटाचा सामना का करावा लागला नाही? तसेच त्या देशांनी इतर देशांवर साम्राज्य प्रस्थापित करुन स्वतःच्या भांडवलाचा विकास आणि त्याची निर्यात कशा स्वरुपात केली याचा परामर्श या सिद्धांताच्या व्याख्येतून घेता येतो.

हा सिद्धांत काही देशांच्या बाबतीत योग्य वाटत असला तरी तो एक पक्षीय स्वरुपाचा आहे. कारण हा सिद्धांत वसाहती देशातील साम्राज्यवादी धोरणाला जन्म देण्याची कारणे शोधणे आणि त्याचे विश्लेषण करणे एवढाच मर्यादित आहे. या सिद्धांताच्या समर्थकांनी साम्राज्यवादाचा, वसाहतीच्या आर्थिक विकासावर काय प्रभाव पडला याचा उहापोह केलेला नाही. हॉब्सन आणि लेनिन यांनी साम्राज्यवादी सिद्धांतापूर्वी मांडलेले सिद्धांत हे सुविदित सिद्धांत म्हणून अभ्यासले गेले त्यांच्या सिद्धांतात आणि पराधिन सिद्धांतात बरेच साम्य आढळते ते असे –

हॉब्सनच्या मते, साम्राज्य असणाऱ्या वसाहती देशांमध्ये श्रमिकांना मजूरी किंवा मोबदला फार कमी मिळत होता. त्यामुळे तेथे निर्माण होणारे उत्पन्न आणि सेवा यांना पाहिजे त्या प्रमाणात मागणी नव्हती, परिणामी तेथील होणारे उत्पन्न आणि सेवा दोन्हीची निर्यात कमी प्रमाणात होत होती. म्हणून भांडवलवादायांनी हतबल न होता नवीन बाजारपेठ शोधने सुरु केले. या बाजारपेठ त्यांना वसाहती असणाऱ्या देशांमध्ये उपलब्ध होऊ शकत होत्या असे मत हॉब्सन प्रमाणेच लेनिनचेही होते.

लेनिन म्हणतो, भांडवलवाद्याच्या लाभाची दरी कोसळू लागली, आणि त्यांनी आपल्या भांडवल निर्मितीसाठी नवीन बाजारपेठ शोधण्यात सुरुवात केली. वसाहती मध्ये त्यांना आपल्या भांडवलाच्या विकासासाठी चांगले क्षेत्र उपलब्ध झाले. अशा स्वरुपात लेनिने साम्राज्यवादाचा संदर्भ स्पष्ट केला. भांडवलवादाला जरी साम्राज्यवादी देशांनी बाहेर फेकले आणि वसाहतींनी त्याला आपल्याकडे आकृष्ट केले तरी कोणत्याही परिस्थितीत वसाहतीतूनच भांडवलाची निर्मिती जास्त होऊ शकते. याचा परिणाम असा होतो की, साम्राज्यवादी देश आणि वसाहती याच्यांतील लाभाच्या मूल्यांचे (किंमतीचे) समानीकरण होते. लेनिनच्या मते, साम्राज्यवादाने आपली दुःस्थिती यानुसार टाळली आहे आणि हेच कारण साम्राज्यवादाला भांडवलवादाची अंतिम अवस्था मानण्यामागे आहे.

पराधिनतावाद किंवा अधिनतावाद समजून घेण्यासाठी साम्राज्यवादाची पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे. लेनिन साम्राज्यवादाला केवळ विकासाची एक अवस्था मानतो, त्याच्या मते साम्राज्यवाद भांडवलवादाची सर्वोच्च अवस्था होती, आणि त्याची पाच मुख्य वैशिष्ट्ये त्याने सांगितली –

१) एकाधिकाराचे वर्चस्व

२) सावकारी भांडवलाचे वर्चस्व

३) वस्तु–विक्रय निर्यातीच्या जागी भांडवलाची निर्मिती

४) अंतरराष्ट्रीय एकाधिकारांची निर्मिती

५) जगाचे विविध भांडवलवादी देशांमध्ये विभाजन

साम्राज्यवाद भांडवलवादाच्या विकासाची केवळ एक अवस्था नसून आर्थिक व्यवस्थांमध्ये आणि विविध देशांमध्ये एकप्रकारचे संबंध निर्माण करणारी प्रक्रिया आहे.

''जेम्स ओ कोनोर'' च्या मते, ''साम्राज्यवादी हे स्थानिक –आर्थिक, संसाधनावर औपचारिक आणि अनौपचारिक स्वरुपाचे नियंत्रण असून या नियंत्रणाचा उपयोग अशा पद्धतीने केल्या जातो की, त्यामुळे स्थानिक आणि आर्थिक व्यवस्थांना हानी नसून साम्राज्यवादी देशाच्या भांडवलवाद्यांना लाभ मिळवता येईल.'' या पार्श्वभूमीवर पराधिनता सिद्धांताचा उदय झाला.

## पराधिनता सिद्धांताचा उदय :–

तिसऱ्या जगाच्या आर्थिक स्थिरतेसंबंधीची व्याख्या करण्यासंबंधी साम्राज्यवादी सिद्धांत असमर्थ ठरल्यामुळे पराधिनता सिद्धांताचा जन्म झाला तिसऱ्या जगाचे आंतरराष्ट्रीय महत्व जेव्हापासून वाढले तेव्हापासून पाश्चिमात्य राज्यशास्त्रज्ञांनी भूतकाळातील वसाहतीमध्ये झालेल्या बदलाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. त्या काळात असा कोणताही सिद्धांत नव्हता की, जो साम्राज्यवादाचा – तिसऱ्या जगातील सामाजिक संरचना आणि आर्थिक विकासाच्या प्रारुपावर काय प्रभाव पडला हे स्पष्ट करु शकेल? साम्राज्यवाद साम्राज्यवादी देशांना होणाऱ्या लाभाची व्याख्या करतो परंतु पराधिनता वसाहतींना होणाऱ्या हानीकडे लक्ष केंद्रित करतो.

रॉक्सबरो ने पराधिनता प्रतिमानाची व्याख्या खालीलप्रमाणे केली :– ''अर्थ विकसित अर्थव्यवस्थांचे जागतिक अर्थव्यवस्थे सोबत संबंध प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेतून संसाधनांची निर्मिती करुन वसाहती आणि अर्धविकसित देशातील केंद्राची प्रगती होऊ शकते आणि संसाधनाद्वारे विरोधकांवर नियंत्रण राखण्यासाठी संघटन तयार होऊ येईल.'' या दृष्टीने पराधिनता प्रारुपाची निर्मिती झाली असे म्हणणे योग्य होईल.

## वरील व्याख्येनुसार दोन निष्कर्ष पराधिनतेसंबंधी काढता येतील –

अ) पराधिनता दोन प्रकारे उत्पन्न होऊ शकते.

१) संसाधनांचा लाभ न होण्यासोबतच वसाहतींचा विकास करण्यात अडथळे निर्माण झाल्यास

२) अर्थव्यवस्था बळकट न होता विरोधी किंवा विकृत प्रकृतीचा प्रभाव वाढून त्यांच्या प्रभावास बळी ठरल्यास पराधिनता उत्पन्न होते.

ब) मूल्यांचे अवमूल्यन आणि विकृतीधारक प्रभाव एक दुसऱ्याशी स्वतंत्रपणे संघटित होऊन सक्रीय झाल्यास पराधिनता उत्पन्न होते.

क) संसाधने हस्तगत करण्याचे उपाय अनेक आहेत. उदा. प्रत्यक्ष कर असमान विनीमय, अनुत्पादित मालाचा उत्पादित मालासोबत विनिमय, मूल्याचे नियंत्रण इत्यादिद्वारे संसाधने हस्तगत केली जातात.

ड) विरोध किंवा विकृती निर्माण करण्याचे अनेक उपाय आहेत – ''डास सांटोस'' च्या मते, पराधिनता अशी स्थिती आहे की, ज्यात देशांच्या एका समूहाची अर्थव्यवस्था ही दुसऱ्या अन्य

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या आधीन राहते, आणि त्या देशाचा विकास आणि प्रसाराशी अनुकूल होते. डास साटोसच्या उपरोक्त विचारानुसार दोन गोष्टी स्पष्ट होतात.

१) पराधिन अर्थव्यवस्थांचे संबंध दोन समूहांशी असतात. एका समूहात ज्या व्यवस्था अंतर्भूत असतात त्या दुसऱ्याला अनुकूल करतात, आणि दुसऱ्या समूहात जे स्वतः दुसऱ्या व्यवस्थेप्रमाणे अनुकूल होत जातात.

२) पराधिनता एक निश्चित स्वरुपाची आंतरिक संरचना आहे जी पाश्चिमात्य संरचनेपेक्षा भिन्न आहे.

तिसऱ्या जगातील सामाजिक संरचना या पाश्चिमात्य संरचनाप्रमाणे नसल्या तरी त्यांच्यापेक्षा जास्त महत्वपूर्ण आहेत, कारण वसाहतीमधील भिन्नतेचा खरा अर्थ पराधिनतेचा केवळ एक संबंधसूचक वस्तु म्हणून घेतल्या जात नाही. तर पराधिनतेला संरचनात्मक समूह संबोधून तेथील भिन्नतांचे विश्लेषण केले जाते. मात्र संरचनात्मक भिन्नता उत्पादन प्रणालीच्या विशेष प्रकारच्या संघटनांतून देखील निर्माण होऊ शकते. एवढेच नव्हे तर त्यांची उत्पादन प्रणाली देखील वैशिष्टयपूर्ण राहू शकते. आपण कोणत्याही सिद्धांताचा स्वीकार करतांना हे लक्षात घेतले पाहिजे की, कोणत्याही देशाची अर्थव्यवस्था बळकट करावयाची असेल तर संघटन मजबूत असणे आवश्यक आहे.

पराधिनता सिद्धांतानुसार आपणांस हे आव्हान स्वीकारणे आवश्यक आहे की, कोणतीही महत्वपूर्ण सुधारणा, तेव्हाच शक्य होते जेव्हा सर्वप्रथम आपल्याला जागतिक पातळीवर अर्थव्यवस्थेसोबतच सक्रीय होण्यासाठी प्रत्येक व्यक्तींनी आपल्या क्षमतेनुसार नवीन स्वरुपात अर्थव्यवस्थेची रचना बांधणी केली पाहिजे मात्र प्रश्न असा निर्माण होतो की, विश्वाच्या अर्थव्यवस्थेसोबत आपल्या अर्थव्यवस्थेसंबंधांची प्रक्रिया अत्यावश्यक पुर्नःरचनेनुसार कशी करता येईल? हे निश्चित आहे की पराधिन देशाचा शासक वर्ग आणि साम्राज्यवाद हे दोन्हीही या पुर्नःरचनेच्या विचाराबाबत प्रखर विरोध करतील या संबंधी ''इआन रॉक्सबरो'' ने असे म्हटले की, पराधिनतेचा एकमात्र यथार्थवादी पर्याय आहे. ''क्रांती किंवा सतत पराधिनता''.

यावरुन पराधिनता निर्माण होण्यामागील मुख्य मुद्दे खालील प्रमाणे नमूद करता येतील.

**१) साम्राज्यवादी देशांचा नवः-** स्वंतत्र वसाहतीवरील हस्तक्षेप : प्राचीन साम्राज्यवादी देशांनी अनेक प्रकारे नवीन स्वतंत्र झालेल्या देशांमध्ये हस्तक्षेप करणे सुरु केल्यामुळे त्यांचा प्रभाव देशाच्या राजकारणावर होऊ लागला. उदा. अफगानिस्तानमध्ये भविष्यकालीन सोव्हिएत संघाचा हस्तक्षेप किंवा ग्रेनाडा, पानामा, निकारगुआ या वसाहती देशांमध्ये अमेरिकने केलेला हस्तक्षेप.

**२) शस्त्रास्त्रांचे सहकार्य :-** नव्याने स्वतंत्र झालेले देश स्वतःची सुरक्षा करण्यासाठी परिपूर्ण आणि आत्मनिर्भर नसल्यामुळे त्यांना विकसित आणि शक्तिशाली राष्ट्रांकडून स्वसुरक्षेसाठी शस्त्रास्त्रांसाठी निर्भर रहावे लागले. अशावेळी शक्तीशाली देश शस्त्र विक्रिसोबतच नव्या वसाहतीवर नियंत्रण ठेवण्याचा दृष्टीने या साधनांच्या स्वरुपात उपयोग करताना दिसतात.

**३) परराष्ट्र सहकार्य आणि कर्जाचा उपयोग :-** नव्याने निर्माण होणाऱ्या देशांच्या निर्धनतेचा फायदा घेऊन संपन्न आणि विकसित राष्ट्रे आपल्या अटी निर्धन देशांवर लादून त्यांना आर्थिक सहायता आणि कर्ज उपलब्ध करुन देतात, या अटीच्या आधारे शक्तीशाली देश पराधिन राष्ट्रांच्या धोरणांवर नियंत्रण ठेवत असतात.

**४) आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थाद्वारे नियंत्रण :-** द्वितीय महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था उदा. विश्व बॅक IBRD, IFC, IDA द्वारा अर्थव्यवस्था नियंत्रित होत असते. या संस्थावर संपन्न आणि शक्तिशाली राष्ट्रांचा प्रभाव आणि नियंत्रण असते. जेव्हा पराधिन देश या संस्थाकडून कर्ज किंवा मदत घेण्याचे ठरवितात तेव्हा संपन्न राष्ट्र आपल्या नियंत्रणानुसार आर्थिक धोरण ठरवित असतात.

**५) बहुराष्ट्रीय नियमांद्वारे नियंत्रण :-** आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील बहुतांश राष्ट्रांवर बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व आहे आणि वसाहती देशांच्या अर्थव्यस्थेवर त्याचे पूर्णतः नियंत्रण असल्यामुळे पराधिन राष्ट्रांच्या राजकीय आणि आर्थिक धोरणांवर त्याचांच प्रभाव आहे. उदा. IBM, GEM, Standard oil इत्यादी.

**६) आर्थिक पराधिनतेचा स्वीकार :-** पराधिन देश आर्थिकदृष्टया मागास असल्यामुळे ते परराष्ट्रीय आर्थिक धोरण निर्णयावर अवलंबून असतात. पराधिन देशांना आपला कच्चा माल विकण्यासाठी तसेच आवश्यक गरजांच्या पूर्तीसाठी पूर्णतः आश्रित म्हणून विदेशी शक्तींवर अवलंबून रहावे लागते आणि कायम पराधिन अशी व्यवस्था निर्माण होते.

**७) आश्रित देश बनून रहाणे :-** जेव्हा निर्भर आणि आर्थिकदृष्टया मागास देशांची अर्थव्यवस्था पूर्णतः परकीय शक्तींवर अवलंबून असते तेव्हा त्यांना आश्रित देश असे संबोधले जाते. एक आश्रित देश आपल्या आंतरिक धोरणांसंबधी आर्थिकदृष्टया स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकत नाहीत. पराधिन देश परकीय शक्तींच्या आधीन राहून स्वतंत्र समूहासमान असतात. ज्याचे धोरण आणि शासन व्यवस्था परकीय शक्ती संचलित आणि नियंत्रित करते.

वरील मुद्दांच्या विवेचनानुसार पराधिन देशांच्या महत्वपूर्ण घडामोडींचा अभ्यास करुन अभ्यासक्रमांनी पराधिन सिद्धांताला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तुलनात्मक राज्यशास्त्राच्या अध्ययनात ह्या सिद्धांताचे अध्ययन करणे क्रम प्राप्त झालेले आहे.

## २.२.४ विशेष साम्य आणि भेद दर्शविणारे तौलनिक प्रारुप (आराखडे)

१) चार देशातील राजकीय संस्कृतीची तुलना दर्शविणारा तक्ता

### इंग्लंड

१) इंग्लंडची राजकीय संस्कृती जगातील प्राचीनतम राजकीय संस्कृती पैकी एक आहे.

२) परंपरेकडून आधुनिकतेकडे वाटचाल करणारी संस्कृती

३) रुढी, परंपरा आणि संकेत यांना प्राधान्य देणारी संस्कृती

४) सहभागांकित राजकीय संस्कृती

५) लोकशाहीवर श्रद्धा ठेवणारी संस्कृती

६) राजकीय परंपराचे पालन करणारी संस्कृती

७) कायद्याची अधिसत्ता मान्य करणारी संस्कृती

८) राष्ट्रीय एकरुपता दर्शविणारी संस्कृती

### अमेरिका

१) भिन्न-भिन्न वंशाच्या संमिश्रणातून निर्माण झालेली संस्कृती

२) भौतिकवादाने प्रभावित असलेली राजकीय संस्कृती

३) प्रयत्नवादी, विज्ञाननिष्ठ बुद्धीवादी आणि धर्मनिरपेक्ष संस्कृती

४) सकारात्मक जनसहभागाची संस्कृती

५) लोकशाहीवर अपारश्रद्धा ठेवणारी राजकीय संस्कृती

६) राजकीय नैतिकता पाळणारी संस्कृती

७) शासनाला प्रभावित करणारी संस्कृती

८) बहुमताचे शासन प्रस्थापित करणारी संस्कृती

### स्वित्झर्लंड

१) भिन्न-भिन्न वंशाची संमिश्र संस्कृती आहे.

२) गुणवत्ता आणि कर्तृत्वाला प्राधान्य देणारी संस्कृती

३) सुशिक्षित पण पुराणमतवादी संस्कृती

४) सहभागांकित राजकीय संस्कृती

५) लोकशाहीवर श्रद्धा ठेवणारी राजकीय संस्कृती

६) राजकीय पक्षाची बांधिलकी नसणारी संस्कृती

७) अनेकात्मक शासनाला समर्थन देणारी संस्कृती

८) तटस्थ धोरण मान्य करणारी राजकीय संस्कृती

### सोव्हिएट रशिया

१) क्रांतिकारी राजकीय संस्कृती आहे.

२) साम्यवादी विचारसरणीची राजकीय संस्कृती

३) विविधतेत एकता दर्शविणारी संस्कृती

४) एकपक्षीय विचारांची राजकीय संस्कृती

५) लोकशाहीतून साम्यवादी समाजरचना मजबूत करणारी संस्कृती

६) आज्ञापालन करणारी राजकीय संस्कृती

७) विस्ताराला मान्यता देणारी संस्कृती

८) लोकतंत्रात्मक राजकीय संस्कृती

२) इंग्लंड आणि अमेरिकेतील समिती पद्धतीची तुलना आणि साम्य

## ''संसद''

## इंग्लंडची समिती पद्धती

१) इंग्लंडच्या समिती पद्धतीचे अधिकार अमेरिकेच्या तुलनेत कमी आहे.

२) इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्समध्ये ५ स्थायी समित्या असून त्या महत्वपूर्ण आणि सक्रिय आहेत.

३) इंग्लंडमध्ये समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड गुणवत्तेच्या आधारावर केली जाते.

४) इंग्लंडमध्ये विषयानुसार स्थायी समिती नसल्याने अनेकदा विशेष समिती गठीत केली जाते.

५) इंग्लंडमध्ये समितीची निवड राजकीय पक्षाद्वारे गठीत समितीतर्फे होते.

६) इंग्लंडमध्ये विधेयकांचे समितीद्वारे द्वितीय वाचन झाल्यावरच ती विधेयके अध्यक्षाकडे पाठविली जातात म्हणून विधेयकांत परिवर्तन करता येते.

## ''काँग्रेस''

## अमेरिकेची समिती पद्धती

१) अमेरिकेच्या समिती पद्धतीचे अधिकार जास्त आहे.

२) अमेरिकेच्या प्रतिनिधी गृहात २० स्थायी समित्या असून त्या सक्रीय नाहीत.

३) अमेरिकेच्या समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड वरिष्ठतेच्या आधारावर केली जाते.

४) अमेरिकेत विषयवार स्थायी समित्या असल्यामुळे विशेष समितीची गरज नसते.

५) अमेरिकेत समितीची निवड प्रतिनिधिक सभेत दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या शिफारशीनुसार होते.

६) अमेरिकेत विधेयकांचे समितीद्वारे प्रथम वाचन झाल्यावर ती विधेयके अध्यक्षांकडे पाठविली जातात म्हणून विधेयकांत परिवर्तन करता येत नाही.

३) अध्यक्षात्मक शासनव्यवस्था आणि सांसदीय शासनव्यवस्था यांची तुलना :-

कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ ह्या शासनाच्या दोन शाखांचे परस्परातील संबंध कसे आहेत, यावर ह्या शासनव्यवस्था अवलंबून आहेत. ह्या आधारावर तीन शासनप्रकार बनतात.

१) कायदेमंडळ जर कार्यकारी मंडळापेक्षा श्रेष्ठ असेल म्हणजे कार्यकारी मंडळावर कायदेमंडळाचे नियंत्रण असेल तर ती सांसदीय शासन व्यवस्था होय.

२) कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ दोन्ही विभाग समान दर्जाचे असतील म्हणजे परस्परांच्या नियंत्रणापासून स्वतंत्र असतील तर ती अध्यक्षीय शासन व्यवस्था होय.

३) कायदेमंडळापेक्षा कार्यकारी विभाग अधिक श्रेष्ठ असेल म्हणजे कायदेमंळाचे नियंत्रण नसेल, ती हुकूमशाही होय.

आधुनिक काळात सांसदीय व अध्यक्षीय हे दोन लोकशाही प्रकार म्हणून स्विकारलेले आहेत. सांसदीय पद्धतीचे माहेघर ब्रिटन तर अध्यक्षीय पद्धतीचे माहेघर अमेरिका आहे.

४) इंग्लंडच्या कायदेमंडाचे दुसरे सभागृह आणि अमेरिकेच्या कायदेमंडळाचे दुसरे सभागृह तुलना

इंग्लंडचे लॉर्ड सभागृह आणि अमेरिकेचे सिनेट सभागृहाची तुलना

**लॉर्डस सभागृह** **सिनेट सभागृह**

१) लॉर्डस सभागृह दुर्बल आहे.

१) सिनेट शक्तीशाली सभागृह आहे.

२) लॉर्डस सभागृह वंशपररेने आलेले सदस्य काम करतात.

२) सिनेटमध्ये जनतेने निवडून दिलेले सदस्य काम करतात.

३) लॉर्डस सभागृहाची सभासद संख्या जवळपास १००० आहे.

३) सिनेटची सभासद संख्या १०० एवढी आहे.

४) लॉर्डस सभागृह सामान्य विधेयक केवळ एका वर्षापर्यत प्रलंबित ठेवू शकते.

४) सिनेट सभागृह सामन्य विधेयकाला पूर्णपर्ण नाकारु शकते.

५) मंत्रिमंडळ लॉर्डस सभागृह जबाबदार असते.

५) मंत्रिमंडळ सिनेट सभागृहाला जबाबदार नसते.

६) न्यायदान क्षेत्रात लॉर्डस सभागृहाचे अधिकार शक्तीशाली आहे.

६) न्यायदान क्षेत्रात सिनेट सभागृहाचे अधिकार नगण्य स्वरुपाचे आहे.

७) कायदानिर्मिती आणि कार्यकारीमंडळ या क्षेत्रात लॉर्डस सभागृहाचे अधिकार कमी आहेत.

७) कायदानिर्मिती आणि कार्यकारीमंडळ या क्षेत्रात सिनेटचे अधिकारी जास्त आहे.

-------------

ड) **विशेष साम्य आणि भेद दर्शविणारे तौलनिक प्रारुप (आराखडे) (Strategic of Comparison) (Most similar Systems and Most different systems design)**

| इंग्लंड | अमेरिका | स्वित्झर्लंड | सोव्हिएट रशिया |
|---|---|---|---|
| १) इंग्लंडची राजकीय संस्कृती जगातील प्राचीनतम राजकीय संस्कृती पैकी एक आहे. | १) भिन्न-भिन्न वंशाच्या संमिश्रणातून निर्माण झालेली संस्कृती | १) भिन्न-भिन्न वंशाची संमिश्र संस्कृती आहे. | १) क्रांतिकारी राजकीय संस्कृती आहे. |
| २) परंपरेकडून आधुनिकतेकडे वाटचाल करणारी संस्कृती | २) भौतिकवादाने प्रभावित असलेली राजकीय संस्कृती | २) गुणवत्ता आणि कर्तृत्वाला प्राधान्य देणारी संस्कृती | २) साम्यवादी विचारसरणीची राजकीय संस्कृती |
| ३) रुढी, परंपरा आणि संकेत यांना प्राधान्य देणारी संस्कृती | ३) प्रयत्नवादी, विज्ञाननिष्ठ बुद्धीवादी आणि धर्मनिरपेक्ष संस्कृती | ३) सुशिक्षित पण पुराणमतवादी संस्कृती | ३) विविधतेत एकता दर्शविणारी संस्कृती |
| ४) सहभागांकित राजकीय संस्कृती | ४) सकारात्मक जनसहभागाची संस्कृती | ४) सहभागांकित राजकीय संस्कृती | ४) एकपक्षीय विचारांची राजकीय संस्कृती |
| ५) लोकशाहीवर श्रद्धा ठेवणारी संस्कृती | ५) लोकशाहीवर अपारश्रद्धा ठेवणारी राजकीय संस्कृती | ५) लोकशाहीवर श्रद्धा ठेवणारी राजकीय संस्कृती | ५) लोकशाहीतून साम्यवादी समाजरचना मजबूत करणारी संस्कृती |
| ६) राजकीय परंपराचे पालन करणारी संस्कृती | ६) राजकीय नैतिकता पाळणारी संस्कृती | ६) राजकीय पक्षाची बांधिलकी नसणारी संस्कृती | ६) आज्ञापालन करणारी राजकीय संस्कृती |
| ७) कायद्याची अधिसत्ता मान्य करणारी संस्कृती | ७) शासनाला प्रभावित करणारी संस्कृती | ७) अनेकात्मक शासनाला समर्थन देणारी संस्कृती | ७) विस्ताराला मान्यता देणारी संस्कृती |
| ८) राष्ट्रीय एकरुपता दर्शविणारी संस्कृती | ८) बहुमताचे शासन प्रस्थापित करणारी संस्कृती | ८) तटस्थ धोरण मान्य करणारी राजकीय संस्कृती | ८) लोकतंत्रात्मक राजकीय संस्कृती |

## २) इंग्लंड आणि अमेरिकेतील समिती पद्धतीची तुलना आणि साम्य

| ''संसद''<br>**इंग्लंडची समिती पद्धती** | ''काँग्रेस''<br>**अमेरिकेची समिती पद्धती** |
|---|---|
| १) इंग्लंडच्या समिती पद्धतीचे अधिकार अमेरिकेच्या तुलनेत कमी आहे. | १) अमेरिकेच्या समिती पद्धतीचे अधिकार जास्त आहे. |
| २) इंग्लंडच्या हाऊस ऑफ कॉमन्समध्ये ५ स्थायी समित्या असून त्या महत्वपूर्ण आणि सक्रिय आहेत. | २) अमेरिकेच्या प्रतिनिधी गृहात २० स्थायी समित्या असून त्या सक्रीय नाहीत. |
| ३) इंग्लंडमध्ये समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड गुणवत्तेच्या आधारावर केली जाते. | ३) अमेरिकेच्या समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड वरिष्ठतेच्या आधारावर केली जाते. |
| ४) इंग्लंडमध्ये विषयानुसार स्थायी समिती नसल्याने अनेकदा विशेष समिती गठीत केली जाते. | ४) अमेरिकेत विषयवार स्थायी समित्या असल्यामुळे विशेष समितीची गरज नसते. |
| ५) इंग्लंडमध्ये समितीची निवड राजकीय पक्षाद्वारे गठीत समितीतर्फे होते. | ५) अमेरिकेत समितीची निवड प्रतिनिधिक सभेत दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या शिफारशीनुसार होते. |
| ६) इंग्लंडमध्ये विधेयकांचे समितीद्वारे द्वितीय वाचन झाल्यावरच ती विधेयके अध्यक्षाकडे पाठविली जातात म्हणून विधेयकांत परिवर्तन करता येते. | ६) अमेरिकेत विधेयकांचे समितीद्वारे प्रथम वाचन झाल्यावर ती विधेयके अध्यक्षांकडे पाठविली जातात म्हणून विधेयकांत परिवर्तन करता येत नाही. |

## ३) अध्यक्षात्मक शासनव्यवस्था आणि सांसदीय शासनव्यवस्था यांची तुलना :-

कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ ह्या शासनाच्या दोन शाखांचे परस्परातील संबंध कसे आहेत, यावर ह्या शासनव्यवस्था अवलंबून आहेत. ह्या आधारावर तीन शासनप्रकार बनतात.

१) कायदेमंडळ जर कार्यकारी मंडळापेक्षा श्रेष्ठ असेल म्हणजे कार्यकारी मंडळावर कायदेमंडळाचे नियंत्रण असेल तर ती सांसदीय शासन व्यवस्था होय.

२) कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ दोन्ही विभाग समान दर्जाचे असतील म्हणजे परस्परांच्या नियंत्रणापासून स्वतंत्र असतील तर ती अध्यक्षीय शासन व्यवस्था होय.

३) कायदेमंडळापेक्षा कार्यकारी विभाग अधिक श्रेष्ठ असेल म्हणजे कायदेमंळाचे नियंत्रण नसेल, ती हुकूमशाही होय.

आधुनिक काळात सांसदीय व अध्यक्षीय हे दोन लोकशाही प्रकार म्हणून स्विकारलेले आहेत. सांसदीय पद्धतीचे माहेघर ब्रिटन तर अध्यक्षीय पद्धतीचे माहेघर अमेरिका आहे.

**४) इंग्लंडच्या कायदेमंडाचे दुसरे सभागृह आणि अमेरिकेच्या कायदेमंडळाचे दुसरे सभागृह तुलना**
**इंग्लंडचे लॉर्ड सभागृह आणि अमेरिकेचे सिनेट सभागृहाची तुलना**

| लॉर्डस सभागृह | सिनेट सभागृह |
|---|---|
| १) लॉर्डस सभागृह दुर्बल आहे. | १) सिनेट शक्तीशाली सभागृह आहे. |
| २) लॉर्डस सभागृह वंशपरंरेने आलेले सदस्य काम करतात. | २) सिनेटमध्ये जनतेने निवडून दिलेले सदस्य काम करतात. |
| ३) लॉर्डस सभागृहाची सभासद संख्या जवळपास १००० आहे. | ३) सिनेटची सभासद संख्या १०० एवढी आहे. |
| ४) लॉर्डस सभागृह सामान्य विधेयक केवळ एका वर्षापर्यत प्रलंबित ठेवू शकते. | ४) सिनेट सभागृह सामन्य विधेयकाला पूर्णपर्ण नाकारु शकते. |
| ५) मंत्रिमंडळ लॉर्डस सभागृह जबाबदार असते. | ५) मंत्रिमंडळ सिनेट सभागृहाला जबाबदार नसते. |
| ६) न्यायदान क्षेत्रात लॉर्डस सभागृहाचे अधिकार शक्तीशाली आहे. | ६) न्यायदान क्षेत्रात सिनेट सभागृहाचे अधिकार नगण्य स्वरुपाचे आहे. |
| ७) कायदानिर्मिती आणि कार्यकारीमंडळ या क्षेत्रात लॉर्डस सभागृहाचे अधिकार कमी आहेत. | ७) कायदानिर्मिती आणि कार्यकारीमंडळ या क्षेत्रात सिनेटचे अधिकारी जास्त आहे. |

**५) स्वित्झर्लडच्या कायदेमंडळाचे दुसरे सभागृह आणि अमेरिकेच्या कायदेमंडळाचे दुसरे सभागृह तुलना स्विस् राज्यसभा आणि अमेरिकन सिमेट मधील तुलना**

| **स्विस् राज्यसभा (Council of the State)** | **अमेरिकन सिनेट (Senate)** |
|---|---|
| १) स्विस् राज्यसभा हे कायदेमंडळाचे वरिष्ठ सभागृह असून हे सभागृह कॅन्टॉन्सचे समान प्रतिनिधीत्व करते. | १) अमेरिकन, सिनेट हे वरिष्ठ दर्जाचे सभागृह असून घटकराज्यांचे समान प्रतिनिधीत्व करते. |
| २) स्विस् राज्यसभेचे अधिकार नगण्य स्वरूपाचे आहे. | २) अमेरिकन सिनेटला सत्ताविभाजनाच्या तत्वामुळे विशेष अधिकार प्राप्त झाले आहे. |
| ३) स्विस् राज्यसभेच्या सदस्यांना कार्यकाळ सारखा नसतो व तो ठरविण्याचा अधिकार प्रत्येक कॅन्टानला असतो. | ३) अमेरिकेत सिनेट सदस्यांचा कार्यकाळ ६ वर्षाचा असतो. |
| ४) राज्यसभेचे सभासद आपल्यातुनच अध्यक्षाची निवड करतात. | ४) अमेरिकेत उपराष्ट्रपती सिनेटचा पदसिध्द सभापती असतो. |
| ५) स्विस्चे राज्यसभा हे कायम सभागृह नाही. | ५) अमेरिकेचे सिनेट सभागृह हे कायम सभागृह आहे. |

## ६) विविध देशातील न्यायमंडळाची तुलना

| इंग्लंड | अमेरिका | स्वित्झर्लंड | सोव्हिएट रशिया |
|---|---|---|---|
| १) इंग्लंडमध्ये हाऊस ऑफ लॉर्डस हे सर्वोच्च न्यायालय असून स्वतंत्र आणि निर्भीड आहे. | १) अमेरिकेत शक्तीशाली सर्वोच्च न्यायलय असून स्वतंत्र व नि:पक्ष आहे. | १) स्विसमध्ये फेडरल ट्रिब्युनल हे सर्वोच्च न्यायालय असून शक्तीशाली न्यायालय नाही. | १) रशियात सुप्रीम कोर्ट ऑफ दि. यु.एस.एस.आर. हे सर्वोच्च न्यायालय असून ते स्वतंत्र नाही. |
| २) इंग्लंडमध्ये सत्ताविभाजन आणि सत्तासंतुलन मान्य केले नाही. | २) अमेरिकेत सत्ताविभाजन व सत्तासंतुलन मान्य केलेल आहे. | २) स्विसमध्ये सत्ताविभाजन व सत्तासंतुलन मान्य केले नाही. | २) रशियात सत्ताविभाजन आणि सत्ता संतुलन मान्य केले नाही. |
| ३) इंग्लंडमध्ये दुहेरी न्यायवयवस्था नाही. | ३) अमेरिकत दुहेरी न्यायव्यवस्था आहे. | ३) स्विसमध्ये एकेरी न्यायव्यवस्था न्यायाधीशांची नियुक्ती फेडरल असेंब्ली करते. | ३) रशियात सर्वोच्च न्यायालय शासनाचाच भाग आहे. |
| ४) इंग्लडमध्ये नऊ विधी लॉर्ड या न्यायाधीशांच्या समितीची नियुक्ती राजा करतो. | ४) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती सिमेटच्या सल्ल्याने व संमतीने अध्यक्ष करतो. | ४) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची नियुक्ती फेडरल असेंब्ली करते. | ४) न्यायाधीशांची नियुक्ती पक्षानुसार होते. |
| ५) महत्वाचे निर्णय पंचाच्या सल्ल्याने म्हणजे ज्युरी पध्दतीने होतात. | ५) न्यायदान ज्युरी पध्दतीने होत नाही. | ५) न्यायदान ज्युरी पध्दतीने होत नाही. | ५) महत्वाचे निर्णय पंचाव्या सल्ल्याने म्हणजे ज्युरी पध्दतीने होतात. |
| ६) न्यायिक पुनरावलोकनाचा अधिकार नाही. | ६) न्यायिक पुनरावलोकनाचा अधिकार आहे. | ६) न्यायिक पुनरावलोकनाचा अधिकार नाही. | ६) न्यायिक पुनरावलोकनाचा अधिकार नाही. |

### ७) चार देशातील जनतेचा राजकीय सहभागातील विविधता दर्शविणारा तक्ता

| इंग्लंड | अमेरिका | स्वित्झर्लंड | सोव्हिएट रशिया |
|---|---|---|---|
| १) सांसदीय शासन पध्दती असल्यामुळे प्रतिनिधींची निवड करण्याचा अधिकार जनतेला प्राप्त झाला आहे. | १) अध्यक्षीय शासन पध्दती असल्याने आणि अध्यक्ष हा घटनात्मक व वास्तविक शासन प्रमुख असल्याने जनतेचा राजकीय सहभाग अन्य स्वरूपाचा आहे. | १) स्विसमध्ये प्रत्यक्ष लोकशाही आणि लोकशाही साधनांचा वापर असल्याने जनतेचा राजकीय सहभाग सक्रिय आहे. | १) लोकशाही शासनाचे केंद्रिकरण आणि शासनावर एकमेव अस्तितवात असलेल्या पक्षाचे प्राबल्य त्यामुळे राजकीय सहभाग सक्तीचा आहे. |
| २) व्दिपक्ष पध्दती आणि सुसंघटित पक्ष असल्याने जनतेचा राजकीय सहभाग अधिक प्रमाणात आहे. | २) व्दिपक्ष पध्दती मात्र पक्षात सुसूत्रता आणि शिस्त नसल्याने येथील पक्ष जनतेला राजकीय विचार पोहोचविण्यात अपुरे पडतात. | २) राजकीय पक्षाव्दारे राजकीय सहभागाचे प्रमाण कमी आहे. | २) एक राजकीय पक्ष असल्याने जनतेचा राजकीय सहभाग एकतर्फी संमतीची आहे. |
| ३) प्रसारमाध्यमे सरकार नियंत्रित नसल्याने जनता राजकीय विचार मांडून राजकीय सहभाग दर्शवितात. | ३) प्रसारमाध्यमे सरकार नियंत्रित नसल्याने जनता या माध्यमांचा उपयोग रीजकीय सहभाग वाढविण्यासाठी करतात. | ३) राजकीय पक्ष प्रभावी नसल्याने व पक्षात चढाओढ नसल्याने प्रसार माध्यमांचा वापर होत नाही. | ३) प्रसारमाध्यमे सरकारच्या मालकीची असल्याने जनतेला या माध्यमातून सहभाग दर्शविता येत नाही. |
| ४) जनतेच्या राजकीय सहभागात विरोधी पक्षाची भूमिका महत्वाची आहे. | ४) राजकीय पक्षाविषयी आत्मियता नसल्याने पक्षाची भूमिका प्रभावी नाही. | ४) राजकीय पक्ष प्रभावहीन आहे. | ४) विरोधी पक्षच अस्तित्वात नाही. |
| ५) दबावगटाची राजकीय सहभागात महत्वाची भूमिका आहे. | ५) दबावगटाच्या माध्यमातून जनतेच्या सक्रिय सहभाग दिसून येतो. | ५) शिक्षणाचे वाढते प्रमाण आणि नागरिकांची जबाबदार वृत्ती असल्याने राजकीय सहभाग अधिक आहे. | ५) राजकीय सहभागात दबावगटाची भूमिका नाही. दबावगट अस्तित्वात नाही. |
| ६) सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचे प्रमाण साधारणत: ८० टक्के असते. | ६) सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचे प्रमाण ५० ते ६० टक्के असते. | ६) सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचे प्रमाण ९५ टक्के असते. | ६) सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाचे प्रमाण ९० टक्के असते. |

## ८) विविध देशातील पक्षपध्दतीची तुलना

| इंग्लंड | अमेरिका | स्वित्झर्लंड | सोव्हिएट रशिया |
|---|---|---|---|
| १) इंग्लंडमध्ये व्दिपक्षपध्दती अस्तित्वात आहे. | १) अमेरिकेत व्दिपक्ष पध्दती अस्तित्वात आहे. | १) स्विसमध्ये अनेक पक्ष पध्दती अस्तित्वात आहे. | १) एकच राजकाय पक्ष पध्ती आहे. |
| २) इंग्लंडमध्ये पक्षसंघटना सुसंघटित आहे आणि पक्षात कठोर शिस्त आहे. | २) अमेरिकेत पक्ष संघटना शिथिल स्वरूपाची असून पक्षशिस्तीचा अभाव आहे. | २) सिवसमध्ये पक्ष संघटना संघटित स्वरूपाच्या नाहीत. | २) रशियात पक्ष संघटना सुसंघटित असून पक्षात कठोर शिस्त आहे. |
| ३) इंग्लंडमधील दोन्ही पक्षांची विचारसरणी परस्परविरोधी आहे. | ३) अमेरिकेत दोन्ही पक्षाच्या विचारसरणीत समानता आहे. | ३) स्विसमधील राजकीय पक्षाच्या विचारसरणीत फारसा भेद नाही. | ३) रशियात एकच पक्ष असून साम्यवादी विचारसरणी बाळगणारा आहे. |
| ४) संसदीय प्रणाली असल्याने इंग्लंडमधील राजकीय पक्ष सदैव सक्रिय असतात. | ४) अमेरिकेत राजकीय पक्ष निवडणुकीपुरते सक्रिय असतात. | ४) स्विसमध्ये लोकशाही साधनाच्या वापरामुळे पक्षाची भूमिका नगण्य स्वरूपाची आहे. | ४) रशियात शासन आणि पक्ष यांच्यात भेद नसल्याने पक्षाची सदैव सत्ता असते. |
| ५) इंग्लंडमध्ये राजकीय पक्षांनी घटनात्मक लोकशाही मार्गाचा वापर केला आहे. | ५) अमेरिकेत राजकीय पक्षांनी ''खैरात पध्दती'' चा वापर करून गैरमार्गाचा अवलंब केला आहे. | ५) स्विसमध्ये राजकीय पक्षांनी घटनात्मक लोकशाही मार्गाचा वापर केला आहे. | ५) सोव्हिएट रशियात पक्षाची भूमिका जनहिताची राहिली आहे. |
| ६) इंग्लंडमध्ये राजकीय पक्षात दबावगटाची भूमिका नगण्य स्वरूपाची आहे. | ६) अमेरिकेतील राजकीय पक्षात दबावगटाचा सक्रिया प्रभाव आहे. | ६) स्विसमधील राजकीय पक्षात दबावगटाचा सक्रिया प्रभाव आहे. | ६) रशियात एकच पक्ष पध्दती मान्य असल्याचे दबावगटांना कार्य करण्याची संधी प्राप्त होत नाही तेथे दबावगटच नाहीत. |

## ९) विभिन्न देशातील दबावगटाची तुलना

| इंग्लंड | अमेरिका | स्वित्झर्लंड |
|---|---|---|
| १) दबावगट हे ब्रिटीश शासनाच्या ध्येय धोरणावर प्रभाव पाडण्याचे कार्य करतात. | १) दबावगट हे कायदेमंडळाचे सदस्य आणि शासन अधिकारी यांच्यावर प्रभाव पाडण्याचे कार्य करतात. | १) दबावगट हे स्विस सरकारच्या ध्येयधोरणांवर व जननिर्णयांवर प्रभाव पाडण्याचे कार्य करतात. |
| २) कायदानिर्मितीच्या प्रक्रियेत येथील दबावगट महत्वाची भूमिका बजावतात. | २) कायदानिर्मितीच्या प्रक्रियेत येथील दबावगट महत्वाची भूमिका बजावतात. | २) विधी निर्मितीच्या प्रक्रियेत दबावगटांना विशेष स्थान आहे. |
| ३) दबावगटाची राजकीय पक्षांशी बांधिलकी आहे. | ३) दबावगटाची राजकीय पक्षाशी बांधिलकी नाही. | ३) दबावगटाची राजकीय पक्षाशी बांधिलकी आहे. |
| ४) दबावगटांना शासकीय आणि वैधानिक मान्यता आहे. | ४) येथील दबावगट सक्षम असून स्वयंभू आहेत. | ४) स्विसमध्ये दबावगटांना शासकीय मान्यता आहे. |
| ५) येथील दबावगट संघटित नसून त्यांची स्थायी कार्यालये नाहीत. | ५) दबावगट सुसंटित असून त्यांचे स्थायी कार्यालय आहे व पगारी नौकर वर्ग आहे. | ५) दबावगट सुसंघटित आहे. |
| ६) दबावगटाची संख्या तुलनेत कमी आहे. | ६) दबावगट लाखाच्या संख्येत आहे. | ६) दबावगटाची संख्या मर्यादित आहे. |
| ७) येथील दबावगट राजकीय निर्णय प्रक्रिया प्रभावित करीत नाहीत. | ७) येथील दबावगट राजकीय निर्णय प्रक्रिया प्रभावित करतात. | ७) येथील दबावगट राजकीय निर्णयप्रक्रिया प्रभावित करतात. |
| ८) इंग्लंडमधील दबावगट ब्रिटीश जनजीवनाचे हित जोपासून मानवतावादी दृष्टिकोनातून कार्य करतात. | ८) अमेरिकेतील दबावगट शांततापूर्ण मार्गासोबतच धमकी, हिंसा किंवा शक्य त्या मार्गाचा वापर करतात तसेच ''लॉबी'' या तत्रांचा वापर मोठया प्रमाणात करतात. | ८) स्विसमधील दबावगट सनदशीर मार्गाचा वापर करतात. |

## १०) चार देशातील निवडणूक विश्लेषण दर्शविणार तक्ता

| इंग्लंड | अमेरिका | स्विट्झर्लंड | सोव्हिएट रशिया |
|---|---|---|---|
| १) प्रादेशिक मतदारसंघ व साध्य बहुमताचा वापर | १) अध्यक्षाची निवड अप्रत्यक्ष पध्दतीने निर्वाचन मंडळाव्दारे केली जाते. | १) नॅशनल कौन्सिलच्या सदस्यांची निवड प्रत्यक्ष मतदानाने केली जाते. | १) कायदेमंडळाच्या सदस्यांची निवड प्रत्यक्ष मतदानाने केली जाते. |
| २) १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नागरिकाला मतदानाचा अधिकार | २) १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या नागरिकाला मतदाराचा अधिकार आहे. | २) २० वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकाला मतदानाचा अधिकार आहे. | २) वयाची १८ वर्षे असणाऱ्याला मतदानाचा अधिकार आहे. |
| ३) निवडणूकीत ७० ते ८० टक्के मतदान | ३) ५० ते ६० टक्के मतदान होते. | ३) १५ टक्के मतदान होते. | ३) १० टक्के मतदान होते. |

## २.३ सारांश

तुलनात्मक राज्यशास्त्रात व्यवस्था सिद्धांत, रचनात्मक कार्यवाही सिद्धांत आणि पराधीनता सिद्धांत यामुळे तुलनात्मक विश्लेषणाचे सर्वश्रेष्ठ साधन प्राप्त झाले आहे. यामुळे तुलना करणे सोपे आणि उपयोगी बनले आहे. व्यवस्थावादी सिद्धांतामुळे राजकीय व्यवस्थेच्या विविध कार्याची माहिती होते तसेच राजकीय व्यवस्था कशाप्रकारे कार्य करते याचाही अर्थबोध होतो. एखाद्या व्यवस्थेतील रचना ती व्यवस्था टिकविण्याच्या दृष्टीने कोणती कार्ये पार पाडते याचा अभ्यास रचनात्मक कार्यवादी सिद्धांमध्ये होतो. व्यवस्थेच्या संदर्भात रचना आणि कार्य हयांचा परस्परसंबंध दर्शविण्यासाठी रचनात्मक कार्यवादी सिद्धांताचा अवलंब करण्यात येतो. पराधीनता सिद्धांत जगातील पराधिन विकास प्रक्रियेला समजून घेण्यासाठी आधारभूत ठरतो. या सिद्धांतामुळे अविकसीत राष्ट्रे इतर राष्ट्रांवर कोणत्या कारणामुळे अवलंबून राहतात याचा अर्थबोध होतो.

## २.४ सरावासाठी प्रश्न

१) व्यवस्थावादी सिद्धांत वर्णन करा.

२) रचनात्मक कार्यवादी सिद्धांताचे प्रतिपादन सांगा.

३) पराधीनता सिद्धांत स्पष्ट करा.

## २.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. Almond, G.A.(1966) Comparative Politics, A Developmental Ap proach, Boston: Little Brown Co.

२. गेना सि.बी.(१९७८) तुलनात्मक राजनीति एवं राजनीतिक संस्थाए, नई दिल्ली, विकास पब्लिसिंग.

३. येरणकर, श्रीराम(२००५) तुलनात्मक शासन आणि राजकारण, नागपूर, साईनाथ प्रकाशन.

४. देवगांवकर, एस.जी.(२०१४) तुलनात्मक शासन आणि राजकारण, नागपूर, साईनाथ प्रकाशन.

------------

# ३

# घटक ३ - राज्य

**घटक संरचनाः**

३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ विषय विवेचन
३.३ राज्याची कल्याणकारी व भौतिकवादी कार्ये
३.४ सारांश
३.५ सरावासाठी प्रश्न
३.६ संदर्भग्रंथ

## ३.० उद्दिष्टे

१. राज्याचा अर्थ जाणून घेऊन त्याचे स्वरुप समजून घेणे.
२. राज्याचे समाज विकासातील महत्व जाणून घेणे.
३. राज्याचा विकास अभ्यासणे.
४. राज्याच्या उत्पत्तीबाबतचे विविध सिद्धांत अभ्यासणे.
५. राज्याची कल्याणकारी व भौतिकवादी कार्ये अभ्यासणे

## ३.१ प्रस्तावना

राज्य ही अगदी पुरातन काळापासून चालत आलेली संस्था आहे. किंबहुना आपणास असे म्हणता येईल की, ज्या वेळेपासून मानवाला समाज करून राहण्याची गरज भासू लागली त्या वेळेपासून त्याला राज्याची देखील गरज निर्माण झाली. ' मनुष्य हा एक समाजशील प्राणी आहे' असे ॲरिस्टॉटलने म्हटले आहे. कोणताही मनुष्य समाजाबाहेर राहून एकाकी जीवन जगू शकत नाही. मानवी जीवनाच्या गरजा अनेकविध असतात. त्यामुळे समाजात वास्तव्य करून इतर व्यक्तींच्या सहकार्यानेच प्रत्येकाला आपल्या गरजांची पूर्तता करणे शक्य होते. व्यक्तींच्या व्यक्तिमत्वाचा खरा विकास समाजातच होऊ शकतो. राज्य समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचे कार्य करते. त्यांच्या या कार्यामुळेच मानवाला सुसंघटित सामाजिक जीवनाचा लाभ घेता येतो. राज्य ही समाजातील अनेक सस्थांपैकी एक संस्था आहे. मानवाने आपल्या जीवनावश्यक गरजांच्या पूर्ततेसाठी अनेक संस्थांची निर्मिती केली. त्यापैकीच राज्य ही एक संस्था होय.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ राज्यसंस्थेचे स्वरुप

१. राज्य ही सर्वश्रेष्ठ व अत्यावश्यक संस्था असली तरी तिच्या स्वरुपाविषयी मात्र राजकीय विचारवंतांत एकमत नाही.

२. आदर्शवादी विचारवंतांनी राज्याला आदर्श व सर्वोच्च संस्था मानले आहे.

३. जर्मन आदर्शवादी विचारवंत हेगेल याने तर राज्य म्हणजे ' ईश्वराचे पृथ्वीतलावरील संचालन होय ' या शब्दात राज्याचे वर्णन केले आहे.

४. व्यक्तिवादी विचारवंतांच्या मते, राज्य ही आपत्ती आहे.

५. कार्ल मार्क्सने राज्याला एक वर्गीय संघटना मानले आहे. त्याच्या मते, राज्य म्हणजे समाजातील वरिष्ठ वर्गाच्या हाती असलेले शोषणाचे एक साधन होय.

विविध देशांत व व्यक्तींच्या विचारात भिन्नता पाहावयास मिळत असली तरी समाज जीवनातील त्याचे सर्वश्रेष्ठ स्थान मात्र अबाधितच राहिले आहे.

### ३.२.२ राज्याची व्याख्या

राज्य ही संकल्पना अधिक स्पष्ट होण्यासाठी निरनिराळ्या राज्यशास्त्रज्ञांनी राज्याच्या केलेल्या काही व्याख्या अभ्यासणे आवश्यक आहे.

- **गार्नर –** विशिष्ट भूप्रदेशावर कायमचे वास्तव्य करणारा, बाह्य नियंत्रणापासून जवळजवळ मुक्त असलेला आणि ज्या शासन संस्थेच्या आज्ञांचे पालन तेथील बहुसंख्य रहिवासी स्वभावतःच करतात अशी सुसंघटित शासन संस्था लाभलेला कमी अधिक लोकांचा समुदाय म्हणजे राज्य होय.
- **ब्लंटशली –** एका निश्चित भूप्रदेशावर राजकीयदृष्ट्या संघटित झालेला जनसमुदाय म्हणजे राज्य होय.
- **प्रो. लास्की –** शासन संस्था आणि प्रजा यांच्यात विभागला गेलेला आणि आपल्या विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात इतर सर्व संस्थांवर श्रेष्ठत्व सांगणारा प्रादेशिक समाज म्हणजे राज्य होय.

### राज्याचे आवश्यक घटक

१. **लोकसंख्या –** लोकसंख्या हा राज्याचा एक महत्वाचा घटक होय. राज्य अस्तित्वात येण्यासाठी लोक असावे लागतात. अर्थात राज्याची लोकसंख्या किती असावी याविषयी विचारवंतांत एकमत नाही. प्लेटोने राज्याची उपयुक्त लोकसंख्या ५०४०

एवढी सांगितली. ॲरिस्टॉटलच्या मते, राज्याची लोकसंख्या राज्य स्वयंपूर्ण होईल इतकी असावी. रुसोच्या मते, राज्याची लोकसंख्या १०,००० असावी. पूर्वी दळणवळणाच्या साधनांत वाढ झाल्याने कमी लोकसंख्या राज्यासाठी उपयुक्त ठरत नाही. राज्याच्या लोकसंख्येविषयी निश्चित नियम नसल्याने आज जगात अतिशय कमी लोकसंख्या असलेली व्हॅटिकन सिटीसारखी राज्ये अस्त्वित आली आहेत. त्याप्रमाणे चीन व भारत यासारखी प्रचंड लोकसंख्या असलेली राज्येही अस्तित्वात आहेत.

२. **भूप्रदेश –** भूप्रदेश हा राज्याच्या सामर्थ्याचा एक महत्वपूर्ण घटक समजला जाऊ लागला आहे. ट्रॉटस्की या शास्त्रज्ञाच्या मते, '' राज्याचा भूविस्तार किती आहे हा प्रश्न महत्वाचा नाही, तर राज्याची सक्ती किती आहे, हीच गोष्ट महत्वाची आहे.'' अर्थात राज्याच्या भूप्रदेशाच्या विस्ताराबरोबरच त्या भूप्रदेशात नैसर्गिक साधनसंपत्ती किती प्रमाणात उपलब्ध आहे यावरही त्या राज्याचे सामर्थ्य व संपन्नता अवलंबून असते.

३. **शासन संस्था –** भूप्रदेश आणि लोकसंख्या यांच्या इतकाच राज्याचा तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे शासन किंवा सरकार होय. त्यासाठी लोकांमध्ये राजकीय संघटनांची आवश्यकता आहे. समाजाला सुसंघटित करण्याचे कार्य शासन संस्था करते. प्रत्येक राज्याचे ध्येय नागरिकांचे कल्याण करणे हे असते. राज्याची धोरणे ठरविणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे, ही शासन संस्थेची कामे होत. म्हणजे शासन संस्था राज्याच्या इच्छेला मूर्त स्वरूप देते. ती राज्याचा एक प्रतिनिधी या नात्याने कार्य करते. शासन संस्थेचे अनेक प्रकार पडतात. उदा. राजेशाही, हुकूमशाही, लोकशाही इत्यादी. प्रत्येक राज्यातील लोक आपल्या सोयीनुसार शासन संस्थेच्या प्रकाराची निवड करतात. शासन कोणतेही असो त्यांनी लोककल्याणाचे कार्य करावे हीच जनतेची इच्छा असते.

४. **सार्वभौमत्व –** सार्वभौमत्व हा राज्याचा आणखी एक महत्वाचा घटक होय. सार्वभौमत्व याचा अर्थ सर्वोच्च, सर्वश्रेष्ठ सत्ता असा होतो. राज्याची सत्ता सर्वोच्च असते. तिच्यावर कोणतेही अंतर्गत अथवा बाह्य मर्यादा नसतात. म्हणून राज्य सार्वभौम समजले जाते. ह्युगो ग्रोशिअस याने सार्वभौमत्वाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. '' जिच्या कृतीवर कोणाचेही नियंत्रण नसते आणि जिच्या इच्छा डावलल्या जात नाहीत, अशा व्यक्तीच्या हाती केंद्रीत झालेली सर्वोच्च सत्ता म्हणजे सार्वभौमत्व होय.'' सार्वभौमत्व व बाह्य सार्वभौमत्व अशा दोन बाजू असतात.

## राज्याच्या विकासातील प्रमुख टप्पे

राज्याचे अस्तित्व सर्व देशात तसेच सर्व काळात व सर्व प्रकारच्या समाजात आढळून येत असले तरी त्याचे स्वरुप सर्वत्र सारखेच होते असे मात्र म्हणता येणार नाही. काळानुसार राज्याच्या स्वरुपात बदल होत आला आहे.

१. टोळी अवस्था अथवा गणराज्ये – प्राथमिक समाजातील टोळी अवस्था हा राज्याच्या विकासातील पहिला टप्पा मानला जातो. या अवस्थेलाच गणराज्ये असेही म्हटले जाते. आधुनिक राज्यापेक्षा टोळी अवस्थेचे स्वरुप बरेच वेगळे असले तरी आधुनिक राज्याची प्रमुख लक्षणे आपणास टोळी जीवनात पाहावयास मिळतात. या अवस्थेत टोळीप्रमुखाचे टोळीतील सर्व व्यक्तीवर नियंत्रण चालत होते.

२. पौर्वात्य साम्राज्ये – प्राथमिक अवस्थेतील मानव भटके जीवन जगत होता. त्यांना उदरनिर्वाहासाठी अन्नाच्या शोधात स्थलांतर करावे लागे. शेतीचा शोध लागल्यावर त्यांनी नदीकाठच्या सुपीक प्रदेशात कायमची वस्ती केली. परिणामी मानवी जीवनाला स्थैर्य प्राप्त झाले त्यातूनच मानवाच्या सांस्कृतिक विकासाला चालना मिळाली. या काळात पौर्वात्य देशात मोठमोठी साम्राज्ये उदयास आली होती. त्यांनाच पौर्वात्य साम्राज्ये असे म्हटले जाते.

३. ग्रीक नगरराज्ये – प्राचीन काळात ग्रीस या देशात नगरराज्याचा उदय झाला होता. नगरराज्य म्हणजे मुख्यत्वेकरून एखाद्या शहरापुरतीच मर्यादित व्याप्ती असलेले एक राज्य होय. ग्रीसमधील विशिष्ट भौगोलिक परिस्थिती नगरराज्याच्या विकासास कारणीभूत ठरली होती. ही नगरराज्ये आकाराने लहान असली तरी मानवी संस्कृतीच्या विकासातील त्यांचे योगदान मात्र अतिशय महत्वपूर्ण असे होते.

४. रोमन साम्राज्ये – ग्रीक नगरराज्यांच्या अस्तानंतर युरोपात रोमन साम्राज्याचा उदय झाला. आधुनिक युरोपातील मोठा भूप्रदेश हा रोमन साम्राज्याच्या नियंत्रणाखाली होता. आधुनिक राज्याची प्रमुख अंगे याच कालखंडात विकसित झाली.

५. सरंजामी राज्ये – इसवी सनाच्या चौथ्या शतकाच्या सुमारास साम्राज्याचे विघटन होऊन युरोपात पुढे अनेक लहान लहान सरंजामी राज्ये अस्तित्वात आली. युरोपच्या इतिहासातील मध्ययुगीन कालखंड हा सरंजामी राज्याचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या काळात मध्यवर्ती राजकीय सत्ता नाममात्र बनली आणि ठीकठिकाणच्या स्थानिक सरंजामदारांनी आपली संरजामी राज्ये प्रस्थापित केली.

६. राष्ट्रराज्ये – मध्ययुगीन कालखंडाच्या अखेरीस सरंजामी राज्यांचा अस्त झाला आणि त्यांची जागा राष्ट्र राज्यांनी घेतली. राष्ट्रराज्ये ही राज्याच्या विकासातील आधुनिक अवस्था होय. सरंजामी राज्यात अनेक उणीवा राहून गेल्या होत्या. त्यामुळे मध्ययुगाच्या शेवटी सरंजामदारांच्या सत्तेला बराच विरोध होऊ लागला. हा विरोध हळूहळू वाढत गेला. त्यातून राष्ट्रवादाच्या विकासाला चालना मिळाली.

## राज्याच्या उत्पत्तीसंबंधीचे सिद्धांत

हजारो वर्षांच्या मानवी इतिहासात राज्याची उत्पत्ती केव्हा झाली हे सांगणे कठीण आहे. राज्यसंस्था केव्हा निर्माण झाली, तिचा विकास कसा झाला, त्या विकासाचे टप्पे कोणते आहेत याविषयीची माहिती उपलब्ध नाही. तर्काच्या आधारावर काही अंदाज बांधले जातात. त्यामुळे राज्यशास्त्राच्या अभ्यासकांपुढे राज्याची उत्पत्ती व विकासाबाबत निश्चित उत्तर नाही. मानवाच्या सामाजिक जीवन जगण्याच्या प्रवृत्तीतून राज्याची निर्मिती झाली असावी. मानवी जीवनाच्या प्रारंभापासून राज्यसंस्था अस्तित्वात होती किंवा नाही याचा शोध घेण्याच्या विचारातून राज्यशास्त्रज्ञांनी राज्याच्या उत्पत्तीसंबंधी विविध सिद्धांत मांडले. काहींनी राज्याची उत्पत्ती दैवी शक्तीतून झाली असे सांगितले. काही विचारवंतांच्या मते, राज्याची उत्पत्ती मानवाने आपसांत केलेल्या सामाजिक करारातून झाली. तर काही विचारवंतांनी राज्याची निर्मिती उत्क्रांतीतून झाली असे मत व्यक्त केलेल्या सिद्धांताचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे–

## १. राज्याच्या निर्मितीचा दैवी सिद्धांत

राज्याच्या उत्पत्ती संदर्भात निरनिराळे सिद्धांत मांडले गेलेत. त्यातील काही सिद्धांत काल्पनिक आहेत तर काही ऐतिहासिक. त्यातील काल्पनिक स्वरुपाचा असलेला हा दैवी सिद्धांत होय. या सिद्दांतानुसार ' राज्याची उत्पत्ती दैवी शक्तीतून झाली ' हा विचार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. विशेषतः त्याला धर्मग्रंथांचे पाठबळ आहे.

## दैवी सिद्धांताची ऐतिहासिक पार्श्वभूमी

### धर्मग्रंथांचा आधार

१. हिंदू धर्म – हिंदू धर्माच्या पवित्र मानल्या जाणाऱ्या महाभारत या ग्रंथात राजा आणि प्रजा यांच्यात करार होऊन राज्याची निर्मिती झाल्याचे उल्लेख सापडतात. शांतिपर्वाच्या ५९ व्या अध्यायात असे उल्लेख आहे की, भीष्माचार्य युधिष्ठिराला सांगतात, सत्ययुगात

धर्म मनुष्याचे रक्षण करीत असे, त्यावेळी लोक स्वतंत्र, निर्भयी होते. निःस्वार्थ हेतूने कार्य करीत. त्यामुळे राज्य, राजा, दंड यांची आवश्यकता नव्हती.

२. ख्रिस्ती धर्मग्रंथ – ख्रिस्ती धर्मग्रंथाच्या जुन्या करारात राज्याच्या उत्पत्तीचा दैवी सिद्धांत सांगितलेला आहे. योग्य राजाची निवड तसेच त्याला पदावरुन काढणे ही कार्ये परमेश्वराकडून होत.

३. ज्यू धर्मग्रंथ – ज्यू धर्मानुसार राजा हा परमेश्वराचा एक प्रतिनिधी आहे. परमेश्वराने त्याला राज्यकारभारासाठी पाठवले आहे. त्यामुळे राजा हा परमेश्वराला जबाबदार असतो. त्याला विरोध करण्याचा अधिकार प्रजेला नाही असा उल्लेख त्यांच्या ओल्ड टेस्टामेंट या ग्रंथात सापडतो.

प्राचीन काळात जगातील जवळजवळ सर्वच देशांत राजा सूर्यपुत्र ईश्वराचा अंश मानला जाई. जसे – भारत, चीन, जपान, ग्रीस, रोमन इत्यादी. प्राचीन इजिप्तमध्ये राजाला सूर्यपुत्र मानले जाई. मध्ययुगीन काळात इंग्लंडच्या स्टुअर्ट घराण्याच्या राजा पहिला जेम्स याने 'दी लॉ ऑफ फ्री मोनार्क' या ग्रंथात राजा ईश्वराचा अंश असल्याचे मत मांडले. १७ व्या शतकात फ्रेंच धर्मगुरु बोसँके याच्या मतानुसार, राजा हा परमेश्वराचा अवतार आहे. कुटुंबात जे स्थान पित्याचे असते तेच स्थान राज्यात राजाचे असते.

इंग्लंडमध्ये १६ व १७ व्या शतकात राज्याच्या ईश्वरी उत्पत्तीऐवजी दैवी अधिकारी या स्वरुपात हा सिद्धांत मांडला गेला. या दैवी सिद्धांताच्या ऱ्हासाला१७ व्या शतकात सुरुवात झाली. त्याची कारणे पुढीलप्रमाणे :–

१. सामाजिक कराराच्या सिद्धांतानुसार मानवाने आपसांत करार करुन राज्याची निर्मिती केली हा विचार अस्तित्वात आला.
२. राजसत्तेची धर्मसत्तेपासून फारकत करणारा विचार अस्तित्वात आला.
३. लोकशाही विचारसरणीचा प्रचार व प्रसाराप्रमाणे निरंकुश राजेशाहीचे महत्व कमी होऊ लागले.

त्यामुळे आधुनिक काळात हा सिद्धांत मागे पडला. परंतु तो पूर्णपणे नष्ट झाला असे म्हणता येत नाही.

तसेच पूर्वी धार्मिक आणि राजकीय संस्था या परस्परांशी संबंधित होत्या. राज्यकर्ता आणि धर्मकर्त्यांच्या संगनमताने राज्यकारभार चालविला जाई. धर्मसत्तेचे प्रतिनिधी कायदा निर्मिती प्रक्रियेत सहभागी होत, राजाचा अभिषेक करत तर राजा धार्मिक स्थळांना देणग्या

देत. जसे – पहिल्या महायुद्धानंतर तुर्कस्तानात केमाल पाशा क्रांती होईपर्यंत खलिफाहा राजकीय अधिकारी होता. परंतु शेवटी आज हा सिध्दांत कालबाह्य झाला. या सिद्धांताच्या दुरुपयोगाने अनियंत्रित राजेशाहीचे समर्थन झाले. त्यामुळे हा सिद्धांत शक्ती सिद्धांताइतकाच दोषी ठरतो. त्यावरील लोकांचा विश्वास उडाला. केवळ राज्याची उत्पत्ती सांगणारा एक प्राचीन सिद्धांत म्हणून केवळ त्याकडे पाहावे लागते. ऐतिहासिक पुराव्यांच्या अभावी हा सिद्धांत त्याज्य ठरला आहे.

## २. राज्याच्या उत्पत्तीसंबंधी सामाजिक कराराचा सिद्धात

राज्याची निर्मिती कशी झाली यासंबंधी विवेचन करणाऱ्या अनेक सिद्धांतांपैकी सामाजिक कराराचा सिद्धांत हा एक होय. प्राचीन काळी मनुष्य निसर्गावस्थेत राहत होता.त्यावेळी राज्य नव्हते. निसर्गावस्थेतील मानवाच्या जीवनात काही संकटे आली. त्यात विशेषत्वाने जीविताचा आणि संपत्तीच्या संरक्षणाचा प्रश्न होता. म्हणून लोकांनी आपआपसांत करार करुन राज्य निर्माण केले. कराराने राजाची नियुक्त करुन त्याला अधिकार दिलेत. त्यामुळे लोकांचे जीवन संघटित होऊन निसर्ग नियमांची जागा राज्याच्या कायद्याने घेतली.

राजकीय इतिहासाचा अभ्यास केल्यास असे लक्षांत येते की, १७ व १८ व्या शतकात या सिद्धांताला महत्व प्राप्त झाले. तसेच या सिद्धांताने अनेक लोक प्रभावित झाले. इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स येथील राज्यक्रांतीच्या वेळी या सिद्धांताने महत्वपूर्ण भूमिका बजावली. राज्य हे मानवनिर्मित असून मानवाने आपसांत करार करुन राज्य निर्माण केले. त्याची कारणे पुढीलप्रमाणे –

१. निसर्गावस्थेतील अराजकता, गोंधळ व बेशिस्तीचे वातावरण दूर करणे.
२. निसर्गावस्थेतील स्वयंशासकता, स्वार्थी प्रवृत्ती व भावनाप्रधान कृती नष्ट करणे.
३. समाजातील बळी तो कान पिळी संकल्पना योग्य नव्हती.

या विविध कारणांमुळे समाजात निर्माण झालेली अराजकता नष्ट करुन शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याच्या हेतूने हॉब्ज, लॉक आणि रुसो या पाश्चात्य विचारवंतांनी सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला. मात्र या तिन्ही विचारवंतांनी वर्णन केलेली निसर्गावस्था व कराराचे स्वरुप भिन्न होते. मात्र निसर्गावस्थेतील अराजकता नष्ट करण्यासाठी मानवाने आपसांत करार करुन राज्य निर्माण केले असा सामाजिक कराराचा सिद्धांत हॉब्ज, लॉक, रुसो, कॉंट, ह्यूम, ग्रोशियस इ. विचारवंतांनी सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला. त्यातील हॉब्ज, लॉक व रुसो यांचा सामाजिक कराराचा सिद्धांत पुढीलप्रमाणे–

## हॉब्जचा सामाजिक कराराचा सिद्धांत :

राज्याची निर्मिती सामाजिक कराराद्वारे

हॉब्जने वर्णन केलेली निसर्गावस्थाअसह्य, त्रासदायक, भयानक आणि चिंताग्रस्त स्वरुपाची अवस्था होती. माणसाला बुद्धी असल्यामुळे त्याने स्वतःच्या संरक्षणासाठी शक्तिशाली सत्तेची स्थापना केली पाहिजे असा विचार केला. त्याकरिता मानवाने नैसर्गिक अधिकारांचा त्याग करुन आणि स्वतःवर नियंत्रण प्रस्थापित केले तरच तो सुखी जीवन जगू शकेल. या नैसर्गिक अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी मानवाने आपसांत करार केला. आपण इतरांशी कसे वागावे व इतरांनी आपल्याशी कसे वागावे हे ठरविणारी राज्यसंस्था निर्माण केली.

प्रत्येक माणूस निसर्ग नियमाने वागत नाही. कारण तो स्वार्थी आहे. त्याला तसे वागणे भाग पाडावे लागते, असे सामर्थ्य निर्माण व्हावे म्हणून अनेक इच्छांच्या जागी एका व्यक्तीकडे सार्वभौम सत्ता सोपवावी. प्रत्येक व्यक्ति स्वतःच्या मनाला येईल त्याप्रमाणे वागत असल्याने समाजात गोंधळ व अनाचाराची परिस्थिती निर्माण झाली होती. मनुष्य शांतताप्रिय असल्याने शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी आपल्या काही अधिकारांचा त्याग करण्याची तयारी त्याने दाखविली. या अवस्थेत व्यक्तीला मुक्त स्वातंत्र्य होते. पण शांतता प्रस्थापित करण्यासाठी या मुक्त स्वातंत्र्यावर काही नियंत्रण लादून घ्यावी लागणार होती. त्याचबरोबर दुसऱ्याचे अधिकार व स्वातंत्र्य मान्य करावे लागणार होते. करार याचा अर्थ व्यक्तींनी आपले काही अधिकार एकमेकांना देणे असा होय.

करार केला याचा अर्थ सर्व काही झाले असे नाही. त्या कराराचे पालन महत्वाचे आहे. करार पाळणे म्हणजे न्यायाची मूल्ये मान्य करणे होय. न्याय अन्यायाची तीच कसोटी होय. हॉब्ज कराराची नुसती कल्पना करुन थांबला नाही तर त्याने करारातील काही व्याख्या व प्रतिज्ञा सांगितल्या आहेत. व्यक्ती करार करताना असे म्हणाले की, मी माझ्यावर सत्ता गाजविण्याचा अधिकार या व्यक्तीला किंवा व्यक्तीसमूहाला देत आहे. पण अट अशी आहे, तूही तुझी सत्ता गाजविण्याचा अधिकार त्याच व्यक्तीला किंवा व्यक्तिसमूहाला द्यायला तयार असशील तर.

या अटीप्रमाणे करारातून राज्यसंस्था, जिला हॉब्जने कॉमनवेल्थ म्हटले आहे ती उदयाला आली.

## लॉकचा सामाजिक कराराचा सिद्धांत

हॉब्ज आणि लॉक यांच्या मानवी स्वभावासंबंधीच्या विचारांत दोन टोकांची भूमिका आहे. हॉब्जने मानवात पशुवत गुण बाघितले तर लॉकने त्याच्या मानवीय गुणांवर लक्ष केंद्रित केले.

लॉकने निसर्गावस्थेचे केलेले वर्णन बघितल्यानंतर मनात प्रश्न निर्माण होतो की, निसर्गावस्था एवढी चांगली असताना त्यामध्ये बदल घडवून आणण्याची आवश्यकता का वाटली याचे उत्तर असे की, त्या काळातील जीवन सुखी असले तरी कालांतराने त्यात काही अडचणी निर्माण झाल्या. त्या अडचणी व गैरसोयी दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले. त्या अडचणी पुढलीप्रमाणे :-

१. निसर्ग नियमांची निश्चित कल्पना व व्याप्ती ठरलेली नव्हती.

२. निसर्ग नियमांची अर्थ लावणारी अधिकृत अशी सत्ता नव्हती.

३. निसर्ग नियमांना अमलात आणणारी एखादी समर्थक प्रबळ सत्ता नव्हती.

या अडचणी दूर करून व्यवस्थित मार्ग काढण्यासाठी व्यक्तींनी आपापसांत करार केला. लॉकच्या मते, दोन प्रकारे करार करण्यात आले असा उल्लेख काही ग्रंथात सापडतो. वास्तविक लॉकने स्पष्ट म्हटले आहे की, एकाच करारातून समाज आणि शासन संस्थेची निर्मिती झाली आहे. पण त्याच्या लिखाणातून दोन करारांचा अर्थ निघतो. निसर्गवस्थेत राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी करार केला आणि आपल्या मर्जीने निसर्गावस्थेतील अर्थ लावण्याचा अधिकार नव्याने निर्माण झालेल्या समाजाला दिला. तेव्हा  या करारामुळे समाजाची निर्मिती झाली. म्हणून याला सामाजिक करार असे म्हणतात. दुसऱ्या करारामुळे सरकारची निर्मिती झाली. म्हणून त्याला सरकारसंबंधीचा करार म्हणतात. या करारामुळे सरकारला कायदा करण्याचा तसेच तो अमलात आणण्याचा अधिकार समाजापासून प्राप्त झाला. परंतु अंतिम सत्ता समाजाकडे राहिली.कारण शासन संस्थेची निर्मिती समाजाने केली आहे. जेव्हा शासन समाजहिताविरुद्ध कृती करील तेव्हा त्याला बदलण्याचा किंवा नष्ट करण्याचा अधिकार समाजाला असेल. शेवटी जनता ही सार्वभौम असेल. त्याने केवळ मार्यादित राजेशाहीचा स्वीकार केला आहे. अशा प्रकारे सार्वभौम राजा हा सामाजिक कराराचा एक पक्ष आहे हे एकदा मान्य केल्यावर सार्वभौमराजाच्या करारावर बंधने येणारच. लोकांच्या कल्याणासाठी राज्याचे अस्तित्व आहे. हे अस्तित्व लोकांच्या संमतीवर अवलंबून आहे. राजाचे अधिकार मार्यादित व नियंत्रित आहेत.

अशा प्रकारे लॉक हॉब्जप्रमाणे अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार करीत नाही. तो न्यायसंस्थेची आवश्यकता सांगतो. कारण राजाच्या हातून चूक झाल्यास स्वतंत्र न्याय मंडळ असावे. जेणेकरुन हे न्याय मंडळ योग्य निर्णय देऊ शकते.

## रुसोचा सामाजिक कराराचा सिद्धांत

१८ व्या शतकात जवळजवळ सर्वच विचारवंतांनी हे मान्य केले की, समाजाची स्थापना ही करारांनी झाली आहे. निसर्गावस्थेतील स्वतंत्र माणूस कराराकडे वळला. कारण विवेकाचा उदय व लोकसंख्येच्या वाढीमुळे त्याच्या निष्पाप स्वभावात बदल होत गेला. आत्मप्रेम दंभात परिवर्तीत झाले. सहानुभूतीची प्रेरणा नष्ट झाली व स्वार्थी प्रवृत्ती वाढली. खासगी संपत्ती जमा करण्याची प्रवृती वाढली. त्यातून तुझे आणि माझे हे शब्द अस्तित्वात येऊन समता नष्ट झाली. हिंसा, संघर्ष, लूटमार या प्रवृत्तीमुळे अराजकता निर्माण होऊन शांतता नष्ट झाली. नंदनवनाची जागा कलहाने घेतली. तेव्हा शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी एका शक्तीची आवश्यकता वाटू लागली. या आवश्यकतेतून सामाजिक करार अस्तित्वात आला. सामाजिक करार घडवून आणण्यात अडचण स्वातंत्र्याची होती. रुसो म्हणतो, मूर्ख अथवा विक्षिप्त मनुष्य आपल्या स्वातंत्र्याचा त्याग करू शकेल. कारण स्वातंत्र्य गमावणे हे मानवाच्या सहज प्रवृत्तीच्या विरुद्ध आहे.

अशाप्रकारे मानवाने करार केला की, ज्यात स्वतःचे अधिकार समाजाला देऊनही स्वातंत्र्य अबाधित राहील. रुसोने कल्पिलेल्या नागरी समाजाला प्रत्येकाने संमती दिली असावी.राजकीय समाजाची स्थापना करू इच्छिणाऱ्या सर्व व्यक्ती एकत्र आल्या व त्यांनी करार करताना म्हटले, आमच्यातील प्रत्येक जण सामुदायिक इच्छेच्या सर्वोच्च नियंत्रणाखाली आपले व्यक्तित्व व सर्व अधिकार समर्पित करतो आणि सामुदायिक एकत्वाचा अविभाज्य घटक या नात्याने त्याचा परत स्वीकार करतो. अशा प्रकारे निसर्गावस्थेतील प्रत्येक माणूस समाज घटकाचा एक भाग बनतो आणि सदस्य म्हणून नैतिक समाजाची निर्मिती करतो. या करारात दोन पक्ष होते. व्यक्ती करार करताना एक पक्ष असते व सामुदायिक रूपात दुसरा पक्ष असतो अ ब क ड यांचा मिळून समाज बनलेला असतो. या समाजाचा अ हा घटक असतो आणि करार करणारा तो स्वतंत्र घटकही असतो. व्यक्तिगत रूपाने हा आपले सर्व अधिकार समुदायाला अर्पण करतो. प्रत्येक जण समुदायाला अधिकार देतात व सामुदायिकरीत्या ते परत स्वीकारतात. त्यामुळे या करारातून कुणालाच काही गमवावे लागत नाही. उलट या कराराने नैसिर्गिक हक्काची हमी, संरक्षण व सहकार्य या गोष्टी प्राप्त होतात. अशा प्रकारे या सामाजिक करारातून समाज, राज्य आणि शासन संस्था निर्माण झाले. या कराराने विकृत समाज आदर्श समाजात रुपांतरित केला.

## ३. राज्याच्या उत्पत्तीसबंधीचा विकासवादी किंवा उत्क्रांतिवादी सिद्धांत

विकास याचा अर्थ ऐतिहासिकदृष्टया हळूहळू वाढ होणे. ज्याप्रमाणे व्यक्ती किंवा संस्थेची वाढ होते, त्याचप्रमाणे राज्यसंस्था विकसित झाली आहे. राज्यसंस्था ही कोणत्याही एका विशिष्ट वेळी निर्माण केलेली नसून ती मानवी संस्कृतीच्या सुरुवातीपासून अस्तित्वात आहे. केवळ परिस्थितीनुरुप त्याचे स्वरुप बदलत गेले. राज्याला प्राप्त झालेले आजचे स्वरुप हजारो वर्षांच्या राजकीय विकासाचा परिणाम आहे.

- लिकॉक या राज्यशास्त्रज्ञाच्या मते, राज्याचा उदय अचानक झालेला नसून राज्याचे विकसन झालेले आहे.
- प्रा. गार्नर यांच्या मते, राज्य हे मानवाच्या दैनंदिन गरजांतून निर्माण झाले आहे. तसेच ते नैसर्गिकरीत्या विकसित झालेले आहे. उत्कृष्ट जीवन जगण्याच्या दृष्टीने ही संस्था आवश्यक असल्याने मानवाने ती टिकवून ठेवली आहे.

राज्यसंस्था ही जाणीवपूर्वक निर्माण झालेली नसून ती विकसित झाली आहे. मानवाच्या स्वाभाविक प्रवृत्तीतून समाज आणि पुढे राज्य निर्माण झाले. स्पेन्सरनेही राज्याच्या विकासवादी सिद्धांताचा पुरस्कार केला आहे. राज्य सेंद्रिय आहे. त्याचा विकास झाला असून ते निर्माण केलेले नाही.

हजारो वर्षांपासून मानवी इतिहास घडत गेला आहे. त्यात राज्याची निर्मिती हा एक टप्पा आहे. त्यामुळे ते केव्हा निर्माण झाले हे निश्चित सांगता येत नाही. मानवी गरजांतून राज्याची निर्मिती झाली. मानवाचे गुंतागुंतीचे प्रश्न सोडविणे व आक्रमणापासून संरक्षण करण्याच्या कार्यातून राज्याचे कार्यक्षेत्र वाढत गेले. ॲरिस्टॉटलच्या विचाराप्रमाणे, मनुष्य हा स्वभावतःच समाजशील प्राणी आहे. या त्याच्या समाजशील प्रवृत्तितून समाजात अनेक संस्था निर्माण झाल्या. त्यातून पुढे राज्यसंस्था निर्माण झाली. चार्लस डार्विनच्या उत्क्रांतिवादी सिद्धांतानुसार, मनुष्यप्राण्याची आजची स्थिति विकासाचा परिणाम आहे.

## राज्याच्या विकासाला कारणीभूत ठरलेले घटक

१. मानवी स्वभाव – ॲरिस्टॉटलच्या विचाराप्रमाणे मनुष्य हा एक समाजशील प्राणी आहे. तो समाजाशिवाय आपले जीवन जगू शकत नाही. समाजात संघ करून राहणे ही मानवाची नैसर्गिक प्रवृती आहे. या प्रवृत्तीतून मनुष्य एकत्र आला. त्यातून कुटुंब, गाव व राज्य यांची निर्मिती झाली.

२. रक्तसंबंध – प्राचीन समाजरचना रक्तसंबंधांवर आधारित होती. एका रक्तसंबंधाचे लोक एकाच कुटुंबात राहत. पुढे कुटुंबाचे कुळ, गोत्र आणि कालांतराने राज्य निर्माण झाले. याचाच अर्थ माणसा–माणसांना बांधणारा मजबूत धागा म्हणजे रक्तसंबंधाचे नाते होय. मॅकआयव्हरच्या मते, रक्तसंबंधातून समाज निर्माण होतो आणि समाजातून राज्य संस्था निर्माण होते.

३. धर्म – अतिप्राचीन काळातील माणूस मेघांचा गडगडाट, महापूर, भूकंप यासारख्या नैसर्गिक आपत्ती पाहून घाबरला असावा. तसेच या कृत्यामागे कुणाचे हात आहेत. एखाद्या गूढ शक्तीचा तो उपक्रम असावा याबद्दलचे कुतूहल मानवाच्या मनात निर्माण झाले. माणसावर अनेक संकटे आलीत. तसेच या निसर्गाने मानवाचे कल्याणही झाले. निसर्गाच्या कृपेने पाऊस आल्याने पिके आली. पिण्यास पाणी उपलब्ध झाले. यामागे निश्चितच कोणती अद्भुत शक्ती असावी या भावनेने मनुष्य धर्मनिष्ठ बनला. याचाच अर्थ धर्माची संकल्पना भीती आणि आश्चर्यातूनच निर्माण झाली.

४. अर्थ – समाजातील कोणतीही व्यक्ती स्वयंपूर्ण स्वावलंबी असत नाही. तिला इतरांच्या मदतीची गरज भासते. आर्थिक व्यवहारांमुळे राज्याच्या निर्मितीस मदत झाली. कारण उपजीविकेच्या बाबतीत मनुष्य इतरांवर अवलंबून असतो. या आर्थिक व्यवहारांमुळे राज्याच्या निर्मितीस मदत झाली. कारण उपजीविकेच्या बाबतीत मनुष्य इतरांवर अवलंबून असतो. या आर्थिक व्यवहारांमुळे यांच्यातील संबंध दृढ होण्यास मदत झाली. मानवाच्या आर्थिक गरजा म्हणजे उदरनिर्वाहाचे साधन प्राप्त करण्याच्या हेतू व मालमत्तेच्या सुरक्षिततेतून राज्याची निर्मिती झाली.

५. शक्ती – प्राचीन काळी अनेक कुटुंबे टोळ्या करून राहत असत. पूर्वी या टोळ्यांचे जीवन भटकंतीचे होते कालांतराने त्या स्थायी झाल्या. त्यांच्यावर इतर टोळ्यांनी आक्रमणे होऊ लागली. या आक्रमणाला तोंड देण्यासाठी बलवान व्यक्तीच्या हाती नेतृत्व देण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यातून लोकांनी आपल्यातील शूर आणि शक्तिशाली अशा व्यक्तीकडे सत्ता सोपविली. अशा शक्तिशाली व्यक्तींचे नियंत्रण समाजावर प्रस्थापित झाले. लोक त्यांच्या आज्ञांचे पालन करू लागले. अशाप्रकारे राज्याच्या उदयाला शक्ति अथवा बल हे घटक कारणीभूत ठरले.

६. युध्द – सुरवातीला निर्माण झालेल्या संघटनेचा उद्देश स्वसंरक्षण व आक्रमणापासून संरक्षण असा होता. स्थलांतराच्या वेळी किंवा एखादा प्रदेश जिंकताना सैनिकी शिस्तीप्रमाणे युद्धाचा वापर केला जाई. त्यामुळे व्यक्ती व्यक्तीतील रक्ताच्या नात्याची जागा राष्ट्रप्रेमाने घेतली. व्यक्तीऐवजी भूमीवरील प्रेम वाढले. टोळी हा समाजातील महत्वाचा घटक होता.

या टोळीचे नेतृत्व युद्धात प्राप्त झालेल्या विजयावर ठरू लागले. जेते आणि जीत यांच्या संबंधातून राजकीय व्यवस्था निर्माण झाली.

७. राजकीय जागरुकता – राजकीय जागरुकता याचा अर्थ राज्याचे ध्येय कोणत्या मार्गाने करावे यासंबंधीची जाणीव होय. ही जाणीव प्रथम कोणाच्या मनात व केव्हा निर्माण झाली हे सांगता येणे कठीण आहे. ही जागरुकता प्रथम काही व्यक्तींच्या मनात निर्माण होऊन नंतर तिचे स्वरूप व्यापक होत गेलेले असावे. विशिष्ट भूप्रदेशांवर स्थिर झालेल्या समाजाने अंतर्गत शांतता व सुव्यवस्था, परकीय आक्रमणांपासून संरक्षण मिळावे या हेतूने सरकारची स्थापना केली. सरकारने जनतेच्या हितासाठी कोणते कार्य करावे याची लोकांना जाणीव झाली. तेव्हा धर्म, व्यवसाय, रक्तसंबंध यांच्या मुळाशी राजकीय विचारसरणी असल्याची जाणीव झाली. आपल्या प्रदेशावर परकीय सत्तेचे वर्चस्व नसावे. या भावनेतून राष्ट्रवादी भावना निर्माण झाली. त्यातून १. लोकांमध्ये जागृती निर्माण झाली. २. लोकांना कायद्याचे महत्व लक्षात आले. ३. राष्ट्रवादी भावना निर्माण झाली. ४. राजकीय ध्येय साध्य करण्याच्या हेतूतून राजकीय संस्थेची निर्मिती झाली. ५. समाजात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी नियमांची अंमलबजावणी करण्यात आली. ६. मालमत्तेचे रक्षण आणि नातेसंबंध जपण्यातून राजकीय संबंधाला भावनिक आधार प्राप्त झाला.

अशा प्रकारे इतर घटकांपेक्षा राजकीय जागरुकतेला अधिक महत्व प्राप्त झाले. राजकीय जागरुकता ही आज राज्यसंस्थेच्या जिवंतपणाचे लक्षण मानले गेले आहे. या विकासवादी किंवा उत्पत्तीवादी सिद्धांताने राज्याच्या उत्पत्तीचे सांगितलेले घटक तर्कसंगत व बुद्धीस पटणारे आहेत. म्हणून हा सिद्धांत अधिक शास्त्रीय आणि विश्वसनीय ठरतो.

## ३.३ राज्याची कल्याणकारी व भौतिकवादी कार्ये

व्यक्तिच्या परिपूर्ण जीवनासाठी राज्याच्या मर्यादित हस्तेक्षेपावर भर देत असतानाच व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राहिले पाहिजे असे सांगणारा हा कल्याणकारी सिद्धांत आहे. व्यक्तिवादी सिद्धांत राज्याने व्यक्तीच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात कमीत कमी हस्तक्षेप करावा असे सांगतो. तर याउलट मार्क्सवादी विचारसरणी सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनासाठी राज्याच्या व्यापक हस्तक्षेपावर भर देतो. या दोघांमध्ये सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न कल्याणकारी विचारात केला आहे. प्राचीन काळी जनतेच्या कल्याणाची काळजी घेणे हे राज्याचे आद्य कर्तव्य मानले जात असे.

प्राचीन काळात राजाने काय करावे या संबंधाची काही मार्गदर्शक तत्त्वे, सूचना आणि नैतिक आदर्श इत्यादींचा उल्लेख महाभारतातही आढळतो. महाभारतातल्या शांतिपर्व आणि अनुशासन पर्वात प्रजेच्या कल्याणासाठी राजाने काय करावे याचा उल्लेख केलेला आढळतो. राजाने आपल्या संपत्तीचा उपयोग दुर्बलांसाठी करावा आणि दुर्बलसुद्धा बलवान होतील हेच उद्दिष्ट राजाने साध्य करावे. प्रजेची सार्वत्रिक समृद्धी आणि प्रजेचा सर्वांगीण विकास करणारा राजा स्वर्गलोकात जातो.

कौटिल्यानेही आपल्या अर्थशास्त्र ग्रंथात प्रजेच्या सुखात आणि हितामध्ये राजाचे सुख आणि हित सामावले असते. विद्याविभूषित राजाला स्वकर्तव्याची जाणीव होते आणि तोच प्रजेच्या हितासाठी झटतो. असा उल्लेख आढळतो.

## ब्रिटिश सरकारची कारकीर्द

ब्रिटिश सरकारने वर्तमान करपद्धती, मजूर संघटना, सामाजिक विमा योजना, राष्ट्रीय अनारोग्य, निवृत्ती वेतन,लहान मुलांना पौष्टिक अन्न, बेकारीमध्ये सवलती, अनिवार्य व निःशुल्क शिक्षण, उच्च शिक्षणासाठी विशेष अनुदान वगैरे कल्याणकारी योजना ब्रिटिश सरकारने व्यापक प्रमाणात अमलात आणल्या आहेत.

## अमेरिकेतील सरकारची योजना

अमेरिकेतही सरकारतर्फे अनेक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी होत आहे. उदा. टेनेसी व्हॅली योजना, सामाजिक सुरक्षितता योजना, रस्ते व पूलबांधणी योजना, प्रे. ट्रूमनची दहा कलमी योजना, प्रे. रुझवेल्टची न्यू डील योजना, सार्वजनिक आणि निःशुल्क शिक्षण वगैरे.

## रशियन सरकारची योजना

सोव्हिएट रशियासारख्या साम्यवादी राष्ट्राने आपल्या नागरिकांच्या कल्याणासाठी कामगारांचे तास, वेतन निश्चिती, शिशुसंगोपन, कुमारी मातांना मदत वगैरे कल्याणकारी योजना मान्य केल्या. पंचवार्षिक योजनांद्वारे आर्थिक प्रकारच्या कल्याणकारी योजना नार्वे, स्वीडन आणि डेन्मार्क इत्यादी राज्यांनी सुरु केल्यात.

## भारत सरकारची योजना

भारत सरकारने कल्याणकारी धोरणाचा स्वीकार केला. सामाजिक, राजकीय व

आर्थिक क्षेत्रांतील असमानता नष्ट करण्यासाठी विविध कल्याणकारी योजनांच्या संदर्भात महत्वपूर्ण कायदे केले. उदा. मोठमोठ्या उद्योगधंद्यांचे व बँकांचे राष्ट्रीयीकरण, प्राथमिक शिक्षण निःशुल्क आणि अनिवार्य, चौदा वर्षाच्या आतील मुलांना धोक्याच्या जागी व काम करण्यास बंदी, मागासलेल्या जातीजमातींच्या संरक्षणासाठी विशेष सवलती, भ्रष्टाचार, काळा बाजार व खाद्यपदार्थांतील भेसळ प्रतिबंधक कायदे. माजी पंतप्रधान स्व. श्रीमती इंदिरा गांधीचा वीस कलमी कार्यक्रम इ.

## कल्याणकारी राज्य – व्याख्या

१. जी.डी.एच. कोलच्या मते, समाजकल्याणकारी राज्य म्हणजे असा समाज की, ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला निश्चित जीवनमानाची हमी प्राप्त होते व आपल्या गरजांची पूर्तता करुन घेण्याचा आणि त्यासाठी निश्चित व योग्य साधन प्राप्त करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

२. टी.डब्ल्यू. केंटच्या मते, आपल्या नागरिकांना व्यापक प्रमाणात सामाजिक सेवा उपलब्ध करून देणारे राज्य म्हणजे कल्याणकारी राज्य होय.

## कल्याणकारी राज्याची कार्ये

कल्याणकारी राज्याची कार्ये ढोबलमानाने दोन भागांत विभागता येतील.

अ) अनिवार्य कार्ये (Obligatory Functions)

ब) ऐच्छिक कार्य (Optional Functions)

अ) अनिवार्य कार्य

अनिवार्य कार्य याचा अर्थ ज्या कार्यावर राज्याचे व राज्यातील प्रजेचे अस्तित्व अवलंबून असते ती कार्ये पुढील प्रमाणे होत.

१. राज्याचे संरक्षण करणे – राज्याचे अस्तित्व व स्थैर्य टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने राज्याला स्वतःचे व नागरिकांचे राज्यांतर्गत आणि राज्याबाहेरील शत्रूंपासून संरक्षण करावे लागते. देशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे राज्याचे आद्य कर्तव्य आहे. राज्याची निर्मितीच मुळी संघर्षातून शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी झाली आहे. प्रत्येक व्यक्तीला दोन गोष्टी अतिप्रिय असतात.

१) जीवन २) संपत्ती, तेव्हा शासनाने जनतेच्या जीवनाची व संपत्तीची हमी घेणे, शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करणे राज्याचे अनिवार्य कार्य आहे. त्यासाठी राज्याला आवश्यक त्या कायद्यांची निर्मिती करून त्याची निःपक्षपाती अंमलबजावणी करावी लागते. राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी सुरक्षा दल आणि पोलीस पथकाची निर्मिती करावी लागते. राज्य हे दंडशक्तीयुक्त असले पाहिजे. जेणेकरून जनतेच्या मनात राज्याविषयी दरारा निर्माण होईल. देशातील नागरिकांचे परकीय शत्रूंपासून संरक्षण करणे, सैन्य ठेवणे, युद्धसाहित्याची निर्मिती करणे,आपल्या सरहद्दीचे संरक्षण करणे ही राज्याची आवश्यक कार्ये आहेत.

२. परराष्ट्रांशी मैत्री व सहकार्याचे संबंध – देशाच्या संरक्षणासाठी व परकी आक्रमणांपासून देशाचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्राला परराष्ट्रांशी मैत्रीपूर्ण व सहकार्याचे संबंध ठेवणे आवश्यक आहे. परराष्ट्रांशी मित्रत्वाचे संबंध असल्यास राज्याचा विकास लवकर होतो. वेळप्रसंगी मित्रराष्ट्रांकडून मदत मिळते व संकटांचे निवारण होते. यासाठी परराष्ट्राशी सहकार्य व सहअस्तित्व निर्माण करणे राज्यासाठी आवश्यक कार्ये आहेत. आंतरराष्ट्रीय नियम आणि आंतरराष्ट्रीय करारांचे पालन करून राज्याने परकीय सबंध परिदृढ व घनिष्ठ बनवले पाहिजेत.

३. नैसर्गिक संकटाला तोंड देणे – राज्यात कधी कधी भूकंप, नैसर्गिक आपत्ती यासारखी संकटे उद्भवतात. अशा अचानक उद्भावणाऱ्या संकटांपासून जनतेचे रक्षण करणे, संकटातून जनतेला वाचविणे, आकस्मिक संकटावर मात करणे ही कार्ये राज्याला करावी लागतात. संकटसमयी संकटग्रस्त भागातील जनतेला मदत करणे ही कार्ये राज्याला करावी लागतात.

अशा प्रकारे राज्याला कल्याणकारी धोरणाच्या दृष्टीने आवश्यक कार्ये करावी लागतात.

## ब) ऐच्छिक कार्य

१. शिक्षण – शिक्षणामुळे नीती–अनीती, योग्य–अयोग्य, कर्तव्य यामधील भेद नागरिकांना कळतो. कारण शिक्षणाचा उद्देश जनतेतील सद्गुणांची वृद्धी करणे हा आहे. शिक्षणामुळे व्यक्ती प्रामाणिक व जबाबदार बनते. नागरिकांची उपेक्षा करणे म्हणजे नागरिकांना अधिकारांचा उपयोग नाकारणे होय. नागरिकांच्या आणि राज्याच्या दृष्टीने प्रत्येक नागरिक सुशिक्षित असणे आवश्यक आहे. यासाठी राज्याने शिक्षण निःशुल्क व सक्तीचे करावे. कारण शिक्षणाचा उद्देश नागिरकांना सद्गुणी व स्वावलंबी बनविणे हा आहे.

२. आरोग्य – आदर्श व कल्याणकारी राज्यासाठी निरोगी नागरिकांची आवश्यकता असते. म्हणजेच आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. निरोगी व्यक्ती स्वतःचा व

राज्याचा विकास करू शकतो. यासाठी नागरिकांच्या आरोग्याकडे लक्ष देणे, साथीच्या रोगांचे निर्मूलन करणे, गलिच्छ व रस्त्यांचे पुनर्वसन करणे, औषधोपचारांची व्यवस्था करणे, कमीत कमी खर्चात व विनामूल्य वैद्यकीय सेवा व्यक्तिला उपलब्ध करून देणे इत्यादी कार्यांचा समावेश राज्याच्या आणि व्यक्तीच्या दृष्टीने आवश्यक आहे.

३. नागरिकांचा सर्वांगीण विकास – राज्याचा उद्देशच मुळी व्यक्तीला सुखी व श्रेष्ठ जीवनाची प्राप्ती करुन देण्याचा आहे. त्यासाठी जनतेला स्वातंत्र्याची संधी मिळाली पाहिजे. याशिवाय समानता व न्यायपूर्ण वातावणाची निर्मिती केली पाहिजे. त्यासाठी सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांतील विषमता नष्ट करणे, आवश्यक त्या कायद्यांची व धोरणांची निर्मिती करून त्याची अमंलबजावणी केली पाहिजे. कारण आर्थिक समानतेशिवाय राजकीय व सामाजिक समानतेला महत्व नाही. त्यासाठी देशातील प्रत्येक नागरिकाला आर्थिक विकासाची समान संधी देणे, महत्वाच्या उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करणे, एकाधिकार, काळा बाजार व भ्रष्टाचार नष्ट करणे, योजनाबद्ध मार्गांचा अवलंब करून राष्ट्राचा आर्थिक विकास घडवून आणणे ही राज्याची कल्याणकारी कार्ये होत.

४. शेती – आपला देश कृषिप्रधान आहे. देशातील महत्वाचे उत्पन्नाचे साधन शेती आहे. त्यामुळे शेतीविकासाकडे लक्ष देणे, अत्याधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर करून अत्याधुनिक पद्धतीने शेती करणे, खते, बी–बीयाणे शेतकऱ्यांना पुरविणे, कृषि संशोधन केंद्रांची स्थापना करणे, निरनिराळे कृषीविषयक संशोधन करून शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करणे, अन्नधान्याच्या बाबतीत राज्याला स्वयंपूर्ण बनविण्याचा प्रयत्न करणे ही राज्याची कल्याणकारी कार्ये आहेत.

५. दळणवळण – उत्पादनवाढीबरोबर मालाची ने–आण करण्यासाठी दळणवळणाच्या साधनांची आवश्यकता असते. व्यापार विकासाच्या दृष्टीने दळणवळणाच्या साधनांत वाढ होणे आवश्यक असते. राज्याने जलमार्ग, वायुमार्ग, लोहमार्ग, पोस्ट, तारायंत्र इत्यादींची व्यवस्था करून त्यांचे संचालन करणे लोककल्याणाच्या दृष्टीने गरजेचे आहे. तसेच दळणवळणाच्या माध्यमातून मिळणाऱ्या नफ्याचा उपयोग जनकल्याणासाठी करावयास हवा.

६. समाजसुधारणा – समाज हा गतिशील आहे. बदलत्या परिस्थितीनुसार समाजात बदल होत असतो. बदलत्या परिस्थितीनुसार रूढी, परंपरा, चालीरीती, संकेत, दृष्टिकोण यात बदल होणे काळाची गरज आहे. उदा. बालविवाह पद्धत, सतीची प्रथा, स्पृश्य–अस्पृश्य इत्यादी अनिष्ठ प्रथांना नष्ट करून समाजाने नवीन पुरोगामी धोरणाचा स्वीकार करून कल्याणकारी धोरणाचा स्वीकार करणे राज्याचे कार्य आहे.

७. सत्तेचे विकेंद्रीकरण करणे – आधुनिक काळात जगातील जवळजवळ सर्वच देशांनी लोकशाही शासन प्रणालीचा स्वीकार केला आहे. लोकशाहीत लोकांनी, लोकांकडून आणि लोकांसाठी चालविलेले शासन असते. जनता सार्वभौम असते. जनतेला राज्यकारभाराचे प्रत्यक्ष शिक्षण देणे आवश्यक आहे. लोकशाहीत जनता राजकारणाप्रती उदासीन असल्यास त्याचा फायदा काही संधीसाधू व्यक्ती करून घेतात. यासाठी लोकशाहीत जास्तीत जास्त जनतेला राजकीय कार्यात सहभागी करुन घेण्यासाठी व त्यांच्यात जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी सत्तेच्या विकेंद्रीकरणाची आवश्यकता आहे.

८. जनजागृती करणे – राज्याची निर्मिती लोकांना सुखी व समाधानी जीवनाची प्राप्ती करण्याच्या उद्देशाने झाली आहे. तेव्हा जनतेत शासन कार्याविषयी जागरूकता निर्माण करणे लोकशाहीत आवश्यक असते. जनतेत जागृती निर्माण होऊन त्यांनी सक्रियरीत्या राजकारणात सहभागी व्हावे, लोकप्रशासन लोकानुवर्ती असावे. लोकांना शासन कार्यात प्रत्यक्ष शिक्षण घेण्याची संधी राज्याने उपलब्ध करून द्यावी. आपले राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्न परस्परांच्या सहकार्याने सोडवावेत. स्थानिक प्रश्न स्थानिक लोक सुकर पद्धतीने सोडवू शकतील. यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात यावे. सत्तेचा दुरुपयोग होणार नाही यासाठी जनतेत जागृती निर्माण करणारे उपक्रम राबवावेत. त्यासाठी जननिर्णय, जनोपक्रम, आवर्तन,, सार्वमत इत्यादी प्रत्यक्ष पद्धतींचा अवलंब करावा.

९. असहाय लोकांना मदत करणे – राज्याने सुदृढ लोकांप्रमाणे असहाय, अनाथ, अपंग, अंध, दुर्बल, रोगी, वृद्ध व बालक यांना मदत करावी. त्यांच्या उदरनिर्वाहाची, औषधोपचाराची व्यवस्था करणे, त्यांना चांगली व समानतेची वागणूक देणे इत्यादी राज्याचे नैतिक कर्तव्य आहे. जर राज्याने याकडे दुर्लक्ष केल्यास त्यांच्यात द्वेषाची भावना निर्माण होऊन ते गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१०. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे – मानवाच्या प्राथमिक गरजा अन्न, वस्त्र व निवारा या होत.या गरजांची पूर्तता राज्याने केली पाहिजे. अन्यथा राज्याविषयी लोकांना आत्मीयता व राष्ट्रभक्ती वाटणार नाही. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे, त्यांची निर्मिती करण्यावर भर देणे तसेच त्यांच्या विनिमयावर नियंत्रण ठेवणे, जीवनावश्यक वस्तू तसेच पर्यायी वस्तूंचा काळा बाजार होणार नाही अशीव्यवस्था करणे इत्यादी राज्याची कार्ये होत.

११. कलाशास्त्र आणि मनोरंजन – नागरिकांना आपल्या परिश्रमांचा शीण घालविण्यासाठी मनोरंजनाची साधने उपलब्ध करून देणे राज्याचे कर्तव्य आहे. त्यासाठी राज्याने व्यक्तींच्या उत्कृष्ट कलाकृती, वाड्.मय, समाजसेवा इत्यादींना उत्तेजन द्यावे. व्यक्तींच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा गौरव करून त्यांना

प्रोत्साहन द्यावे. विश्रामगृह, क्लब, नाट्यगृह, सिनेमा, सहल, प्रेक्षणीय स्थळे, रेडिओ, दूरदर्शन इत्यादी मनोरंजनाच्या साधनांची व्यवस्था राज्याने करावी.

१२. कुशल नोकरवर्ग – शासनाच्या लोककल्याणधारी धोरणामुळे शासनाची कार्ये वाढलीत. कार्यातील गुंतागुंत सुलभ रीतीने सोडविण्यासाठी वाढते कार्य व वाढत्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कुशल आणि कार्यक्षम नोकरवर्गाला राजकारणापासून अलिप्त ठेवावे. दप्तरदिरंगाई, लाचलुचपत, भ्रष्टाचार, लालफितीचे धोरण यापासून त्यांनी दूर राहावे. भ्रष्ट नोकरवर्गाविरुद्ध कडक कारवाई करणे ही कल्याणकारी राज्याचीच कर्तव्य आहेत.

१३. इतर कार्ये – सुखी व्यक्ती जीवनासाठी राज्याला अनेक कल्याणकारी स्वरुपाची कार्ये करावी लागतात. उदा. प्रत्येक व्यक्तीला काम उपलब्ध करून देणे, कामाचे तास निश्चित करणे,वेतन, सुट्टी व इतर सुखसोयींकडे लक्ष पुरविणे, बेकारी भत्ता देणे, वृद्धापकाळ आणि अपंगांच्या व्यवस्थेसाठी विमा योजनेची सोय करणे, दारिद्र्य आणि बेकारी निवारण करणे, प्रसूतीकाळी स्त्रियांना सुट्टी देणे तसेच वैद्यकीय मदत देणे, कुटुंब नियोजनाची योजना आखणे, बेघरांना घर पुरविणे, भूमिहीनांना भूमी देणे, संपत्तीचे न्याय वितरणासाठी संपत्तीची कमाल मर्यादा ठरविणे इ.

## ३.४ सारांश

सर्वश्रेष्ठ व अत्यावश्यक असलेल्या राज्यसंस्थेचे स्वरुप हे परिस्थितीनुरुप व देशानुरुप बदलत गेलेले आहे. पुरातन काळापासून ते आजगायत राज्याचे स्वरुप भिन्न भिन्न असल्याचे आपणास दिसून येते. देशात शांतता व सुवस्था टिकवून ठेवण्याचे कार्य राज्याने केले आहे. पूर्वी राज्याचे स्वरुप हे पोलीसी स्वरुपाचे होते ते आता लोककल्याणकारी स्वरुपाचे बनले आहे. समाजातील अनेक संस्थांपैकी एक असलेली राज्यसंस्था कशी निर्माण झाली याविषयी विचारवंतातं एकमत नाही. तसेच देशपरत्वे व कालपरत्वे राज्याचे स्वरुपही बदलत गेलेले आहे. भूप्रदेश, लोकसंख्या, सरकार व सार्वभौम हे राज्याचे आवश्यक घटक आहेत. राज्याच्या उत्पत्तीसंदर्भात दैवी सिद्धांत, सामाजिक कराराचा सिद्धांत व विकासवादी सिद्धांत मांडण्यात आले आहेत. अलीकडच्या काळात जगातील जवळजवळ सर्वच राज्यांनी लोककल्याणकारी धोरणाचा स्वीकार केला आहे. त्यामुळे शासनाची जनतेच्या हिताप्रती असलेली जबाबदारी वाढत गेली आहे. शासनाचे अधिकार जितके जास्त तितके व्यक्तीचे अधिकार कमी होतात. त्यांच्यावर मर्यादा येतात, हे विचार घेऊन व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या विचारवंतांनी राज्याच्या व्यक्ती जीवनातील हस्तक्षेपाला विरोध केला. त्यातून अराज्यवादी विचार जन्माला आला.

## ३.५ सरावासाठी प्रश्न

१. राज्य म्हणजे काय ते सांगून राज्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२. राज्याचे आवश्यक घटक कोणते

३. राज्याच्या उत्पत्तीसंबंधींचे विविध सिद्धांत थोडक्यात सांगा.

४. राज्याचा विकासवादी विचार विशद करा.

५. लोककल्याणकारी राज्याला करावी लागणारी कार्ये सांगा.

## ३.६ संदर्भग्रंथ


१. डॉ. शुभांगी राठी (२०१३), राज्यशास्त्राच्या मूलभूत संकल्पना, कैलाश पब्लिकेशन्स्, औरंगाबाद.

२. प्रा. बोराळकर कृ. दि (१९८७), राज्यशास्त्र कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद

३. वाईकर अ.वा., राज्यशास्त्र, निराली प्रकाशन, पुणे.

४. Gokhale इ. घ. (२००५), Political Science, Himalaya Publishing House, Mumbai

५. गरळप च. झ. (१९८७), Political Theory, Guild Publications.

६. येरणकर, श्रीराम (२००५) राजकीय सिद्धांत, साईनाथ प्रकाशन, नागपूर.


----------

# ४

# घटक ४ – राजकीय संस्कृती, राजकीय सामाजिकीकरण व राजकीय भरती

**घटक संरचनाः**

४.० उद्दिष्टे
४.१ प्रस्तावना
४.२ विषय विवेचन – राजकीय संस्कृती
    ४.२.१ अर्थ व व्याख्या
    ४.२.२ राजकीय संस्कृतीचे आधारभूत घटक
    ४.२.३ राजकीय संस्कृतीचे प्रकार
    ४.२.४ राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाची आवश्यकता
    ४.२.५ राजकीय संस्कृती आणि प्रतिके
४.३ राजकीय सामाजिकरण
    ४.३.१ राजकीय सामाजिकरणाच्या व्याख्या
    ४.३.२ राजकीय सामाजिकरणाचा अर्थ
    ४.३.३ राजकीय सामाजिकरणाची वैशिष्ट्ये
    ४.३.४ राजकीय सामाजिकरणाची साधने
    ४.३.५ राजकीय सामाजिकरणाची अध्ययनाची आवश्यकता
४.४ राजकीय भरती
    ४.४.१ राजकीय भरतीचा अर्थ
    ४.४.२ राजकीय भरतीचे स्वरूप
    ४.४.३ राजकीय भरतीचे प्रमुख घटक
    ४.४.४ अन्य घटक
    ४.४.५ राजकीय भरतीच्या पद्धती
४.५ सारांश
४.६ सरावासाठी प्रश्न

## ४.० उद्दिष्ट्ये

१. राजकीय संस्कृती व तिचे घटक जाणून घेणे.

२. संस्कृतीचे विविध प्रकार अभ्यासणे.

३. राजकीय सामाजिकीकरण म्हणजे काय हे जाणून घेऊन सामाजिकीकरण घडवून आणणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

४. राजकीय सामाजिकीकरणाची वैशिष्ट्ये अभ्यासणे.

५. राजकीय भरतीये स्वरुप जाणून घेऊन भरतीसाठी कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

## ४.१ प्रस्तावना

आधुनिक राजकीय व्यवस्थेचा तौलनिक अभ्यास करत असताना त्या त्या देशांची राजकीय संस्कृती, राजकीय सामाजिकीकरण व राजकीय भरतीची प्रक्रिया जाणूण घेणे आवश्यक आहे. जगातील प्रत्येक देशाची भौगोलिक, सामाजिक, आर्थिक परिस्थिती भिन्न असल्याने तेथील संस्कृतीही भिन्न भिन्न आहे. संस्कृती याचा अर्थ त्या देशात असलेल्या रूढी परंपरा, विचारसरणी, चालिरिती, श्रद्धा, दृष्टीकोन इ. बाबी होय. या बाबी एका पिढीकडून किंवा एका व्यक्तीकडून जेव्हा दुसऱ्या व्यक्तीकडे किंवा पिढीकडे संक्रमित होते त्यालाच राजकीय सामाजिकीकरण असे म्हटले जाते. प्रत्येक देशातील राजकीय व्यवस्थेला राजकीय संस्कृतीच्या मर्यादा लक्षात घेऊन कार्य करावे लागते. व्यवस्थेने ठरविलेले धोरण, घेतलेले निर्णय, केलेले नियम इ. बाबी विचारात घेऊन व्यवस्था ह्या सर्वसामान्य व्यक्तींपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करीत असतात. व्यवस्थेचे घेतलेले निर्णय जनतेला मोठ्या प्रमाणात योग्य वाटले तर जनता आपला विश्वास पुन्हा दर्शवून पुर्वीच्याच व्यक्तींची राजकीय भरती करते. परंतु जेव्हा व्यवस्था जनतेच्या विश्वासाला पात्र ठरत नाही तेव्हा सत्तांतर होते. प्रत्येक राजकीय पक्ष सत्ता मिळविण्यासाठी धडपडत असतात. लोकशाहीत निवडणुका ह्या राजकीय पक्षामार्फत लढविल्या जातात. त्यामुळे देशातील संस्कृती विचारात घेऊन सामाजिकीकरणाची प्रक्रिया पक्षामार्फत होत असते. त्याचा फायदा राजकीय भरतीसाठी त्यांना होतो. तेव्हा विविध देशांचा तौलनिक अभ्यास करतांना राजकीय संस्कृती, सामाजिकीकरण व भरती म्हणजे काय, त्याचे स्वरुप कशा प्रकारचे आहे हे जाणून घेणे आवश्यक आहे.

## ४.२ विषय विवेचन - राजकीय संस्कृती

### व्याख्या

अल्मंड व पॉवेलच्या मते, एखाद्या राजकीय व्यवस्थेत असणाऱ्या व्यक्तींच्या राजकीय जीवनात आढळून येणाऱ्या मन:प्रवृत्ती आणि प्रेरणांच्या आकृतिबंध म्हणजे राजकीय संस्कृती होय.

प्रत्येक संस्था विशिष्ट राकीय परिस्थितीच्या संदर्भात कार्य करीत असते. एखाद्या देशाची राजकीय व्यवस्था ज्या परिस्थितीत संदर्भात कार्य करते ती परिस्थिती म्हणजेच त्या राज्यव्यवस्थेची पार्श्वभूमी अथवा राजकीय संस्कृती होय.

जसे– हाताची पाची बोटे सारखी नसतात. तसेच एकाच आईवडीलांच्या पोटी जन्माला आलेली सर्व मुले सारखी नसतात. शारीरिक गुणधर्म, स्वभावविशेष, मन:प्रवृत्ती इ. बाबतीत दोन व्यक्तींमध्ये संपूर्ण साम्य क्वचितच सापडते.

## काही गुणविशेष

१) वंशपरंपरेने अपरिहार्य असतील. २) पिढीजाद रक्तांचा गुण आढळेल ३) त्या परिस्थितीचा अपरिहार्य परिणाम जाणवेल. ४) सुखलोलुपतेने आळसवलेली असेल किंवा ५) सतत अरिष्टांना तोंड द्यावे लागल्याने खडतर जीवनास आवश्यक अशी जिद्द बाळगणारी असेल.

संस्कृतीची आर्थिक बाजू असते, सामाजिक बाजू असते तशीच राजकीय बाजूही असते. ही राजकीय संस्कृती होय.

## ४.२.१ अर्थ व व्याख्या

१) रॉय मॅक्रिडिस यांच्या मते, राजकीय संस्कृती म्हणजे एखाद्या राजकीय समाजाने सामान्यपणे राजकीय समाजाने समान्यपणे स्वीकारलेली उदिष्टे आणि नियम होत.

एखाद्या देशाच्या शासनाने कोणत्या गोष्टी आणि कोणत्या पध्दतीने कराव्यात याविषयी त्या देशातील जनतेची सर्वमान्य मूल्ये, श्रध्दा आणि दृष्टीकोण म्हणजे देशाची राजकीय संस्कृती होय.

२) ग्रॅबियल व अल्मंड यांच्या मते, ज्या मुल्यांच्या अथवा प्रेरणांच्या आकृतीबंधनात, कोंदणात एखादी राजकीय व्यवस्था कार्य करीत असते तो आकृतीबंध म्हणजे राजकीय संस्कृती होय.

३) एस. इ. फायनर यांनी राजकीय संस्कृतीचे विवेचन करतांना शासकांची अधिमान्यता आणि राजकीय संस्था प्रक्रिया यांच्या संबंधावर भर दिला आहे.

४) रॉबर्ट ढॉल यांच्या मते, राजकीय संस्कृतीच्या संदर्भात खालील घटकांचा विचार करावा लागतो.

– लोकांचा प्रश्न सोडविण्याचा दृष्टीकोन व्यावहारिक आहे की विवेकी आहे.

- लोकांची सामूहिक कार्य करण्याची पध्दती सहकार्याची आहे की असहकार्याची,
- लोकांची राजकीय व्यवस्थेबाबतची वृत्ती निष्ठाशाली आहे की निष्ठाहीन
- लोकांची आपल्या सहकार्याबाबतची भावना विश्वासाची आहे की, अविश्वासाची.

## राजकारणातील सहभागाचे घटक

१) राजकीय जाणीव – या जाणीवेमुळे व्यक्तीला राजकीय व्यवस्थेतील ज्ञान होते. राजकीय उदिष्टांची आणि श्रध्दांची कल्पना येते.

२) राजकीय भावनिकता – या भावनिकतेमुळे राजकीय उदिष्टांबाबत व्यक्ती आवडनिवड करू पाहते. प्रिय, अप्रिय अशी तुलना करू पाहते.

३) राजकीय मुल्यात्मकता – या मूल्यात्मकतेमुळे व्यक्ती भावनिकेतेपुढे जाऊन राजकीय उदिष्टांची योग्ययोग्यता पाहू लागते.

या तिनही प्रकारच्या मन:प्रवृत्तींच्या व्यक्तींच्या मनावर सतत परिणाम होतो. मन:प्रवंर्तीच्या वरील तिन्ही प्रकार परस्परांशी निगडित आहेत व एकाच व्यक्तीच्या बाबतीत देखील त्यांची गुंफण निरनिराळ्या तऱ्हेने झालेली दिसेल.

## ४.२.२ राजकीय संस्कृतीचे आधारभूत घटक

राजकीय संस्कृतीच्या जडणघडणीमध्ये निरनिराळे घटक कारणीभूत ठरत असतात. ते पुढीलप्रमाणे :-

१) **भौगोलिक परिस्थिती** – विशेषत: राजकीय संस्कृतीला घडविण्यासाठी भौगोलिक परिस्थिती महत्वाची ठरते. नैसर्गिक साधनसामुग्री, हवामान, जागतिक स्थान इ. चा समावेश त्यामध्ये होतो. जसे – इंग्लंड व जपान बेटावर वसल्यामुळे त्यांचे स्वातंत्र्य अबाधित राहिले. हिमालयासारख्या पवर्तराज, इतर बांजूनी सागराचे संरक्षण यामुळे भारतीय संस्कृतीला संरक्षण लाभले तर भारताच्या फाळणी मुळे पाक/भारत सीमा ही भारताच्या राजकीय संस्कृतीला अडथळा बनली. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेत अनके अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामधून संकटे निर्माण झाली व होत आहेत.

तसेच भौगोलिक परिस्थितीवर देशाच्या आर्थिक व्यवस्थेचे स्वरूप निर्भर असते. डोंगराळ प्रदेशामुळे इंग्लंडची व्यवस्था उद्योग प्रधान बनली तर भारतामध्ये सुपीक जमीन असल्यामुळे तेथील व्यवस्था कृषीप्रधान बनली.

भारताला लोकसंख्येचे प्रमाण हा सर्वात मोठा धोका ठरला आहे तर आपली

वाढती लोकसंख्या पोसण्यासाठी नव्या देशांवर आपले प्रभुत्व निर्माण करण्याचा चीनचा प्रयत्न चीनच्या आक्रमक राष्ट्रवादाचा घटक बनला आहे. त्यामुळे अशा नैसर्गिक परिस्थितीनुसार राजकीय व्यवस्थेत ज्या प्रक्रिया घडत असतात त्यातून राजकीय संस्कृतीच्या विकासाची गती ठरत असते.

२) आर्थिक घटक – देशाच्या आर्थिक व्यवस्थेचा राजकीय संस्कृतीवर परिणाम होत असतो. लोकशाहीचा विश्वास असणाऱ्या राजकीय संस्कृतीच्या राजकीय व्यवस्था आर्थिक सत्तेला महत्व देतात. अशा सत्ता लोकशाहीच्या संवर्धनासाठी त्याकडे लक्ष केंद्रीत करतात. सत्तेबद्दलची दूरावस्था व त्यामधून निर्माण होणारा असंतोष हुकूमशाहीला प्रेरणादायी ठरतो. त्यामुळेच जर्मनी व इटालीमध्ये सर्वकषवादी शासकांचा उदय झाला. साम्यवादी राजकीय व्यवस्था रशियामध्ये निर्माण झाली. राजकीय व्यवस्थेत आर्थिक परिस्थितीत सामान्याला काम मिळाले. गरीबी कशी हटविली जाते. शेतमजूर, शेतकरी, भांडवलदार यांचे हित कसे जोपासल्या जाते. त्यांचे परस्पर संबंध काय आहेत याचा राजकीय संस्कृतीवर परिणाम होत असतो. उद्योगप्रधान देशात कामगारांच्या संघटना बांधणे सहज शक्य असते. राजकीय संस्कृतीचा आधार म्हणून त्या व्यवस्थेचा आर्थिक परिस्थितीला महत्व आहे.

३) **सामाजिक घटक** – समाजव्यवस्थेचा राजकीय संस्कृतीवर परिणाम होत असतो. वर्ण, वर्णभेद, भाषाभेद, नितीभेद, धार्मिक संबंधाचे स्वरूप इत्यादी बाबींचा विचार याठिकाणी करावा लागेल, एकसंघ समाज व्यवस्था ज्या राजकीय व्यवस्थेत असेल त्याठिकाणी राष्ट्रीय व्यवस्था अधिक जाणवते. विविध स्वरूपांच्या सामाजिक मतांनी समाज भिन्न असेल तर राष्ट्रीयत्व निर्माण होण्यास अनेक अडथळे निर्माण होतात. त्या देशाची राजकीय संस्कृती विघटीत राहाते. महाराष्ट्राच्या राजकारणात जातीय वर्चस्व निर्माण झालेले आहे. उदा–महाराष्ट्रात पाटील देशमुखांचे महत्व आजही टिकून आहे. सर्वसाधारण मतदार जातीय तर उत्तर प्रदेशात जाटांना विशेष महत्त्व आहे.

भाषिक एकसंघता ही राजकीय व्यवस्थेत महत्वाची ठरते. इंग्लंडमध्ये इंग्रजी भाषा, फ्रान्समध्ये फ्रेंच भाषा या एकसंघी स्वरूपात दिसते. धर्माच्या बाबतीत मानवाची संवेदनक्षमता सर्वात तीव्र असते. त्यामुळे धर्माच्या नावावर राज्याराज्यात संघर्ष होत असत. पुढे राज्य आणि धर्म स्वतंत्र ठेवण्याची वृत्ती वाढीस लागून त्यामधून धर्मनिरपेक्षतेची कल्पना पुढे आली, पंरतु आजही काही देशात धर्माधिष्ठित राज्ये अस्तित्वात असलेली दिसतात.

४) **शैक्षणिक घटक**- शिक्षणाची पध्दती राजकीय व्यवस्थेत कशी स्वीकारली आहे. त्यातून राजकीय संस्कृतीच्या बांधणीला मदत होते. संस्कार हा राजकीय संस्कृतीचा आधार असतो व ते संस्कार शैक्षणिक संस्थांमधून व्यक्तीवर घडत असतात. कारण शिक्षणामुळे ज्ञानाबरोबरच विचारांत परिपक्वता घडून येत असतात. कारण शिक्षणामुळे ज्ञानाबरोबरच विचारात परिपक्वता येते. बुध्दीधिनिष्ठता येते, राजकीय प्रक्रियेची पातळी उंचावण्यासाठी ही आवश्यक असते. उदारमतदवादी शिक्षणप्रणालीचा स्विकार केल्यामुळे पाश्चात्य देशातील आधुनिकीकरणाला विशेष महत्व आल्याचे दिसून येते.

५) **ऐतिहासिक घटक** - देशाच्या ऐतिहासिक विकास कोणत्या पध्दतीने झाला यावरही त्या देशाची राजकीय संस्कृती अवलंबून असते. कोणती मूल्ये देशात जोपासली जातात. त्यावर त्या देशाच्या इतिहासाची दिशा ठरते. फ्रास (१७८९) आणि रशिया (१९१७) या देशातील स्थित्यंतरे अधिक मूलगामी, मूळच्या व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करणारी अशी होती. विकसनशील देशातील होणाऱ्या क्रांत्या त्यांच्या राजकीय जीवनात स्थिरता किंवा चंचलता व्यक्त करतात.

६) राजकीय व्यवस्थेचे स्वरूप - राजकीय संस्कृतीच्या पार्श्रभूमीवर राजकीय व्यवस्था कार्य करीत असते. तसेच राजकीय व्यवस्थेच्या कार्याचा राजकीय संस्कृतीवर परिणाम होतो. राजकीय संस्कृतीत समाजातील मन:प्रवृत्ती, प्रेरणा आणि मूल्यांचा समावेश असतो. याचा प्रभाव राज्यव्यवस्थेवर पडतो. एखाद्या व्यवस्थेत काही मूल्यांचा जाणीवपूर्वक जोपासना केली जाते. काही मूल्यांचे जाणूनबुजून उल्लंघन केले जाते. लोकशाहीत व्यक्ती स्वांतत्र्यांचे समर्थन केले जाते तर हुकूमशाहीत व्यक्ती स्वांतत्र्याला गौण मानले जाते. लोकशाही व्यवस्थेत व्यक्तीला राजकीय संस्था स्थापण्याचे स्वातंत्र्य असते याउलट हुकूमशाहीत नसते.

या सर्व विवेचनावरून असे स्पष्ट करता येईल की, राजकीय संस्कृती राजकीय व्यवस्थेने जशी स्वीकारली, त्या आधारावर तिची जडण घडण होत असते म्हणजेच राजकीय व्यवस्था संस्कृतीच्या निर्मितीसाठी प्रयत्नशील असते.

भारतात संसदीय शासनप्रणालीत मूल्ये जोपासण्याचा प्रयत्न केला जातो. तिच्या निर्मितीसाठी, अस्तित्वासाठी राजकीय संस्कृतीच्या आधारावर कोणतीही किंमत देऊन राजकीय व्यवस्थेत टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

## ४.२.३ राजकीय संस्कृतीचे प्रकार

अल्मंड आणि व्हर्बा यांनी 'नागरी संस्कृती' या ग्रंथात राजकीय संस्कृतीचे काही प्रकार सुचविले आहेत. त्या आधारावर राजकीय संस्कृती वर्गीकरणाचा अभ्यास आपल्याला करता येतो.

१) संकुचित राजकीय संस्कृती – ज्या देशातील व समाजातील व्यक्ती नवीन विचार स्वीकारण्यास तयार नसतात अशा परंपराप्रिय देशातील राजकीय संस्कृती ही संकूचित स्वरूपाची असते. अशा राजकीय व्यवस्थेतील समाजात व्यक्तीची राजकीय भूमिका म्हणून कृती वेगळी झालेली नसते. त्यांच्या कार्याचे विशेषीकरण झालेले नसते. एकच व्यक्ती विविध क्षेत्रात कार्य करते. त्यांना राजकीय प्रक्रियेचे ज्ञान नसते. राजकारणाप्रती तेथील जनतेत उदासिनता असते. त्यामुळे राजकीय पक्ष व दबावगट प्रभावी असलेले तेथे दिसत नाही. अशा व्यवस्थेतील समाजामध्ये आर्थिक, राजकीय व धार्मिक बाबीसंबंधी नविन दृष्टीकोन मान्य नसतात. या देशातील लोकांच्या व्यवस्थेपासून काहीच अपेक्षा नसतात. हा राजकीय संस्कृतीचा प्रकार पारंपारिक प्राथमिक व्यवस्थेतील समाजामध्ये शुध्द प्रमाणात आढळते.

२) **आज्ञांकित संस्कृती** – या संस्कृतीमध्ये राजकीय व्यवस्थेशी संबंध प्रस्थापित झालेला असतो. परंतु शासनाच्या कृतीमधून घेतले जाणारे निर्णय याविषयी लोकांचा संबंध प्रस्थापित झालेला नसतो. त्याविषयी स्वत:चा सहभाग कसा द्यावा. याविषयी त्यांचा दृष्टिकोन तयार झालेला नसतो. लोकांचा शासनविषयी अभिमान, जाणीव दिसते. शासन न्याय आहे की नाही याची कल्पना त्यांना असते. पण त्याचा व्यवस्थेशी असलेली संबंध सामान्य पातळीवर असतो. तो संबंध निष्क्रिय स्वरूपाचा दिसतो.

३) **सहभागप्रधान राजकीय संस्कृती** –ज्या राजकीय व्यवस्थेतील लोकांचा दृष्टीकोन राजकीय प्रक्रियेकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टीकोन झालेला असतो. होणाऱ्या राजकीय घटना, राजकारण कसे असावे, कसे असू नये याची ज्यांना जाण झालेली असते ते व्यवस्थेत होणाऱ्या आदान–प्रदान संबंधाशी आपण सबंध जोडून असतात. त्या आधारावर प्रत्यक्ष सहभाग देऊन आपली भूमिका वठवली असतात. त्याला सहभागप्रधान राजकीय संस्कृती म्हणतात. अशा संस्कृतीमध्ये व्यक्तीच्या राजकीय जागृतीला विशेष महत्व असते. अनिष्ठ इष्ट या आधारावर त्या ठिकाणी सहभाग घेण्याचे ठरत असते. तो घेत असतांना राष्ट्रीय मूल्ये, प्रेरणा याला प्राधान्य असते.

४) राजकीय संस्कृतीचे मिश्र स्वरूप – कोणत्याही राजकीय व्यवस्थेत संस्कृतीचा एक प्रकार नष्ट होऊन दुसरा प्रकार निर्माण होत नाही, तर या प्रकाराचे मिश्र स्वरूप राजकीय व्यवस्थेत अस्तित्वात असते.

आज्ञांकित व सहभागप्रधान संस्कृती राजकीय व्यवस्थेतील राजकीय प्रक्रियेत बराच काळ राहू शकते. नव्या राष्ट्रामध्ये ही राजकीय संस्कृती संकुचित स्वरूपाची असते. ज्या संस्था व पध्दती नव्याने सुरू केलेल्या असतात त्यामध्ये सहभाग भावना संस्कृती असतात.

एकाच वेळी हा समाज हुकूमशाहीकडे तर दुसऱ्या क्षणी लोकशाहीकडे झुकतो.

उदा– भारतात जातीय व धार्मिक संघटना विशिष्ट वेळी वेगळेकार्य करतात तर काही परिस्थितीत त्यांचा सहभाग भावना या आधारावर शासकीय स्तरावर ठेवतात. त्यामुळे या मिश्र स्वरूपासंबंधात राजकीय संस्कृतीची गणंना कोणत्या गटात करावी हा संभ्रम पडतो.

उदा– भारतातील राजकीय संस्कृतीचे काही विशेष पहिल्या प्रकारात, काही दुसऱ्या प्रकारात तर काही तिसऱ्या प्रकारात आहेत असे दिसून येईल.

## ४.२.४ राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाची आवश्यकता

आधुनिक राज्याशास्त्रात राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाला महत्व दिले गेले. त्या आधारावर राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाचे महत्व स्पष्ट करण्यात आले. संस्कृतीच्या विविध अंगभूत घटकांचा विचार केल्यानंतर राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाची आवश्यकता आधुनिक राज्यशास्त्रात जाणवली. या अध्यनाचा हेतु, उद्देश व त्यापासूनचे होणारे फायदे स्पष्ट करण्यात आले ते पुढीलप्रमाणे –

१) **राजकीय प्रक्रियेचे अध्ययन** – कोणत्याही राजकीय संस्कृतीचा परिणाम त्या देशातील राजकीय व्यवस्थेवर पडत असतात. त्यानुसार राजकीय प्रक्रिया कार्य करीत असते. राजकीय प्रक्रिया कोणत्या मूल्याच्या आधारावर चालते ते जाणून घेण्यासाठी राजकीय संस्कृतीचे अध्ययन आवश्यक आहे. राजकीय प्रक्रिया तसेच राजकीय प्रक्रियेतील व्यक्तीची भूमिका जाणून घेण्यासाठी राजकीय संस्कृतीचे अध्ययन केले गेले.

२) **राजकीय व्यवस्थेतील परिवर्तनाचे अध्ययन** – कोणतीही राजकीय व्यवस्था ही गतिशिल असते. त्या परिस्थितीनुसार बदल होत असतात. २० व्या शतकात समाज

व राजकीय व्यवस्थेत ज्ञानाचा पुनरोदय झाला. परिणामी, उद्योगिक व तांत्रिक क्षेत्रात प्रगती झाली. या प्रगतीचा प्रभाव त्या देशातील मानवाच्या दृष्टिकोनावर व मूल्यांवर झाले. या मानवी मनात झालेल्या बदलाचा परिणाम तेथील राजकीय व्यवस्थेवर पडला. राजकीय व्यवस्थेत बदल होत गेले. जेव्हा-जेव्हा असे बदल झाले, तेव्हा तेव्हा राजकीय संस्कृतीतही बदल होत गेला. त्यामुळे या बदलाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने राजकीय अभ्यासाला महत्व प्राप्त झाले.

३) रूपांतराची प्रक्रिया जाणून घेण्यासाठी - दुसऱ्या महायुध्दानंतर जागातील अनेक राष्ट्र स्वतंत्र झाली. नवीन राष्ट्राचा उदया झाला. या नवीन राष्ट्रात आधुनिकीकरणाची प्रक्रिया निर्माण झाली. परंपरागत रूढी मूल्यांवर आधारित समाजाचे आधुनिक समाजात रूपांतर होऊ लागले. ही रूपांतराची प्रक्रिया सर्वच देशात किंवा सर्व व्यवस्थेत सारख्या स्वरूपाची नव्हती. तसेच त्याच्या रूपांतराची गतीही सारखी नव्हती. काही देशामध्ये जलद गतीने रूढी मुल्यांच्या स्वीकार केला गेला, तर काही देशात त्याची गती अतिशय मंद होती. या रूपांतर प्रक्रियेच्या अभ्यासासाठी तेथील राजकीय संस्कृतीच्या अध्ययनाला महत्व प्राप्त झाले.

४) राजकीय कार्यक्षेत्राचे अध्ययन- आधुनिक काळात राज्याची कार्यक्षमता विस्तृत आणि व्यापक होत आहे. कारण जगातील अनेक राष्ट्रांनी लोककल्याणकारी धोरणाची स्वीकार केला. शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य अशा विविध क्षेत्रात शासनाचा हस्तक्षेप वाढला, राजकीय व्यवस्थेचा व्यक्ती जीवनातील हस्तक्षेप वाढल्याने समाजातील अनेक व्यक्ती नवनवीन आव्हानांना तोंड द्यावे लागते. व्यक्ती स्वातंत्र मर्यादित होते. व्यक्तीच्या मुलभूत अधिकारात शासनाचा हस्तक्षेप होणार नाही. याची दक्षता घ्यावी लागते. या सर्व घटनांचा परिणाम व्यक्तीच्या दृष्टिकोनांवर मूल्यांवर होतो.

५) दृष्टिकोनांचा अध्ययन - आधुनिक काळात सर्वच सामाजिक शास्त्रात दोन दृष्टिकोनांचा विचार केला होता.

१) स्थूल दृष्टिकोन २) सूक्ष्म दृष्टिकोन

या दृष्टिकोनांचा विचार राजकीय व्यवस्थेत केला गेला. व्यक्तीत केंद्रबिदू मानून राजकीय प्रक्रियेचा अभ्यास हा सूक्ष्म स्वरूपाचा होता. याउलट समाज, राज्य, राज्य किंवा राजकीय व्यवस्था यांचा केलेला अभ्यास हा स्थूल स्वरूपाचा होता. व्यक्ती आणि राजकीय संस्कृतीला जोडणारा दुवा म्हणून राजकीय संस्कृतीला महत्व प्राप्त झाले. अशा

प्रकारे आधुनिक काळात विविध घटकांचा विचार करून संस्कृतीच्या अध्ययनाची आवश्यकता निर्माण झाली ते स्पष्ट होते.

## ४.२.५ राजकीय संस्कृती आणि प्रतिके

कोणत्याही राजकीय संस्कृतीत प्रतिकांना फार महत्व असते. एखाद्या समाजातील राजकीय प्रवृत्ती, मूल्य, दृष्टिकोन, भावना, चिन्ह, राष्ट्रगीत या सारख्या बाबींमध्ये प्रतिके व्यक्त होत असतात.

प्रतीकांमध्ये त्या देशातील पक्षातील किंवा समाजातील रूढी, परंपरा, दृष्टिकोन, भावना इ.बाबी दडलेल्या असतात. त्यामुळे प्रतिकांच्या सहाय्याने आपण राजकीय संस्कृती जाणून घेवू शकतो.

सर्व सामान्य व्यक्तींना राजकीय पक्ष, त्या पक्षांचे तत्वज्ञान किंवा राज्यघटना इ. बाबी समजत नाही. परंतू त्यामागील भावना जसे-राज्यघटनेऐवजी राष्ट्रगीत व राष्ट्रध्वज लोकांना माहित आहे. राजकीय विचार प्रणालीऐवजी कोणत्या पक्षांचे काय चिन्ह आहे? हे त्यांनी चांगल्या प्रकारे माहित असते. म्हणून राजकीय संस्कृतीत प्रतिकांना खूप महत्व आहे.

प्रतिकांमुळे जनतेच्या मनातील निष्ठा व भावना यांना स्थैर्य प्राप्त होते. प्रतिकांमुळे त्या देशातील राजकीय संस्कृतीची ओळख होते. जितकी प्रतिके जुनी तितके त्याचे विश्लेषण करणे कठीण जाते. कोणत्याही देशात प्रतिक म्हणून मानल्या गेलेल्या राष्ट्रध्वज किंवा राष्ट्रगीत यांचा अवमान करणे गुन्हा मानला जातो. यावरून प्रतिकांवर असलेली निष्ठा आपल्या लक्षात येते. भारताच्या स्वातंत्र्य दिनी व प्रजासत्ताक दिनी ध्वज फडकवून राष्ट्रगीत म्हटले जाते. देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती विचारांत घेऊन प्रतिके निश्चित केले जातात. या प्रतिकांमध्ये त्या देशांची विचार धारा दडलेली असते.

उदा-मुसोलिनिने विळा-कोयता हे सामर्थांचे प्रतीक तर हिटलरच्या नाझी पक्षांने स्वस्तिक या चिन्हांचा वापर करून सर्वांना एकत्र बांधण्याचा प्रयत्न केला.

सोव्हिएत रशियाने कोयता आणि हतोडा हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक निवडले. सुरूवातीला कृषीप्रधान असलेला भारत देश विचारात घेवून काँग्रेस पक्षाने बैलजोडी, इंदिरा काँग्रसने गाय-वासरू तर जनता पक्षाने नांगरधारी शेतकरी हे प्रतिक निवडले. त्यानंतच्या काळात राष्ट्रीय काँग्रसने-पंजा, राष्ट्रवादी काँग्रसने घड्याळ, भाजपाने- कमळ,

शिवसेनेने धनुष्यबाण यासारख्या प्रतिकांचा वापर करून जनतेची मते मिळविण्याचा प्रयत्न केला.

निवडून आल्यावर व्हिक्टरी या चिन्हांचा वापर केला जातो. यावरून जनता विजयांचा अंदाज लावते. या चिन्हांचा वापर इंग्लंडमध्ये आणीबाणीसारख्या युध्दजन्य परिस्थितीत जनतेची एकात्मता टिकविण्यासठी करण्यात आलेला होता. हातात तराजू असलेली व डोळ्यांवर पट्टी बांधलेली न्याय देवता हे अमेरिकेच्या स्वातंत्र्य प्रधान राजकीय संस्कृतीने स्वीकारले महत्वपूर्ण प्रतिक आहे. आज या प्रतीकांचा वापर नि:पक्षपातीपणे स्वीकारण्यात आला आहे.

आपल्या देशात होऊन गेलेले थोरपुरूष, संत, महात्मे, देवादितांचे अवतार, विविध थोर पुरूष, त्यांची जयंती, पुण्यतिथी किंवा वेगवेगळे सण प्रतीकांचा रूपात साजरे केले जातात. यांचा उपयोग राजकीय संस्कृतीच्या जडण घडणीसाठी होतो.

जसे–दसरा या दिवशी रावणाचे दहन केले जाते. या मागचा भाव दृष्ट प्रवृत्तीचा किवां अधर्माचा नाश करणे असे मानले जाते.

## ४.३ राजकीय सामाजिकरण

### ४.३.१ राजकीय सामाजिकरणाच्या व्याख्या –

१) राजकीय सामाजिकीकरण म्हणजे राजकीय संस्कृतीचे स्वरूप ठरविणारी अत्यंत महत्वाची प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमुळे व्यक्ती राजकीय व्यवस्थेशी परिचित होते. तिला राजकारणाचे ज्ञान होते. राजकारणाविषयीच्या तिच्या प्रतिक्रिया निश्चित ठरतात. या प्रक्रियेला राजकीय सामाजिकीकरणाची प्रक्रिया असे म्हणतात.

२) ईस्टन आणि डेव्हीस यांच्या मते, ज्यामुळे नागरिकांना राजकीय दृष्टिकोच प्राप्त होतात. त्यांचे राजकीय वर्तन ठरते. अशी विकसनशील प्रक्रिया म्हणजे राजकीय सामाजिकीकरण होय.

आधुनिक राजकीय विश्लेषणात राजकीय संस्कृतीला असलेले महत्व आपण विचारात घेतले आहे. राजकीय व्यवस्थांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी त्या व्यवस्थांच्या मुलभूत राजकीय संस्कृतीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. एखाद्या देशाची राजकीय संस्कृती विशिष्ट प्रकारची असते. तशी संस्कृती इतर देशात पाहावयास

सापडत नाही. या संस्कृतीची भिन्नता अभ्यासण्यासाठी राजकीय सामाजिकीकरणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## ४.३.२राजकीय सामाजिकीकरणाचा अर्थ -

राजकीय सामाजिकीकरण ही कायदेशीर किंवा तात्वीक बाब नाही.

सामाजिककीरणाची प्रक्रिया ही समाजामध्ये घडत असते.

समाजात निर्माण झालेल्या संघटना, जाती, दबावगट अशा विविध संघटनांचा प्रभाव सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेवर होत असतो.

मानवी मन व या मनातील ज्ञात व अज्ञात हेतू हे या सामाजिकीकरणाची प्रेरक शक्ती आहे.

समाजातील रूढी, परंपरा, मूल्य, विचारसरणी ही त्यातील महत्वांची शस्त्रे आहेत.

समाजातील काही पदाधिकाऱ्यांची प्रतिष्ठा सत्तेचा केला जाणारा सन्मान, कराची आकारणी यासारख्या अनेक बाबी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडणाऱ्या घटकांवर अवलंबून असतात. तसेच राजकारणातही काही व्यक्तींना अनपेक्षित यश मिळते. राजकीय व्यक्तीच्या (नेत्याच्या) प्रवृत्तीत परिस्थितीनुरूप बदल होतो. या सर्व परिवर्तनामध्ये सामाजिकीकरणाची प्रक्रिया दडलेली असते.

१९६० पूर्वीच्या राज्यशास्त्राचा अभ्यास केल्यास आपल्या असे लक्षात येते की, १९६० पूर्वी राजकीय सामाजिकीकरणाची प्रक्रिया किंवा संज्ञा यांचा वापर कोठेही केलेला आढळत नाही.

## संस्काराचा प्रभाव

सामाजिकरणाच्या प्रक्रियेत मानवी मनावर अगदी लहानपणापासून जे संस्कार होतात. त्याच्या परिणाम होत असतो. लहानपणी झालेल्या संस्कारामुळे त्याचे तारूण्य व्यवस्थेतील वागणे कळत-नकळत बदलत असतात. कुटूंबात आई-वडिल, शेजारी-पाजारी, मित्र-मैत्रिण, सास-सूनांची विविध साधने व अन्य माध्यमांचाही जसे-शाळा, कुटूंब, राजकीय पक्ष, दबावगट, मंदिर इ. बाबींचा मानवाच्या मनावर प्रभाव पडत

असतो. त्याद्वारे मानवाच्या वागण्यात व बोलण्यात परिवर्तन होत असते.

लहानपणी अतीश्रीमतं कुटूंबात वाढलेली मुले व्यक्तीनिष्ठ, गर्विष्ट, चैनी, आत्मविश्वास यासारख्या गुणांनी प्रभावीत झालेल्या पाहावयास मिळतात. याचाच अर्थ सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत संस्काराला महत्व आहे. संस्काराच्या प्रभावानुसार मानवाचे वर्तन निश्चित होत असते.

## ४.३.३ राजकीय सामाजिकीकरणाचे वैशिष्ट्ये -

राजकीय सामाजिकीकरणाच्य प्रक्रियेवरून आपणास राजकीय सामाजिकीकरणाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील.

१) **सामाजिकीकरणाचे सातत्य** - एखाद्या राजकीय व्यवस्थेत सामाजिकीकरणाची प्रक्रिया सातत्याने घडताना दिसते. राज्य कोणतेही असो जसे - राजेशाही, लोकशाही, हुकुमशाही इ. त्यांना जनतेच्या हितासाठी सातत्याने कार्य करावे लागते. या कार्यातून विविध विचार दृष्टिकोन, श्रध्दा, संस्कार एका पिढींकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात व्यवस्थेची एक चौकट असते. या चौकटीत राहुन म्हणजेच नियमाच्या किंवा कायद्याच्या आधारे व्यवस्थेला कार्य करावे लागते.

या व्यवस्थेचा केंद्रबिंदू व्यक्ती असते. व्यक्तीला विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. राजकीय व्यवस्थेच्या विकासासाठी व बलशाही देशासाठी व्यक्तीकडून विविध कृती अपेक्षित असतात. प्रत्येक व्यक्तीला बाल्यावस्थेत, तारूण्यावस्थेत राजकीय प्रक्रियेची ओळख होते. प्रौढा अवस्थेत विविध दृष्टिकोन व मूल्य प्राप्त होतात. या मूल्याच्या आधारे तो विशिष्ट पक्षाचा किवा दबावगट अथवा हितसंबंध गटाचा सदस्य बनतो. कालांतराने त्यात परिवर्तनही होते. त्यामध्ये राजकीय सामाजिकीकरण ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. व्यक्तीवर जे संस्कार होतात. त्यानुसार व्यक्तीचा राजकीय सहभाग ठरत असतो.

२) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सामाजिकीकरण - राजकीय सामाजिकीकरणाची प्रक्रिया राज्यव्यवस्थेत होत असतांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सामाजिकीकरण होत असते. जसे - आपण लहान असतांना कोणती वस्तू कोणाकडे मागावे जेणेकरून ती आपल्याला मिळेल हे ज्ञान कळत नकळत आपल्याला प्राप्त होते. त्यावरून आपले सामाजिकीकरण होत असते. हे सामाजिकीकरण अप्रत्यक्ष स्वरूपाचे असते. परंतू पक्षांचे सदस्यत्व स्वीकारणे, पक्षाच्या मिटींगला जाणे, जाहीर सभेला उपस्थित राहणे इ. राजकीय घटनेने प्रत्यक्षरित्या सामाजिकीकरणाची प्रक्रिया घडत असते. व्यक्तीवर झालेल्या प्रभावाचा

कुटुंब, शाळा, समाज, राजकारण त्यातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या सामाजिकीकरणाची प्रक्रिया घडत असते.

३) ज्ञानात्मक सामाजिकीकरण – व्यक्तीला लहानपणापासून राजकीय व्यवस्थेचे ज्ञान होत असते. जसे–कुटूंबात आईकडे, वडिलांकडे किंवा अन्य वडिलधाऱ्या व्यक्तींकडे कोणत्या मागण्या पूर्ण होतील याचे ज्ञान त्याला असते. हे ज्ञान एक प्रकारे सत्तेचे ज्ञान असते. कुटूंब, शासन, राजकीय, संस्कृती, वर्तमानपत्रे, रेडिओ, टिव्ही यासारख्या विविध संसूचन माध्यमातून कळतात, समाजातील काही व्यक्तींमध्ये ज्ञानाचे प्रमाण जास्त असते तर काही व्यक्तीमध्ये ते कमी असते. या ज्ञान किंवा माहिती संपादन करण्याच्या प्रक्रियेला ज्ञानात्मक सामाजिकीकरण असे म्हणतात.

४) भावनात्मक सामाजिकीकरण – राजकीय ज्ञानाप्रमाणे व्यक्तीला समाजातील विविध संस्था किंवा गटांकडून भावनात्मक ज्ञान प्राप्त होत असते. या ज्ञानाच्या आधारे काय चांगले? काय वाईट? यांचे ज्ञान व्यक्तीला होते. तसेच नैतिक–अनैतिक योग्य–अयोग्य, याबाबींचेही ज्ञान त्यातील मूल्य, श्रध्दा, दृष्टीकोन एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात. याला भावनात्मक सामाजिकीकरण असे म्हटले जाते.

५) जाणीवपूर्वक सामाजिकीकरण – समाजात काही वेळा कुटूंब, शाळा, धार्मिक संस्था, राजकीय पक्ष व अन्य सामाजिकीकरणांच्या साधनाद्वारे जाणीवपूर्वक काही मूल्य, श्रध्दा, दृष्टीकोण रूजविण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकारे बऱ्याचदा जाणीवपूर्वक सामाजिकीकरणाची प्रक्रिया समाजात होत असते.

६) अजाणतेपणे सामाजिकीकरण – काही वेळा समाजात विविध सामाजिकीकरणांच्या साधनाद्वारे अजाणतेपणे काही विचार एका व्यक्तींकडून दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रमित होत असतात. व्यक्तीच्या अंगी असलेल्या अनुकरणाच्या प्रवृत्तीतून तसेच प्रेरणेतून अजाणतेपणे ह्या गोष्टी स्विकारल्या जातात.

जसे–रस्त्याने जात असतांना एखाद्या प्रचार सभेतील काही वाक्य आपल्या कानावर पडतात. ते विचार पुन्हा–पुन्हा आपल्या डोक्यात येतात. ही सामाजिकीकरणाची प्रक्रिया अजाणतेपणे घडत असते.

७) **नेतृत्वांचा प्रभाव** – काही राजकीय प्रभाव व्यक्ती आपल्या आलेल्या अनुभवातून स्विकारत असते. वेगवेगळ्या राजकीय प्रसंगातून सर्वसामान्य व्यक्तीला राजकीय शिक्षण मिळते. व्यक्ती आपल्या निष्ठा एखाद्या नेत्यांवर केंद्रीत केल्याने तर नेत्यांचे विचार त्या व्यक्तीकडे संक्रमित होतात ती व्यक्ती नेतृत्वांचे विचार इतरांपर्यंत संक्रमित करते. अशा

प्रकारे नेतृत्वांतून सामाजिकीकरण होत असते.

जसे–पंडीत नेहरू, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी या नेत्याच्या व्यक्तीमत्वांचा प्रभाव अनेकांवर पडलेला आहे.

८) **परिणामाची विविधता** – राजकीय सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये एखाद्या घटनेचा प्रभाव सर्वांवर सारखा पडत नाही. हा प्रभाव कमी अधिक प्रमाणात पडत असतो. जसे –एखाद्या व्यक्तीने दिलेल्या व्याख्यानाचा प्रभाव सर्वांवर सारखा पडलेला दिसत नाही. त्याचप्रमाणे राजकीय पक्षाचे तंत्र, जाहीर सभेतील वर्क्तृत्व संसुचन साधनांचा प्रभाव सर्वांवर सारखा पडत नाही. त्यामुळे सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत परिणामाची विविधता असल्याचे आपल्याला पाहण्यास मिळते.

९) माध्यमाची विविधता – राजकीय सामाजिकीकरण घडवून आणणारे विविध माध्यमे आहेत. जसे – कुटूंब संस्था, शिक्षणसंस्था, राजकीय पक्ष, वेगवेळ्या व्यक्तीचे कार्यक्षेत्र इत्यादी या सर्व माध्यमाचा व्यक्तीच्या वर्तनावर सारखा प्रभाव पडत नाही. तसेच ह्मा माध्यमाच्या प्रभावाची विविधता स्थानिक, प्रादेशिक व राष्ट्रीय स्तरावर वेगवेळ्या प्रकारची असते.

अशा प्रकारचे समाजात होणाऱ्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेवरून वरील वैशिष्ट्ये आपल्यास पाहण्यास मिळतात ही प्रक्रिया अनुकरण, प्रेरणा व शिक्षण ह्मा माध्यमातून घडत असते.

## ४.३.४राजकीय सामाजिकीकरणाची साधने

समाजात एखाद्या घटनेचा प्रभाव सर्वांवर सारखा पडत नाही. तसेच प्रभाव पाडणारी साधनेही विविध आहेत. व्यक्तीच्या विचारांवर सामाजिकीरणाचा प्रभाव वेगवेळ्या साधनांच्याद्वारे पडत असतो. ही साधने पुढीलप्रमाणे –

१) कुटूंबसंस्था – लहानपणी मुलांचा जास्त वेळ कुटूंबातच जातो. आई, वडिल, भाऊ, बहीण, आजी, आजोबा अशा विविध लोकांच्या विचारांचा प्रभाव कळत नकळत तर कधी जाणीवपूर्वक बालकावर पडत असतो. त्यानुसार एका पिढीतील विचार दुसऱ्या व्यक्तीकडे संक्रमित होतात. कुटूंबातील मूल्य जसे सत्य याबाबतचे मुलांला ज्ञान होते. कुटूंबातील कोणत्या सदस्यातून काय अपेक्षा कराव्यात याचें त्याला ज्ञान होते. आई–वडिलांच्या राजकीय विचाराचा प्रभाव मुलांवर पडतो. जसे – पंडित नेहरूचा प्रभाव इंदिरा

गांधी, इंदिरा गांधीचा प्रभाव राजीव गांधीवर, राजीव गांधीचा प्रभाव राहुल गांधीवर पडलेला आहे. त्यामुळे वंश परंपरेने त्यांचे राजकीय सामाजिकीकरण झालेले दिसते.

काही वेळा मुलांची बुध्दीमत्ता व विचारशक्ती ही इतरांपेक्षा वेगळी असते. आईवडिलांचा सर्व मुलांवर पाहिजे तसा प्रभाव पडत नाही. असे असले तरी आपल्या लक्षात येते की, बालकांच्या सामाजिककरणाची सुरुवात कुटूंबातून तसा प्रभाव पडत नाही. असे असले तरी आपल्या लक्षात येते की, बालकांच्या सामाजिकीकरणाची सुरुवात कुटूंबातून होत असते.

२) मित्र मंडळी – बालकांचे जसजसे वय वाढत जाते तसतसे त्याला कुटूंबातील सदस्याऐवजी मित्रांविषयी प्रेम वाढायला लागते. त्यानुसार बालक आईवडिलांपेक्षा मित्राला जवळ मानायला लागतो. त्यांच्या विचारात मित्रांच्या विचारांचा प्रभाव पडतो. मित्रामधील नेतृत्वशैली, संवेदनशक्ती, सहकार्य, त्यागाची भावना, आदी बाबींची त्याला जाणीव झाल्यास त्यातून कधी जाणीवपूर्वक तर कधी अजाणतेपणे राजकीय सामाजिकीकरणाची प्रक्रिया होत असते.

३) शिक्षण संस्था – वयाच्या साधारण तीन वर्षानंतर बालकाचा विकास सुरू होते. या कालावधीत बालकाचा शारिरीक व मानसिक विकास होत असतो. त्या सक्षम वयात बालकाला जाणीवपूर्वक शिक्षकांकडून राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, आदर्श मुल्य यांची ओळख करून दिली जाते. विविध नेत्यांची चरित्र शिकविली जातात. त्यामुळे या शैक्षणिक संस्थामधून बालकांवर वेगवेगळ्या विचारांचा प्रभाव पडून राजकीय सामाजिकीकरणाची प्रक्रिया घडत असते.

४) व्यक्तीचे कार्यक्षेत्र – व्यक्ती ज्या ठिकाणी कार्य करते, नोकरी किंवा व्यवसाय करते त्यांचा प्रभाव व्यक्तींच्या कार्यांवर पडत असतो. म्हणून व्यक्तींच्या कार्यक्षेत्रांच्या ठिकाणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या राजकीय सामाजिकरणाची प्रक्रिया घडून येते. जसे –कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या विविध संघटना निर्माण होतात. या संघटनांचा राजकीय पक्षांशी संबध येतो. जसे–इंटक ही कामगार संघटना कॉंग्रेस पक्षांशी निगडीत आहे. हिंदू–मजदूर सभेवर समाजवादी विचारसरणीचा प्रभाव असल्याचे दिसून येते.

विद्यार्थी संघटनेतही अशा विविध विचारसरणीचा प्रभाव जाणवतो. जसे – अभाविप या संघटनेवर जनता पक्षाचा, एनएसयुआय या संघटनेवर कॉंग्रेसचा, विद्यार्थी सेनेवर शिवसेनेचा प्रभाव असल्याने त्या पक्षांच्या विचारसरणीद्वारे सामाजिकीकरणाची प्रक्रिया होत असते

५) **फुरसतीच्या संघटना** – समाजात काही व्यक्ती आपला वेळ सार्वजनिक कार्यात लावण्याच्या उद्देशाने वेगवेगळ्या संस्था व संघटना स्थापन करतात. जसे – लायन्स क्लब, रोटरी क्लब, महिला क्लब, कॅरमक्लब, व्यायाम मंडळ, हास्य क्लब इ. या संस्थांचे नियम, अटी असतात. ठरलेल्या दिवशी सभासद एकत्र येतात. चर्चा करतांना सभासद आपली मते व्यक्त करतात. येथे अनेक प्रकारच्या गप्पा रंगतात. राजकीय प्रश्नांवर चर्चा होते. त्यातून व्यक्तींची मते बनतात. अशा प्रकारे फुरसतींच्या संघटनेतून विचारांची देवाण–घेवाण होते. श्रध्दा, मुल्य, दृष्टिकोन आदी बाबीं संक्रमित होतात. त्यातून राजकीय सामाजिकीकरणाची प्रक्रिया घडून येते.

६) **राजकीय पक्ष** – लोकशाहीत राजकीय पक्षाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कारण लोकशाहीतील निवडणुका ह्या राजकीय पक्षांच्या माध्यमातून लढविल्या जातात. त्यासाठी राजकीय पक्षांना जनतेच्या इच्छा, आकांक्षा, अपेक्षा आदी बाबीं विचारात घेवून पक्षांचे ध्येयधोरण ठरवावे लागते. त्या आधारांवर जाहीरनामा तयार करून तो जनतेसमोर ठेवला जातो. जनता त्या जाहीरनाम्याने प्रभावित झाल्यास पक्षाला मतदान करते. काही व्यक्ती पक्षांच्या सभासद बनतात. जाहीर सभेला उपस्थित राहतात, प्रचार सभेत सहभागी होतात. जनतेला आपले विचार पटवून देण्यासाठी व सत्ता हस्तगत करण्यासाठी राजकीय पक्ष प्रचार, जाहिरसभा, जाहिरात, पत्रक वाटणे यासारखे उपक्रम राबवत असतात. त्यामुळे साहजीकच राजकीय पक्षांचे ध्येय, मुल्ये, श्रध्दा या लोकांमध्ये संक्रमित होतात. त्यामुळे राजकीय सामाजिकीकरणाची प्रक्रिया घडून येते.

७) **दबावगट** – समान हितसंबंध असलेल्या व्यक्ती आपल्या उदिष्टपूर्तीसाठी एकत्र येतात. आपला कार्यक्रम ठरवितात. आपल्यावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडतात. आपल्या उदिष्ट पुर्तीसाठी शासनांवर दबाव टाकतात. आपल्याला हवे असलेले सरकाह निवडून यावे यासाठी प्रयत्न करतात. वेळप्रसंगी जनतेचा मानसिक पाठिंबा मिळविण्यासाठी संप, हरताळ, उपोषण, घेराव धरणे–धरणे या सारख्या मार्गाचा अवलंब करतात. त्यामध्ये विचारांचे किंवा मुल्यांचे संक्रमण होऊन सामाजिकीकरणाची प्रक्रिया होत असते.

८) संसूचनाची साधने – समाजात वेगवेगळ्या श्रध्दा, मूल्य दृष्टिकोन यांचे सामाजिकीकरण करण्यात महत्वाची भूमिका संसूचन साधनाची असते. ते संसूचन साधने ही विविध प्रकारची असतात. जसे–

१) दृक श्राव्य – उदा –वर्तमान पत्रे, मुकचित्रपट, मासिक, फॅक्स, इंटरनेट इ.

२)  श्राव्य साधने – उदा–रेडिओ, टेलिफोन इ.

३)  दृकश्राव्य साधने – उदा– टिव्ही, चित्रपट, नाटक

या विविध साधनांच्या साह्याने आचार–विचार, श्रध्दा, मूल्य, दृष्टिकोन आदी बाबी कळत–नकळत बदलत जातात, त्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम समाजमनावर होवून सामाजिकीकरणाची प्रक्रिया घडून येते.

## ४.३.५राजकीय समाजिकीकरणाची अध्ययनाची आवश्यकता

१)  मानवी वर्तनाचा अभ्यास– राजकीय सामाजिकीकरणामुळे राजकीय व सामाजिक व्यवस्थेत समन्वयक साधला जातो. राजकीय समाजशास्त्रातील ती अत्यंत महत्वाची कल्पना आहे. व्यक्ती जसा सामाजिक प्राणी आहे. तसाच तो राजकीय प्राणी आहे. मानवाच्या सामजिक व राजकीय वर्तनाचा परस्परांशी संबंध आहे. मानवाच्या सामाजिक वर्तनाचा प्रभाव राजकीय वर्तनांवर व राजकीय वर्तनाचा प्रभाव सामाजिक व्यवहारांवर पडत असतो. या परस्परांशी संबंधीत व्यवहारांचा अभ्यास करण्यासाठी सामाजिकीकरण समजून घेणे आवश्यक आहे.

२)  **सामाजिक शास्त्राच्या अभ्यासासाठी** – आधुनिक काळात सामाजिक शास्त्रे विकसीत झाली आहे. सर्व सामाजिक शास्त्रांचा अभ्यास विषय मानव आहे. त्यामुळे मानवाच्या केवळ एका विशिष्ट अंगाचा अभ्यास करणे संयुक्तीक नाही. मानवाच्या सामजिक, आर्थिक, राजकीय, मानसिक अशा विविध घटकांचा समाजावर प्रभाव पडत असतो. त्यामुळे आधुनिक काळात सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासाला सुरूवात झाली. आंतरशास्त्रीय दृष्टिकोन विकसीत असल्याने या दोन शास्त्रांचा परस्परसंबंध जाणून घेण्याच्या दृष्टीने राजकीय सामाजिकीकरणांची आवश्यकता निर्माण झाली.

३)  मानवाची मानसिकता जाणून घेण्यासाठी – समाजात वावरत असतांना व्यक्तीला विविध प्रकारच्या भूमिका पार पाडाव्या लागतात. व्यवस्थेच्या वागणे स्वरूपांवरून व्यक्तींची मानसिक भूमिका तिच्या राजकीय सहभागांवर अवलंबून असते. एखाद्या व्यवस्थेतील व्यक्तींचा सहभाग, कार्य शैली जाणून घेण्यासाठी राजकीय सामाजिकीकरणांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

४)  परिवर्तनाचा अभ्यास करण्यासाठी – व्यवस्था कोणतीही असो तिच्यात काळानुसार बदल होत असतात. याचाच अर्थ ती कालसापेक्ष संकल्पना आहे. काळानुसार बदल होत

असतात. याचाच अर्थ ती कालसापेक्ष संकल्पना आहे. काळानुसार राजकीय व्यवस्थेत बदल होतात. व्यक्तींच्या राजकीय सहभागातही बदल होतो. नेतृत्व शैली बद्दलच्या या सर्व परिवर्तनवादी बाबी जाणून घेण्यासाठी राजकीय सामाजिकीकरणाचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## ४.४ राजकीय भरती (Political Recruitment)

### ४.४.१ राजकीय भरतीचा अर्थ

आज जगातील जवळजवळ सर्वच देशांनी लोकशाही शासनप्रणीलीचा स्वीकार केलेला आहे. विस्तीर्ण भुप्रदेश आणि वाढती लोकसंख्या विचारात घेता प्रत्यक्ष लोकशाहीची जागा अप्रत्यक्ष लोकशाही शासनपद्धतीने घेतली. परंतु आजही काही देशात राजेशाही, लष्करशाही, हुकूमशाही शासनप्रणाली असल्याचे दिसून येते.

शासनव्यवस्था कोणत्याही प्रकारची असो त्यांना कायदेविषयक, कार्यकारी स्वरुपाची व न्यायविषयक कार्ये करावी लागतात. ही कार्ये व्यवस्थितरित्या पार पाडण्यासठी राजकीय भरतीची आवश्यकता असते. लोकशाही शासनप्रणालीत जास्तीत जास्त व्यक्तीचा राजकीय सहभाग महत्त्वाचा असतो. राजकीय स्तरावर असलेल्या व्यक्तींपैकी अनेकांचा सहभाग हा केवळ मतदानापुरताच सिमीत असतो. परंतु काही व्यक्ती ह्या सत्ताशोधक असतात. जो राजकीय पक्षाचे सभासदत्व स्वीकारतो, नेतृत्वधारी वरिष्ठ पक्षनेत्यांची मर्जी सांभाळतो, त्यांना खुष ठेवण्याचा प्रयत्न करतो, आपल्या कर्तृत्वाने लोकांचा विश्वास संपादन करतो आदी सत्ताशोधक वर्गच फक्त राजकीय भरतीसाठी पात्र असतो.

### ४.४.२ राजकीय भरतीचे स्वरूप

सत्ताशोधकाला राजकीय व्यवस्थेत निश्चित प्रकारची भूमिका पार पाडावी लागते. राजकीय व्यवस्थेचे मूल्ये, विचार, श्रद्धा, दृष्टीकोन याविषयीचे ज्ञान व्यक्तीला विविध माध्यमांद्वारे दिले जाते. त्याद्वारे सत्ताधीशाला विशिष्ट भूमिका पार पाडण्यासंबंधीची जबाबदारी सोपविली जाते यास राजकीय भरती असे म्हणतात. अशा प्रकारे राजकीय सामाजिकीकरणाच्या आधारे राजकीय भरतीची प्रक्रिया पूर्ण होते.

राजकीय भरती व राजकीय सामाजिकीकरण ह्या एकाच प्रक्रियेच्या दोन बाजू आहेत. राजकीय भरतीचे अध्ययन करणे याचा अर्थ अनेक राजकीय अभिजन अथवा श्रेष्ठींचा अभ्यास करणे होय. ज्यात राजकीय पक्षाचे विविध पदाधिकारी, राजकीय नेते.

मंत्रीमंडळ आदींचा समावेश होतो. समाजातील श्रेष्ठीजनांच्या निवडीच्या प्रक्रियेलाच राजकीय भरतीची प्रक्रिया असे म्हणतात. या राजकीय श्रेष्ठीजनांना त्याचे राजकीय सामाजिकीकरण व त्यांची क्षमता लक्षात घेवून राजकारणात प्रवेश दिला जात असतो. त्यांच्या अंगी असलेल्या गुणांचा विचार करून त्यांना राजकीय व्यवस्थेत विशिष्ट भूमिका देण्याचा प्रयत्न जगातील अनेक देशांत केला जातो. अतिशय श्रीमंत, उच्च शिक्षित, राजकारणाचा वारसा सोपविलेली व्यक्तीची भूमिका यात फरक असल्याचे चित्र विविध देशांच्या तौलनिक अभ्यासावरुन आपल्या लक्षात येते. याचाच अर्थ विविध देशांच्या राजकीय व्यवस्थेत राजकीय भरती करतांना अथवा भूमिका देतांना संबंधीत व्यक्तीचे समाजातील स्थान, कार्यकुशलता, नेतृत्वशैली, प्रभावकारकता, पक्षनिष्ठा, पक्षहित आदी बाबींचा विचार केला जातो.

यावरुन आपल्या असे लक्षात येते की, राजकीय भरती ही प्रशासकीय पदाच्या भरतीपेक्षा वेगळी आहे. प्रशासकीय कार्याच्या बाबतीत सनदी सेवकांची भरती करतांना त्यांची शैक्षणिक पात्रता, कुशलता, वय, लिंग आदी बाबींचा विचार केला जातो. मात्र राजकीय भरतीत पात्रता, कुशलता आदी बाबींच्या ऐवजी धर्म, जात, लिंग, त्यांचा लोकसहभाग, नेतृत्वशैली, पक्षनिष्ठा, प्रसिद्धी, पैसा आदी गोष्टींना प्राधान्य दिले जाते. राजकीय पक्ष सत्ता मिळविण्यासाठी प्रयत्नशील असतो. त्यामुळे राजकीय भरती करतांना लोकशाहीत राजकीय पक्ष विविध बाबी विचारात घेऊन सत्ताशोधन पदासाठी योग्य प्रतिस्पर्धी उमेदवार देण्याचा प्रयत्न करतात. सत्ताशोधन सत्ताधीश बनले की त्यांच्यातील विविध बाबी लक्षात घेऊन त्यांच्याकडे कुवतीनुसार किंवा विश्वासानुसार जबाबदारी सोपविली जाते. त्यामुळे राजकीय भरतीत शिक्षणाला फारसे महत्त्व भारत देशात दिले जात नाही. मात्र पाश्चात्त्य देशात औपचारीक शिक्षणाला महत्व दिलेले आपणास अनेक राजकीय भरती पाहता लक्षात येते.

लोकशाही शासनव्यवस्था असलेल्या देशात राजकीय भरती ही खुल्या स्वरूपाची असते. मात्र हूकूमशाही, साम्यवादी, लष्करशाही असलेल्या देशांत राजकीय भरतीवर मर्यादा असतात. तेथे व्यक्तीची कार्यकुशलता महत्त्वाची नसून त्यांची पक्षनेत्यांवर किंवा हुकुमशहावर असलेली निष्ठा महत्त्वाची असते. त्यामुळे लोकशाही जननी असलेल्या इंग्लंडमध्ये आजही राजपद अनुवंशिकतेने प्राप्त होते. तसेच हाऊस ऑफ लॉडर्सच्या सभासदांची निवडही वंशपरंपरेने होते.

## ४.४.३ राजकीय भरतीचे प्रमुख घटक

राजकीय समाजशास्त्रज्ञांनी राजकीय भरतीच्या विविध घटकांची चर्चा केली.

त्यातील हेरॉल्ड लॉसवेल यांनी सांगितलेले राजकीय भरतीचे प्रमुख घटक पुढीलप्रमाणे–

१. शक्ती – आधुनिक काळात जगातील सर्वच देशात राजकीय भरती प्रसंगी शक्ती या घटकाला प्राधान्य दिले जाते. निवडणुकीच्या काळात उमेदवार आपल्या शक्तीचे प्रदर्शन करतात. त्यासाठी विविध युक्त्यांचा वापर केला जातो. काहीवेळा सत्ताशोधक शक्तीचा वापर सक्तीसाठी करताना दिसतात. त्याचाच परिणाम अलीकडे राजकारणाचे गुन्हेगारीकरण व गुन्हेगारांचे राजकारण चालत आहे. त्यामुळे राजकीय पक्षाने संसद व विधानसभेत उभ्या केलेल्या उमेदवारात गुन्हेगारांचे प्रमाण असल्याचा निर्वाळा निर्वाचन आयोगाने दिला आहे.

७ काही देशातील काही भागात राजकीय भरतीप्रसंगी आपल्या शक्तीचा वापर मतपेट्या पळविणे, खोटे मतदान करणे, मतदान करु न देणे, धाक दाखविणे यासाठी केला जातो. लोकशाही तत्वांची पायमल्ली करुन आपल्या शक्तीच्या साहाय्याने राजकीय भरतीसाठी शक्तीचा वापर केला जातो असे चित्र लोकशाहीचा वारसा नसलेल्या भागात पाहवयास मिळतो.

२. प्रतिष्ठा – प्रतिष्ठेचे परिणाम हे स्थळ, काल व व्यक्तीप्रमाणे बदलते, प्रतिष्ठा ही व्यक्तीच्या सामाजिक उंचीचे मोजमाप मानले जाते. त्यामुळे गावातील, देशातील प्रतिष्ठीत व्यक्तींकडे लोक आदराने पाहतात. त्यांना मानसन्मान देतात. त्यांच्या शब्दाला प्रमाण मानून, त्यांच्या शब्दाला आदेश मानून त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करतात. या त्यांच्या प्रतिष्ठेमागे ज्यांचे विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य असते. त्यामुळे समाजातील इतर व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. जसे – स्वांतत्र्योत्तर भारताचा विचार करता सुरुवातीच्या काळात लोकसभेच्या निवडणुकीत त्याच व्यक्तींना यश आले ज्यांची परंपरानुरूप समाजात प्रतिष्ठा होती. मात्र काळानुरूप प्रतिष्ठेच्या मापदंडात बदल झालेले आपणास निदर्शनास येते. त्यामुळे बदललेल्या मापदंडात ज्या व्यक्ती योग्य वाटल्या त्या प्रतिष्ठीत झाल्या. न्याय–अन्याय, योग्य–अयोग्य, लायक आदी बाबी बाजूला पडून पैसा, प्रसिद्धी, जात, धर्म, गुंडगिरी आदी घटकांच्या आधारावर प्रतिष्ठीत मानलेल्या गेलेल्या व्यक्तींची राजकीय भरती झाली. या घटकांना सत्ता मिळविण्यासाठी राजकीय पक्षाने उमेदवारी दिली ते केवळ त्यांच्या प्रतिष्ठेच्या आधारावर.

३. प्रामाणिकता – लोकशाही अथवा अन्य कोणतीही शासनप्रणाली असो तेथे राजकीय भरती प्रसंगी बुद्धिजीवी वर्ग हा प्रामाणिकता या घटकाला प्राधान्य देतांना आपल्या लक्षात येते. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्वांतत्र्यसैनिकांकडे प्रामाणिकता असल्याने

स्वातंत्र्यासैनिकांना राजकीय भरतीत सामावून घेण्यासाठी त्यांना तत्कालीन काँग्रेस पक्षाने तिकीटे दिलीत. जनतेचा विश्वास संपादन केलेल्या या व्यक्तींना सत्ता प्राप्ती झाली. तो समाजातील श्रेष्ठीजनांचा वर्ग बनला. तो केवळ त्यांच्या प्रामाणिकतेमुळे. परिणामतः स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षापर्यंत जवळजवळ तीन दशकापर्यंत जनतेने एकच पक्ष सदस्यांची राजकीय भरती झाली. पं. नेहरू, म. गांधी. डॉ. आंबेडकर, जयप्रकाश नारायण यासारख्या व्यक्तीतील प्रामाणिकता राजकीय भरतीचा भाग बनली.

परंतु प्रामाणिकता हा घटक सापेक्ष असल्याने तो सर्वत्र सारख्या प्रमाणात लागू होवू शकला नाही हे वास्तव नाकारता येत नाही. काळानुरूप प्रामाणिकतेचे स्वरुप बदलत गेले. भारतीय राजकारणात प्रामाणिक असणाऱ्या व्यक्ती पक्षश्रेष्ठी अथवा सत्तालोलुप लोकांना नको असणाऱ्या त्यांना नाकारण्यात आल्याचे चित्र आपण पाहतो. त्यामुळे अलीकडे प्रामाणिक व्यक्ती राजकीय भरतीच्या भानगडीत पडण्याऐवजी त्या स्वत;ला अन्य क्षेत्रात गुंतवून ठेवत आहे. मात्र इंग्लंड, अमेरिका या विकसित लोकशाही असलेल्या देशात प्रामाणिक हा राजकीय भरतीला आवश्यक घटक बनलेला आहे.

४. स्नेह – समाजातील ज्या व्यक्ती उदार विचारधारेच्या असतात. स्वहिताऐवजी जनहिताचा विचार करतात त्या समाजप्रिय होऊन त्यांची राजकीय भरती झालेली असते. अशा व्यक्ती आपल्या विचाराप्रमाणे कृतीतून समाजाविषयी, समुहाविषयी तसेच देशाविषयी विचार करुन तनमनधनाने कार्य करतात. त्यांचे समाजातील आदरयुक्त स्थान विचारात घेऊन राजकीय पक्ष त्यांना आपल्या पक्षात सहभागी करुन घेऊन त्यांना तिकीटे देतात. सत्ताप्राप्तीचा हा सहज मार्ग राजकीय पक्षाला वाटत असल्याने त्यांच्या समाजातील स्नेहाचा फायदा ते घेतात. अशा प्रेम देणाऱ्या व्यक्तींची राजकीय भरती झाल्यास त्या लोककल्याणाच्या हिताचा विचार करुन विविध समाजोपयोगी योजना आखतात, त्यांची निष्ठेने अंमलबजावणी करतात. त्यामुळे त्यांना पुन्हा समाजाकडून स्नेह मिळते. पुढील निवडणुकीतही त्यांच्या राजकीय भरतीचा मार्ग सुकर होतो. त्यामुळे अनेक देशात समाजाविषयी स्नेहभाव बाळगणाऱ्या व्यक्तींचा समावेश सत्ताधीश वर्गात झालेला दिसून येतो.

५. कल्याण – समाजातील काही व्यक्तींना समाजकार्याची आवड असते. अशा व्यक्ती स्वत:ला समाजहिताच्या योजना राबविण्यात, समाजहितासाठी विविध प्रकल्प राबविण्यात स्वत:ला गुंतवून घेतात, काही व्यक्ती समाजासाठी अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आपले जीवन समाजकार्यासाठी सर्मप्रित करतात. विविध चळवळी, आंदोलने या मार्गाने जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडतात. त्यामुळे समाजकल्याणाच्या हेतूने कार्यरत

असलेल्या समाजसुधारकांचा जनसंपर्क हा दांडगा असतो. जनतेचा त्यांच्यावर विश्वास असतो. त्यामुळे मतदाराचे वर्तन नियंत्रित करण्याची क्षमता या लोकांमध्ये असते. याचा फायदा राजकीय पक्षाद्वारे राजकीय भरतीसाठी केला जातो. तर भारतातील 'आप' पक्षाची स्थापना याच हेतूने झाली. दिल्लीकरांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना राजकीय भरतीत सामावून घेतले. ते केवळ समाजकल्याणाच्या हेतूने. त्यामुळे कल्याण हा अनेक देशात राजकीय भरतीचा आवश्यक घटक बनला आहे.

६. संपत्ती – आधुनिक राजकीय व्यवस्थेत जगातील जवळपास सर्वच देशात संपत्ती हा घटक राजकीय भरतीचा आवश्यक भाग बनला आहे. संपत्ती असेल अशाच व्यक्तीला राजकीय पक्षाद्वारे तिकीट दिली जाते. निवडणूक लढविण्यासाठी प्रचार सभा, दौरे, परिपत्रक आदी बाबी कराव्या लागतात. त्यासाठी लागणारा खर्च हा सर्वसामान्य व्यक्तीला न परवडणारा असतो. अलीकडे दुपारनंतर मतदारांच्या लागलेल्या रांगा हे दर्शवितात की, संपत्तीच्या जोरावर मतदान वर्तणूक नियंत्रित करता येते. आज भारत देशातील उमेदवारांना जाहीर केलेली संपत्ती पाहता. निवडणूका ह्या संपत्तीवानांनी लढविण्याचा मार्ग बनला आहे असे चित्र दिसते. त्यामुळे सद्यस्थितीत जागतिक राजकीय भरतीच्या प्रक्रियेत संपत्ती ह्या घटकाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

७. क्षमता – राजकारण चालविणे ही सर्वांना न जमणारी बाब आहे. त्यासाठी नेतृत्व कौशल्य व्यक्तीच्या अंगी असणे आवश्यक आहे. नेतृत्व कौशल्याची क्षमता ही जन्मत: काही व्यक्तीच्या अंगी असते. तर काही व्यक्तींमध्ये ती परिस्थितीनुरुप विकसित होत असते. नेतृत्वक्षमता असलेल्या व्यक्तीचा प्रभाव मानवी वर्तनावर पडत असतो. त्यामुळे जगातील जवळपास सर्वच देशात व्यक्तीची क्षमता राजकीय भरतीप्रसंगी विचारात घेतली जाते. केवळ संपत्तीच्या बळावर निवडून आलेली व्यक्ती पुढच्या निवडणूकीत निवडून येईल असे सांगता येत नाही. क्षमता नसलेल्या व्यक्तींची राजकीय भरती झाल्यास त्या जनतेचा विश्वास संपादन करतील असे नाही.त्यामुळे व्यक्तीच्या अंगी असलेल्या क्षमता विचारात घेऊन पदनिश्चिती केली जाते. यासाठी कर्तृत्व, सेवा, त्याग, सहकार्य, औदार्य, विरोध पचविण्याची ताकद आदी बाब लक्षात घेऊन राजकीय भरती केली जाते.

८. प्रबोधन – राजकारण ही एक कला आहे तर सत्ताधीश कलाकार आहेत. तेव्हा जनहिताचा विचार करणारा, प्रबोधन करणाऱ्या घटकांला राजकीय भरतीत प्राधान्य दिले जाते. पूर्वी समाजसुधारक असलेल्या प्रबोधन वर्गाला राजकीय भरतीत महत्त्व दिले जाई. प्रबोधन हा व्यक्ती विकासातील महत्त्वाचा टप्पा आहे. नेल्सन मंडेलाने केलेल्या प्रबोधन कार्याचा परिणाम राजकीय भरतीसाठी झाला. आजही तिबेटचे भारतातील नेते दलाई

लामा या मुल्याचेच पायीक आहेत. पूर्वी प्रबोधन या घटकाला खुप महत्त्व दिले जाई.

अशाप्रकारे राजकीय भरतीसाठी या विविध घटकांचा प्रभाव कमी अधिक प्रमाणात पडत असतो. सर्वच देशात सर्व घटक सारख्या प्रमाणात परिणामकारक ठरत नाही. त्यात विविधता असल्याचे निदर्शनास येते. काळानुरुप, परिस्थितीनुरुप या विविध घटकांची प्रभावकारकता ठरत असल्याचे लक्षात येते. सद्यस्थितीत भारताच्या परिस्थितीचा अभ्यास, केला तर संपत्ती, प्रतिष्ठा, क्षमता या बाबी राजकीय भरतीत निर्णायक भूमिका बजावत आहेत तर अमेरिकेत आर्थिक स्थितीप्रमाणे, उच्च सैनिकी शिक्षणाला प्राधान्य दिले जाते. राजकीय पक्ष व मतदारवर्ग सत्ताशोधकांची वैचारीक स्पष्टता व क्षमता विचारात घेतात.

### ४.४.४ अन्य घटक

राजकीय भरतीच्या या सर्वसामान्य घटकांच्या व्यतिरिक्त देशकालपरत्वे अन्य काही घटकही कार्यरत असतात. जसे-

१. राजकीय कौटुंबिक वारसा - व्यक्तीचा जन्म कोणत्या कुटुंबात झाला याचा प्रभाव राजकीय भरतीवर पडतो. अलिकडच्या काळात राजकीय नेत्यांची मुले, आई, मुलगी, बहीण आदी नातेसंबंधाच्या व्यक्ती राजकीय भूमिका बजावत असल्याचे चित्र भारतीय राजकारणात दिसून येते. त्यांच्यात ही प्रवृत्ती कुटुंबातून आलेली असते. उदा. पंडित नेहरु, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी, राहुल गांधी इत्यादी त्यामुळे आधुनिक राजकीय भरतीत घराणेशाही मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली आहे.

२. मानसिकता - राजकीय दृष्ट्या सर्व कुटुंबातील सदस्य सक्रिय नसतात, राजकीय भरती होण्याची मानसिकता काही कुटुंबात लहानपणापासूनच निर्माण होते.

३. शिक्षण - शिक्षण हा राजकीय भरतीचा आधार अनेक देशांत मांडला गेला आहे. शिक्षणाद्वारे व्यक्ती योग्या-अयोग्य, न्याय-अन्याय या बाबींचा विचार करु शकते. शिक्षणाला विकसित लोकशाही असलेल्या देशात महत्त्व प्राप्त झालेले आहे.

४. महत्त्वाकांक्षा - समाजातील काही व्यक्तींमध्ये नेतृत्व करण्याची महत्त्वाकांक्षा असते. दृष्टिकोनातून त्या राजकीय पक्षाच्या सदस्य बनतात. निवडणूक लढवितात. त्यासाठी अनेक मार्गाने सत्ताप्राप्तीचा प्रयत्न करतात.

५. आरक्षण – आरक्षण हा आधुनिक काळात राजकीय भरतीचा एक मार्ग बनला आहे. समाजातील दुर्बल घटक; ज्यांना सत्तेत स्थान मिळाले नाही त्यांच्या दृष्टिकोनातून आरक्षणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. भारतीय राजकारणात अनुसूचित जाती जमाती तसेच महिलांना आरक्षणाची व्यवस्था करून देण्यात आली आहे. ही व्यवस्था काही बाबतीत लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात आली आहे. पंचायत राज व्यवस्थेत महाराष्ट्रातील महिलांना ५०% आरक्षण देण्यात आले आहे.

६. विचारसरणी – समाजातील काही व्यक्ती आपल्या विचारांचा प्रभाव इतर व्यक्तींवर पाडण्याच्या दृष्टिकोनातून राजकीय भरतीचा प्रयत्न करतात. राजकीय सत्तेच्या माध्यमातून विचारांना मूर्त रुप देण्याचा प्रयत्न त्यांच्यामार्फत केला जातो. जसे– रशिया व चीनमध्ये साम्यवादी विचारसरणीद्वारे राजकीय भरती करण्यात आली.

७. उपद्रवी मूल्ये – अलीकडच्या काळात राजकारणात भ्रष्टाचार हा शिष्टाचार बनला आहे. समाजातील काही व्यक्ती सत्तेसाठी कोणत्याही स्तरापर्यंत जाण्यास तयार होतात. राजकीय पक्ष आपल्या मुल्यांची तिलांजली देतात. वास्तविक ही मूल्यं लोकशाही असलेल्या देशात राजकीय भरतीचा घटक असणे हे अहितकारी आहे.

अशाप्रकारे जगातील विविध देशांत राजकीय भरतीचे हे विविध घटक कमी अधिक प्रमाणात राजकीय भरतीसाठी कारणीभूत ठरतात.

### ४.४.५ राजकीय भरतीच्या पद्धती

राजकीय भरतीच्या पद्धती ह्या विविध देशांत व विविध काळात वेगवेगळ्या प्रकारच्या असलेल्या आपणास पाहावयास मिळतात. तसेच शासनप्रणाली कोणत्या स्वरुपाची आहे? जसे – लोकशाही, हूकूमशाही, सरंजामशाही, भांडवलशाही इ. व्यवस्थेत भरतीचे वेगवेगळे मार्ग आहेत. ते मार्ग व पद्धती पुढीलप्रमाणे –

१. वंशपरंपरागत – पूर्वीच्या काळी वंशपरंपरागत पद्धतीने सत्ता ही वडीलानंतर मुलाकडे यायची. रामायण, महाभारतात यासंबंधीचे पुरावे सापडतात. आजही लोकशाहीची जननी असलेल्या इंग्लंडमध्ये वंशपरंपरेने राजा किंवा राणी यांची राजकीय भरती होते. राजाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा हा वारसदार बनतो. इंग्लंडप्रमाणेच नेपाळ, जपान, सौदी अरेबिया या देशांतही वंशपरंपरेने राजकीय भरती झालेली आहे. इंग्लंडच्या हाऊस ऑफ लार्डस्चे सभासद मोठ्या संख्येने वंशपरंपरागत पद्धतीने निवडले जातात. लोकशाही असलेल्या देशात ही पद्धत योग्य वाटत नाही.

२. निवडणूका – निवडणुकीला 'लोकशाहीचा प्राण' म्हटले जाते. निवडणुका जितक्या खेळीमेळीच्या वातावणात पार पडतील तितकी लोकशाही यशस्वी होते. म्हणून जगातील लोकशाही असलेल्या राष्ट्रात निवडणुकीला महत्त्व प्राप्त झाले आहे. जगातील अनेक देशांनी निवडणुकीच्या वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब केला. लोकशाही असलेल्या भारतात देशाचा सर्वोच्च प्रमुख असलेल्या राष्ट्रपतींची निवड ही अप्रत्यक्षरित्या जनतेकडून होते तर पतंप्रधान, मंत्रीमंडळ व अन्य संसदेचे सदस्य हे जनतेकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मार्गाने निवडले जातात. साम्यवादी असलेल्या देशात निवडणुका ह्या एकाच पक्षाच्या मार्फत लढविल्या जातात. त्यामुळे त्या पक्षाची मक्तेदारी तेथे निर्माण होते. लोकशाहीत निवडणुका लढविण्यासाठी किमान दोन पक्ष असणे आवश्यक असते. भारतात सध्या अनेक पक्षांमार्फत निवडणुका लढविल्या जातात. त्याद्वारे राजकीय भरती होते.

३. नियुक्ती – जगातील काही देशात वरिष्ठ पदांवर असलेल्या व्यक्तींची भरती करतांना नियुक्तीचा मार्ग स्वीकारला जातो. जसे – भारतात सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची व अन्य न्यायाधिशांची नियुक्ती केली जाते. राज्यपाल हा राष्ट्रपतींकडून निवडला जातो. राज्यासभेतील १२ सदस्य विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ हे राष्ट्रपतींकडून निवडले जातात. लोकसभेत ॲग्लो इंडियन समाजाला प्रतिनिधी न मिळाल्यास २ सदस्यांची निवड राष्ट्रपतींकडून केली जाते. अमेरिकेत अध्यक्ष कार्यकारी मंडळातील अन्य सदस्यांची नियुक्ती करतात.

४ निवड – निवडीचा मार्ग हा साधारणत: प्रशासकीय भरतीच्या संदर्भात वापरला जातो. प्रशासक नेमतांना त्याची कुशलता व बुद्धिमत्ता तपासण्यासाठी काही निकष लावले जातात. सामान्य व विशेष पात्रता पदानुसार निश्चित केली जाते. वेगवेगळ्या प्रकारच्या निवडीच्या पद्धतीद्वारे जसे – परीक्षा, मुलाखत, शारीरिक परीक्षा, मानसिक परीक्षा इ. मार्गांनी त्यांची निवड केली जाते. साम्यवादी देशात तसेच हुकूमशाही देशात हुकूमशहा आपल्या विश्वासातील व्यक्तींची निवड राजकीय भरतीसाठी करतात.

५. घटनाबाह्य मार्ग – हा मार्ग वास्तविक राजकीय भरतीच्या दृष्टीने योग्य नाही. यामध्ये सत्ता हस्तगत करण्यासाठी उठाव करणे, लष्करी कट रचणे, हिंसक घटना घडवून आणणे यासारख्या गैरमार्गाचा वापर केला जातो. पाकिस्तानातून लष्करी हूकूमशहांनी या घटनाबाह्य मार्गानेच सत्ता हस्तगत केलेली होती. १९२२ मध्ये इटलीचा हुकूमशहा मुसोलिनीने याच घटनाबाह्य मार्गाने सत्ता हस्तगत केली.

६. शैक्षणिक संस्था – अलीकडच्या काळात देशात वेगळेगळ्या शैक्षणिक संस्था काढून त्याद्वारे राजकीय व्यवस्थेला पूरक असे नागरिक निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले

जातात. त्याविषयी कार्यक्रमांचे आयोजन करणे, राजकारणाला पूरक अभ्यासक्रम ठरविणे, महाविद्यालयात विद्यालयीन संघटना स्थापन करून नेतृत्व विकसित करणे हे कार्ये केले जाते. याबाबतीत राजकीय पक्ष युवकांना आपल्या हाताशी ठेवण्याचा प्रयत्न करतात. त्याचा फायदा सत्ता मिळविण्यासाठी करुन घेतात. विविध शैक्षणिक संस्थेत वादविवाद, वर्क्तृत्व स्पर्धा यासारखे विविध उपक्रम राबविले जातात. त्याचाच परिणाम आज विविध विद्यापीठातून भारतीय नेतृत्व विकसित झाले. ही पद्धत जगातील अनेक देशात निर्माण झालेली आहे.

७. कामगार चळवळ – औद्योगिकीकरणानंतर कामगार चळवळीला महत्त्व प्राप्त झाले. सुरुवातीच्या काळात साम्यवादी पक्ष व समाजवादी पक्ष कामगारवर्गाला राजकीय भरतीत समाविष्ट करुन घेण्यासाठी प्रयत्न करत, परंतु कामगारांमध्ये झालेल्या जागृतीचा परिणाम आज विविध कामगार संघटना सक्रिय झाल्या आहेत. राजकीय भरतीच्या दृष्टिकोनातून ते दबावगटाची भूमिका पार पाडीत आहेत.

८. महिला चळवळ – पुरुषांच्या बरोबरीने महिलांची संख्या असताना त्यांना राजकारणापासून दूर करण्यात आले होते. भारतीय घटनेने दिलेल्या अधिकाराचा परिणाम महिलांना राजकारणात सक्रिय करण्यासाठी आरक्षणाचा मार्ग स्वीकारण्यात आला. त्या दृष्टिकोनातून विविध महिला आघाड्या स्थापन झाल्या. राजकीय पक्ष तिकीट वाटप करतांना महिलांना प्राधान्य देत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेत आरक्षणामुळे महिलांची राजकीय भरती सुकर झाली आहे.

९. धार्मिक व जातीय संघटना – जगातील अनेक देशात धार्मिक व जातीय संघटना जेवढी कार्यरत नाही तेवढी मोठ्या प्रमाणात ती भारतात कार्यरत आहे. निवडणुकीच्या काळात जात, धर्म या बाबींना विचारात घेऊन मतदान केले जाते. ज्या जातीचे लोक विशिष्ट प्रभागात असतील त्यांचाच उमेदवार निवडून येतो असे चित्र निर्दशनास येते. आज देशात धार्मिक संघटना सक्रीय झालेल्या आहेत. धर्माच्या नावावर राजकीय भरती केली जाते.

१०. विशिष्ट क्षेत्रातील निपुणता – समाजातील काही व्यक्ती ह्या विविध क्षेत्रात निपुण असतात. त्यांच्या ज्ञानाचा फायदा देशाला व्हावा यासाठी अशा वर्गांची नियुक्ती करण्यावर भर दिली जातो. नियुक्ती करतांना किंवा निवडणुकीची उमेदवारी देतांना निपुणता विचारात घेतील जाते. ही निपुणता राजकीय भरतीचा महत्त्वाचा भाग बनते.

अशाप्रकारे जगातील विविध देशात तेथील असलेल्या शासन प्रणालीच्या

आधारावर भरतीचे मार्ग निवडले जातात. पदानुसार तसेच काळानुसार भरतीच्या मार्गात बदल झालेले आहेत.

## ४.५ सारांश

तुलनात्मक राज्यशास्त्राचा अभ्यास करतांना राजकीय संस्कृती, राजकीय सामाजिकीकरण व राजकीय भरती या संकल्पना एकमेकांशी निगडीत आहेत. राजकीय व्यवस्थेला कार्य करतांना विशिष्ट मूल्य, श्रध्दा, दृष्टीकोन, रूढी, नियम आदी बाबी विचारात घेऊन कार्य करावे लागते, यालाय राजकीय संस्कृती असे म्हणतात, व्यक्ती तितक्या प्रकृती त्याचप्रमाणे विविध देशांतील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, भौगोलिक, सांस्कृतिक आदी परीस्थिती भिन्न असल्याने तेथील राजकीय संस्कृती ती भिन्न भिन्न स्वरुपाची असलेली पाहावयास मिळते. हे विचार, दृष्टोकोन, श्रध्दा, मूल्य या बाबी जेव्हा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात यालाच राजकीय सामाजिकीकरण असे म्हणतात. ही राजकीय सामाजिकीकरणाची प्रक्रिया कुटुंब, शिक्षण संस्था, धार्मिक संस्था, फुरसतीच्या संघटना, राजकीय पक्ष, दबावगट, संसूचनाची साधने यासारख्या विविध साधनांद्वारे घडत असते. ही सामाजिकीकरणाची प्रक्रिया सातत्याने सुरु असते. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष, औपचारिक-अनौपचारिक, उघड-छुप्या यासारख्या मार्गांनी सामाजिकीकरण होत असते. या सामाजिकीकरणाचा प्रभाव राजकीय भरतीच्या प्रक्रियेवर होत असतो. राजकीय पक्ष निवडणुकीच्या काळात जनतेत प्रबोधन घडवून आणण्याचा, त्यांचे वर्तन बदलविण्याचा प्रयत्न करतात. या सामाजिकीकरणातून राजकीय भरती ही निश्चित होत असते. समाजातील सत्ताशोधकांचा वर्ग हा राजकीय भरतीसाठी प्रयत्नशील असतो. निवडणुका, निवड, वंशपरंपरा, शिक्षण इ. मार्गांनी विविध देशात राजकीय भरती होत असते. जगातील परिस्थिती, स्थळ, काळ, विचारात घेता बदलत असते. त्यानुसार संस्कृतीत बदल होत गेले. त्याचप्रमाणे राजकीय भरतीचे मार्गही परिस्थितीनुसार बदलत गेले.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

१. राजकीय संस्कृती म्हणजे काय ते सांगून संस्कृतीचे आधारभूत घटक स्पष्ट करा.
२. राजकीय संस्कृतीच्या प्रकारांची चर्चा करा.
३. राजकीय सामाजिकीकरणाचा अर्थ सांगून सामाजिकीकरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
४. राजकीय सामाजिकीकरण घडवून आणणाऱ्या विविध साधनांचा आढावा घ्या.
५. राजकीय भरती म्हणजे काय ते सांगून भरतीच्या विविध पद्धती स्पष्ट करा.

**उपक्रम**

१. आपल्या गावातील पंचायत राज्याच्या होणाऱ्या निवडणुकीचे सर्वेक्षण करा.

२. भारतातील राजकीय मूल्य, दृष्टीकोन, नियमावली या आधारावर प्रंबध तयार करा.

**संदर्भसूची**

१. प्रा. मुठाळ राम (१९९७), राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर.

२. डॉ. दिवाण चंद्रशेखर (१९९८), राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण, विद्या प्रकाशन, नागपुर.

३. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण (१९८८), राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिकेशर्स, नागपुर.

४. गेहरीळ. ग. उ. (१९८९). Principles of Modern Political Sci ence. Sterling Publishers Pvt. Ltd. New Delhi.

------------

# ५

# घटक ५ - राजकीय आधुनिकीकरणाचा सिद्धांत, राजकीय विकासाचा सिद्धांत आणि राजकीय ऱ्हास

**घटक संरचनाः**

५.० उद्दिष्ट्ये

५.१ प्रस्ताविक

५.२ विषय विवेचन

- ५.२.१ राजकीय आधुनिकीकरणाच्या सिद्धांताची आवश्यकता
- ५.२.२ राजकीय आधुनिकीकरण अर्थ व व्याख्या
- ५.२.३ राजकीय आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये
- ५.२.४ राजकीय आधुनिकीकरणाला प्रभावित करणारे घटक
- ५.२.५ राजकीय आधुनिकीकरणाच्या यंत्रणा
- ५.२.६ राजकीय आधुनिकीकरणाचे नमुने
- ५.२.७ सिद्धांताचे दोष
- ५.२.८ भारतीय राजकारण व आधुनिकीकारणाची समस्या
- ५.२.९ सिद्धांताचे मूल्यमापन
- ५.२.१० राजकीय विकास सिद्धांत
- ५.२.११ राजकीय विकासाचा अर्थ आणि व्याख्या
- ५.२.१२ राजकीय विकासाची वैशिष्ट्ये
- ५.२.१३ राजकीय विकासाचे स्तर किंवा अवस्था
- ५.२.१४ राजकीय विकास प्रक्रिया निर्धारित करणारे घटक
- ५.२.१५ राजकीय विकासाच्या समस्या
- ५.२.१६ भारतातील राजकीय विकास
- ५.२.१७ सिद्धांताचे मूल्यमापन
- ५.२.१८ राजकीय ऱ्हास
- ५.२.१९ राजकीय ऱ्हासाची लक्षणे

५.३ सारांश
५.४ सरावासाठी प्रश्न
५.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ५.० उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला राजकीय आधुनिकीकरणाच्या सिद्धांताची आवश्यकता, त्यांचा अर्थ आणि व्याख्या स्पष्ट करता येईल.

- राजकीय आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये, आधुनिकीकरणाला प्रभावित करणारे घटक, आधुनिकीकरणाचे प्रकार स्पष्ट करता येईल.
- राजकीय आधुनिकीकरणाच्या यंत्रणा, नमुने सांगता येतील.
- भारतीय राजकीय आधुनिकीकरणाची समस्या स्पष्ट करता येईल.
- राजकीय विकासाचा सिद्धांत त्याचा अर्थ आणि व्याख्या स्पष्ट करता येईल.
- राजकीय विकासाची वैशिष्ट्ये, विकासाचे स्तर सांगता येईल.
- राजकीय विकासप्रक्रिया निर्धारित करणारे घटक, विकासाच्या समस्या सांगता येईल.
- भारतातील राजकीय विकासाबाबत सांगता येईल.
- राजकीय ऱ्हास आणि ऱ्हासाची लक्षणे स्पष्ट करता येईल.

## ५.१ प्रस्ताविक

दुसऱ्या महायुद्धानंतर विशेषतः आशिया आणि आफ्रिका खंडात ज्या काही राजकीय उलाढाली घडून आल्या त्यांच्यामुळे आधुनिकतेचा प्रश्न निर्माण झाला. आधुनिकतेचा प्रश्न प्रामुख्याने समाजशास्त्रीय प्रश्न आहे. मात्र राजकीय जीवनाच्या दृष्टिने त्याला महत्व प्राप्त झाले आहे. राजकीय व्यवस्थेची स्थिरता राजकीय आधुनिकीकरणाच्या प्रश्नाशी निगडीत असल्याने आधुनिकीकरणास महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. आधुनिकीकरण ही विकसनशील समाजामध्ये घडून येणारी राजकीय दृष्ट्या प्रगत/प्रगल्भ बनण्याची प्रक्रिया आहे. अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांनी राजकीय आधुनिकीकरण आणि राजकीय विकास हया संकल्पना बऱ्याचशा समानार्थी वापरल्या आहेत. साधारणतः पुनरुज्जीवनाच्या काळापासून यूरोपात जे राजकीय स्थित्यंतर घडून आले आणि राजकीय संस्था, मूल्ये स्वीकारली गेली त्याला राजकीय आधुनिकता मानण्याची प्रवृत्ती आढळते. त्यामुळे विशिष्ट स्थित्यंतरे विकसनशील समाजामध्ये घडून यावीत अशी अपेक्षा राजकीय आधुनिकीकरणा वरील लिखाणात आढळते. हे लिखाण पाश्चात्यीकरणाचा पुरस्कार करते असा त्यावर आक्षेप घेतला जातो.

आधुनिकतेची प्रक्रिया ही बदलविषयक प्रक्रिया आहे. मात्र हा बदल विकासाच्या दिशेने अभिप्रेत असतो. काही वेळा राजकीय विकास व राजकीय आधुनिकीकरण हे दोन्ही शब्द समानार्थी वापरले जातात. मात्र दोघांतीतल निश्चित फरक करणे अवघड आहे. तरी आधुनिक काळात प्रगत समाजाच्या संदर्भात वापरला जातो. येथे आधुनिकीकरणात विकास अभिप्रेत असतो.

आधुनिकीकरणावर नागरीकरण, औद्योगिकरण, ऐहिकीकरण, लोकशाहीकरण, शिक्षण आणि संप्रेषण माध्यमांचा वाढता उपयोग, वाढता राजकीय सहभाग राजकीय संस्थांचा सामाजिक संस्थांमधील प्रवेश, लोकांचे राजकीय संघटन, राजकीय व्यवस्थेची लोकांची वाढती एकरुपता, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाचे वाढते प्रमाण, सार्वजनिक क्षेत्रातील न्याय व गुणवत्ता याचा आदर, इत्यादी अनेक गोष्टी अंतर्भूत असतात. म्हणून तुलनात्मक राजकीय विश्लेषणात या सिंद्धाताचा अभ्यास करणे महत्वपूर्ण ठरते. राजकीय आधुनिकीकरणाबरोबरच राजकीय विकास ही संकल्पना सुद्धा महत्वपूर्ण आहे. म्हणून दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील राष्ट्रात कशाप्रकारे विकास झाला. याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. विकासाची लक्षणे कोणती आहेत हे अभ्यासणे महत्वाचे आहे.

## ५.२ विषय विवेचन

### ५.२.१ राजकीय आधुनिकीकरणाच्या सिद्धांताची आवश्यकता

तुलनात्मक राजकीय अभ्यासामध्ये आधुनिकीकरणाचा सिद्धांत राजकीय व्यवहाराला अधिक व्यापक प्रमाणात समजण्यासाठी मांडण्यात आलेला आहे. अनेक राज्यशास्त्रज्ञांचे असे मत आहे की राजकीय व्यवस्थाकडे केवळ विकासात्मक सिद्धांतामधून बघितल्यास आणि केवळ संरचनात्मक प्रक्रियेवर भर दिल्यास राजकीय व्यवस्थांच्या अनेक महत्वपूर्ण घटकांकडे दुर्लक्ष होते. त्यांचे असे मत आहे की राजकीय विकास राजकीय आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेचा परिणाम आहे आणि राजकीय आधुनिकीकरण समाजाच्या आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेने प्रेरित आणि प्रभावित होतो. राजकीय व्यवस्थांकडे राजकीय आधुनिकीकरणाच्या दृष्टिकोनातून बघितल्यास राजकीय व्यवहारांची वास्तविकपणे माहिती होते. म्हणून तुलनात्मक राजकीय अभ्यासाला विकासाच्या ऐवजी आधुनीकीकरणाच्या संपूर्ण प्रक्रियेचा अभ्यास शक्य होण्यासाठी असे नवीन सिद्धांताचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. अशा प्रकारे राजकीय आधुनिकीकरणाचा सिद्धांत राजकीय प्रक्रियांचा आधुनिकीकरणाचा व्यापक संदर्भात अभ्यास करण्यासाठी आवश्यक मानण्यात आला आहे.

विकसनशिल राजकीय व्यवस्थांना समजण्यासाठी राजकीय विकासाची संकल्पना मर्यादित ठरते. परंतु, आधुनिकीकरण ही अशी प्रक्रिया आहे जी निरंतर चालते. तिला अडथळे निर्माण केले जाऊ शकतात, परंतु थांबवले जाऊ शकत नाही. प्रत्येक समाज आधुनिक बनू इच्छितो. प्रत्येक समाजात आधुनिक बनण्याची प्रक्रिया स्वतःच निर्माण होत असते. आधुनिकीकरण एक किचकट परंतु सदैव चालणारी सर्वव्यापी प्रक्रिया आहे. यामुळे तुलनात्मक राजकीय प्रक्रियेशी जोडण्याची आवश्यकता वाटू लागली. याचाच परिणाम म्हणजे राजकीय आधुनिकीकरणाचा सिद्धांत होय. थोडक्यात, राजकीय व्यवस्थांचा व्यापक प्रमाणात अभ्यास करण्यासाठी या सिद्धांताची आवश्यकता आहे.

## ५.२.२राजकीय आधुनिकीकरण अर्थ व व्याख्या

राजकीय आधुनिकीकरण 'आधुनिक राजकीय सिद्धांतामध्ये एक असा शब्द आहे की ज्याची व्याख्या करणे कठीण आहे. राजकीय आधुनिकीकरणाची व्याख्या पाहण्याअगोदर सर्वप्रथम 'आधुनिकीकरण' या शब्दाचा अर्थ पाहणे आवश्यक आहे.

रॉबर्ट वार्ड यांच्या मते ''आधुनिक समाज निर्माण करण्याच्या दृष्टीने उपलब्ध साधन सामग्रीचे विचारपूर्वक नियोजन या संबंधीची प्रक्रिया म्हणजे आधुनिकीकरण होय.''

रॉजर्स व स्वेनिंग यांच्या मते ''आधुनिकीकरण म्हणजे जिच्या आधारे व्यक्ती पारंपारिक जीवन प्रणालीचा त्याग करुन अधिक गुंतागुंतीची, तांत्रिकदृष्ट्या प्रगत व गतिमान अशी जीवनप्रणाली स्वीकारते.''

हटिंग्टन यांच्या मते ''मानवी विचार व क्रिया या संबंधीच्या सर्व क्षेत्रात बदल घडवून आणणारी बहुमुखी प्रक्रिया म्हणजे आधुनिकीकरण होय.''

राबर्ट वार्ड, रॉजर्स व स्वेनिंग आणि हटिंग्टन इत्यादी विचारवंतानी आधुनिकीकरणाची ज्याप्रकारे व्याख्या केली आहे. त्यावरून हे स्पष्ट होते की आधुनिकीकरण एक बहुमुखी प्रक्रिया आहे ज्यामुळे मानवी विचार आणि कार्याच्या सर्व क्षेत्रात परिवर्तन होते.

राजकीय आधुनिकीकरण, राजकीय विकासाच्या तुलनेत व्यापक संकल्पना आहे. समाजातील सामाजिक संचलन आणि आर्थिक विकासामुळे होणाऱ्या राजकीय परिवर्तनास साधारणपणे राजकीय आधुनिकीकरणाचे नाव दिले जाते.

कोलमन यांनी राजकीय आधुनिकीकरणाची व्याख्या करताना म्हटले आहे कि 'राजकीय आधुनिकीकरण' अशा संस्थात्मक व्यवस्थांचा विकास आहे की जो योग्य प्रमाणात लवचिक आणि एवढा शक्तिशाली असावा की त्यामध्ये निर्माण होणाऱ्या मागण्यांचा सामना करु शकेल.''

कोलमन यांच्या मतानुसार राजकीय आधुनिकीकरण संक्रमणकालिन समाजाच्या राजकीय व्यवस्थांमध्ये होणाऱ्या संरचनात्मक किंवा सांस्कृतिक बदलांचा समुह आहे. या बदलांचा संबंध राजकीय व्यवस्थेची संबंधित संस्था, संरचना, प्रक्रिया किंवा व्यवहाराशी संबंधित असतो.

## ५.२.३ राजकीय आधुनिकीकरणाची वैशिष्टचे

राजकीय आधुनिकीकरणाच्या वैशिष्ट्याबाबत आणि लक्षणाबाबत विचारवंतामध्ये एकमत नाही. मोठ्या प्रमाणात राजकीय आधुनिकीकरणाचे तीन प्रमुख लक्षणे मानली जातात.

(क) राज्यातील वाढते सत्तेचे केंद्रीकरण आणि परंपरागत सत्तेच्या स्त्रोताचे सत्ताहीन होणे.

(ख) राजकीय संस्थांचे विभिन्नीकरण आणि विशेषीकरण.

(ग) राजकारणामध्ये जनतेचा वाढता सहभाग आणि व्यक्तींना संपूर्ण राजकीय व्यवस्थेविषयी अधिकाधिक ज्ञान/माहिती.

अनेक लेखकांनी राजकीय आधुनिकीकरणाच्या वरील लक्षणांचा विस्ताराने पुढील प्रमाणे वर्णन केलेले आहे.

## (१) राज्यामध्ये सत्तेचे अधिकाधिक केंद्रीकरण –

राजकीय आधुनिकीकरणाचे एक महत्वाचे वैशिष्ट हे आहे की मानवी जीवनाच्या व्यवहाराशी संबंधित सर्व प्रकारच्या सत्तेचे राज्य किंवा राजकीय व्यवस्थांमध्ये केंद्रीकरण सुरु होते. राजकीय व्यवस्था अधिकाधिक सत्तेचे नियंत्रक बनते. राजकीय व्यवस्थेमध्ये सत्तेचे केंद्रीकरण राजनयिक सत्तेला महत्वपूर्ण आणि इतर सत्तेचा संचालक व नियंत्रक बनविते.

## (२) राज्याचा समाजात अधिकाधिक प्रवेश –

२०व्या शतकात लोक कल्याणकारी राज्याच्या विकासामुळे शासन किंवा प्रशासनाच्या कार्यामध्ये एवढी वाढ झाली आहे की त्याचा समाजामध्ये प्रवेश होऊ लागला आहे. आता मनुष्याच्या जन्मापासून तर मृत्यूपर्यंत संपूर्ण जीवन शासनाच्या कार्यक्षेत्रात आले आहे. संचार साधनांच्या विकासामुळे शासनाच्या कार्यक्षेत्रात वाढ होण्यास मदत झाली आहे.

## (३) केंद्राची अतीक्रियामध्ये वाढ –

आधुनिक राजकीय समाजात केंद्र आणि वातावरणाच्या अंतःक्रियामध्ये व्यापक प्रमाणात वाढ होते. याठिकाणी केंद्र म्हणजे राजकीय व्यवस्था आणि वातावरण म्हणजे समाज असा अर्थ अभिप्रेत आहे. राजकीय पक्ष, हितसंबंधी गट, दबाव गट आणि नोकरशाहीच्या माध्यमाद्वारे या अंतःक्रियेत वाढ होते.

## (४) परंपरागत क्षेत्रात सत्तेचे हनन –

परंपरागत राजकीय समाजात राजकीय सत्तेचे स्त्रोत टोळीप्रमुख, राजे–महाराजे, धर्मगुरु, कुंटुंबप्रमुख इत्यादी होते. राजकीय आधुनिकीकरणात सत्तेचे हे आधार नष्ट होतात. हटिंग्टन आणि कार्ल डॉयच यांनी राजकीय आधुनिकीकरणाच्या वैशिष्ट्याला विशेष महत्व दिले आहे. याच्या अभावामुळे इतर वैशिष्ट्ये प्रभावहीन बनतात.

## (५) राजकीय संस्थेचे विभिन्नीकरण किंवा विशेषीकरण –

आधुनिक राजकीय व्यवस्थेच्या अंतर्गत शासनाच्या कार्यात अधिक वाढ होते. यासाठी शासनाला आपल्या व्यापक कार्यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्यासाठी संस्थात्मक व्यवस्थांचे विभिन्निकरण करावे लागते. याशिवाय शासन योग्यप्रकारे कार्य करु शकत नाही. म्हणूनच विविध मंत्रालये निर्माण केली जातात.

## (६) राजकारणात जनतेच्या वाढता सहभाग –

राजकीय संस्था आणि प्रक्रियामध्ये जनतेचा व्यापक सहभाग राजकीय आधुनिकीकरणाचे एक महत्वपूर्ण लक्षण आहे. जनतेच्या सहभागाचा अभाव विशेषतः विकसनशील राजकीय व्यवस्थेमध्ये दिसून येतो. नागरिक राजकीय व्यवस्थेच्या प्रती एवढे उदासिन बनतात की ते निवडणुकांत मतदानसुद्धा करीत नाहीत. अशा परिस्थितीत

सहभाग असा असावा की ज्यामध्ये व्यक्ती आपल्या कर्तव्याला समजून भाग घेईल. राजकीय आधुनिकीकरणासाठी सहभाग हा जबाबदारीपूर्वक असावा. अन्यथा त्याला काही अर्थ नाही.

## (७) व्यक्तिंना संपूर्ण राजकीय व्यवस्थेविषयी अधिकाधिक ज्ञान –

राजकीय आधुनिकीकरण झालेल्या व्यवस्थेमध्ये व्यक्तिंच्या विचारात आणि दृष्टिकोनात असे परिवर्तन येते की, त्यांची संपूर्ण राजकीय व्यवस्थेच्या प्रती निष्ठा मजबूत होते. इतर राजकीय संस्थाच्या प्रती प्रेम आणि निष्ठेमुळे व्यक्तींचा विकास होतो. पर्यायाने राष्ट्राचाही विकास होतो.

## (८) नोकरशाहीचा व्यापक आधार –

राजकीय व्यवस्थांना केवळ आकाराने व संख्येने मोठ्या असलेल्या नोकरशाहीमुळे आधुनिक म्हणता येत नाही. तर आधुनिकीकरणासाठी तिच्या आकारापेक्षा तिचा व्यापक आधार आवश्यक आहे. अशी व्यवस्था असावी कि ज्यामध्ये प्रशासक समाजाच्या सर्व स्तरातून आलेले असले पाहिजे.

राजकीय आधुनिकीकरणाच्या वरील वैशिष्ट्यांना अधिकाधिक पाश्चात्य देशांनी पूर्ण केले आहे म्हणूनच त्यांना आधुनिक राजकीय व्यवस्था म्हटले जाते. विकसनशील राष्ट्रांमध्ये वरील वैशिष्ट्ये कमी प्रमाणात आढळतात. यामुळे त्यांना आधुनिक राजकीय व्यवस्थेच्या रुपात स्विकार केले जात नाही.

## ५.२.४ राजकीय आधुनिकीकरणाला प्रभावित करणारे घटक

राजकीय आधुनिकीकरणाला प्रभावित करणारे निश्चित घटक सांगता येत नाही. कारण हे घटक केवळ राजकीय व्यवस्थेपुरते मर्यादित नसतात. त्यांचा संबंध आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि ऐतिहासिक क्षेत्रांशी सुद्धा येतो. समान शासनपद्धती असलेल्या देशांतसुद्धा आधुनिकीकरणारे प्रभावित करणारे घटक वेगवेगळे असतात. सर्व साधारणपणे राजकीय आधुनिकीकरणाला पुढील घटक प्रभावित करतात.

## (क) पारंपारिक राजकीय संरचना आणि संस्कृती –

राजकीय आधुनिकीकरणाच्या व्याख्येत आपण असे बघितले आहे. की राजकीय आधुनिकीकरण म्हणजे सामान्य परंपरेपासून मुक्तता यामुळे पारंपारिक राजकीय सरंचना आणि संस्कृतीचा राजकीय आधुनिकीकरणावर प्रभाव पडतो. उदा. नेपाळमध्ये राजकीय संरचनांना पारंपारिक प्रथांशी जोडण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामुळे नेपाळमध्ये राजकीय आधुनिकीकरण भारताच्या तुलनेत हळूहळू होत आहे. भुतानच्या संदर्भात सुद्धा ही बाब लागू होते मध्यपूर्वच्या अनेक देशामध्ये राजकीय संरचनांचे पारंपारिक स्वरुप आधुनिकीकरणाला बाधक ठरते. उदा. अफगणिस्थान, इराक इ. मुस्लिम राष्ट्रे विकसनशिल राष्ट्रात पारंपारिक राजकीय संरचना आणि संस्कृती राजकीय आधुनिकीकरणाला अडथळे निर्माण करतात.

## (ख) ऐतिहासिक काल संदर्भ –

राजकीय आधुनिकीकरणाच्या प्रयत्नात ऐतिहासिक काळ, क्षण महत्वपूर्ण ठरतात. असे म्हटले जाते की वाईट परिस्थितीत चांगले कार्य करणे कठीण होते. राजकीय व्यवस्थेमध्ये आधुनिकीकरण करण्यासाठी विशिष्ट काळ, परिस्थिती महत्वाची ठरत असते. उदा. भारताच्या संविधानात ४२व्या संविधान दुरुस्तीद्वारे क्रांतीकारक आणि मूलभूत बदल करण्यात आले. जर १९७६ च्या ऐवजी १९५६ मध्ये असे बदल केले गेले असते तर कदाचित कोणत्याही भारतीय नागरिकाने ते स्विकारले नसते. म्हणून राजकीय व्यवस्थेला आधुनिक करण्याचा प्रयत्न कोणत्या परिस्थितीत केला जातो हे महत्वाचे आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रामध्ये सम्राज्यवाद कायम ठेवणे कठीण झाले होते कारण ते इतिहासाच्या सामान्य प्रवाहाच्या विरुद्ध होते.

## (ग) राजकीय नेतृत्वाचे व्यक्तिमत्व आणि विचार –

राजकीय नेतृत्वाचे व्यक्तिमत्व आणि विचार राजकीय आधुनिकीकरणाला प्रोत्साहित किंवा बाधक ठरु शकतात. देशातील नेते कशाप्रकारे विचार करतात. ही बाब आधुनिकीकरणासाठी महत्वपूर्ण ठरते. राजकीय नेत्यांचे विचार जर आधुनिक असेल तर ते राजकीय आधुनिकीकरणाला प्रोत्साहित करतात. आफ्रिका आणि आशिया देशातील अनेक नेत्यांनी असे केले आहे. भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी यांनी भारताला आधुनिक बनविण्याचा प्रयत्न केला. याविरुद्ध असे नेतेसुद्धा असू शकतात की जे आधुनिकीकरणाला विरोध करतात. आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि आशियातील काही देशात राजकीय नेतेच आधुनिकीकरणाला विरोध करतात. म्हणून हा घटक महत्वाचा ठरतो.

## (घ) राजकीय व्यवस्थेचे स्वरुप -

राजकीय आधुनिकीकरणामध्ये राजकीय व्यवस्थेचे स्वरुप महत्वपूर्ण आहे. लोकशाही राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय आधुनिकीकरण मोठ्या प्रमाणात आणि गतीने होते. याउलट हुकूमशाही व्यवस्थेत राजकीय आधुनिकीकरण फारसे होत नाही. म्हणून राजकीय आधुनिकीकरणाला राजकीय व्यवस्थेचे स्वरुप मोठ्या प्रमाणात प्रभावित करते. विकसनशिल राष्ट्रात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लोकशाही व्यवस्था स्थापन झाल्यानंतर आधुनिकीकरणाला गती मिळाली याउलट ज्या देशात हुकूमशाही स्थापन झाली तेथे आधुनिकीकरणाला गती मिळाली नाही.

राजकीय आधुनिकीकरणाला प्रभावित करणाऱ्या घटकांचा अभ्यास केल्यानंतर हे स्पष्ट होते की विकसनशील राष्ट्र एका बाजूने आधुनिक बनण्यासाठी उत्सुक आहेत तर दुसऱ्या बाजूने त्यांची पारंपारिक राजकीय संरचना, संस्कृती, निरंकुश नेतृत्व, आधुनिकीकरणाच्या युगात प्रवेश करण्यासाठी बाधक ठरत आहे. जोपर्यंत व्यापक प्रमाणात लष्करशाही आणि पारंपारिक हुकूमशाही व्यवस्था अस्तित्वात राहील तोपर्यंत खऱ्या अर्थाने ह्या देशात राजकीय आधुनिकीकरण होणे कठीण आहे.

## ५.२.५राजकीय आधुनिकीकरणाच्या यंत्रणा

राजकीय आधुनिकीकरण एक किचकट परिवर्तनीय प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमध्ये अनेक यंत्रणा आणि माध्यमांची भूमिका महत्वपूर्ण असते. राजकीय आधुनिकीकरणाच्या प्रमुख आणि महत्वपूर्ण यंत्रणा पुढीलप्रमाणे आहेत.

## (क) श्रेष्ठीजन आणि बुद्धिवंताची भूमिका -

कोणत्याही राजकीय व्यवस्थेमध्ये शासनाची सत्ता काही लोकांच्या हातामध्ये असते. असे लोक शासक असतात. लोकशाही आणि हुकूमशाही राजकीय व्यवस्थेचे सत्ताधारी हे अल्प लोक असतात. यानांच श्रेष्ठीजन आणि बुद्धिवंत म्हटले जाते. राजकीय आधुनिकीकरणा मध्ये यांची भूमिका महत्वपूर्ण असते. म्हणून त्यांचा समावेश राजकीय आधुनिकीकरणाच्या यंत्रणेमध्ये केला जातो. राजकीय श्रेष्ठीजनांची भूमिका संविधानाची अंमलबजावणी करणे, शासनाचे धोरणे ठरविणे, शासनकारभार करणे यामध्ये महत्वाची असते. याद्वारे ते राजकीय आधुनिकीकरण घडवून आणू शकतात. त्यांच्यामुळेच राजकीय आधुनिकीकरणाची प्रक्रिया सक्रिय किंवा असक्रिय राहू शकते.

## (ख) विचारधारा -

राजकीय समाजात परिवर्तनाच्या प्रक्रियेला दिशा देणे आणि महत्वपूर्ण बदल घडवून आणण्याच्या प्रक्रियेत विचारधारेची भूमिका महत्वाची ठरते. राजकीय पक्ष राजकीय आधुनिकीकरणाचे मुख्य साधन असतात. लोकशाही व्यवस्थेमध्ये यांची भूमिका महत्वाची असते. राजकीय पक्षांची संघटना म्हणजे समान विचारधारा असलेल्या लोकांचा समूह असतो. याप्रमाणे, राजकीय पक्षांच्या माध्यमांतून विचारधारा राजकीय आधुनिकीकरणाची मुख्य प्रेरक बनते. विचारधारेला राजकीय आधुनिकीकरणाचे शक्तिशाली साधन मानले जाते. विचारधारेच्या आधारावर राजकीय आधुनिकीकरणाच्या लक्षणात, ज्यांचा संबंध मनुष्याला व्यवहाराशी, स्वभावाशी असतो बदल घडवून आणणे सोपे जाते. उदा. विचारधारेच्या आधारावर पारपांरिक विचारांना, प्रथांना नष्ट केले जाते. भारतात धर्मनिरपेक्षता ही विचारधारा आधुनिकीकरणासाठी महत्वपूर्ण ठरली आहे.

## (ग) शासनाची भूमिका -

शासनाच्या नियंत्रणातच आधुनिकीकरणाच्या संपूर्ण प्रक्रियेचे संचालन केले जाते. शासनाची राजकीय आधुनिकीकरणाच्या यंत्रणामध्ये विशेष महत्व आहे. आधुनिक राजकीय व्यवस्थेत शासनाद्वारेच अनेक कार्यांची अंमलबजावणी केले जाते. आधुनिक युगाचा नागरिक राजकीय आधुनिकीकरण आणण्यात शासनाला अधिक सक्षम मानतो. कारण शासनाजवळ बंधनकारक सत्ता असते. शासन आपल्या निर्णयांची अंमल बजावणी करुन आधुनिकीकरणाला चालना देत असते. शासन आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये बहुमुखी विकासाची प्रेरक बनून राजकीय व्यवस्थेच्या आधुनिकीकरणाची प्रभावी आधारभूत माध्यम बनू शकते. राजकीय आधुनिकीकरणाच्या वरिष्ठ प्रमुख तीन यंत्रणाशिवाय राजकीय पक्ष, शैक्षणिक संस्था यांच्या भूमिकाचांही उल्लेख केला जाऊ शकतो.

## ५.२.६ राजकीय आधुनिकीकरणाचे नमुने

जगातील सर्व राष्ट्रांच्या शासन व्यवस्थेमध्ये राजकीय आधुनिकीकरणाचे एक समान नमुने दिसून येत नाही. विविध शासनप्रणाली मध्ये राजकीय आधुनिकीकरणाचे वेगवेगळे नमुने दिसून येतात. परंतु हे नमुने एक-दुसऱ्यांना प्रभावित करीत असतात. त्यांच्या मध्ये फरकही दिसून येतो आणि त्यामध्ये बदल सुद्धा होत राहतो.

एडवर्ड शिल्स यांनी राजकीय आधुनिकीकरणाच्या नमुन्यांचे पाच भागात वर्गीकरण केले आहे, ते पुढीलप्रमाणे

## (१) राजकीय लोकतंत्र/लोकशाही -

यास शिल्स प्रतिनिधीक संस्था आणि सार्वजनिक स्वातंत्र्याच्या माध्यमाद्वारे नागरिकांचे शासन मानतो. यामध्ये दहा वैशिष्ट्ये असतात. पहिले-सार्वजनिक प्रौढ मताधिकार, नियमित निवडणुका व निर्वाचित कायदेमंडळ जे सर्वोच्च असते आणि कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवते. दुसरे-राजकीय पक्षांचे अस्तित्व जे निवडणुकीत सहभागी होतात आणि सरकार बनवितात. तिसरे-राजकीय सत्ता एका निश्चित कालावधीसाठी प्राप्त केली जाते. चौथे- टिका करण्याचा अधिकार हा सुरक्षित असतो. पाचवे-न्यायपालिका स्वंतत्र असते. सहावे - सामान्य जनता लोकतंत्रीय आत्मसन्मानात राहते. सातवे - सरकारच्या प्रति लोकांची निष्ठा असते. नववे- लष्कर आणि पोलिस व्यवस्था समाधानकारक असते आणि दहावे - सामान्य जनता लोकशाही मूल्यांशी बांधील असते.

## (२) अभिजन लोकशाही -

अभिजन लोकशाही म्हणजे अशी राजकीय व्यवस्था की ज्यामध्ये लोकशाही संस्था कायम असतात. परंतु सत्तेचे कार्यकारी मंडळाच्या हाती केंद्रीकरण झालेले असते. परंतु शिल्सच्या मते शासक वर्गांची वृत्तीशेवटी राजकीय लोकशाहीकडे जाण्याची असते. याची पुढील वैशिष्ट्ये आहेत. एक या व्यवस्थेमध्ये सत्तेचे मुख्य केंद्र कार्यपालिका असते कार्यकारी मंडळाची निर्मिती समाजातील सर्वात प्रभावशाली व्यक्तिसमुहाद्वारे केली जाते. हा समुह सरकार आणि राजकीय पक्ष या दोघांवरही नियंत्रण ठेवतो. दोन - कायदेमंडळ कार्यकारी मंडळाच्या नियत्रंणाखाली काम करते. तीन - विरोध करण्याचा अधिकार असतो परंतु प्रसार माध्यमे नियंत्रित केली जातात. चार - एक सभागृह आणि कर्तव्यनिष्ठ नोकरशाही शासन चालविते. पाच - कायदयाचे राज्य आणि नागरिक स्वातंत्र्य सुरक्षित असते.

## (३) आधुनिकीकरणशील वर्गतंत्र -

शिल्सच्या मते ही अशी राजकीय व्यवस्था आहे की जी पारंपारिक वर्गतंत्र आणि राजकीय लोकशाही या दोहोमधील मिश्रण आहे. यामध्ये शासनाचे केंद्रीकरण मुठभर नागरिकांच्या विशिष्ट वर्ग किंवा सैनिकांच्या हाती असते. ही निरंकुशवादी व्यवस्था आहे.

याची पुढील वैशिष्ट्ये असतात. पहिले – संसद प्रशासनाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणारी संस्था बनते. तिच्या हाती महत्वपूर्ण अधिकार नसतात. दुसरे – विरोधकांना नष्ट केले जाते. तिसरे – राजकीय पक्ष समाप्त केले जातात. चौथे – निवणुका निष्पक्षपणे होत नाही. पाचवे – प्रसारमाध्यमांवर सेन्सरशिप लागू केली जाते आणि सहावे – नोकरशाही मजबूत असते.

## (४) सर्वाधिकारवादी वर्गतंत्र –

शिल्सच्या मते सर्वाधिकारवादी वर्गतंत्र एका राजकीय सिद्धांताद्वारे चालत असते. त्यांनी यामध्ये साम्यवादी आणि फासीवादी व्यवस्थांना सहभागी केले आहे. याचीही काही वैशिष्ट्ये आहेत. पहिले – संपूर्ण सत्तेचे केंद्रीकरण एका शासक समुहाच्या हाती असते. ज्याचा आधार वर्ग किंवा जाती असते. दुसरे – शासकांचा समुह असे समजतो की त्यालाच इतिहास चक्राचे ज्ञान आहे. तिसरे – यामध्ये कायदयाचे शासन नसते आणि न्यायपालिका स्वतंत्र नसते. चौथे – विशिष्ट वर्गांचे लोक शिस्तबद्ध समुहाच्या स्वरुपात काम करतात. पक्षीय शिस्त अधिक कठोर असते. पाचवे – प्रशासन आणि नोकरशाही दोघांचा आधार एकपक्षीय शासनव्यवस्था असते. सहावे – व्यवस्थेला समर्थन देण्यासाठी एक बांधिल बुद्धिवंताचा समुह उभा केला जातो.

## (५) परंपरावादी वर्गतंत्र –

शिल्सचा हा शेवटचा नमुना आधुनिकीकरण आणि विकासासाठी सक्षम मानला जात नाही. यामध्ये शासकांचा आधार रक्तसंबंध, कुंटुंब, नातेवाईक, राष्ट्र, जात इत्यादी असतो. याची खालील वैशिष्ट्ये आहेत. पहिले – यामध्ये कायदेमंडळास कोणतेही महत्वपूर्ण स्थान नसते. दुसरे – यामध्ये सक्षम नोकरशाही नसते. तिसरे – यामध्ये जमीनदारांचा / सरंजामदारांचा प्रभाव अधिक असतो. चौथे – विरोधी पक्षांचे अस्तित्व नसते आणि असले तरी ते प्रभावी नसतात. पाचवे – शासन कायम ठेवण्यासाठी एक लहान सैनिकशक्ती ठेवल्या जाते.

अर्थात शिल्सच्या या वर्गीकरणाला अनेक विद्वान स्विकार करीत नाहीत. कारण त्यांच्यामते हा सिद्धांत अनेक बाबींची अवहेलना करतो आणि समाधानकारक नाही. विशेषतः यामध्ये दिलेल्या नमुनाच्या संदर्भात तुलनात्मक राज्यशास्त्राच्या विद्वानामध्ये गंभीर मतभेद आहेत.

## ५.२.७सिद्धांताचे दोष

## या सिद्धांतामध्ये पुढील दोष आहेत :-

(१) राजकीय आधुनिकीकरणाच्या नमुन्याबाबत एकमत नाही. एक एका गोष्टींवर भर देतो तर दुसरा दुसऱ्या गोष्टीवर. कोणी सहभागाला महत्व देतात तर कोणी विभिन्निकरण आणि विशेषीकरणाला. यामुळे या सिद्धांताबाबत एकमत दिसून येत नाही.

(२) राजकीय आधुनिकीकरणाचे मोजमाप करण्यासाठी हा सिद्धांत विशिष्ट आधार सांगत नाही. विभिन्निकरण, विशेषीकरण, राष्ट्रीय ज्ञान, सहभाग अशा घटकांसाठी कोणते मापदंड बनविले जावे याबाबतचे खास आधार या सिद्धांतात दिसून येत नाही.

(३) या सिद्धांताचे समर्थक जगातील राजकीय व्यवस्थांना विशिष्ट वर्गाच्या विचारांच्या दृष्टिकोनातून पाहतात आणि याच आधारावर राजकीय व्यवस्थांचे वर्गीकरण करतात.

(४) शेवटी हा सिद्धांत सामाजिक शास्त्रातील सीमा रेखा समाप्त करतो.

अर्थात या सिद्धांतामध्ये वरील दोष असले तरी तुलनात्मक राजकीय विश्लेषणात हा सिद्धांत महत्वपूर्ण आहे. याचा विकास झाल्यामुळे आपले संशोधन कार्य मोठ्या प्रमाणात पुढे गेले असून तुलनात्मक राजकारणाचे क्षेत्र सुद्धा विस्तारले आहे.

## ५.२.८भारतीय राजकरण व आधुनिकीकरणाची समस्या

भारतासारखा विकसनशील देश राजकीय आधुनिकीकरणाच्या दिशेने हळू-हळू जात आहे. आधुनिकीकरणाच्या या मंद गतीची काही कारणे आणि समस्या आहेत त्या पुढील प्रमाणे :-

(१) राजकीय आणि सामाजिक व्यवस्थामध्ये संपर्क वाढण्यामुळे लोक कल्याणकारी कार्यात वाढ होण्याची शक्यता असते. परंतु भारतात अशी परिस्थिती नाही, कारण प्रशासन आपल्या अहंकारामुळे जनतेशी मिळून-मिसळून वागत नाही. प्रशासनाच्या या कमतरतेमुळे विकासाचे ध्येय गाठणे कठीण झाले आहे.

(२) राजकीय आधुनिकीकरणासाठी केंद्रामध्ये स्थिर व मजबूत सरकार असणे आवश्यक आहे. परंतु भारतात गेल्या सुमारे दोन दशकापासून प्रादेशिक राजकीय पक्षांचा वाढता

प्रभाव केंद्रामध्ये लाचार आणि कमकुवत सरकार बनवित आहे. स्पष्ट आहे की प्रादेशिक राजकीय पक्षांचा उदय आणि विकास भारतामध्ये राजकीय आधुनिकीकरणाला वाईट स्वरुपात प्रभावित करीत आहे.

(३) भारतातील राजकीय आधुनिकीकरणाच्या गतीला येथील पारंपारिक तत्व प्रभावीत करीत आहे. भारतीय समाजाची धार्मिक पारंपारिक कौटुंबिक आणि जातिय सत्तेचे स्थान एक ऐहिक आणि राष्ट्रीय राजकीय सत्ता आजपर्यंत घेऊ शकली नाही.

(४) राजकीय आधुनिकीकरणासाठी राजकीय संस्थाचे विभिन्नीकरण आणि विशेषीकरण आवश्यक असते. भारतामध्ये आजपर्यंत असे विभिन्नीकरण आणि विशेषीकरण चांगल्या प्रकार झाले नाही. आपल्या देशात विशेषज्ञांची आजही कमी आहे. यामुळे सामान्य ज्ञान असलेले लोक सुद्धा विशिष्ट सेवांचे संचालन करीत आहे.

(५) भारतामध्ये राजकीय आधुनिकीकरणाला येथील निरक्षरता गरीबी, राजकारणाप्रती उदासिनता इ.ने प्रभावित केले आहे. हे सर्व घटक राजकीय आधुनिकीकरणाच्या मार्गातील अडथळे आहेत.

वरील समस्यामुळे हे स्पष्ट होते की भारतीय राजकारणाच्या आधुनिकीकरणातील मार्गामध्ये अनेक अडथळे आज ही आहेत. परंतु असे नाही की अडथळ्यांना दूर केले जाऊ शकत नाही. जर आजही प्रबळ राजकीय इच्छाशक्ती असेल, तर ह्या अडथळ्यांना दूर करुन भारतामधील राजकीय आधुनिकीकरणाची गती वाढविल्या जाऊ शकते.

## ५.२.९ सिद्धांताचे मूल्यमापन

राजकीय व्यवस्थांचे तुलनात्मक आकलन होण्यासाठी आणि त्यांच्यातील सरचनांचे सामान्यीकरण करण्यासाठी अनेक विचारवंतांनी ज्यामध्ये एडवर्ड शिल्स, डेव्हिड ॲप्टर आणि बेलच हे प्रमुख आहेत. यांनी राजकीय प्रक्रियांना आधुनिकीकरणाच्या सामान्य दृष्टिकोनातून बघण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्यामते तुलनात्मक राजकीय अभ्यासासाठी इतर सिद्धांताच्या तुलनेत राजकीय आधुनिकीकरणाचा सिद्धांत अधिक वास्तववादी सिद्धांत आहे.

या सिद्धांतामध्ये राजकीय व्यवस्थांच्या क्षमतांना मोजण्यासाठी आधुनिकीकरणाच्या घटकांचा प्रयोग केला जातो. आधुनिकीकरणाचे विभिन्न घटक - शहरीकरण, औद्योगिकरण, ऐहिकीकरण, लोकशाहीकरण, साक्षरता आणि सहभाग यामध्ये येणाऱ्या बदलांचा प्रभाव राजकीय व्यवस्थांवर प्रत्यक्षपणे पडतो. शेवटी राजकीय विकास ही

स्वतंत्र प्रक्रिया नाही. म्हणून तिला समजण्यासाठी व्यापक दृष्टिकोनाची आवश्यकता असते. आधुनिकीकरणाचा सिद्धांतामध्ये अशा प्रकारची व्यापकता आहे. तुलनात्मक विश्लेषणात याचा उपयोग अधिक सविस्तरपणे अभ्यास करण्यासाठी होतो.

राजकीय आधुनिकीकरणाच्या सिद्धांतामध्ये हे लक्षात ठेवले जाते की राजकीय संस्था आणि राजकीय मूल्य परिवर्तनशील आहे. काही समाजामध्ये यामध्ये शिघ्र गतीने परिवर्तन होते तर काही समाजात कासव गतीने होते. अनेक व्यवस्थांमध्ये स्थिरता आणि अस्थिरता असते. ह्या स्थिरता आणि अस्थिरतेला समजण्यासाठी हा दृष्टिकोन उपयोगी पडतो. शेवटी, हा सिद्धांत आधुनिकीकरण जे परिवर्तनाचे दुसरे नाव आहे, त्याचा आधार स्तंभ आहे. तुलनात्मक विश्लेषणामध्ये ब्लैक, आयन्स्टैड आणि हटिग्टंन इत्यादी विचारवंतानी या सिद्धांताचा वापर अधिक उपयोगी मानला आहे. सारांश, तुलनात्मक राजकीय विश्लेषणामध्ये राजकीय आधुनिकीकरणाचा सिद्धांत अधिक महत्वपूर्ण आहे.

## ५.२.१० राजकीय विकास सिद्धांत

तुलनात्मक राजकीय विश्लेषणाचा राजकीय विकास सिद्धांत अशा प्रयत्नांचा परिणाम आहे की ज्यामध्ये आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेमध्ये स्वतंत्र झालेल्या राज्यांच्या राजकीय संरचनांचा अभ्यास करण्यासाठी अधिक वास्तववादी, दृष्टीकोनाचा शोध घेण्यात येत होता. राजकीय व्यवस्था दृष्टिकोन आणि संरचनात्मक प्रक्रिया दृष्टीकोन विकसनशील राज्यांच्या राजकीय व्यवस्थामध्ये होणाऱ्या बदलांचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त ठरत नव्हते. म्हणून काही विचारवंत यामध्ये ल्यूशियन पाय, आलमंड, कोलमैन, रिग्स आणि मायरन विनर यांनी राजकीय विकासाचा अभ्यास करण्यासाठी हा दृष्टिकोन मांडला. तुलनात्मक राजकारणामध्ये राजकीय विकास सिद्धांत केवळ आवश्यकता नाही तर हा सिद्धांत अधिक वैज्ञानिक, शास्त्रशुद्ध पद्धतीवर आधारित असल्यामुळे विश्वसनीय निष्कर्ष आणि सामान्यीकरणापर्यंत जाणारा ठरला आहे. म्हणून तुलनात्मक राजकीय विश्लेषणामध्ये या सिद्धांताची आवश्यकता आहे.

## ५.२.११ राजकीय विकासाचा अर्थ आणि व्याख्या

राष्ट्रीय पुर्ननिर्माण एक व्यापक आणि बहुमार्गी संकल्पना असून राजकीय विकासाचा त्याच्याशी घनिष्ठ संबंध आहे. समाजापुढील आधुनिकीकरणाच्या समस्या राजकीय व्यवस्था कशा सोडवितात याचा अभ्यास करण्यासाठी वापरली जाणारी ही संकल्पना आहे. राजकीय विकासाच्या प्रक्रियेत राज्य उभारणी, राष्ट्र उभारणी, राजकीय सहभागाचा

विस्तार आणि सेवा -सुविधांचे वितरण ह्याच्यांशी सलग्ण समस्या सोडविण्याच्या आव्हानांचा अंतर्भाव होतो.

राजकीय आधुनिकीकरणातून उद्‌भवणारे प्रश्न सोडविण्याची क्षमता म्हणजे राजकीय विकास असे आमंडने म्हटले आहे. ह्या प्रक्रियेत त्याने रचनांचे विभिन्नीकरण आणि राजकीय संस्कृतीचे ऐहिकीकरण ह्यांचा समावेश केला आहे.

हंटिंग्टनने राजकीय सहभागाचा विस्तार आणि संस्थीभवन हे राजकीय विकासाचे घटक मानले असून संस्थीभवन झाल्याशिवाय राजकीय स्थिरता येणार नाही असे सूचविले आहे. डब्ल्यू. जे. एस. मेकेंजी यांच्या मते,''समाजाच्या उच्चतम विकासप्रती अनुकूल होण्याची क्षमता म्हणजे राजकीय विकास होय. ज्यामध्ये कनिष्ठ समाज वरिष्ठ समाजाच्या समकक्ष होण्याचा प्रयत्न करतो.''

या व्याख्यांच्या आधारावर राजकीय विकासाच्या प्रक्रियेसंबंधी सी.एच.डॉक यांनी विकासाचे दोन अर्थ स्पष्ट केले आहेत.

(१) केवळ परिवर्तनाच्या स्वरुपात राजकीय विकास.

(२) काही विशिष्ट ध्येयाच्या प्रती चालणाऱ्या प्रक्रियेच्या रुपात राजकीय विकास .

वरील व्याख्यांच्या आधारावर राजकीय विकासाच्या संदर्भात दोन दृष्टिकोन विकसित झाले.

**१) एकमार्गी दृष्टिकोन २) बहुमार्गी दृष्टिकोन**

(१) एकमार्गी दृष्टिकोन - या दृष्टिकोनानुसार राज्याच्या विकासाचा केवळ एकच मार्ग आहे. सर्व राष्ट्र विकासाच्या या मार्गावर विकासाच्या वेग-वेगळ्या अवस्थांमध्ये आहे. दुसऱ्या शब्दात एक मार्गी दृष्टिकोनाच्या आधारावर जगातील सर्व राष्ट्र विकासात पुढे जाऊ इच्छितात.

(२) बहुमार्गी दृष्टिकोन - या दृष्टिकोनानुसार राजकीय विकास बहु-दिशाई आणि बहु-आयामी आहे. कारण विकासाच्या अनेक दिशा असतात. जर समाजाचा विकास या बहु-दिशेने होणारा असेल तर त्यांचा राजकीय विकास सुद्धा बहु-दिशाई होतो. विकास सुद्धा बहु-मार्गाने होतो. कारण ऐतिहासिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि

राजकीय परिस्थितीमुळे विकासाचे उद्देश आणि ध्येय निर्धारित होतात. यामुळे विकासाची दिशा निश्चित होते.

राजकीय विकासाच्या अर्थाच्या संबंधात आजही विचारवंतामध्ये मतभेद आहेत. याचे मुख्य कारण याची व्याख्या करणाऱ्या विचारवंताचा विशेष दृष्टिकोन आहे. उदा. स्पर्ट, एमर्सन, लिपसेट, कोलमन यांनी राजकीय विकास म्हणजे आर्थिक विकासाची पूर्व अट आहे असे मानले आहे.

थोडक्यात, राजकीय विकास म्हणजे, राजकीय सरंचनांचे विभिन्नीकरण आणि विशेषीकरण किंवा राजकीय संस्कृतीचे असे ऐहिकीकरण आहे की ज्यामुळे जनतेमध्ये समानता आणि राजकीय व्यवस्थांमध्ये कार्यक्षमता वाढेल.

## ५.२.१२ राजकीय विकासाची वैशिष्ट्ये

राजकीय विकासाच्या वैशिष्ट्यबाबत एकमत नाही. ल्युशियन पाय, आमंड आणि पॉवेल आणि हेलियो जाग्वाराइब ह्या विचारवंतानी राजकीय विकासाची वेगवेगळी वैशिष्ट्ये सांगितली आहेत. ल्युसियन पाय यांच्यामते राजकीय विकासाची पुढील तीन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

### (१) समानता

पाय यांच्या मते राजकीय विकासाची प्रमुख विशेषता म्हणजे राजकीय व्यवस्थेच्या व्यक्तींमध्ये समानतेच्या प्रति सामान्य भावना निर्माण होणे ही आहे. कोणत्याही राष्ट्रामध्ये व्यक्ती-व्यक्तीमध्ये समानता, सरकार आणि नागरिकांमध्ये समानता आणि प्रशासन व राजकीय व्यवस्थेमध्ये समानता असणे आवश्यक आहे. पाय यांच्यामते समानता तेव्हांच स्थापित झाली आहे असे मानता येईल जेव्हा राजकीय प्रक्रियांमध्ये भाग घेण्यासाठी सर्व लोकांना समान संधी प्राप्त होईल आणि राजकीय प्रक्रियेमध्ये जनतेच्या सहभागासाठी कोणताही भेदभाव राहणार नाही. राजकीय विकासाच्या लक्षणाबाबत पाय यांना पुढील वैशिष्ट्ये अभिप्रेत आहे.

१) राजकीय सक्रियतेच्या सर्व स्तरावर नागरिकांना समान संधी .

२) भेदभाव रहित जनतेचा सहभाग.

३) राजकीय निर्यणप्रक्रियेत जनतेचा सहभाग.

४) सर्व नागरिकांसाठी एकच कायदा म्हणजे कायद्यापुढे समानता.

५) धर्मनिरपेक्षतेमध्ये कोणत्याही धर्माचे आचरण व प्रचार करण्याची समानता इत्यादी.

अशा प्रकारची लक्षणे असलेला राजकीय समाज समानता असलेला असेल जो पाय यांच्यामते राजकीय विकासाचे मुख्य लक्षण आहे.

## (२) क्षमता –

समतेच्या लक्षणाचा संबंध संपूर्ण लोकसमुहाशी आहे तर क्षमतेचा संबंध राजकीय सत्तेच्या संरचनात्मक व्यवस्थेच्या प्रभावाशी संबंधित आहे. पाय यांच्यामते या वैशिष्ट्यांचा संबंध राजकीय व्यवस्थेचा प्रदान कार्याशी अधिक आहे. राजकीय व्यवस्थेच्या क्षमतेशिवाय राजकीय विकास शक्य नाही. राजकीय विकासामध्ये राजकीय व्यवस्थेच्या क्षमतेमध्ये वाढ होण्याची खालील लक्षणे आहेत.

१) मागण्याचे योग्य समाधान करणे.
२) वाद तार्किक आधारावर सोडविणे.
३) शासनाचा प्रभाव आणि समर्थन
४) प्रशासकीय कौशल्य
५) प्रशासकीय बुद्धिमता

या लक्षणांचा सरळ संबंध राजकीय व्यवस्थेच्या क्षमतेशी असतो. राजकीय विकास अशा राजकीय व्यवस्थेमध्ये होतो जिची क्षमता वरील घटकांमध्ये वाढत जाते.

## (३) विभिन्नीकरण –

राजकीय सरंचनाच्या स्वरुपाचा राजकीय विकासाशी घनिष्ठ संबंध आहे. यामध्ये पुढील लक्षणांचा समावेश होतो.

१) राजकीय संरचनांचे वेगवेगळ्या कार्यासाठी विभाजन

२) कार्यात्मक दृष्टिकोनातून कार्यांचे विभाजन

३) प्रक्रियेची सुनिश्चितता

४) सरंचना आणि प्रक्रियांमध्ये समन्वय

अशा प्रकारचे सरंचनात्मक विभिन्नीकरण व विशेषीकरण राजकीय विकासाचे लक्षण असते.

## आमंड आणि पॉवेल यांच्यानुसार राजकीय विकासाची वैशिष्ट्ये -

आमंड आणि पॉवेल यांनी राजकीय विकासाच्या वैशिष्ट्यांना वेगळ्या शब्दात मांडले आहे. अर्थात पाय आणि आमंड व पॉवेल यांच्या वैशिष्ट्यात फारसा मुलभूत फरक नाही. त्यांनी राजकीय विकासाची पुढील तीन वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

### १) भूमिका विभिन्नीकरण -

हे वैशिष्ट्य पाय यांनी सांगितलेल्या विभिन्नीकरण याचा पर्याय आहे. पाय राजकीय संरचनांच्या विभिन्नीकरणाबाबत मत मांडतो तर आमंड व पॉवेल भूमिकेच्या विभिन्नीकरणाबाबत मत मांडतात. आमंड व पॉवेल यांच्यामते राजकीय विकासात राजकीय सरंचनाच्या विभिन्नीकरणापेक्षा भूमिकेचे विभिन्नीरकण महत्वाचे आहे. अनेक देश, विशेषतः साम्यवादी व विकसनशील देश असे आहेत जेथे सरंचनाचे व्यापक विभिन्नीकरण केले जाते. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात या देशात एकाच संरचनेद्वारे इतर संस्थाच्या कार्याचेही नियंत्रण केले जाते. चीनमध्ये सरंचनात्मक विभिन्नीकरण आहे, परंतु भूमिकांचे विभिन्नीकरण नाही. या कारणामुळे आमंड आणि पॉवेल राजकीय विकासासाठी भूमिकांचे विभिन्नीकरण महत्वाचे मानतात. अर्थात राजकीय सरंचनांचे विभिन्नीकरण आणि भूमिकांचे विभिन्नीकरण यांचा परस्परांशी संबंध आहे.

### २) उप-व्यवस्थांची स्वायत्तता -

उप-व्यवस्थांच्या स्वायत्ततेचा संबंध राजकीय व्यवस्थेच्या क्षमतेची आहे. पाय ज्याला राजकीय व्यवस्थेची क्षमता म्हणतात. आमंड आणि पॉवेल त्याला उप-व्यवस्थांची स्वायत्तता असे म्हणतात. त्यांचे असे मत आहे की भूमिकांचे विभिन्नीकरण तोपर्यंत शक्य नाही जोपर्यंत राजकीय व्यवस्थांच्या उप-व्यवस्थांची स्वायत्तत्ता प्राप्त होत नाही. राजकीय व्यवस्थेमधील उप-व्यवस्थांची स्वायतत्ता असल्यास सत्तेचे विकेंद्रीकरण होते आणि संबंधित उप-व्यवस्था आपआपल्या स्तरावर निर्णय घेऊ शकतात. यामुळे राजकीय व्यवस्थेच्या क्षमतेत वाढ होते.

## ३) लौकिकीकरण / ऐहिकीकरण –

प्रत्यक्षात याचा संबंध संस्कृतीशी आहे. पारंपारिक मूल्यापासून दूर जाणे आणि धर्मनिरपेक्षतेकडे समाज तेव्हाच मार्गक्रमण करु शकतो जेव्हा व्यक्तिमध्ये समानता प्रस्थापित होईल. पाय यांनी समानतेच्या संबंध व्यवस्थेच्या प्रति निष्ठा वाढवणाऱ्या राजकीय संस्कृती व भावनांशी लावला आहे. हाच अर्थ लौकिकीकरणाचा लावता येऊ शकतो. फरक एवढाच की समानतेचा संबंध विविध मुद्यांशी येतो तर लौकिकीकरणाचा संबंध मर्यादित आहे. कोणत्याही राजकीय समाजात लौकिकीकरण किंवा ऐहिकीकरणाचा संबंध लोकांच्या विचारांमध्ये किंवा ऐहिकीकरणाचा  संबंध लोकांच्या विचारांमध्ये बदल घडवून आणणे आहे.

आमंड आणि पॉवेल यांचे असे मत आहे की राजकीय विकासाची ही तीन लक्षणे अशा प्रकारे परस्परांशी संबंधित आहेत की एका लक्षणातील बदल दुसऱ्या आणि तिसऱ्या लक्षणांमध्ये सुद्धा बदल घडवून आणतो.

## ५.२.१३ राजकीय विकासाचे स्तर किंवा अवस्था

राजकीय विकासाच्या स्तराची कल्पना अर्थशास्त्रातून घेतलेली दिसते. रोस्टोव यांनी आपल्या स्टेजेस ऑफ इकोनोमिक ग्रोथ या ग्रंथात आर्थिक विकासाच्या विविध अवस्थांचा विचार केलेला आहे. यामुळे राजकीय विकासाच्या विविध अवस्थांचा विचार करण्यासाठी प्रेरणा मिळाली. राजकीय विकासांच्या विविध अवस्थाविषयी हटिंग्टन, आयन्स्टैड, आमंड इत्यादी विचारवंतांनी विचार मांडलेले आहेत.

(१) हटिंग्टनचे विचार – हटिंग्टन यांनी आपल्या 'पोलिटिकल डेव्हलमेंट आणि पोलिटिकल डिके' या निबंधात राजकीय ऱ्हासाचा विचार करताना राजकीय विकासाच्या अवस्थांचा विचार केला आहे. त्यांनी राजकीय विकासाचे तीन प्रमुख स्तर मानले आहेत.

## १) सत्तेच्या बुद्धिसंगतेचा स्तर –

यामध्ये अनेक स्थानिक सत्तेच्या ठिकाणी एका केंद्रीय सत्तेची निर्मीती केली जाते. याला तो सत्तेच्या केंद्रीकरणाची अवस्था म्हणतो. याचा अर्थ असा कि विविध सत्तास्थानाऐवजी एकच सत्ता स्थान निर्माण केले जाते.

## २) नवीन राजकीय कार्यांचे विभिन्नीकरण –

नवीन राजकीय कार्यांचे विभिन्नीकरण आणि त्यासाठी विशिष्ट सरचनांचा विकास, राजकीय विकासाच्या प्रक्रियेचा दुसरा स्तर आहे. यामध्ये राजकीय प्रक्रियेत नवीन राजकीय कार्यांचा समावेश होतो आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य संरचनात्मक व्यवस्थांचा विकास केला जातो.

## ३) सहभागिता –

यामध्ये परिसरातील सामाजिक समूह आणि समाजाच्या घटकांना हळू-हळू केंद्रीय सत्तेमध्ये सहभागी करुन घेतले जाते.

हटिंग्टंनचे असे मत आहे की विकासाची ही प्रक्रिया तेव्हाच शक्य होते जेव्हा ते तीनही स्तर योग्य प्रकारे कार्य करतील. यामध्ये प्रत्येक स्तराच्या विकासाशी संबंध आहे.

(२) आमंडचे विचार – आमंड यांनी राजकीय व्यवस्थेची संबंधित अधिक विश्लेषणात्मक दृष्टिकोनाचा स्वीकार करुन राजकीय विकासाच्या स्तराचे वर्णन केले आहे. त्याने चार स्तर सांगितले आहेत ते पुढीलप्रमाणे :-

## (क) राज्य निर्माण –

यामध्ये केंद्रीय सत्तेचे निर्माण. या सत्तेचे राजकारणामध्ये प्रवेश आणि विविध गटांचा केंद्रीय सत्तेच्या अधिकार क्षेत्रात एकीकरण होणे अपेक्षित आहे.

## (ख) राष्ट्र निर्माण –

यामध्ये निष्ठा आणि जबाबदारी निर्माण करणे ज्यामुळे विदेशी राष्ट्रांच्या समर्थनात वाढ होणे अपेक्षित आहे.

## (ग) सहभागिता –

यामध्ये राजकीय प्रक्रियेध्ये सक्रिय स्वरुपात सहभागी झालेले गट आणि समाजातील विविध घटकांना व्यापक बनविणे अपेक्षित आहे.

## (घ) वितरण –

यामध्ये सामाजिक जिवनासाठी आवश्यक असलेल्या वस्तूचे समाजातील सर्व लोकांमध्ये वितरण होणे अपेक्षित आहे.

आमंड यांचे असे मत आहे की ज्या समाजात राजकीय विकास झालेला आहे आणि ज्या समाजात राजकीय विकासाचा शेवटचा स्तर आलेला आहे ते सर्व याच अनुक्रमाने एका स्तरावरुन दुसऱ्या स्तरावर पोहोचले आहे आणि विकसनशील राज्यामध्ये सुद्धा हाच क्रम असणे आवश्यक आहे.

## ५.२.१४ राजकीय विकास प्रक्रिया निर्धारित करणारे घटक

राजकीय विकास प्रक्रिया निर्धारित करणारे घटक पुढीलप्रमाणे आहेत :-

## १) राजकीय नेतृत्व –

कोणत्याही राजकीय व्यवस्थेमध्ये जोपर्यंत एक कुशल राजकीय नेतृत्व प्राप्त होणार नाही तोपर्यंत राजकीय विकास सुरु होऊ शकत नाही. कारण जसे नेते असतील तसे आदर्श निर्माण होतील. राजकीय नेत्याचे व्यक्तिमत्व, ज्ञान, भाषा-कौशल्य, साहस, निर्णय क्षमता इत्यादी उत्कृष्ट असेल तर ते राजकीय व्यवस्थेमध्ये प्रभाव पाडून राजकीय विकास प्रक्रियेला पुढे नेऊ शकतात. राजकीय नेते भ्रष्टाचारी, चारित्र्यहीन, संधीसाधू असेल तर त्या देशाचा राजकीय विकास फारसा होऊ शकत नाही. पाश्चात्य देशातील राजकीय नेते आणि आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका या देशांच्या राजकीय नेत्यामध्ये असमानता दिसून येते.

## २) परंपरागत राजा / सम्राट –

राजकीय विकास आधुनिक युगाचे प्रतिक आहे. परंतु जेव्हा जगातील राष्ट्रावर साम्राज्यवादी शक्तीचे वर्चस्व होते तेव्हा सम्राटाजवळ शासन सत्ता होती. तो शासनाचा सर्वेसर्वा होता. परंतु हळू-हळू काही देश साम्राज्यवादाच्या जोखडातून बाहेर पडून स्वतंत्र झाले. परंतु तेथील शासनपद्धतीत परंपरागत राजाचे/सम्राटाचे पद कायम राहिल्यामुळे राजकीय विकासात सम्राटाचे पद आज ही महत्वपूर्ण आहे. अरब देशात उदा. सौदी अरेबिया, कुवैत इ. देशामध्ये सम्राटाचे पद आजही अस्तित्वात असून ते परंपरांना आजही महत्व देतात. ते आधुनिक विचारांवर नियंत्रण लावतात. यामुळे परंपरागत सम्राटांनी राजकीय विकास करण्यासाठी मदत केली पाहिजे.

### ३) राजकीय पक्ष -

शासन कारभात जनतेला संचालित करण्यासाठी राजकीय पक्षांची भूमिका महत्वपूर्ण असते. राजकीय विकास राजकीय पक्षाशिवाय शक्य नाही तसेच राजकीय पक्षा अभावी राजकीय विकास प्रक्रियेला पुढे नेता येत नाही. वेगवेगळ्या देशात वेगवेगळी राजकीय पक्ष पद्धती असते. कुठे एक पक्ष पद्धती, कुठे द्विपक्षी पद्धती तर कुठे बहुपक्षीय पद्धती असते. साम्यवादी देशात एकपक्ष पद्धती असल्यामुळे तेथे राजकीय विकास चांगल्या प्रमाणात होताना दिसतो. उदा. चिन ज्या देशांमध्ये द्विपक्षपद्धती असते तेथे सुद्धा सरकार स्थिर असते आणि राजकीय विकासाला प्रभावित करते. ज्या देशात बहुपक्षीय पद्धती असते तेथील शासन अस्थिर असते त्यामुळे राजकीय विचारावर परिणाम होतो. उदा. भारत सत्ताधारी पक्षाला विरोध करण्यासाठी अनेक राजकीय पक्ष असतात. त्यामुळे नेहमी विरोधाचे वातावरण असते. तरीसुद्धा राजकीयपक्ष अनुशासित, राजकारणाचे केंद्र मानले जाते. पक्षशिस्त आणि आर्थिक धोरणांचा व्यापक प्रभाव राजकीय विकासावर पडतो.

### ४) लष्कर -

जेव्हा कोणत्याही देशात राजकीय पक्ष संकट निर्माण करतात तेव्हा जनतेचा शासनावरुन विश्वास उडून जातो त्याचबरोबर शासनात असलेले राजकीय नेते आणि राजकीय पक्षावरुनही विश्वास नष्ट होतो. अशा परिस्थितीत देशात अराजकता निर्माण होते. अशा परिस्थितीत शासनाची सत्ता लष्कराच्या हातात दिली जाते. कारण लष्कर शिस्तबद्ध धोरणामुळे अराजकता निर्माण करणाऱ्यांना नेस्तनाबूत करते आणि देशात पून्हा लोकशाही शासन प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करते. अरब देश तसेच पाकिस्तानात लष्करी शासनाची पुनरावृत्ती होताना दिसते. जेव्हा लष्कराला असा विश्वास वाटतो की सामान्य परिस्थिती निर्माण झाली आहे आणि कोणत्याही संकटाची भिती नाही तेव्हा लष्कर लोकशाहीची स्थापना करुन शासनाकडे सत्ता हस्तांतरित करते.

अशाप्रकारे वरील चार घटक राजकीय विकास प्रक्रियेला निर्धारित करतात. म्हणून राजकीय विकास प्रक्रियेत त्यांना महत्वाचे स्थान आहे.

## ५.२.१५ राजकीय विकासाच्या समस्या

राजकीय विकासाच्या समस्या केवळ राजकीय व्यवस्थेशी संबंधीत नाही. प्रत्यक्षात या समस्यांचा संबंध अशा पर्यावरणाशी अधिक आहे ज्यामध्ये राजकीय व्यवस्था कार्य

करते आणि राजकीय विकासाचा कार्यक्रम चालतो. राजकीय विकासाच्या प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

(क) राष्ट्र बांधणीची समस्या

(ख) राजकीय व्यवस्थेच्या क्षमतेमध्ये वाढ करण्याची समस्या

(ग) समानता प्रस्थापित करण्याची समस्या

(घ) सहभाग वाढविण्याची समस्या

(च) वैधता प्राप्त करण्याची समस्या

(छ) आधुनिकीकरणाची समस्या

वरील समस्यांचे समाधान राजकीय विकासाशी संबंधित आहे. ज्या ज्या प्रमाणात राजकीय विकासाचा स्तर वाढत जातो त्या त्या प्रमाणात या समस्या सोडविण्यासाठी मदत मिळते. परंतु, विकसनशील राष्ट्रात राजकीय विकासाची समस्या यापेक्षा वेगळ्या असतात. यामध्ये (क) राजकीय विकास नमुना निवडीची समस्या

(ख) राजकीय स्थिरतेची समस्या (ग) संरचनात्मक व्यवस्थाना स्थिर ठेवण्याची समस्या (घ) राजकीय पक्ष हित संबंधी आणि दबाव गटांचे संघटन आणि विकसीत होण्याची समस्या (च) हिंसात्मक राजकारणाची समस्या

विकसनशिल देशांच्या ह्या समस्यांमुळे राजकीय विकासच प्रभावित होत नाही तर राजकीय पतनांकडे जाण्याची स्थिती निर्माण होते. यामुळे या देशांत सुरुवातीला राजकीय विकासाला प्राधान्य देण्यात आले होते परंतु वर्तमानकाळात आर्थिक विकासावर भर देण्यात येत आहे. परंतु या देशांमध्ये आज ही आर्थिक विकासाचे मार्ग सुद्धा अनिश्चित आहेत. या कारणामुळे विकसनशील देशामध्ये राजकीय विकासाची समस्या एवढी गंभीर आहे की कोणताही समाधानकारक उपाय शोधणे कठीण आहे.

## ५.२.१६ भारतातील राजकीय विकास

पाश्चात्य देशांच्या राजकीय विकासाच्या तुलनेत भारताच्या राजकीय विकासामध्ये खूप फरक दिसून येतो. भारत पाश्चात्य राष्ट्रांच्या तुलनेत सामाजिक, पारंपारिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय श्रद्धांच्या प्रती आस्था ठेवतो कारण भारत परंपरावादी देश मानला जातो. विविधतेमध्ये एकता ही भारताची ओळख आहे. भारतामध्ये राजकीय

व्यवस्थेचा स्विकार करण्यात आला आहे. ज्यामध्ये लोकशाही आदर्श, मूल्ये, लोकभावना, भारतातील तत्वज्ञान, भारतीय परंपरा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतामध्ये राजकीय विकास व्यवस्थितपणे करण्यासाठी एक दिर्घकालीन प्रक्रियेचा अवलंब केला आहे. यासाठी पारंपारिक संस्कृती कायम ठेवून आधुनिक संस्कृतीचे आदर्श निर्माण केले जात आहे. भारत हे एक असे राष्ट्र आहे. जे आपली प्राचीन संस्कृती कायम ठेवण्यात यशस्वी ठरले आहे. राजकीय विकासात जनतेचा सहभाग आहे. स्वातंत्र्यापासून तर आजपर्यंत राजकीय विकास प्रक्रियेचा अवलंब केला आहे. या प्रक्रियेत समाजातील प्रत्येक व्यक्ती, वर्ग आणि समूह आपली योग्य भूमिका पार पाडीत आहे. याच कारणामुळे भारतामध्ये एकता, अखंडता आणि सार्वभौमत्व कायम आहे.

भारतामध्ये विविध प्रकारची समानता, मग ती राजकीय असो, प्रशासकीय असो किंवा सामाजिक असो प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करुन राजकीय विकास साधला जात आहे. भारतामध्ये राजकीय पक्षांची भूमिकासुद्धा राजकीय विकासासाठी महत्वपूर्ण ठरलेली आहे. प्रौढ मताधिकार, निष्पक्ष व नियमित निवडणुका यामुळे राजकीय विकासाला चालना मिळाली आहे.

भारतामध्ये पंचायती राज व्यवस्था स्थापन करुन सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. तसेच महिलांना आरक्षण देऊन राजकीय सहभाग वाढविला आहे. यामुळे राजकीय विकास मजबूत झाला आहे. अर्थात असे असले तरी भ्रष्ट राजकीय नेते संधीसाधू नेते, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, राजकीय अस्थिरता यामुळे भारताच्या विकासात काही बाधा निर्माण होतात या समस्यांना दूर करून भारत विकसीत राष्ट्रांकडे मार्गक्रमण करु शकतो.

## ५.२.१७ सिद्धांताचे मूल्यमापन

राजकीय विकासाशी संबंधित अभ्यासांचा समारोप करतांना एस.पी. वर्मा यांनी राजकीय विकासाच्या सिद्धांताच्या संदर्भात अत्यंत निराशाजनक निष्कर्ष काढले आहेत. त्यांनी असे म्हटले आहे की राजकीय विकासाचे एवढे नमुने असूनही (पाश्चात्य आणि साम्यवादी) राजकीय विकास सिद्धांताचा शोध निरर्थक दिसून येतो. ला पालोम्बारा यांनीसुद्धा असेच विचार व्यक्त केले आहेत. त्यांनी म्हटले आहे कि, राजकीय विकासाचा सिद्धांत किंवा संकल्पना एवढी अस्पष्ट आहे की ते एक प्रकारचे नवीन विचार बनतात किंवा गतिशील होण्याऐवजी जैसे थे होतात. यामुळे ते अधिक खर्चिक बनतात.'' यामुळे ला पालोम्बरा राजकीय विश्लेषणामध्ये या सिद्धांताच्या उपयुक्तेबद्दल शंका निर्माण

करतात. परंतु एस.पी. वर्मा यांनी राजकीय विकास सिद्धांतासंबंधी आपल्या निराशांचे इतर कारणाने समर्थन केले आहे. त्यांचे असे मत आहे की असा कोणताही परिपूर्ण आदर्श समाज नाही की ज्यांचे इतर समाजाने अनुकरण करावे. सामाजिक विज्ञानामध्ये आणि विशेषतः तुलनात्मक राजकीय अभ्यासामध्ये सिद्धांताचा शोध लावणे अत्यंत कठीण आणि गुंतागुंतीचे होते. राजकीय विकासाचा अर्थ, व्यवस्था आणि वैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यानंतर यामध्ये किती मतभेद आहेत हे आपण बघितले आहे.

काही विचारवंताचे असे मत आहे की राजकीय विकासाची संकल्पना ही पाश्चात्य संकल्पना आहे. त्यांचे असे मानणे आहे की पाश्चात्य देश सुखी सम्पन्न आणि साधनांनी भरपूर आहेत. यामुळे विकासासंबंधी कोणत्याही संकल्पनेला विकसित करुन विकास करतात. याच्या विरुद्ध विकसनशील राष्ट्रांत साधनांचा अभाव दिसून येतो तसेच आर्थिक साधनांचीही कमतरता दिसून येते. यामुळे राजकीय विकास पाश्चात्य देशांच्या तुलनेत कमी होतो. यामुळेच विकसनशील राष्ट्रांमध्ये अपूर्ण राजकीय विकास दिसून येतो.

शेवटी, या सिद्धांतात काही दोष असले तरी तुलनात्मक राजकीय विश्लेषणात राजकीय व्यवस्थांच्या विकासाच्या अभ्यासासाठी हा सिद्धांत उपयुक्त आहे. या सिद्धांतामुळे आपण राजकीय व्यवस्थांच्या विकासाचा तुलनात्मक अभ्यास करु शकतो.

## ५.२.१८ राजकीय ऱ्हास

राजकीय ऱ्हास हा राजकीय सिद्धांत असून मुलतः तो सॅम्युअल हटिंग्टन यांनी वर्णन केला आहे. राजकीय आणि संस्थात्मक आधुनिकीकरणाऐवजी राजकीय व्यवस्थेमध्ये कशाप्रकारे गोंधळ आणि वाईट व्यवस्था निर्माण होते यासंदर्भात या सिद्धांतात त्यांनी वर्णन केले आहे. राजकीय अस्थैर्य, भ्रष्टाचार, निरकुंशवाद, अंतर्गत हिंसा, संस्थांचा ऱ्हास आणि राजकीय विभक्तीकरण हे राजकीय ऱ्हासाचे निदर्शक आहेत.

जर सामाजिकरण, संस्कृती, भरती आणि सहभागाचे प्रमाण एखाद्या राजकीय व्यवस्थेत अधिक असेल तर तेथे राजकीय विकास आणि सामाजिक बदल घडून येतो अन्यथा, या विरुद्ध परिस्थिती असेल तर राजकीय ऱ्हास होतो थोडक्यात, राजकीय ऱ्हास हा सिद्धांत राजकीय विकास सिद्धाताचा नकारार्थी आहे. राजकीय व्यवस्थेच्या राजकीय प्रक्रियेत जनतेचा वाढता राजकीय सहभाग, कायदयाचे अधिराज्य, स्वतंत्र न्यायपालिका, प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य, स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुका, राजकीय स्थिरता, शांततापूर्वक

बदल हे राजकीय विकासाला अभिप्रेत आहे. परंतु याविरुद्ध राजकीय व्यवस्थेमध्ये घडत असेल तर तो राजकीय ऱ्हास मानला जातो.

राजकीय ऱ्हास सिद्धांताचे प्रख्यात विद्वान सॅम्युअल हटिंग्टन यांनी असे म्हटले आहे की, कोणत्याही राजकीय व्यवस्थेच्या संस्थांचा स्तर त्या व्यवस्थेतील संघटना कशाप्रकारे नवीन परिस्थितीशी जुळवून घेतात. त्यांना कशाप्रकारे स्वायतत्ता असते, त्यांच्यामधील स्पष्टपणा यावरुन निर्धारित केला जातो. प्रत्येक राजकीय व्यवस्थेमध्ये संघर्ष होत असतात. हे संघर्ष जर समाधान कारक सोडविले जात असतील तर तेथे विकास होऊ शकतो. परंतु ह्या संघर्षामुळे त्या राजकीय व्यवस्थेतील राजकीय आणि संविधानात्मक संस्था नष्ट होत असतील किंवा त्यांचे पतन होत असेल तर याला राजकीय ऱ्हास म्हणता येईल. म्हणून राजकीय ऱ्हास हा राजकीय विकास या संकल्पनेच्या नकारात्मक स्वरुपात विचारात घेतला जातो.

## ५.२.१९ राजकीय ऱ्हासाची लक्षणे

राजकीय ऱ्हासाची पुढील लक्षणे आहेत. ज्या राजकीय व्यवस्थेमध्ये ही लक्षणे दिसून येत असतील तेथे राजकीय ऱ्हास आहे असे मानल्या जाते.

१) राजकीय अस्थिरता

२) भ्रष्टाचार आणि कुप्रशासन

३) अंतर्गत हिंसाचार

४) संस्थांचे पतन

५) कायदयाचे अधिराज्य नसणे

६) राजकीय हत्या

७) राजकीय पक्षांतर

८) राजकीय नेत्यांचे दैवतीकरण

९) बांधिल नोकरशाही

१०) अंतर्गत कारभारात परदेशी सत्तांचा हस्तक्षेप

११) कार्यालयीन विचारधारेचे उदात्तीकरण

१२) सैनिक दलांचे राजकीयीकरण

१३) राजकीय पक्षांचे आणि समुहांचे विविध भागात विभाजन

१४) सत्तेचे केंद्रीकरण

१५) विरोधकांची दडपशाही

अशाप्रकारे वरील लक्षणे राजकीय ऱ्हासाची आहेत. ज्या राजकीय व्यवस्थेमध्ये वरील लक्षणापैकी अधिक लक्षणे अस्तित्वात असतील तेथे राजकीय ऱ्हास आहे असे मानल्या जाते. राजकीय ऱ्हास हा राजकीय विकास आणि राजकीय आधुनिकीकरणाला बाधक आहे. जगातील काही देशामध्ये विशेषतः आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील देशामध्ये राजकीय ऱ्हास दिसून येतो. म्हणून त्या देशांचा राजकीय विकास होताना दिसत नाही.

## ५.३ सारांश

राजकीय आधुनिकीकरण ही विकसनशील समाजामध्ये घडून येणारी राजकीय दृष्ट्या प्रगत बनण्याची प्रक्रिया आहे. साधारणतः पुनरुज्जीवनाच्या काळापासून युरोपमध्ये जे राजकीय स्थित्यंतर घडून आले आणि राजकीय संस्था, मूल्ये स्वीकारली गेली त्याला राजकीय आधुनिकता मानण्याची प्रवृत्ती आढळते. राजकीय सहभागाची समान संधी, धोरणे आखून ती अंमलात आणण्याची राजकीय व्यवस्थेची क्षमता, रचनांचे विभिन्नीकरण आणि राजकीय प्रक्रिया ऐहिक/धर्मनिरपेक्ष स्वरुपाची बनविणे इत्यादी घटकांचा राजकीय आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत समावेश होतो.

समाजपुढील आधुनिकीकरणाच्या समस्या राजकीय व्यवस्था कशा सोडवितात याचा अभ्यास करण्यासाठी राजकीय विकास ह्या संकल्पनेचा वापर केला जातो. राजकीय विकासाच्या प्रक्रियेत राज्य उभारणी, राष्ट्र उभारणी, राजकीय सहभागाचा विस्तार आणि सेवा. सुविधांचे वितरण ह्यांच्याशी संलग्ण समस्या सोडविण्याच्या आव्हानांचा अंतर्भाव होतो. राजकीय आधुनिकीकरणातून उद्भवणारे प्रश्न सोडविण्याची क्षमता म्हणजे राजकीय विकासास असे आमंडने म्हटले आहे. राजकीय विकासाचा निश्चित अर्थ, टप्पे, राजकीय विकासाला साह्यभूत ठरणारे घटक, यांच्याबाबत एकमत नाही. मात्र राजकीय विकासाच्या बहुतेक सर्व सिद्धांतामध्ये प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे लोकशाही हा घटक महत्वाचा मानलेला दिसतो.

राजकीय ऱ्हास ही संकल्पना राजकीय विकासाच्या संकल्पनेच्या विरुद्ध आहे.

सॅम्युअल हटिंग्टन यांनी या संकल्पनेचे प्रामुख्याने वर्णन केले आहे. राजकीय अस्थिरता, राजकीय हिंसाचार, राजकीय भ्रष्टाचार, कायदयाच्या अधिराज्याचा अभाव, राजकीय हत्या, राजकीय नेत्यांचे दैवतीकरण, सैनिकी दलांचे राजकीयीकरण इत्यादी राजकीय ऱ्हासाची कारणे आहेत. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका या खंडातील अनेक देशात राजकीय ऱ्हास झालेला दिसून येतो. राजकीय ऱ्हास लोकशाहीसाठी घातक आहे.

थोडक्यात दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील नवोदित स्वतंत्र राष्ट्रांमध्ये राजकीय आधुनिकीकरण आणि राजकीय विकास या संकल्पनांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी राजकीय आधुनिकीकरण आणि राजकीय विकास हया सिद्धांताचा वापर केला जाऊ लागला. यामुळे विकसनशील, राष्ट्रांमध्ये कशाप्रकारे राजकीय आधुनिकीकरण आणि विकास साध्य केला जाऊ शकतो या संदर्भात काही विचार मांडण्यात आले. हया विकसनशील राष्ट्रांमध्ये राजकीय विकासाऐवजी राजकीय ऱ्हास कशाप्रकारे होतो याचीही कारणे शोधण्यात अभ्यासकांना प्राप्त झाले.

## ५.४ सरावासाठी प्रश्न

१) राजकीय आधुनिकीकरणाच्या सिद्धांताचे वर्णन करा.

२) राजकीय आधुनिकीकरणाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

३) राजकीय आधुनिकीकरणाला प्रभावित करणारे घटक लिहा.

४) राजकीय आधुनिकीकरणाच्या यंत्रणा स्पष्ट करा.

५) भारतातील राजकारण व आधुनिकीकरणाची समस्या वर्णन करा.

६) राजकीय विकास सिद्धांत थोडक्यात वर्णन करा.

७) राजकीय विकासाचा अर्थ स्पष्ट करुन वैशिष्ट्ये सांगा.

८) राजकीय विकास प्रक्रिया निर्धारित करणारे घटक लिहा.

९) भारतातील राजकीय विकास सांगा.

१०) राजकीय ऱ्हास म्हणजे काय? ऱ्हासाची लक्षणे लिहा.

## ५.५ अधिक वाचनासाठी पुस्तके


1) Almond, G.A. (1966) Comparative Politics : A Developmental Approach, Boston : Little Brown Co.

2) Apter, D.E. (1965) The Politics of Modernization, Chicago : Unverisity of Chicago Press.

3) Huntington, S.P. (1965) Political Development and Decay, World Politics, Vol.XVIII.

4) Huntington, S.P. (1968) Political order in changing Societies, Londan : Yale University Press

5) Johari, J.C. (1989) Principles of Modern Political Science, New Delhi : Stering Pub.

6) Pye Lucian (1966) Aspects of Political Development, Bostan - Little Broun & co.

7) Shils, Edward (1962) Political Development in the New State, Heaque : Mouton & Co.

8) Varma, S.P. (1975) Modern Political Theory, Delhi : Vikas Pub.

९) गेना, सी.बी.(१९७८) तुलनात्मक राजनीति एवं राजनीतिक संस्थाए, नई दिल्लीः विकास पब्लिशिंग


---------------

६

# घटक ६ – अभिजन, वर्ग आणि जनता

**घटक संरचनाः**

६.० उद्दिष्टे
६.१ प्रास्ताविक
६.२ विषय विवेचन
 ६.२.१ अभिजन वर्गाचा अर्थ व स्वरूप
 ६.२.२ अभिजन वर्गाची वाढ व विकास
 ६.२.३ विविध दृष्टीकोण
 ६.२.४ अभिजन वर्गाचे सैध्दांतिक
 ६.२.५ टिकात्मक परिक्षण
६.३ पारिभाषीक शब्द, शब्दार्थ
६.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे
६.५ सरावासाठी स्वाध्याय
६.६ क्षेत्रीय कार्य
६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ६.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यांनतर आपणास

(१) अभिजन वर्गाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट होईल.
(२) अभिजन वर्ग आणि अल्पतंत्र व कुलीनतंत्र यातील फरक लक्षात येईल.
(३) अभिजन वर्गाच्या क्रोयसेच्या सिध्दांताचे आकलन होईल.
(४) अभिजन वर्गाशी संबंधीत विविध दृष्टिकोनाशी ओळख होईल.
(५) अभिजन वर्गाच्या सिध्दांताचे टीकात्मक परिक्षण समजून घेता येईल.

## ६.१ प्रास्ताविक

आज जगातील बंहुतांश देशांमध्ये लोकशाही व्यवस्था प्रचलित असल्याचे आढळते. अशा व्यवस्थेमध्ये लोकांचा जास्तीत जास्त सहभाग अपेक्षीत असतो. परंतु प्रत्यक्षात लोकांचा असा सहभाग फारचा मर्यादित स्वरूपाचा असल्याचे चित्र पाहावयास मिळते. याच आधारावर काही समाज व राज्यशास्त्रज्ञांनी लोकशाही पध्दती संबंधीच्या सैध्दांतीक व्याख्येचे खंडण केले आहे. त्यांनी उदारवादी लोकशाही पध्दतीच्या कार्यात्मक

पैलूंवर सरळ आघात केला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, कोणी आपल्या राजकीय व्यवस्थेमध्ये कितीही लोकतंत्रात्मक बनण्याचा प्रयत्न केला तरी प्रत्येक संघटनेमध्ये अल्पतंत्राचे एक प्रबळ तत्व असते. असा तर्क दिला जातो की, संघटन जेवढे मोठे असेल तेवढीच अल्पतंत्राप्रती तीव्र ओढ असेल. बाल यांनी यासंबंधी अधिक चांगल्या प्रकारे विवेचन केले आहे. ''प्रत्यक्षात राजकीय अभिजन कोण आहे आणि त्याची व्याख्या संकुचीत वा व्यापक-प्रकारे केली आहे. यासंबंधी समस्यां आहे, सोबतच त्याच्या भरतीच्या साधनांबाबतही मतभेद आहे, परंतु अल्पमताच्या शासनाच्या अपरिहार्यतेसंबंधी सर्वांचे एकमत आहे.''

## ६.२ विषय विवेचन

### ६.२.१अभिजन वर्गाचा अर्थ व स्वरूप -

अभिजन वर्गाचा व्यक्तीचा असा वर्ग जो इतरांच्या वर समाजाच्या शिखरावर स्थित असतो. सर्व समाज अभिजन वर्गाद्वारे शासित होतो. अभिजन म्हणजे समाजाचे लहान अंग आहे. प्राचीन परंपरा, शारिरिक शक्ती, आर्थिक स्थिती इत्यादी कारणांमुळे अभिजन वर्गाला चांगले स्थान प्राप्त होते; अर्थात अभिजन याचा शब्दश: अर्थ 'निवडलेले तत्व' असा आहे. अभिजन म्हणजे व्यक्तीचा असा वर्ग जो इतरांपेक्षा वेगळा असतो. कारण अभिजन वर्ग जन्मापासून कुलीन व समृध्द असतो. मोठे कुटुंब, संघ, श्रम संघटना, नोकरशाही, सशस्त्र सेनेमध्ये त्याचे अस्तीत्व असू शकते. अभिजन वर्ग अशा समुहाचे प्रदर्शन करतो जो प्रत्येक सामाजिक पातळीवर नेतृत्व व प्रभावाच्या आधारे पुढे आलेला असतो. अभिजन वर्गाच्या शासनासंबंधीच्या अशाप्रकारच्या दृष्टीकोनामुळे त्याचे अल्पतंत्र (oligarchy) व कुलीन तंत्रापासुन (Aristoctacy) फरक करणे कठीण होते. निहीत स्वार्थाचे रक्षण व संवर्धन अभिजन वर्गाच्या शासनाची जशी आवश्यक अट आहे तशीच ती अल्पतंत्र व कुलीन-तंत्राची अनिवार्य अट आहे. याअर्थाने दोहोंतील फरक स्पष्ट होत नाही. दोहोंमध्ये असलेले अंतर वास्तवीक या तथ्यामध्ये दडले आहे की, अभिजन वर्गाच्या शासनामध्ये परंपरागत वैभव, शान-शौक आणि स्वत:ला नेहमी तयार ठेवण्याची प्रवृत्ती नसते तर अल्पतंत्र व कुलीनतंत्राच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या काही व्यक्तीच्या शासनाची ती विशेषता असते. यासंबंधी बर्नी यांनी केलेले विधानही महत्त्वपूर्ण आहे. ''असे वाटते की अभिजन वर्गाच्या शासनामध्ये कुलीन तंत्र आणि अल्पतंत्राचे लक्षण निहित आहे. परंतु यामध्ये कुठल्याही प्रकारचा घोळ नसला पाहिजे. अल्पतंत्राप्रमाणे हे अल्पमताचे शासन आहे आणि यामध्ये कुलीनतंत्राच्या प्रमाणे श्रेष्ठ व्यक्ती असतात, परंतु यामध्ये स्वत:ला कायम ठेवण्याचा आणि आत्म स्वार्थाची भावना नसते जी अल्पतंत्रामध्ये

असते. तसेच यामध्ये शान-शौक नसतो जो साधारणपणे कुलीन तंत्राच्या बरोबर जोडला जातो.''

वरील सीमारेषेमुळे ही गोष्ट लक्ष देण्यायोग्य आहे की, अभिजन वर्गाचे स्वरूप देश व कालाबरोबर बदलत राहते. सामाजिक विकासाच्या अवस्थांचा अभिजन वर्गाच्या स्वरूपावर निर्णायक प्रभाव पडतो. दास समाजामध्ये जसा स्वतंत्र व्यक्तींचा अभिजन वर्ग होता तसा सामंत व्यवस्थेमध्ये कुलीन वर्ग होता. जसे दक्षिण आफ्रिकेमध्ये गोऱ्यांचा अभिजन वर्ग आहे तसे आफ्रिकेच्या इतर स्वतंत्र देशांमध्ये निग्रो लोकांनाशुध्दा असेच विशेष अधिकार मिळाले आहे. याच तथ्यामुळे अभिजन वर्ग आपल्या विशेषाधिकार पूर्ण विशिष्ट स्थितीसाठी सामान्य लोकांनी प्रदान केलेली मान्यता व सन्मानाचा ऋणी आहे. असे कुलीन तंत्र व अल्प तंत्र अशा दोहोंमध्ये ही आढळत नाही. जर एखादा समाज आपल्या मुल्यांचे मानक बदलत असेल म्हणजे उदाहरण दयायचे झाल्यास सम्राज्यवादी युगाच्या जागी औदयोगिक युग आले तर वेगळ्याप्रकारच्या लोकांना सन्मान व आदर प्रदान केला जाईल आणि ते लोकच राष्ट्राचे अभिजन वर्ग होतील.

यावरून हा निष्कर्ष निघतो की अभिजन वर्गाच्या अस्तित्वाचा आधार सामाजिक शालीनतेवर अवलंबून आहे.

## ६.२.२ विविध दृष्टीकोन -

## क्रोयसेचा सिध्दांत-

निर्णय - निर्माण प्रक्रिये मध्ये अभिजन वर्गाला आपल्या प्रभावांमुळे अधिक महत्वपूर्ण स्थान आहे. शिवाय अभिजन वर्ग हे राजकीय समुदयामध्ये एक प्रकारे असलेली वास्तविक नियंत्रण शक्ती आहे. याविषयाच्या व्यवहारीक अध्ययनासाठी आपण काही समाज शास्त्रज्ञांनी स्विकारलेल्या महत्त्वपूर्ण दृष्टीकोनाचे अध्ययन करू शकतो.

## (१) स्थितीगत दृष्टीकोण-

याचा अर्थ असा आहे की, अधिकार पूर्ण स्थितीवर व्यक्तीच वास्तवामध्ये महत्त्वपूर्ण निर्णय घेत असते. लिण्डस व मिल्सचा विचार आहे की, प्रभावपूर्ण स्थिती आर्थिक सत्तेमुळे प्राप्त केली जाते. स्टुफर याचा स्त्रोत व्यक्तीची गैर-सैनिक आणि राजकीय स्थिती शोधतात. शुल्ज आणि लमबर्ग आपले विचार क्षेत्र व्यापक करून यामध्ये सर्वच आर्थिक आणि गैर-आर्थिक कारणांचा समावेश करतात. याविचाराचे

समर्थन करून जैनिंग्स अधिकारी, नागरिक स्टाफ आणि आर्थिक प्रभावाला महत्त्व प्रदान करतो. अशाप्रकारे एखादया व्यक्तीच्या निर्णय-निर्माण प्रक्रियेमधील उच्च स्थानाचा स्त्रोत आर्थिक सामाजिक आणि राजकीय अशा विविध कारकांमध्ये शोधाल.

## (२) प्रतिनिधीत्मक दृष्टीकोण -

वेबर आणि लॉस्वेलच्या निष्कर्षावर आधारीत वार्नर, होलिंगशेड, हंटर व एंजल सारखे लेखक समुदयाच्या सर्वाधिक प्रभावी व्यक्तींच्या भुमिकेचे निर्धारन करतात. ज्यांना त्यांची सत्ता संरचना व त्यातील त्यांच्या भुमिकेमुळे समाजाचे प्रतिनिधी समजले जाऊ शकते. एक प्रकारे हा स्थितीगत दृष्टीकोणाचा आणखी एक प्रकार असल्याचे वाटते. असे असले तरी दोहोंमध्ये फरक आहे. स्थितीगत दृष्टीकोण विषयनिहाय कारकांवर तर प्रतिनिधीत्मक दृष्टीकोण आत्मीक कारकांवर जोर देतो. अशाप्रकारे पहिल्या दृष्टीकोनाची निश्चिततेमुळे प्रशंसा केली जाऊ शकते तर दुसऱ्याची अनिश्चिततेमुळे टीका केली जाते.

## (३) विषय सहभागी दृष्टीकोण-

यालाच निर्णय - निर्माण आणि घटना विश्लेषण दृष्टीकोणाच्या नावाने सुध्दा ओळखले जाते. यामध्ये वास्तविक जीवन स्थितींमध्ये प्राप्त प्रभावांमुळे वास्तविक निर्णय -निर्मात्यांच्या भुमिकेवर जोर दिला गेला आहे.

क्रोयसे यांनी आपल्याच पध्द्तीने अभिजन तंत्राला उचित ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी अभिजन वर्गाची परिभाषा पुढील प्रमाणे केली आहे. ''असा वेगळा समुह ज्याला समाजामध्ये एक विशेष ध्येय पुर्ण करायचे असते.

## ६.२.३ अभिजन वर्गाचा विकास

अभिजन वर्गाची वाढ व विकास सर्व समाजामध्ये होतो. ते सत्तेसाठी स्पर्धा करतात ज्यायोगे राजकीय संस्कृतीच्या अध्ययनासाठी आकडयांची निर्मिती होते. लॉस्वेल यांच्या मते, सर्वाधिक प्रभावपूर्ण व्यक्ती अभिजन, इतर लोक मध्यमवर्गीय अभिजन आणि सामान्य म्हणून ओळखले जातात. फाइनर यांनी एका फोडीयुक्त संत्राच्या उपमेपासून या स्थितीचे उदाहरण दिले आहे. त्याचे चित्र खाली दिले आहे.

फाइनर त्याची अशाप्रकारे व्याख्या करतात की, ''एक संत्रा, ज्याची साल समाजाच्या अभिजन वर्गाची दयोतक आहे, पाण्यामध्ये तंरगलेला त्याच्या सालीच्या पाण्याच्या रेषेच्या वरचा अंश शासक अभिजन वर्गाचे प्रतिक आहे आणि पाण्यामध्ये बुडालेला भाग समाजाच्या अशा संघांचा प्रतिनिधी आहे जो स्पर्धेमध्ये विजयी होऊन त्याचे नेते सरकारमध्ये स्थित आहे व सरकारमध्ये भाग घेऊन राहीले आहे. पाण्याच्या रेषेच्या खालील सर्व भाग संघांचा परिचायक आहे जो या प्रतिस्पर्धेमध्ये पराजीत राहिला आहे आणि ज्याचे धोरण अस्थायी प्रकारे विजयी अंगाच्या धोरणाच्या अधिन झाले आहे, आणि आणि संत्र्याच्या सालीच्या ज्या अंगापासून त्याला साकले आहे पूर्ण समाजासाठी त्या प्रती-अभिजन वर्गाचे प्रतिनिधीत्व करतो जो कोणत्याहीवेळी शासक अभिजन वर्गाचे स्थान ग्रहण करू इच्छितो''

## ६.२.४ अभिजन वर्गासंबंधीचे सैध्दांतीक -

राज्यशास्त्राच्या अंगाच्या रूपात अभिजन वर्गाच्या अध्ययनाची सुरूवात १९ व्या शतकाच्या शेवटी आणि २०च्या शतकाच्या प्रारंभी इटलीच्या विलफ्रेडो परेटो व गैटानो मोस्का या दोन समाजशास्त्रज्ञांच्या योगदानामुळे झाली. माइकेल्स, बर्नहम आणि राइट मिल्स सारख्या इतर समाजशास्त्रज्ञांनी सुध्दा आपले योगदान दिले आहे. त्यांच्यात जरी मतभेद असले तरी सर्वांच्या योगदानामध्ये एका अल्पसंख्यांक वर्गाचेच शासन असते, ज्याच्याजवळ अशी आवश्यक पात्रता असते की ते पुर्ण सामाजीक व राजकीय सत्तेचे उत्तराधिकारी बनतील. जे लोक शिखरावर पोहोचतात त्यांनाच नेहमी उत्तम समजले जाते. त्यांनाच अभिजन वर्ग म्हणून ओळखले जाते. उदाहरणार्थ वकीलांचा एक अभिजन वर्ग, मिस्त्रींचा अभिजन वर्ग.

## ६.२.५ टीकात्मक परिक्षण-

अभिजन वर्गाच्या-संबंधीचे सैधांतीक अभिजन वर्गाचा राजकारणावर अधिक जोर देतात परंतु ते वर्ग संघर्षाच्या मार्क्सवादी सिध्दांताचे काही व्यवहारीक पर्याय प्रस्तुत करू शकले नाही. अभिजनवादी सत्तेच्या संबंधी चुकीची धारणा बनवितात. यासंबंधी ते सत्ता किंवा शक्ती, प्राधिकार आणि प्रभाव यासारख्या शब्दांमध्ये असलेला फरक विसरतात. अभिजन वर्गाशी संबंधीत सिध्दांत गोपनीयता व तडजोडीच्या राजकारणाचे अस्तित्व व परिचालन न्यायोचित ठरवितात. परंतु असे ठरविणे चुकीचे आहे. कारण सर्वस्थितीत राजकारणाच्या क्षेत्रामध्ये मानवी जीवनाच्या नैतिक आणि अध्यात्मिक बाजूला तिलांजली दिली जाऊ शकत नाही. अभिजन वर्गाच्या सिध्दांतासंबंधी असे काही दोष असले आणि त्यावर टिका केली जात असली तरी त्यामुळे अभिजन वर्गाच्या सिध्दांताचे महत्व व

उपयोगिता कमी होत नाही. यासिध्दांताच्या सहाय्याने जगातील कितीही घटनांची व्याख्या केली जाऊ शकते. अभिजन वर्गीय सिध्दांत परिक्षण योग्य सामाजीक घटनांकडे निर्देश करतो आणि यशस्वीपणे सामाजीक व राजकीय परिवर्तनांची व्याख्या करण्याचा प्रयत्न करतो. नविन सिध्दांताच्या निर्मितीसाठी अभिजन वर्गीय सिध्दांत मदत व सहाय्यकारी आहे. शिवाय विकसनशील देशांच्या राजकारणाला समजण्यासाठी विशेष प्रकारे उपयोगी व महत्वपुर्ण आहे.

## ६.३ पारिभाषिक शब्बद, शब्दर्थ

Elites - अभिजन

Oligarchy - अल्पतंत्र

Aristocracy - कुलीन तंत्र

## ६.४ स्वयं-अध्यनासाठी प्रश्न

१) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अ) अभिजनासंबंधी क्रोयसेच्या सिध्दांताचे नाव सांगा.

(ब) अभिजन वर्गासंबंधीचे तीन दृष्टीकोण कोणते?

(क) अभिजन वर्गाच्या अध्ययनासाठी महत्वाचे योगदान देणारे इटलीचे दोन समाजशास्त्रज्ञ कोणते?

## ६.५ सरावासाठी स्वाध्याय

पुढील प्रश्नांची दहा ते पंधरा ओळीत उत्तरे लिहा.

(१) अभिजन वर्गाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

(२) अभिजन वर्गाच्या क्रोयसेच्या सिध्दांताचे विवेचन करा.

(३) अभिजन वर्गाच्या सिध्दांताचे टीकात्मक परिक्षण करा.

## ६.६ क्षेत्रीय कार्य

तुम्ही राहत असलेल्या परिसरातील अभिजन वर्गाचा शोध घेऊन त्यांच्या स्थिती संबंधीचा अहवाल तयार करा.

## ६.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) जौहरी, जे. सी., तुलनात्मक राजनीति.

२) गाबा, ओम् प्रकाश, तुलनात्मक राजनीतिकी रुपरेखा.

३) Ball, A. R., Modern Politics and Government.

४) Party, Geraint, Political Elites

५) Finer, S. E., Comparitive Government.


-----------------

# बहुलवाद (Pluralism)

**अनुक्रमणिका -**


६.० उदिद्ष्टे

६.१ प्रास्ताविक

६.२ विषय विवेचन

६.२.१ सहवर्तन बहुलवादाचा आशय

६.२.२ बहुलवादाचे सिद्धांत

६.२.३ बहुलवादाचे टीकात्मक परीक्षण

६.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

६.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

६.५ सारांश

६.६ सरावासाठी स्वाध्याय

६.७ क्षेत्रीय कार्य


## ६.० उदिद्ष्टे -

या घटकाच्या अभ्यास केल्यानंतर आपणास

(१) बहुलवादाचा आशय स्पष्ट होईल.

(२) बहुलवादाच्या सिध्दांताचे आकलन होईल.

(३) बहुलवादाच्या मर्यादा वा उणिवांचे ज्ञान होईल.

## ६.१ प्रास्ताविक

बोदीन, हॉब्ज, हेगल, ऑस्टीन, इत्यादी. विचारवंतांनी सार्वभौम सत्तेच्या अव्दैत-वादाचे प्रतिपादन केले आहे. ज्याचे तात्पर्य हे आहे की प्रत्येक राज्यामध्ये एकच सार्वभौम सत्ता असते, सर्व व्यक्ती व समुदाय त्याच्या अधिन असतात आणि ही सर्वोच्य सत्ता राज्याची सत्ता असते. या संकल्पनेनुसार राज्याची ही सत्ता स्थायी, सर्वव्यापक मौलीक व अविभाज्य असते आणि मानवी जीवनांच्या सर्व बाबींचे नियमन आणि नियंत्रण राज्यादवारेच केले जाऊ शकते. अशाप्रकारे बहुलवाद सार्वभौम सत्तेच्या अव्दैत-वादाच्या संकल्पनेविरूध्द् निर्माण झालेली विचार सरणी आहे. यालाच राजकीय बहुलंवाद किंवा बहुसमुदाय वाद या नावाने ही ओळखले जाते. बहुलवाद अशी प्रतिक्रिया म्हटली जाऊ शकते जी राज्याच्या अस्तित्वाला कायम ठेवू इच्छित असली तरी राज्याच्या सार्वभौम सत्तेचा शेवट करणे सोयीचे मानते.

## ६.२ विषय विवेचन-

### ६.२.१सहवर्तन बहुलवादाचा आशय

बहुलवादी विचारसरणीला अनुसरून राज्याची सत्ता सार्वभौम आणि निरंकुश नाही. समाजामध्ये असलेल्या अनेक समुदयाचे अस्तित्व राज्याच्या सत्तेला मर्यादीत करीत असते. व्यक्ती आपल्या गरजांच्या पुर्ततेसाठी फक्त राज्याचे सभासदत्व न स्विकारता इतर अनेक समुदाय आणि संघटनेचे सभासद्त्व सुध्दा स्विकारीत असते. अशा स्थितीत एकमेव राज्याला संबंध सत्ता प्रदान केली जाऊ शकत नाही. विचारवंत हेसियो यांनी यांसंबंधी लिहीले आहे कि, ''बहुलवादी राज्य एक असे राज्य आहे, ज्यामध्ये सत्तेचा फक्त एकच स्त्रोत नाही, हे राज्य विविध क्षेत्रामध्ये विभाजनीय आहे आणि त्याला विभाजीत केले गेले पाहिजे.'' लिंडसे यांच्या मते, ''जरा आपण तथ्यांची पाहणी केली तर हे स्पष्ट होते की, सार्वभौम सत्तेच्या सिध्दांताचा शेवट झाला आहे.'' बार्करचे म्हणणे आहे की, ''कोणताही राजकीय सिध्दांत इतका असफल झाला नाही जितका राज्याच्या सार्वभौम सत्तेचा सिध्दांत असफल झाला आहे'' लास्की यांच्या शब्दात सांगायचे झाले तर, ''समाजाच्या सांगाड्याला पुर्ण होण्यासाठी त्याला संघात्मक असले पाहिजे.'' गेटेल यांनी बहुलवादाची व्यापक व्याख्या केली आहे. त्यांच्या मते,'' बहुलवादी या गोष्टीला मान्यता देत नाही. की, राज्य एक सर्वोच्च समुदाय आहे. ते इतर समुदयाला सुध्दा आधारावर आवश्यक व स्वाभाविक समजतात. त्यांचा विचार आहे की ते सर्व समुदाय तेवढेच महत्वपूर्ण आहे जेवढे राज्य महत्वपूर्ण आहे. या समुदायांचा प्रादुर्भाव स्वत: किंवा निसर्गत: होतो, ते राज्याद्वारा निर्माण होत नाही आणि ते आपल्या अस्तित्वासाठी

राज्याच्या इच्छेवरही अवलंबून राहत नाही. राज्याप्रमाणे ते सुध्दा आपल्या क्षेत्रामध्ये सर्वश्रेष्ठ आहे. ते यागोष्टीला सुध्दा मानत नाही की, राज्य आपल्या सत्तेच्या कारणामुळे काही सर्वोच्च अधिकार ठेवू शकते. ते सर्व समुदयाच्या समान अधिकारामध्ये विश्वास करतात जे आपल्या सभासदांना एका सुत्रामध्ये गुंफुन त्यांच्यासाठी महान कार्य करतात. राज्य अविभाज्य, सर्वोच्च आणि सत्ता-संपन्न नाही. त्याच्या सर्वोच्च सत्तेचा दावा आजही जटील विश्वाच्या वास्तविक गोष्टीच्या अनुसरुन नाही.''

## ६.२.२ बहुलवादाचे सिध्दांत-

### (१) राज्य फक्त एक समुदाय आहे.

बहुलवादी आदर्शवादयांप्रमाणे राज्याला सर्वव्यापक, सर्वशक्तीशाली व नैतिक संस्थेच्या रूपात स्विकारीत नाही. त्यांच्यामते समाजाच्या वर्तमान स्थिती व रचनेच्या आधारावर राज्य इतर समुदायाप्रमाणेच एका समुदायाच्या पलीकडे आणखी काही नाही. मानवी जीवनाची गरज बहुवीध स्वरूपाची असून राज्य व्यक्तीच्या सर्व गरजांची पुर्तता करू शकत नाही. याच कारणामुळे राज्याच्या शिवाय इतर समुदायांचेही उपयोगी अस्तित्व आहे. बहुलवादाचे प्रतिपादन असे आहे की, इतर समुदाय राज्याच्या बरोबरीचे आहे आणि राज्यासारखेच हे समुदाय हे सुध्दा आपल्या क्षेत्रामध्ये पूर्ण शक्तीशाली असले पाहिजे. लास्की यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास, ''समुदायांच्या अनेक प्रकारांमध्ये राज्य सुध्दा एक आहे आणि इतर समुदायांच्या तुलनेमध्ये ते व्यक्तीच्या भक्तीचा उच्चतर अधिकारी नाही.'' मॅटलंडच्या मते,'' राज्य सुध्दा अशा समुदयांपैकी एक आहे.''

### (२) नियंत्रित राज्यसत्ते मध्ये विश्वास-

बहुलवाद ऑस्टीनच्या सार्वभौम सत्तेच्य सिध्दांतांच्या विरुध्द एक प्रतिक्रिया आहे. बहुलवाद अनियंत्रित सार्वभौम सत्तेचे खंडण करतो आणि अतंर्गत व बाहय दोन्ही ही क्षेत्रामध्ये सार्वभौम सत्तेला नियंत्रित मानतो. बलंटस्ली यांनी योग्यच म्हटले आहे की, ''राज्य सर्व सत्तावान नाही कारण ते बाहय क्षेत्रामध्ये इतर राज्यांच्या अधिकारांपासून नियंत्रित आहे. आणि अंतर्गत क्षेत्रामध्ये ते स्वत: आपली प्रकृती व आपल्या नागरीकांच्या अधिकारांपासून नियंत्रित आहे.''

### कायदा राज्यापेक्षा श्रेष्ठ-

बहुलवादी कायद्याला राज्यापासून स्वतंत्र आणि श्रेष्ठ मानतात. यासंबंधी फ्रांसचे विचारवंत डिग्विट आणि डच विचारवंत क्रॅब यांचे विचार महत्वपूर्ण आहे. डिग्विट यांच्या

मते, कायदा राजकीय संघटनेपासून स्वतंत्र, त्याहून श्रेष्ठ आणि पूर्वकालिक आहे. राज्याचे व्यक्तित्व एक कल्पना मात्र आहे. कायदा राज्याला नियंत्रित करतो, अशा प्रकारचे विचार मांडले आहे. क्रॅब एकमेव कायदयाचीच सर्वभौम सत्ता स्वीकार करतो जी राज्यापासून स्वतंत्र व श्रेष्ठ आहे. त्याच्याच शब्दात सांगायचे झाल्यास,'' रांज्य कायदयाचे नाही तर कायदा राज्याची निर्मिती करतो.''

## (४) विकेंद्रीकरणामध्ये विश्वास-

बहुलवाद केद्रीत राज्यामध्ये विश्वास करत नाही तर तो विकेंद्रीकरणालाच राज्याच्या वास्तविक उपयोगितेचा आधार मानतो. बहुलवादाला अनुसरुन स्थानिय समस्यां सुध्दा कमी महत्वाच्या नसून त्यांचे समाधान सत्तेच्या केंद्रीकरणाच्या पध्दतीपासून केले जावू शकत नाही. त्यासाठी केंद्रीत सत्तेला व्यावसायिक प्रतिनिधीत्वाच्या पध्दतीच्या आधारावर विकेंद्रित करून इतर समुदायामध्ये विभाजित करावे आणि एका संघात्मक सामाजिक संघटनेची स्थापना करावी. अशाप्रकारचे संघात्मक सामाजिक संघटनच मानवी जीवनाच्या बहुविध गरजांची पुर्तता करू शकते

## ६.२.३बहुलवादाचे टीकात्मक परिक्षण -

बहुलवादाच्या विरुध्द टीकेचा सर्वात प्रमुख आधार हा आहे की बहुलवादी विचारसरणीला स्विकारण्याचा स्वाभाविक परिणाम अराजकतेची स्थिती असेल. जर प्रत्येक समुदायाला राज्याच्या समान मानले आणि त्यांना सार्वभौम सत्तेचा प्रमाणशिर अधिकार दिला तर समाजामध्ये कायदाविहीन स्थिती निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

कोदीन, हॉब्ज, रूसो ऑस्टिन, इत्यादी सर्व विचारवंत राज्याच्या सार्वभौम सत्तेवर प्राकृतिक, नैतिक वा व्यावहारीक काही ना काही नियंत्रण स्वीकार करतात. कोलरच्या मते, ''त्यापैकी कोणताही विचारवंताचा असा दावा नव्हता की सार्वभौम सत्तेची अवज्ञा करणे, तीला आव्हान देणे, तीची टीका करणे वा विरोध करणे सर्वथा अनैतिक, अतार्किक, असामाजिक व अव्यावहारीक आहे.''

बहुलवादाच्या विरूध्द एक गंभीर टिका ही आहे की बहुलवादी विचारसरणी अंतर्विरोधाने भरलेली आहे. टीकाकारांनी लिंडसे, बार्कर आणि इतर बहुलवादयांच्या या वक्तव्याची कडवी टीका केली की राज्य समुदायांचा एक समुदाय आहे. लिंडसेच्या मते राज्यच एकमेव असा समुदाय आहे ज्याची सदस्यता अनिवार्य आहे आणि ज्याच्याजवळ शिक्षा प्रदान करण्याची सत्ता आहे.

बहुलवादाची टीका या दृष्टिने सुध्दा केली जाते की डिग्विट आणि क्रॅब सारखे बहुलवादी विचारवंताचे कायदयासंबंधीचे विचार असत्य आहे.

असे काही दोष असले आणि त्यावर टीका होत असली तरी बहुलवादाचे महत्व नाकारता येत नाही.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न–**

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अ) सार्वभौम सत्तेच्या अद्वैतवादाविरुध्द जी विचारधारा निर्माण झाली तीचे नाव सांगा.

(ब) सार्वभौम सत्तेच्या सिध्दांताचा शेवट झाल्याचे कोणी म्हटले?

(क) बार्कर यांनी सार्वभौम सत्तेच्या सिध्दांताबाबत काय म्हटले आहे?

## ६.३ पारिभाषीक शब्द, शब्दार्थ

Pluralism - बहुलवाद

## ६.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(अ) बहुलवाद

(ब) लिंडसे

(क) सर्वात निष्फळ सिध्दांत

## ६.५ सारांश

या घटकामध्ये बहुलवादाचा आशय स्पष्ट करून बहुलवादाच्या सिध्दांतासंबंधीचे विवेचन केले आहे. शेवटी टीकात्मक परिक्षण करून बहुलवादाच्या मर्यादा विषद केल्या आहेत. बहुलवादाचे प्रमुख प्रतिपादन असे आहे की, राज्याची सत्ता सार्वभौम आणि निरंकूश स्वरूपाची नाही. समाजामध्ये असलेल्या अनेक समुदायाचे अस्तित्व राज्यसत्तेला मर्यादित करीत असते. बहुलवाद सार्वभौम सत्तेच्या अद्वैतवादी संकल्पनेच्या विरूध्द असलेली एक प्रतिक्रीया आहे. बहुलवादाचे काही दोष असले तरी त्यांचे महत्व कमी होत नाही.

## ६.६ सरावासाठी स्वाध्याय

खालील प्रश्नांची उत्तरे दहा ते पंधरा ओळीत लिहा.

(१) बहुलवादाचा आशय स्पष्ट करा.

(२) बहुलवादाच्या सिध्दांताचे निवेचन करा.

(३) बहुलवादाच्या दोषांची चर्चा करा.

## ६.७ क्षेत्रिय कार्य

तुम्ही राहत असलेल्या परिसरातील सामाजिक संघटनांचा शोध घेऊन त्यांच्या स्थिती संबंधीचा अहवाल तयार करा.

(१) गाबा, ओम् प्रकाश, राजनीति सिध्दांत की रुपरेखा.

(२) जैन, पुथ्वराज एवं फडिया, बी. एल., आधुनिक राजनीतिक सिध्दांत.

(३) भोळे, भा. ल., राजकीय सिध्दांत आणि विश्लेषण

-------------

# सहवर्तनमुलकवाद
# (Consociationalism)

अनुक्रमाणिका


६.० उद्दिष्टे

६.१ प्रास्ताविक

६.२ विषय विवेचन

६.२.१. सहवर्तन मुलकवादाचा आशय

६.२.२. सहवर्तन मुलकवादासाठी आवश्यक अटी

६.२.३. टीकात्मक परिक्षण

६.३ सरावासाठी स्वाध्याय

६.४ क्षेत्रिय कार्य

६.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

६.६ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न


## ६.० उद्दिष्टे –

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

(१) सहवर्तनमुलक वादाच्या आशय स्पष्ट होईल.

(२) सहवर्तनमुलक वादाच्या यशस्वीतेसाठी आवश्यक अटीचे ज्ञान होईल.

(३) सहवर्तनमुलक वादाच्या मर्यादा विषद होतील.

## ६.१ प्रास्तविक–

सहवर्तनमुलकवादामध्ये ज्या सत्तासहभागाला महत्त्वपूर्ण स्थान दिले जाते, त्यासंबंधी फार आधी १९६० मध्ये अभ्यासकांनी विश्लेषणाला सुरूवात केली. राजकीय नेते आणि संविधान लेखकांनी आपल्या विभाजीत समाजाच्या समस्येचा उपाय म्हणून सत्ता–सहभागाची (power- sharing) योजना पुढे केली. उदा. ऑस्ट्रेलिया, कॅनडा, कोलंबीया, सायप्रस, भारत, लेबनॉन, मलेशिया, नेदरलँड आणि स्वित्झर्लंड. सहवर्तनमुलकवादासंबंधी राज्यशास्त्रज्ञ अरेंड लिजफार्ट यांनी चर्चा केली आहे. लिजफार्ट यांनी असे म्हटले आहे

की, राज्यकर्ता वर्ग आणि विद्ववानांनी स्वतंत्रपणे सहवर्तनमुलकवादासंबंधीची पायाभरणी काही वर्षे आधीच केली आहे. जॉन मॅकगरी आणि ब्रेंउन ओ लेरी यांनी जेव्हा नेदंरलँडमध्ये पहिल्यांदा १९९७ मध्ये सहवर्तनमुलकवादाचा अंमल झाला तेव्हा त्यावर जोर दिल्याचे आढळले.

## ६.२ विषय विवेचन-

### ६.२.१.सहवर्तन मुलकवादाचा आशय -

सहभागाचा तांत्रिक दृष्ट्या असलेला एकमेव प्रकार आहे. त्याचा सामुदायीकवादाशी जवळचा संबंध आहे. काहींनी त्याच्या विचार सामुदायिक वादाचा प्रकार म्हणूण केला आहे. इतरांनी असा दावा केला आहेकी, आर्थिक सामुदायीक वादाची योजना वर्गीय संघर्षाची नियमन करण्यासाठी करण्यात आली आहे. मानव वंश व धर्माला अनुसरून विभाजीन सामाजिक समुहामध्ये समन्वय प्रस्थापित करण्याच्या आधारावर सहवर्तनमुलकवादाचा विकास झाला आहे. सहवर्तनमुलक आधारावरील राज्यांमध्ये बेल्जीयम, सायप्रस, लेबनॉन, नेदरलँड (१९१७ ते १९६७), स्वित्क्षर्लंज, दक्षिण आफ्रिका, इत्यादींचा उल्लेख करता येतो. काहींनी तर युरोपियन युनियनचाही यामध्ये समावेश करण्यासंबंधी जोरदार समर्थन केले आहे.

सहवर्तनमुलक राजकारण म्हणजे असे राजकारण ज्यामध्ये सर्व निर्णय केवळ बहुमताच्या आधारावर केले जाते नाही तर वेगवेगळे समुह मिळून-मिसळुन निर्णय करतात आणि वाटून सत्तेचा उपयोग करतान. ज्या समाजाचे विभाजन जात, धर्म, भाषा, प्रदेश, संस्कृती आणि विचारसरणीच्या आधारावर झाले असेल, त्यामध्ये परस्पर सद्भावना टिकून ठेवण्यासाठी अशा सहवर्तनमुलक राजकरणाची नितांत गरज असते

### ६.२.२. सहवर्तनमुलकवादासाठी आवश्यक अटी

काही आवश्यक अटी आहेत. यामध्ये विभाजीत मानवी समुदाय, बहुभागीय सत्ता संतुलन, सर्व समुदायासाठी समान असलेले भितीचे अस्तित्व, राज्याप्रतीची निष्ठा, अभिजन परंपरा, सामाजिक आर्थिक समता, धोरण भार कमी करण्यासाठी कमी लोकसंख्या, सुधारीत बहुपक्ष पध्दती, इत्यादींचा उल्लेख करता येइल. लिजफार्ट यांनी वरील अटी सहवर्तनमुलक वादाच्या याशस्वीतेसाठी अत्यावश्यक असल्या तरी पुरेशा नसल्याचे म्हटले आहे. जॉन मॅकगरी आणि ब्रेइन ओ लेरी यांनी लोकतंत्रात्मक सत्ता सहभागाच्या स्थापनेसाठी तीन महत्वपूर्ण अटी सांगितल्या आहेत. संघर्ष नियमनामध्ये अभिजन वर्गाला

व्यस्त ठेवण्यासटी प्रेरित करणे, अभिजन वर्गाने विभाजीत समुहाचे नेर्तृत्व करणे आणि सत्तेचे बहुभागीय संतूलन अशा ह्या तीन अटी आहेत.

### ६.२.३. टीकात्मक परीक्षण–

ब्रीयन बारी यांनी देशांमध्ये अस्तित्वात असलेल्या विभागाच्या स्वरुपा संबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. लिजफार्ट यांनी विभागाचा विचार सहवर्तनमुलकवाद लोकशाहीचा 'अभिजात नमुना' म्हणून केला आहे. त्यासाठी त्यांनी स्विसचे उदाहरण दिले आहे. राजकीय पक्ष उच्च रचित उद्देशाच्या संघर्षापेक्षा समाजातील विभाजीत समुहाला छेद देऊन महत्वपूर्ण एकमताचे छित्र प्रधान करतात.

रिनस वॅन शेंडेलेन यांनी अशी टीका केली आहे की, लिजफार्ट यांनी निवडक पुराव्यांचा उपयोग केला आहे. अशा काही टीका केल्या जात असल्या तरी सहवर्तनमुलक वादाचे आणि सहवर्तनमुलक राजकारणाचे असलेले महत्व कमी होत नाही.

## ६.३. पारिभाषीक शब्द, शब्दार्थ

Consociationalism - सहवर्तनमुलकवाद

Power-sharing - सत्ता–सहभाग

## ६.४–स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

(अ) प्रत्यक्ष सहभाग

(ब) सामुदायिकवाद

(क) १९१७

## ६.५. सारांश

या घटकामध्ये सहवर्तनमुलक वादाचा आशय स्पष्ट करून त्यासाठी आवश्यक असलेल्या अटींचे विवेचन केले आहे. शेवटी टीकात्मक परिक्षण करून सहवर्तन मुलक वादासंबंधीच्या उनिवांचा उल्लेख केला आहे. सहवर्तनमुलकवाद सत्ता–सहभागाचा तांत्रिकदृष्टिने एकमेव प्रकार आहे. यामध्ये सत्ता–सहभागाला महत्वाचे स्थान आहे. सहवर्तन मुलकवादासंबंधी लिजफार्ट यांनी चर्चा केली आहे. त्यांच्यावर ब्रीयन बेरी व रिनस थेंडेलेन सारख्य विचारकांनी टीका ही केली आहे.सहवर्तन मुलकवादासंबंधी काही

उणिवा वा दोष असले आणि त्यासंबंधी काही टीका केली जात असली तरी त्याचे महत्व कमी होत नाही.

## ६.६ सरावासाठी स्वाध्याय

पुढील प्रश्नांची उत्तरे दहा ते पंधरा ओळीत लिहा.

(१) सहवर्तनमुलक वादाचा आशय स्पष्ट करा.

(२) सहवर्तनमुलक वादाच्या यशस्वीतेच्या अटीचे विवेचन करा.

(३) सहवर्तनमुलक वादाच्या गुण-दोषांची चर्चा करा.

## ६.७ क्षेत्रीय कार्य

तुम्ही राहत असलेल्या परिसरातील जात व धर्माच्या आधारावर विभाजीत समुहांचा शोध घेऊन त्यांच्यातील आंतरसंबंधावर निबंध लिहा.

## ६.८. अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) गाबा, ओम् प्रकाश, तुलनात्मक राजनिती की रुपरेखा.

(२) Journal of Democracy, Volume 15, Number, 2, April, 2004.

## ६.९ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) सहवर्तनमुलक वादामध्ये कशाला महत्व दिले जाते.

(ब) सहवर्तनमुलक वादाचा कोणत्या बाबीशी जवळचा संबंध आहे.

(क) नेदर लँड मध्ये सहवर्तमुलकवादाचा अंमल कधी झाला.

--------

# मार्क्सवादी दृष्टीकोण

**अनुक्रमाणिका**

६.० उदिदृष्टे
६.१. प्रास्तावीक
६.२. विषय विवेचन
६.२.१. मार्क्सवादी दृष्टीकोनाचा आशय.
६.२.२. वर्ग संघर्ष.
६.२.३. मार्क्सवादाची गुहीतके.
६.२.४. मार्क्सवादी दृष्टीकोनाची उपयोगीता.
६.३ परीभाषीक, शब्द, शब्दार्थ
६.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न
६.५ सारांश
६.६ सरावासाठी स्वाध्याय
६.७ क्षेत्रीय कार्य
६.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ६.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यांस केल्यानंतर आपणास :

१) मार्क्सवादी दृष्टिकोनाचा आशय स्पष्ट होईल.

२) मार्क्सवादी संबंधीत वर्ग संघर्षाच्या स्थीती संबंधीचे आकलन होईल.

३) मार्क्सवादाच्या गृहीतका संबंधीचे ज्ञान होईल.

४) मार्क्सवादी दृष्टीकोनाच्या उपयोगीते संबंधी आकलन होईल

## ६.१ प्रास्ताविक

मार्क्सवादी (Marxist) आणि नवमार्क्सवादी (New-marxist) विचाराच्या अंतर्गत असे मानले जाते कि अल्पविकसीत देशांची वर्तमान स्थीती भांडवलवादी देशांच्या

गतिविधींचा परीणाम आहे. तुलनात्मक राजकीय विश्लेषणाच्या अंतर्गत येणारे अनुभववादी दृष्टीकोन महत्वपूर्ण असले तरी त्यांच्या काही उणीवा आहेत. वर्तनवादी. व्यवस्थात्मक, संरचना- प्रकार्यात्मक इ. अनुभवात्मक दृष्टिकोणांची असलेली वैशिष्टये मार्क्सवादी दृष्टीकोनाचा अवलंब करून दूर केली जाऊ शकतात. याचाच अर्थ मार्क्सवादी अध्ययन पध्दतीत व सैध्दांतीक चौकटीला पर्याय देऊन नष्ट करण्याचा त्या दृष्टीकोनांच्या प्रवर्तकांचा उद्द्येश्य पुर्णपणे अपयशी ठरणारा आहे. अमेरीकन भांडवलशाहीच्या प्रेरणेने वर्गीय विश्लेषण रदद्बादल करू पाहणारे हे दृष्टिकोन अल्पजीवी ठरले. आणि त्यांच्या प्रवर्तकांना कोणत्या ना कोणत्या स्वरूपात मार्क्सवादाचा आधार घेणे नंतरच्या काळात आवश्यक झाले. डेव्हिड ईस्टन व गॅब्रीयल आल्मंण्ड यांनीही ६० च्या दशकानंतरच्या काळात आपल्या अनुभववादाला मुरड घालुन मुल्यात्मक, ऐतिहासीक आणी परिवर्तनलक्षी भुमिका घेतलेली पहावयास मिळते. त्यमुळेच मार्क्सवादी दृष्टिकोनाचे वेगवेळपण व महत्व लक्षात घ्यावे लागते.

## ६.२ विषय विवेचन

### ६.२.१मार्क्सवादी दृष्टिकोनाचा आशय.

मार्क्सवादी दृष्टिकोनात फक्त सामाजिक तथ्यांचे संकलन महत्वपुर्ण नसुन त्या तथ्यांच्या मुळाशी जे वर्गीय आधार असतात त्यांचा शोध घेणे अपेक्षीत असते. मार्क्स च्या मते, सामाजिक विकासात 'वर्ग' कळीची भुमिका निभावतात व्यक्ती ज्या वर्गाची सभासद असते त्या वर्गाच्या हितसंबंधाचे प्रतिनिधीत्व करीत असते. व्यक्ती वर्ग या अमुर्त संकल्पनेच्या मुर्त अविष्कार असतात. त्या वर्ग हिताच्या धारक असतात. प्रत्येक समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास असतो. कारण वर्गावर्गांच्या हितसंबंधात आर्थिक घटक निर्णायक महत्वाचे असतात. असे मार्क्स चे प्रतिपादन असले तरी इतर सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक घटकांच्याही आंतरक्रियांचे त्याला यथार्य भान होते. समाजातील उत्पादने शक्ती आणि तत्सम उत्पादनसंबंध तसेच त्या पायावर रचले गेलेले तत्ववैचारीक इमले, संरचना व संस्था या सर्व बाबींची समग्रता मार्क्सवादीने विचारात घेतली आहे.

### ६.२.२वर्ग संघर्ष.

मार्क्सवादी विचाराला अनुसरुन संस्कृतीच्या प्रारंभापासुनच समाजाचे विभाजन धनवान व धनहीनअशा दोन वर्गात होते. धनवान वर्ग उत्पादनाच्या प्रमुख साधनांचा मालक असतो. निर्धन वर्ग फक्त आपल्या कष्टाच्या आधारावर उदरनिर्वाहासाठी धडपडत असतो. इतिहासाच्या प्रत्येक युगात या दोन वर्गांचा संघर्ष संपुर्ण सामाजिक गतिविधीचे केंद्र असते. समाजाच्या कल्याणासाठी या वर्गसंघर्षाचा अंत वा शेवट आवश्यक असतो.

त्या साठी कामगार वर्गाला आपले संघटन तयार करून भांडवलशाहीच्या विरूध्द क्रांती करावी लागेल, आणि उत्पादनाच्या प्रमुख साधनांवर सामाजिक मालकी निर्माण करावी लागेल ज्यायोगे वर्गविहीन समाजाचा उदय होऊ शकेल.

## ६.२.३मार्क्सवादाची गृहीतके.

समाजात घडणारी सगळी घटीते परस्परावलंबी असतात. सामाजीक प्रक्रीयांमध्ये अंगभूत अंतविरोध असतात. एकाच वेळी समाजात क्रियाशील असलेल्या परस्परविरोधी शकतींचा आंतरसंबंध द्वंद्वात्मक स्वरुपाचा असतो. भौतिक जिवनातील उत्पादन साधनांच्या स्वरूपानुसार समाजातील सामाजीक, राजकीय व बौध्दीक प्रक्रीयांचे सर्वसाधारण स्वरूप निश्चीत होते. जाणीवांनुसार माणसांचे अस्तित्व निर्धारीत होत नसुन त्यांच्या सामाजीक अस्तीत्वानुसार माणसांच्या जाणीवा आकार घेत असतात. वस्तुजाताचा आत्मतत्वाशी आणी भौतिकाचा अभौतीकाशी अतुट संबंध असतो. अशी मार्क्सवादाची काही गृहीतके सांगता येतील. संबंधीत गृहीतकांच्या आधारे शास्त्रीय पण मुल्यमुक्त नसलेल्या अभ्यासपध्दतीचा अवलंब करून मार्क्सवाद सामाजीक-आर्थीक परिवर्तनाची सैध्दांतिक चौकट मांडू पाहातो.

## ६.२.४मार्क्सवादी दृष्टिकोनाची उपयोगीता.

राजकीय व्यवस्थांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासठी हा दृष्टिकोन अनेक अगांनी उपयोगी ठरू शकतो. सामाजीक गतिमानतेच्या मुळाशी असलेल्या अंतरविरोधाचा शोध घेणाऱ्या या दृष्टिकोनाच्या माध्यमातुन विविध राजकिय व्यवस्थेतील मालमत्तासंबंध विशेषत: मालकी हक्काच्या संदर्भात तपासने अभ्यासकाला शक्य होते. विविध राजकीय व्यवस्थेमध्ये असलेली सामाजीक पातळीवर श्रमविभागणी तो तुलनात्मक पध्दतीने अभ्यास शकतो. शिवाय त्या श्रमविभागणीवर नव्या तंत्रज्ञानाचा व संज्ञापन माध्यमांचा क्रांतीचा झालेल्या परिणामही तो तपासु शकतो.

विविध राज्य व्यवस्थांची तुलना अर्थपूर्ण पध्दतीने करण्यासाठी मार्क्सवादातील इतिहास विषयक मिमांसा मार्गदर्शक ठरू शकते. विशिष्ट समाजात विशिष्ट ऐतिहासीक टप्प्यावर आढळणारी वैशीष्ट्ये आणि ति तशी असण्याची कारणे तुलनात्मक अध्ययनाद्वारे शोधली गेल्यास शासनाच्या क्षेत्रात मौलीक भर पडु शकेल.

तिसऱ्या जगातील (Third -world) राष्ट्रांच्या बाबतीत तर मार्क्सवादी दृष्टिकोनाची उपयुक्तता व प्रासंगीकता निर्वीवाद आहे. मार्क्सवादाचा प्रयत्न विविध राज्यव्यवस्थांना समान असलेल्या घटकांचे मुलस्त्रोत जागतीक आर्थिक व्यवस्थेत शोधण्याचा असल्यामुळे विकसीत व विकसनशील अशा दोन्ही प्रकारच्या राज्यव्यवस्थांच्या तुलनेच्या कसोट्या निश्चीत करणे शक्य हाते. कोणत्याही दोन वा अधीक राज्यवस्थांची तुलना तेथील समाजात प्रचलीत असलेल्या उत्पादन संबंधांपासुन आणि त्यास कारक ठरलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेच्या चिकित्सेपासुन मार्क्सवाद सुरू करतो परिणामी इंग्लंड–अमेरिके प्रमाणेच तिसऱ्या जगातील कोणत्याही राज्यवस्थेतील राजकीय वास्तवाचा अचुक वेध घेणे त्याला शक्य होते.

## ६.३ परीभाषीक, शब्द, शब्दार्थ

१) Marxist – मार्क्सवादी

२) New-marsixt – नवमार्क्सवादी

३) Third world – तिसरे जग

## ६.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(अ) मार्क्सवादानुसार समाजाचे विभाजन कोणत्या दोन वर्गात होते ?

(ब) समाजात क्रियाशील असलेल्या परस्पर विरोधी शक्तींचा आंतरसंबंध कोणत्या स्वरूपाचा असतो ?

(क) मार्क्सच्या मते सामाजीक विकासात कळीची भूमिका निभावणारा घटक कोणता ?

**स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

(अ) धनवान व निर्धन

(ब) द्वंद्वात्मक.

(क) वर्ग.

## ६.५ सारांश

या घटकामध्ये मार्क्सवादी दृष्टिकोनाचा आशय स्पष्ट करून त्याच्याशी संबंधीत वर्गसंघर्षाच्या स्थीतीचे विविचेन केले आहे. मार्क्सवादाच्या गृहीतकांची मांडणी करून शेवटी दृष्टिकोनाची उपयोगीता विषद केली आहे. वर्तनवादी, व्यवस्थावादी, संरचना

कार्यवादी इ. अनुभववादी दृष्टिकोनांचे सर्व दोष मार्क्सवादी दृष्टिकोनाला अनुसरून दूर केले जाऊ शकतात. यातच मार्क्सवादी दृष्टिकोनाचे वेगळेपण व महत्व दडले आहे. मार्क्सच्या म्हणण्याप्रणाणे प्रत्येक समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा असतो कारण वर्गावर्गांच्या हितसंबंधात आर्थिक घटक निर्णायक महत्वाचे असतात. मार्क्सने असे प्रतिपादन केले असले तरी इतर सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक घटकांच्याही आंतरक्रीयांचे त्याला चांगलेच भान होते. हा दृष्टिकोन ऐतिहासीक दृष्टिकोनातून वर्तमान परिस्थीतीचा विचार करतो. विविध राजकीय व्यवस्थांची तुलना अर्थपुर्ण पद्धतिने करण्यासाठी मार्क्सवादातील इतिहासविषयक मिमांसा मार्गदर्शक ठरू शकते. तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या संदर्भात मार्क्सवादी दृष्टिकोनाची उपयुक्तता व प्रासंगीकता वादातीतच आहे.

## ६.६ सरावासाठी स्वाध्याय

पुढील प्रश्नांची दहा ते पंधरा ओळीत उत्तरे लिहा–

(१) मार्क्सवादी दृष्टिकोनाचा आशय स्पष्ट करा.

(२) मार्क्सवादी दृष्टिकोनाशी संबंधीत वर्गसंघर्षाची स्थिती स्पष्ट करा.

(३) मार्क्सवादी दृष्टिकोनाची उपयोगिता व महत्व विषद करा.

## ६.७ क्षेत्रीय कार्य

तुम्ही राहत असलेल्या परीसरामधील श्रमसंघटनांचा शोध घेऊन त्यांच्यातील मार्क्सवादा संबंधाच्या जाणीवांचे अध्ययन करून त्यावर निबंध लिहा.

## ६.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) जौहरी, जे, सी., तुलनात्मक राजनीति.

(२) गाबा, ओम् प्रकाश, तुलनात्मक राजनीति की रुपरेखा.

(३) भोळे, भा. ल., शासन आणि राजकारण: तौलनिक अध्ययन.

(४) Das, H. H., Comparative Politics.

---

**७**

# घटक ७ – राजकीय सहभागाचा सिध्दांत

**घटक संरचनाः**


७.० उद्दिष्टे

७.१ प्रास्ताविक

७.२ विषय विवेचन

७.२.१ राजकीय सहभागाच्या व्याख्या

७.२.२ राजकीय सहभागाचा अर्थ

७.२.३ राजकीय सहभागाचे महत्व

७.२.४ राजकीय सहभागातील क्रिया

७.२.५ रॉबर्ट ढॉलचे विश्लेषण

७.२.६ राजकीय सहभागाची पातळी व प्रवृत्ती

७.२.६.१ नेतृत्व

७.२.७ राजकीय सहभागावर राजकीय पक्षाची भूमिका

७.२.८ राजकीय सहभागात दबावगटाची भूमिका

७.२.९ लोक चळवळी

७.३ सारांश

७.४ सरावासाठी प्रश्न

७.५ संदर्भ सूची


## ७.० प्रस्तावना :

जगातील अनेक देशांनी लोकशाही शासनप्रणालीचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीत जनतेचा सहभाग महत्वाचा असतो. परंतु प्रत्यक्षात राजकीय प्रक्रियेत अभिजनांचा वाटा मोठा असतो. हूकूमशाही असलेल्या सर्वकष व्यवस्थेतही जनतेच्या सहकार्याचा विचार केला जातो. जनतेच्या पाठीब्याने अमर्याद सत्तेला अधिमान्यता मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. जनतेच्या सहकार्यामुळे शासनव्यवस्था कोणतीही असो ती स्थिर व सुव्यवस्थित राहू शकते. त्यामुळे राजकीय सहभागाला महत्व प्राप्त झाले आहे. २०व्या शतकात राज्यशास्राचे स्वरूप

वर्तनवादी आणि वस्तुनिष्ठ बनल्यामळे राजकीय सहभागाच्या संकल्पनेला महत्व प्राप्त झाले आहे. कारण अनेक प्रकारच्या प्रक्रिया आणि सामाजिक संबंध यातूनच राजकीय व्यवस्था निर्माण झाली. या सर्व संबंधाचा आधार व्यक्तिचा सहभाग हाच आहे. त्याचाच परिणाम जगातील अनेक लोकशाही असलेल्या देशांनी सर्वाधिक स्वरूपात नागरिकांना राजकीय सहभागाचे अधिकार दिला आहे.

## ७.१ उद्दिष्टे :

या घटकांची खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहे.

१. राजकीय सहभागाचा अर्थ जाणून घेणे

२. राजकीय सहभागाचे महत्व अभ्यासणे

३. राजकीय सहभागाचे स्वरूप जाणून घेवून त्यासंबंधीच्या सिध्दांताचा अभ्यास करणे.

४. राजकीय सहभागाच्या विविध माध्यमांचा अभ्यास करणे

५. राजकीय नेतृत्व, राजकीय पक्ष, दबावगट व लोकचळीवळीची राजकीय सहभागातील भूमिका अभ्यासणे.

## ७.२ विषय विवेचनः

ग्रीक तत्वज्ञ ॲरिस्टॉटलच्या मते, मनुष्य हा स्वभावतःच सामाजिक व राजकीय प्राणी आहे. त्यामुळे तो समाजाशिवाय व राज्याशिवाय जीवन जगू शकत नाही. समाजाशिवाय व राज्याशिवाय व्यक्तीचे जीवन आनंदी राहू शकत नाही. या राज्यात व्यक्तिचा विकास होत असतो. अशा सामाजिक व राजकीय जीवनात पूर्वी पासून व्यक्ती आपला सहभाग दर्शवित आला आहे. जसे ग्रीक नगरराज्यातील सर्व नागरिक राज्यकारभारास प्रत्यक्ष सहभागी असत. याचा अर्थ असा की, राज्याच्या चौकटीत व्यक्तीने कसे वागावे. तसेच राज्यसंस्थेशी व्यक्तीने कसे संबंध ठेवावे याचा विचार प्राचीन विचारवंतांनी केला होता.

आधुनिक काळात जगातील अनेक राष्ट्रांनी प्रतिनिधीक लोकशाहीचा स्वीकार केला. त्यामुळे जनतेच्या राजकीय सहभागाला महत्व प्राप्त झाले. कारण लोकशाही राजकीय व्यवस्थेत जनसंमती देण्याचा व काढून घेण्याचा महत्वाचा मार्ग म्हणजे राजकीय सहभाग आहे. शासन त्या मार्गानेच शासितांचे उत्तरदायित्व असते. आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी जनता राजकीय पक्षाच्या संपर्कात राहतात. काही वेळा उमेदवारी स्वीकारतात. पक्ष प्रचार कार्यात सहभागी होतात. निवडणूकीचा फंड गोळा करतात. उमेदवाराचा प्रचार करतात. राजकीय विचारांबाबत मत बनविणे इत्यादी बाबींचा समावेश राजकीय सहभागात होतो.

### ७.२.१ राजकीय सहभागाच्या व्याख्याः

१. आल्मंड व पॉवेल यांच्या मते, ‘‘राजकीय व्यवस्थेच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेतील

लोकांचा सहभाग म्हणजे राजकीय सहभाग होय''.

२. प्रा. डेव्हिड ईस्टन यांच्या मते, ''विशिष्ट प्रदेशात राहण्यास लोकसमूह की जो सार्वजनिक स्वरूपाचे निर्णय घेण्यासाठी सहभागी होतो. त्या सहभागास राजकीय सहभाग असे म्हणतात.

३. रॉबर्ट ढाल यांच्या मते, ''शासकीय निर्णयात मानसिकदृष्ट्या गुंतून राहणे म्हणजे राजकीय सहभाग होय''.

## ७.२.२. राजकीय सहभागाचा अर्थः

वरील व्याख्यांच्या आधारे राजकीय सहभागाचा अर्थ पुढीलप्रमाणेः

राजकीय प्रक्रियेशी संबंधीत ऐच्छिक कृतीची मालिका होय.

राजकीय निर्णय प्रक्रिया प्रभावित करण्याच्या हेतूने व्यक्तीने केलेली व्यक्तिगत अथवा सामूदायिक कृती होय.

सार्वजनिक स्वरूपाच्या निर्णय प्रक्रियेत सहभाग घेणे.

सरकारतर्फे कोणते निर्णय घेतले जातात व ते का घेतले जातात.

शासकीय निर्णय प्रक्रियेत मानसिकदृष्ट्या गुंतून राहणे होय.

राजकीय सहभागातून राजकीय व्यवस्थेला जनमत लक्षात येते.

राजकीय सहभागामुळे जनतेत जबाबदारीची जाणिव निर्माण होते.

शासनाला धोरण ठरवितांना जनतेच्या इच्छा-आकांशा जाणून घेण्यास मदत होते.

जनतेच्या सक्रीय राजकीय सहभागामुळे शासनावर नियंत्रण प्रस्थापित होते.

यावरून आपल्या असे लक्षात येते की, राजकीय सहभाग याचा अर्थ नागरिकांचा राजकीय सहभाग होय. लोकशाही स्वरूपाच्या राजकीय व्यवस्थेत सहभागाला फार महत्व असते. तसेच अन्य राजकीय व्यवस्थेत जसे हुकूमशाही यातही जनतेच्या सहभागावर व संमतीवर त्यांचे स्थैर्य अवलंबून असते. कारण नागरिकांचा राजकीय सहभाग हा सत्ताधाऱ्यांच्या सत्तेला अधिक प्रेरित करत असतो. याउलट ज्या राजकीय व्यवस्थेत राजकीय सहभागाला विरोध होतो त्या व्यवस्थेत विस्फोटक परिस्थिती निर्माण होते.

सर्वच राजकीय व्यवस्थेत कमी अधिक संख्येत सत्ता काही व्यक्तिच्याच हातात केंद्रीत असते. लोकशाहीत निवडणूकीच्या आधीचा कालावधी व नंतरच्या कालावधीत जनतेचा सहभाग वाढलेला असतो. सत्तास्थानी असलेला सत्ताधीशांचा गट अनेक व्यक्तिंना राजकीय प्रक्रियेत सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न करत असते. कारण जितका जनतेचा राजकीय सहभाग हा जास्त असतो, तितकी राजकीय सत्तेला वैधता प्राप्त होते. जनतेच्या मोठ्या प्रमाणातील सहभागाने देशात हिंसात्मक घटना अथवा सशस्त्र उठावाचा धोका कमी असतो. राजकीय सहभागाचे महत्व पुढील बाबीवरून अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

## ७.२.३राजकीय सहभागाचे महत्व

### १. लोकशाही शासनपध्दतीचे महत्वः

लोकशाही शासनपध्दतीत देशातील नागरिकांना आपले प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार असतो. हे प्रतिनिधी निवडणूकीच्या मार्गाने निवडले जातात. त्यामुळे निवडणुकीला लोकशाहीचा प्राण किंवा आत्मा म्हणून ओळखले जाते. निवडणुका जितक्या खेळीमेळीच्या वातावरणात पार पडतील तितकी लोकशाही यशस्वी होते. लोकशाही शासन हे लोकानुवर्ती असल्याने यात लोकमताला महत्व असते. जेव्हा राजकीय व्यवस्था लोकमताची दखल घेवून निर्णय घेते तेव्हा त्या देशातील प्रजा ही संतुष्ट असते. त्याचा फायदा राजकीय व्यवस्थैला स्थैर्य लाभण्यासाठी होतो. परिणामी लोकशाहीत जनतेच्या राजकीय सहभागाला महत्व प्राप्त झाले.

### २. प्रचार व भावनांची अभिव्यक्ती

राजकीय सहभागामुळे व्यक्तीला आपल्या भावना विचार मांडण्याची संधी प्राप्त होते. व्यक्तीगत, सामुहिक अथवा राजकीय पक्ष, दबावगट, संसूचनाच्या विविध माध्यमाद्वारे व्यक्ती आपल्या मागण्या राजकीय व्यवस्थेसमोर मांडून राजकीय प्रक्रियेत सहभागी होते. लोकशाहीत सनदशीर मार्गाने आपले विचार मांडण्याचा प्रयत्न नागरिकांकडून केला जातो. ज्यात अर्ज, विनंती वृत्तपत्रे, सभा, समेलने, धरणे या व यासारख्या अन्य मार्गाचा अवलंब करून प्रजा आपल्या विचार व भावना राजकीय व्यवस्थेपर्यंत पोहचविते. त्यामुळे समाजाच्या मनावरील ताण कमी होण्यास मदत होते.

### ३. राजकीय व्यवस्थेवर नियंत्रण

राजकीय सहभागामुळे राजकीय व्यवस्थेला कोणताही निर्णय घेतांना अथवा धोरण ठरवितांना जनमताचा विचार करावा लागतो. जनतेचा राजकीय सहभाग जितका सक्रीय तितके शासनावर नियंत्रण प्रस्थापित होते. राजकीय व्यवस्थेने घेतलेले निर्णय जास्तीत जास्त लोकांच्या हिताचे असल्यास त्यांना जनतेचा मोठ्या प्रमाणात पाठबिा निर्माण होवून शासनाला स्थैर्य लाभते. याउलट काहीच व्यक्तिचे हित जोपासणारे असल्यास राजकीय व्यवस्थेचे अस्तित्व धोक्यात येवू शकते.

### ४. नागरिक व शासनकर्ते यांच्यात संपर्क

लोकशाही शासनव्यवस्थेत नागरिक व राजकीय व्यवस्था यांच्यात धनिष्ठ संबंध असतात. निवडणूकीच्या काळात सत्ताशोधकाने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता सत्ताधीशांनी करावी अशी जनतेची अपेक्षा असते. तर शासनाला आपल्या धोरणाच्या अंमलबजावणी प्रसंगी व अन्य कार्यात जनतेच्या सहकार्यांची अपेक्षा असते. जनतेच्या राजकीय सहभागामुळे शासन व जनता यांच्यात सहकार्याने संबंध प्रस्थापित होवून समन्वय निर्माण होतो. संपर्क साधण्याचे कार्य राजकीय पक्ष, दबावगट, हितसंबंधी गट व राजकीय नेते करीत असतात. विशिष्ट ध्येय धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राजकीय सहभाग उपयुक्त ठरतो.

## ५) राजकीय व्यवस्थेविषयी आपुलकी

लोकशाही निवडणुकीच्या काळात जनतेची इच्छा, आकांक्षा विचारात घेवून राजकीय पक्ष आपला जाहीरनामा तयार करतात. जनतेचा विश्वास घेवून सत्ता प्राप्तीसाठी प्रयत्न करतात. राजकीय पक्ष अथवा दबावगटातील सदस्य आपल्या भावना व विचार शासनाच्या कानावर घालतात. जनतेच्या विचारांना शासन दरबारी पोहचवून जनतेचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न राजकीय व्यवस्थेकडून केला जातो. त्यामुळे बहुसंख्य लोकांच्या भावनांची दखल व्यवस्थेकडून घेतली गेली. त्यामुळे जनतेच्या मनात व्यवस्थेविषयी आपुलकी निर्माण होते. त्याचा परिणाम राजकीय सहभाग वाढीसाठी होतो.

## ६) राजकीय शिक्षण

लोकशाही जनतेच्या राजकीय सहभागाला खुप महत्व असते. व्यक्तीच्या सहभागाने तिच्या जबाबदारीची जाणिव निर्माण होते. नागरिकांच्या सक्रीय सहभागाने त्यांना नेतृत्व करण्याचे व अन्य राजकीय घडामोडीचे व कार्याचे ज्ञान प्राप्त होते. त्यामुळे व्यक्ती राजकीय दृष्टीने परिपक्व होत जाते. त्याचा फायदा राजकीय व्यवस्थेचे स्थैर्य वाढविण्यासाठी होतो. ज्या देशातील लोकांचा सहभाग हा जास्त असतो. तेथे लोकशाही यशस्वी होवून राजकीय व्यवस्था योग्य प्रकारे कार्य करु शकते. जसे -इंग्लंड व अमेरिका या देशातील लोकांचा राजकीय सहभाग हा मोठ्या प्रमाणात आहे.

## ७) राजकीय विकास आणि राजकीय आधुनिकीकरण

कोणत्याही देशाचा राजकीय विकास व राजकीय आधुनिकीकरण प्रक्रिया ही त्या देशातील राजकीय सहभागावरुन निश्चित होते. देशातील सार्वजनिक प्रश्नांचे स्वरुप व गरजा सर्वसामान्य जनतेला माहीत असतात. देशातील अनेक गरजांपैकी कोणत्या गरजांना प्राधान्य द्यावे याची माहीती त्यांना असते. या विकास व आधुनिकीकरणाच्या दृष्टीने नागरिकांनी व्यवस्थेच्या निर्णय निर्धारण प्रक्रियेत नेतृत्व, सत्तारुढ राजकीय पक्ष, विरोधी पक्ष अथवा दबाबगट या स्वरुपात आपली भूमिका पार पाडणे आवश्यक असते.

## ८) मतदार वर्तणूक

राजकीय सहभागामुळे मतदार असलेल्या नागरिकांच्या वर्तणूकीचा अभ्यास करता येवू लागला. मतदार वर्तनावर प्रभाव टाकणारे घटक, राजकीय सहभागाचे विविध प्रकार, सहभागाच्या पातळ्या आदी बाबी जाणून घेणे सोयीचे होते. तसेच राजकीय सहभागावर प्रभाव टाकणारी विविध संसूचन माध्यमे आदी बाबी शास्त्रीय पद्धतीने अभ्यासता येवू लागल्या. अलीकडच्या काळात राजकीय सहभागात मतदार वर्तणुकीच्या अभ्यासाला त्यामुळे महत्व प्राप्त झाले.

## ९) लोकमान्यतेची जाणिव

लोकशाही असलेल्या देशात लोकांचा राजकीय सहभाग हा सक्रीय आहे की निष्क्रीय याची कल्पना लोकांना येते. लोकांच्या राजकीय सहभागाचा प्रकार व प्रमाणावरुन राजकीय व्यवस्थेची असलेली लोकमान्यता समजण्यास मदत होते.

## १०) मूलभुत हक्कांना प्राधान्य

लोकशाही असलेल्या देशात नागरिकांना मतदान करण्याचा, निवडणूकीला उभा राहण्याचा, आपली मते मांडण्याचा, जाहीरसभा घेण्याचा या सारखे अधिकार प्राप्त झालेले असल्याने राजकीय सहभाग महत्वाचा ठरला. राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याचा मूलभुत हक्क नागरिकांना संविधानाने प्राप्त झाला. त्यामुळे राजकीय पक्ष विविध युक्त्या योजून सत्ता प्राप्तीसाठी जास्तीत जास्त जनतेला सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न करतात.

यावरुन राजकीय सहभागाचे राजकीय व्यवस्थेत असलेले महत्व आपल्या लक्षात येते.

## ७.२.४राजकीय सहभागातील क्रिया

वुडवर्ड व रोपर या अभ्यासकांच्या मते, राजकीय सहभागात अनेक क्रियांचा (Activities) समावेश होतो. जसे मतदान करणे, राजकारणाची माहिति मिळवणे, राजकारणावर चर्चा करणे, संख्या वाढविण्यासाठी धर्मांतरण करणे, सभांना उपस्थित राहणे, पक्षांना आर्थिक मदत देणे, प्रतिनिधीच्या संपर्कात राहणे, निवडणूकीच्या काळात प्रचार करणे, राजकीय पक्षाचे सभासद होणे, राजकीय भाषण देणे इत्यादी क्रियांचा समावेश राजकीय सहभागात केला आहे.

राजकीय सहभागात प्रामुख्याने पाच प्रमुख कृतींचा समावेश होतो.

## १) मतदान करणे

लोकशाही राजकीय व्यवस्थेत जगभर प्रौढ मतदात पद्धतीचा स्वीकार केलेला आहे. २१ वर्ष पूर्ण केलेल्या सर्व व्यक्तीना मतदानाचा अधिकार दिलेला असतो. भारतात हा अधिकार १८ वर्षे पूर्ण करणाऱ्यास दिलेला आहे. केवळ मतदान करीत असेल तर तो राजकारणात सहभागी झालेला असतो कारण मतदानाद्वारे ते एका व्यापक राजकीय निर्णय प्रक्रियेत ‘संमती’ किंवा ‘विराधाने’ सहभागी होत असतात.

## २) दबाबगटांचे सभासदत्व

राजकीय व्यवस्थेत अनेक दबावगट व हितसंबंधी गट असतात. वरवर पाहता त्यांचे स्वरुप आर्थिक किंवा सामाजिक असते. पण त्यांचा उद्देश राजकीय

व्यवस्थेतील संरचनेवर म्हणूनच शासनावर दबाव टाकून हितसंबंधाची जपणूक करणारा नियम करुन घेणे हाच असतो. यासाठी नागरिक अनेक दबावगटांचे सभासद होत असतात.

भारतात अनेक जातीच्या संघटना आहेत त्या संघटनेचे सभासदत्व म्हणजे राजकीय सहभाग होय.

## ३) निर्वाचित प्रतिनिधींशी संपर्क ७

नगरराज्यात प्रतिनिधींची गरज नव्हती. मात्र राष्ट्रराज्यानंतर प्रतिनिधीची गरज भासू लागली. प्रत्यक्ष लोकशाहीची जागा अप्रत्यक्ष लोकशाहीने घेतली. परिणामतः प्रतिनिधीमार्फत जनता राज्याचा कारभार पाहू लागली. निवडणूकीच्या काळात प्रतिनिधी हे जनतेशी मतांसाठी संपर्क प्रस्थापित करतात. त्यांची मते मागतात. निर्वाचित झाल्यानंतर प्रतिनिधीशी सामान्य नागरिक संपर्क प्रस्थापित करण्याचा सतत प्रयत्न करीत असतो.

सामान्य नागरिक निर्वाचित प्रतिनिधीना त्यांचे प्रश्न सोडविण्यास सांगतात. प्रथम ते विनंती करतात व नंतर प्रतिनिधीला धमकावतात. काही वेळा निवडणुकीच्या वेळी पाहून घेण्याची धमकी देतात. थोडक्यात निवडणूकीनंतर त्याचा राजकीय सहभाग समाप्त होत नाही. प्रतिनिधि व नागरिक यांच्या मध्ये ते सतत क्रिया-प्रतिक्रीया पार पडत असतात. जे प्रतिनिधी नागरिकांच्या मागण्यांना महत्व देत नाही त्यांना नंतरच्या निवडणूकीत जनता पराभूत करते.

## ४) राजकीय पक्षांचे सभासदत्व

सर्व लोकशाही व्यवस्थेत किमान दोन पक्ष असतात. काही देशात अनेक पक्ष असतात. प्रत्येक राजकीय पक्षाने विशिष्ट विचारसरणी स्वीकारलेली असते व त्या विचारसरणीचा प्रचार व समर्थन तो राजकीय पक्ष करीत असतो. राजकीय पक्ष त्याने स्वीकारलेल्या विचारसरणीचा प्रसार कार्यकर्त्याच्या मार्फत करीत असतात. हे प्रसार करणारे कार्येकर्ते त्या पक्षाचे सक्रिय सभासद असतात.

प्रत्येक शहरात, खेड्यात राजकीय पक्षाचे कार्यकर्ते असतात व त्यांच्यात दरवर्षी भर पडत असते. राष्ट्रीय पक्षाचे कार्यकर्ते संपूर्ण देशात असतात. प्रादेशिक कार्यकर्त्यांची सीमा त्या राज्यापूरतीच मर्यादित असते. लोकशाहीत नागरिक कोणत्याही पक्षाचा सभासद होऊ शकतो. तो सक्रिय सभासद होऊ शकतो. या सक्रिय कार्यकर्त्यांचा निर्वाचित प्रतिनिधीवर अतिशय प्रभाव असतो. सर्वच राजकीय पक्ष राजकीय भरतीचे (Recruitement) काम करीत असतात. राजकीय सहभागाच्या क्षेत्रात पक्षाचा वाटा मोठा असतो.

साम्यवादी देशात राजकीय सहभाग खुला नसतो. एकच पक्ष असतो व तो पक्ष त्याने

ठरवलेल्या अटी तो पूर्ण करतो. त्यास सभासद करतो. त्याचा परिणाम रशियात साम्यवादी व्यवस्था होती तेव्हा केवळ दोन टक्के लोक राजकीय पक्षातंर्गत राजकीय सहभागात होते. चीनमध्ये पक्ष भरतीसाठी अतिशय कठोर नियम आहेत. त्यामुळे तेथे राजकीय सहभाग मर्यादित आहे.

## ५) प्रचार कार्याद्वारा सहभाग

निवडणूकीच्या काळात व इतर वेळी देखील सर्वच राजकीय पक्ष त्यांनी स्वीकारलेल्या विचारसरणीचा प्रचार व प्रसार करीत असतात. पत्रकाद्वारे, भाषणाद्वारे, प्रत्यक्ष जनसंपर्काद्वारे हे कार्य होत असते. विचारसरणी प्रभावी असेल तर ती निश्चतपणे राजकीय सहभागास वाढवते. या संदर्भात मार्सवादी विचारसरणीचे उदाहरण महत्वाचे आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर या विचारसरणीने मोठ्या प्रमाणात लोकांना प्रभावीत करुन राजकीय सहभाग वाढवला होता.

राजकीय सहभागासाठी प्रत्येक देशात काहीना काही घटना घडत असतात. दररोज वृत्तपत्रे या घटनांनी भरलेली असतात. राजकीय पक्ष नेहमीच कोणत्या तरी प्रश्नांच्या शोधात असतात. कारण त्या द्वारे त्यांना सभासदांना सक्रिय करता येते व नवीन राजकीय भरती करता येते.

सामाजिक, आर्थिक प्रश्नावर मोर्चा काढणे, संप व बंदचे आयोजन करण्याचे कार्य पक्षाकडून चालतात. निवडणूकीच्या काळात राजकीय सहभाग वाढतो याचे कारण राजकीय पक्षच असतो. अराजकीय प्रश्नावर होण्याऱ्या आंदोलनामुळे देखील राजकीय सहभाग वाढतो. चीपको आंदोलन, सरदार सरोवर आंदोलनामुळे राजकीय सहभाग निश्चित वाढलेला आहे.

## ७.२.५रॉबर्ट ढॉलचे विश्लेषण

रॉबर्ट ढॉल या राजकीय विश्लेषणकाराने त्यांच्या 'मॉडर्न पोलिटिकल ॲनालिसीस' (आधुनिक राजकीय विश्लेषण) या ग्रंथात राजकीय सहभागाच्या संदर्भात स्वतंत्र दृष्टीकोन मांडलेला आहे. त्यांच्या मते, प्रत्येक समाजात दोन प्रमुख स्तर असतात. (१) राजकीयेतर स्तर, (२) राजकीय स्तर, राजकीय स्तरात (अ) सत्ताशोधक (ब) सत्ताधीश या दोन स्तरांचा समावेश होतो.

राजकीयेतर स्तर : सर्वच देशात या स्तरातील लोकांची संख्या अधिक असते. प्रत्यक्ष लोकशाही जेथे अस्तित्वात होती. अथेन्समध्ये राजकीयेतर स्तर या स्तरातच जास्त लोक होते. या स्तरात अधिक संख्या असते. त्यांची कारणे -

राजकारणात अनेकांना स्वारस्य नसते.

राजकारणापेक्षा इतर क्षेत्रात जास्त अधिक लाभ मिळत असेल तर त्या राजकारणाकडे पाठ फिरवत असतात.

मोठ्या प्रमाणात व्यक्ती कुटूंब कल्याणाला अधिक प्राधान्य देतात.

राजकारण हे क्षेत्र अनेकांना असुरक्षित वाटते. त्यातील अनिश्चितता त्यांना आवडत नाही म्हणून ते राजकारणापासून दूर राहतात.

फार मोठ्या प्रमाणात लोक समाजाबद्दल बेफिकीर असतात. त्याची ही सामाजिक अवस्था त्यांना राजकारणापासून दूर ठेवतात.

राजकीय लाभात इतर व्यवसायासारखे सातत्य नसते. ही आर्थिक कारणे आहेत ती बहुतांश लोकास राजकारणापासून दूर ठेवतात.

## २) राजकारणात भाग न घेण्याचे दुसरे कारण -

राजकारणात भाग घेतला काय किंवा न घेतला काय विशेष परिणाम नाही हे माहीत असल्यामुळे ते राजकीय उदासीन असतात.

स्वतःच्या राजकीय कर्तुत्वावर विश्वास नसल्यामुळे.

राजकीय प्रक्रियेच्या संदर्भात अपुरी माहिती लोकांना राजकारणापासुन दूर ठेवते.

राजकारण म्हणजे धडपड, दगदग, अनेकांना थोडा देखील त्रास घ्यावासा वाटत नाही. उदा. मतदार यादीत नाव आहे किंवा नाही याची खात्री करुन घेणे, अधिकाऱ्यांना त्यासाठी पत्र पाठवणे, आवेदनपत्रे भरणे, भारतात पदवीधर मतदार संघात याच कारणामुळे सभासदसंख्या कमी असते.

३) मोठ्या प्रमाणात व्यक्तींचा स्वभाव संघर्षापासून दूर राहण्याचा असतो. राजकारण म्हणजे विरोध करणे, काही व्यक्तींचा स्वभाव विरोध करण्याचा नसतो. आपणास हे जमणार नाही. आपले हे काम नाही. ही मानसिकता अनेकांना राजकारणापासून दूर ठेवते.

या विविध कारणांमुळे राजकीयेत्तर स्तरातील लोकांची संख्या वाढलेली आहे.

राजकीय स्तर (Political Stratum)

लोकशाहीत हा स्तर इतर कोणत्याही राजकीय व्यवस्थेपेक्षा अधिक असतो. सर्वकष राजकीय व्यवस्थेत हा स्तर अधिक आहे. असे सकृतदर्शनी वाटते. कारण त्या व्यवस्थेत मतदानाचा अधिकार बजावणे बंधनकारक असते. मतदानाच्या अधिकारालाच या व्यवस्थेत कर्तव्याचा भाग करण्यात आलेले असते.

## राजकारणात व्यक्ती भाग घेण्याचे कारण -

अनेकांना असे वाटते की, त्यांच्याजवळ पर्याय आहे.

आपण आपल्या विचारांनी व कृतीनी परिवर्तन करु शकतो.

समाजासाठी कष्ट सोसण्याची तयारी असते.

राजकारणाची व राजकीय प्रक्रियेची माहिती त्यांना राजकारणाकडे आकर्षित करते.

आर्थिक बाजू चांगली असते.

सामाजिक प्रतिष्ठा मिळविण्यासाठी

अनेक शासकीय योजनांचा फायदा मिळविण्यासाठी.

**आर्थिकदृष्टच्या संपन्न असलेल्या व्यक्तींना राजकारण सुरक्षितता प्रदान करते. यामुळे राजकीय सहभाग वाढतो.**

## सत्ताशोधक व सत्ताधीश

जागातील सर्व नागरिकांचा राजकीय सहभाग हा सारखा नसतो. जसे व्यक्ती
फक्त मतदानाला जातात.
काही सभांना जातात.
पक्षाचे सहानुभूतीदर्शक असतात.
पक्षाचे सक्रिय सभासद असतात.
निवडणूकीत भाग घेतात.
पक्षातर्फे उमेदवार असतात.

निर्वाचित होऊन पदाधिकारी होतात. या सर्वांचा समावेश राजकीय स्तरात होतो. यापैकी सर्वानाच सत्ता मिळत नाही, पण सर्व सत्तेच्या शोधात असतात.

१) सत्तशोधक :- सत्ताशोधक सर्वच असतात. पण सर्वांना सत्ता लवकर मिळत नाही.

(अ) काही व्यक्तिना सत्तेची संधी लवकर मिळत नाही. (ब) काही व्यक्तिना सत्तेची संधी लवकर मिळते. (क) काहींना सत्ता उशिरा मिळते. (ड) सत्ता कधीच प्राप्त होत नाही.

सत्ताप्राप्ती हीच ज्यांची विचारसरणी आहे त्यांना ती लवकर मिळते. जे सत्तेसाठी तडजोड स्वीकारतात. विचारांना काही काळासाठी बाजूला ठेवतात त्यांना सत्ता मिळते पण उशीर लागतो. मात्र जे सत्ताप्राप्तीसाठी कोणतीच तडजोड करीत नाही त्यांना कधीच सत्ता मिळत नाही. अनेक अभ्यासकांनी व विचारवंतांनी 'स्वहित' या घटकालाच महत्व दिले आहे. राजकारणाचे बदलते स्वरुप व त्यात कार्य कारणाऱ्या प्रभावी वृत्ती व प्रवृत्ती दाखवतात की 'स्वहित' याचा सर्वात जास्त राजकीय सहभागावर प्रभाव आहे.

फ्राइड विचारवंताच्या मते, 'स्वहित हीच राजकीय सहभागाची प्रमुख प्रेरणा असते.'

याला थॅमिमकसने पाठींबा देवून असे सांगितले की, 'स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीच व्यक्ति राजकारणात सहभागी होतात.'

## सत्ताधीश

यात अनेक स्तर असतात. स्थानिक स्वराज्य संस्थेचा सभासद ते देशाचा पंतप्रधान अशा वरिष्ठ पासून ते कनिष्ठ त्या पातळ्या असतात.

भारतास स्वातंत्र्य मिळाले तेव्हा राजकीय सहभाग कमी होता. अनुसूचित जाती व जमातींना प्रतिनिधित्वात, शिक्षणात, नोकरीत राखीव जागा दिल्यामुळे राजकीयेतर स्तरात असणारा हा वर्ग राजकीय स्तरात आला. सत्ताशोधक व सत्ताधीश झाला. मंडल आयोगाच्या शिफारसी स्वीकारल्या नंतर संख्येने कमी असणाऱ्या अनेक जाती राजकीय सहभागात सक्रिय झाल्या. शाहाबानो प्रकरण तसे राममंदिर प्रश्नांमुळे धार्मिक राजकारणाला गती मिळाली व राजकीय सहभाग वाढला. धर्माचा, जातीचा सत्तेसाठी वापर करणे हे लोकशाही तत्वाच्या

विरोधात आहे असे असतांना भारतात मात्र त्यांनीच राजकीय सहभागाचे क्षेत्र व्यापक केले आहे असे चित्र आपणास पहावयास मिळते.

## ७.२.६ राजकीय सहभागाची पातळी व प्रवृत्ती :

राजकीय सहभागाच्या संदर्भात ज्या विविध पातळ्या आहेत त्या प्रवृत्तीशी निगडीत असतात. मोठ्या प्रमाणात राजकीयेतर स्तर ही एक पातळी व राजकीय स्तर ही दुसरी पातळी.

राजकीय स्तर :- राजकीय स्तरात राष्ट्रपती, पंतप्रधान, मुख्यमंत्री ते ग्रामपंचायत सभासद किंवा स्थानिक स्वराज्य संस्था सभासद इतक्या पातळ्या असतात. प्रत्येक पातळीसाठी लोकांचा कमी-अधिक धडपड लागते. कमी-अधिक क्षमता अपेक्षित असते. तसेच कमी-अधिक आर्थिक क्षमता अपेक्षित असते. स्थानिक स्वराज्य संस्थेचा सभासद हा संसदेचा होण्यासाठी फारसा प्रयत्नशील नसतो. प्रांतीक नेते राष्ट्रीय राजकारणात (काही अपवाद वगळल्यास) जाण्यास नाखुस असतात असे आपल्या निदर्शनास येते.

राजकीय सहभागाच्या पातळ्या अभ्यासकांनी आकृतीच्या आधारे दाखवल्या आहेत. यात मिलबॅथ या अभ्यासकाने केलेला आकृतीबंध पुढीलप्रमाणे
सर्वच देशात ७० पेक्षा अधिक लोक 'दिखाऊ स्वरुपाचे प्रकारात मोडतात.' ''अधिक कौशल्यपूर्ण प्रकारात'' एक टक्का देखील लोक राजकीय स्तरातील नसतात. 'संक्रमणशील स्वरुपाचा प्रकार' यात येणाऱ्यांशी संख्या अधिक असते. पण या पातळीत कमी लोक टिकतात. प्रा. मिलबॅथ यांनी अमेरिकेला केंद्रबिंदू मानून या पातळ्या निश्चित केल्या असे असले तरी स्थूल मानाने सर्वच देशात थोड्याफार फरकाने अशी स्थिती सर्व ठिकाणी पहावयास मिळते.

रुस व अत्थॉफ या अभ्यासकाने राजकीय सहभागाच्या पातळ्या पुढीलप्रमाणे सांगितल्या -

### ७.२.६.१ नेतृत्व

नेतृत्व म्हणजे केवळ विशिष्ट गुणवत्ता असलेले व्यक्तित्व नसून एखाद्या समुहाच्या सदस्यांतील ती एक असा कार्यात्मक संबंध होय की, ज्यानुसार त्या समुहाच्या कार्यातील सक्रिय सहभाग व स्वतःच्या समुहाने ते कार्य यशस्वी करण्याची क्षमता यामुळे नेत्याने विशिष्ट स्थान निर्माण होते.

नेता नेतृत्व करतो म्हणजे आपल्या सहकाऱ्यांना व्यक्तिगतरित्या व सक्रीयपणे सोबत घेऊन राजकीय सहभागाद्वारे ध्येय प्राप्तीचा प्रयत्न करतो. हे त्यांच्या क्रियाशीलतेतून व्यक्त होते.

सामाजिक व आर्थिक बदलामुळे आजच्या राजकीय व्यवस्थेत वेगवेगळ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्यांची दखल शासकीय नेतृत्वाला घ्यावी लागते. राजकीय सहभागामुळे जनता आपले पुढारी विधीमंडळात निवडून देतात या निवडलेल्या व्यक्तितून मंत्र्यांची निवड होते. हे मंत्री पक्षांशी एकनिष्ठ असतात. हे मंत्री शासकीय पुढारी असतात

म्हणून सहभागाला नेतृत्व देण्याची जबाबदारी जनतेवर आलेली आहे.

राजकीय नेत्यासंबंधी निरनिराळ्या कालखंडात व विविध देशात भिन्न संकल्पना दिसून येतात. आधुनिक व पारंपारिक संदर्भात नेतृत्वाचा विचार करता येतो. या दोन्ही नेतृत्वात एक महत्वपूर्ण भेद आहे. पारंपारिक नेतृत्व प्रामुख्याने विशिष्ट समुह जात/वर्ग यांच्या सदस्यांमुळे आणि विशिष्ट प्रतिष्ठा व स्थान यामुळे निर्माण होत असे, परंतु आधुनिक काळात नेतृत्वाचा विचार वेगवेगळ्या भूमिकेतून केला जावून त्यावरुन राजकीय सहभाग निश्चित होतो.

- १८ व्या शतकापासून प्रत्यक्ष लोकशाही व जनतेची सार्वभौम सत्ता या संकल्पनेचा उदय झाला. यामुळे राजकीय चळवळी, राजकीय घटना, नेतृत्व या क्षेत्रात काही बदल होण्यास सुरुवात झाली. त्याच प्रक्रियेतुन नेतृत्वाऐवजी समूह नेतृत्वाला राजकीय सहभागात अधिक महत्व प्राप्त झाले.
- २० व्या शतकातुन समाजात आढळणारी असुरक्षितपणाची भावना, समता आणि प्रगती या मुल्यांवर दिला जाणारा भर, यामुळे राजकारण व राजकीय सहभाग यांचे स्वरुप व्यापक प्रमाणात बदलत गेले. परिणामः नेतृत्वाकडे पाहण्याचा दृष्टकोन सुद्धा बदलला.
- आधुनिक काळात तंत्रज्ञान व वैज्ञानिक क्रांतीमुळे प्रचंड गतिमानता निर्माण झाली आहे. सामाजिक जीवन सुद्धा अतिशय गतिमान झाले आहेत. त्यामुळे संघर्ष व समस्या निवारण यासाठी त्वरीत निर्णय घेणारी नेतृत्व जनतेला जास्त उपयुक्त वाटते. त्यामुळे जनतेचा सहभाग वाढण्यास मदत होते. नेतृत्वाचे केंद्र विधीमंडळाकडून कार्यकारी मंडळाकडे गेले आहे. कार्यकारी प्रमुखाच्या हाती नेतृत्व आणि सत्ता यांचे केंद्रीकरण होत चालले आहे.
- नभोवाणी, दुरदर्शन, वृत्तपत्रे इ. संसुचनाच्या आधुनिक साधनामुळे कार्यकारी विभागाचा जनतेशी प्रत्यक्ष संपर्क मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे पक्ष संघटनेवर शासकीय नेतृत्वाचे नियंत्रण आणि प्रभाव वाढत्या प्रमाणात वाढून सहभाग वाढण्यास मदत झाली आहे.
- कल्याणकारी राज्याच्या कल्पनेमुळे जनतेच्या राजकीय सहभागाचे व शासकीय कार्यक्षेत्र सतत वाढत आहे. त्याचा परिणाम सनदी लोकशाही संघटनात्मक बल प्रचंड प्रमाणात वाढले आहे. नोकरशाहीची संघटीत शकती कार्यकारी विभागाच्या नेत्यांना निर्धारित धोरणाच्या अंमलबजावणीसाठी उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे कार्यसिद्धीची त्याची क्षमता इतर राजकीय नेत्यापेक्षा जास्त असते.
- वाढत्या प्रमाणावरील औद्योगिकीकरणामुळे विशेषीकरणाचे प्रमाण वाढत आहे.

त्यामुळे समाजात हितसंबंधी गट व दबावगट यांची संख्या व क्षेत्र वाढत आहे. याचा परिणाम म्हणजे समाजातील नेतृत्व विशिष्ट सत्ताधारी वर्गात केंद्रीत न राहता विस्तारित झालेले असून त्याचा परिणाम राजकीय सहभागावर झालेला दिसून येतो.

- आधुनिक काळातील विशेषीकरणाचा एक परिणाम म्हणजे व्यावसायिक राजकारणी नेतृत्वाचा उदय होय. हे नेतृत्व विशिष्ट ज्ञान व संघटनात्मक कौशल्य यावर अवलंबून असते. परंतु त्याला जनतेचा पाठिंबा आवश्यक असत्याने राजकीय सहभागाचे महत्व वाढत असल्याचे निदर्शनास येते.

  सर्व सामान्य अनुयायी व जनतेला प्रसंगी क्रियाशील होणाऱ्या नेतृत्वापेक्षा सतत कार्य करीत राहणाऱ्या व्यावसायिक नेत्याशी संपर्क साधने सोपे असते. तसेच आपल्या भूमिका सर्वोच्य नेत्यापर्यंत नेऊन पोहचवणे त्यांना लाभदायक वाटते. परिणामी जनता आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी राजकीय सहभाग घेवून नेतृत्वाला पाठींबा देतात.

## ७.२.७राजकीय सहभागावर राजकीय पक्षाची भूमिका

लोकशाही शासनपद्धतीची कल्पना आपण राजकीय पक्षांशिवाय करु शकत नाही. लोकांच्या इच्दा आकांक्षाचे प्रतिक म्हणून लोकशाहीत राजकीय पक्षांना अत्यंत महत्वाची कार्ये पार पाडावी लागतात. लॉवेल च्या मते, 'सर्व लोकांचे सरकार म्हणजे लोकशाही ही केवळ कल्पनाच असते.' शेवटी सरकार हे बहुमत असलेल्या पक्षांचे असते. राजकीय पक्षांच्या कार्यामुळे राजकीय पक्षांचे व राजकीय सहभागाचे महत्व वाढते. राजकीय पक्षाच्या पुढील विविध कार्याचा फायदा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी होत असतो.

- निवडणुकीच्या माध्यमाने देशाचे राज्यकर्ते कोण व्हावे हे ठरविले जाते. त्यामुळे निवडणूकीच्या साह्याने सत्ता प्राप्त करणे हे राजकीय पक्षाचे मुख्य कार्य असते. त्यासाठी उमेदवार निश्चित करणे, पक्षयंत्रणा उभी करणे, निवडणूक निधी गोळा करणे, निवडणूक प्रचाराला गती आणणे, निवडणूकीचे डावपेच आखून जनतेच्या भावना लक्षात घेवून व त्यांचा सहभाग वाढवून निवडणूक यशस्वी करण्याचा प्रयत्न राजकीय पक्षाकडून केला जातो.
- कोणतीही राजकीय व्यवस्था कार्यक्रमाची आखणी करतात. म्हणजे जे आपल्या पक्षाच्या ध्येयधोरणाचीच आखणी करतात. निवडणूकीत जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी त्याला निश्चित अशा कार्यक्रमाची आखणी करावी लागते. विरोधी पक्षही लोकमत जागे करणे, सरकारवर टिका करणे या धोरणाची अंमलबजावणी करतात. त्यांचा फायदा जनतेत जागरुकता येवून त्यांचा सहभाग वाढण्यास मदत होते.
- राजकीय पक्ष जनता व सरकार यात योग्य ते संबंध स्थापन करतात. तसेच ते

जनतेला व्यवस्थित कामाची माहिती देतात. त्यामुळे राजकीय व्यवस्थेला लोकांचा पाठिंबा मिळवणे शक्य होते. विरोधी पक्ष असेल तर ते राजकीय व्यवस्थेत केलेल्या चुका लोकांच्या निदर्शनास आणतात. राजकीय पक्षातील विरोधी पक्ष व्यवस्थेच्या कार्यपद्धतीवर व धोरणावर टीका करतात व सरकार विरोधी लोकमत तयार करतात. त्यासाठी ते सतत जनतेशी संपर्क ठेवतात. अशा प्रकारे जनता आणि सरकार यांच्यातील दुवा म्हणून राजकीय पक्ष कार्य करतात. त्याचा फायदा जनतेत जबाबदारीशी जाणिव निर्माण होवून जनतेचा सहभाग वाढविण्यात पक्षाची भूमिका महत्वाची ठरते.

राजकीय पक्ष राजकीय समस्यांचा सतत विचार करीत असतात त्यासंबंधीच्या उपाययोजना सुचवित असतात. रेडिओ, वृत्तपत्रे, टि.व्ही., इंटरनेट या सारख्या जनसंपर्काच्या साधनांच्या आधारे राज्यासमोर कोणत्या समस्या आहेत याची माहिती ते सतत जनतेला देत असतात. लोकांना राजकीय शिक्षण देऊन ते समस्यांच्या बाबतीत लोकांना सतत जागे ठेवतात त्याचा फायदा राजकीय सहभाग वाढविण्याकरिता होतो.

- लोकशाही म्हणजे जनतेचे राज्य होय. लोकांना राजकारणात व राज्यकारभारात सहभागी करुन घेणे हे फार महत्वाचे असते. राजकारणाबद्दल लोकांच्या मनात आशा निर्माण करणे व त्यासाठी सभा, संमेलने, शिबिरे या विविध माध्यमांतून ते लोकांशी सतत संपर्क साधून असतात. लोकांना राजकीय दृष्ट्या परिपक्व बनवितात. या त्यांच्या सातत्याच्या कार्याने जनतेचा राजकीय सहभाग सक्रीय करण्यात राजकीय पक्षाची भूमिका महत्वाची आहे.
- राजकीय शिक्षण देणाऱ्या शाळा म्हणजेच राजकीय पक्ष होय. देशापुढील प्रश्न हाती घेऊन राजकीय पक्ष जनतेत मोठ्या प्रमाणात जागृकता निर्माण करतात. जाहीरसभा, प्रचार मिरवणुकी, मेळावे यांच्या सहाय्याने जनतेस शिक्षण देण्याचे कार्य राजकीय पक्षांकडून केले जाते. विशिष्ट कार्यक्रम आणि योजना जनतेसमोर मांडून जागृत लोकमत घडविण्याचे अत्यंत महत्वाचे कार्य राजकीय पक्ष पार पाडीत असतात. त्याचा फायदा जनतेचा राजकीय सहभाग वाढविण्यात होतो.
- पक्षाची बांधणी करणे हे राजकीय पक्षाचे महत्वाचे कार्य असते. लोकशाहीतील निवडणूकांवर त्या पक्षाची परिस्थिती आणि भवितव्य अवलंबून असते. कष्टाळू, प्रामाणिक, त्यागी, ध्येयवादी कार्यकर्त्यांचा संच उभारण्याचा प्रयत्न प्रत्येक राजकीय पक्ष पार पाडतो. तळापासून वरपर्यंत विविध स्तर पक्षाला निर्माण करावे लागतात. पक्षाची बांधणी जितकी मजबूत तितके पक्षाचे भवितव्य चांगले राहते. यासाठी विविध स्तरावरील पक्ष संघटना आपले पक्षाचे सभासद वाढविण्यासाठी प्रयत्न करतात. त्याचा परिणाम राजकीय सहभाग वाढण्यास होतो.

- निवडणूका संपल्यानंतर सत्तारुढ पक्षांस आपल्या कार्यक्रमाची फेरआखणी करावी लागते. निवडणूक जिंकलेल्या सर्व उमेदवारांना एकत्र आणून पुढील आखणी केली जाते. विरोधी पक्षास काही भरीव कार्यक्रम जनतेसमोर ठेवावे लागतात. सत्तारुढ पक्षावर टिका करणे आणि त्या दृष्टीने जनतेचे प्रबोधन करणे हे काम त्यास पार पाडावे लागते. यामुळे सत्तारुढ पक्षावर एक प्रकारचा नैतिक दबाव आणला जातो. राजकीय पक्षाच्या या धोरण आखणीमुळे जनता सतत जागरुक होवून पक्षनितीवर लक्ष ठेवत असते. त्या आधारावर सत्ता कोणत्या पक्षाच्या हातात द्यावी याबाबत मतदानाच्या राजकीय प्रक्रियेत सहभागी होवून निर्णय घेते.
- लोकशाहीत सत्ता मिळविणे. ती टिकविणे यासाठी पक्ष सतत जागरुक असतात. त्यासाठी विरोधी पक्ष सत्तारुढ पक्षावर नियंत्रण ठेवत असतात. लोकांच्या तक्रारीचे निवारण करण्यावर लोकप्रयता अवलंबून असते. काही वेळेस विशिष्ट भागाचे प्रश्नही राजकीय पक्ष नेटाने उचलून धरतात. पक्षाच्या या कार्यपद्धतीचा परिणाम राजकीय सहभागावर पडत असतो.
- राजकीय पक्ष केवळ नेमून दिलेली कामेच पार पाडतात असे नव्हे तर समाजात राजकीय जीवनाच्या दृष्टीने पोषक अशी मनोवृत्ती लोकांमध्ये निर्माण करतात. ते नुसती राजकीय जागृती घडवितात असे नाही तर लोकांच्या राजकीय वर्तनात विशिष्ट अशी राजकीय मूल्ये निर्माण करतात. पक्षाच्या विचारसरणीशी लोकांची बांधिलकी निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्याचा फायदा सत्ताप्राप्तीसाठी व्हावा हा त्यांचा मुख्य उद्देश असतो. या सामाजिकीकरण प्रक्रियेतून राजकीय सहभाग वाढण्यास मदत होते.
- आज जगातील अनेक राष्ट्रात लोकशाही शासन व्यवस्था आहेत. हे शासन राजकीय पक्षच स्थापन करतात. राजकीय पक्षाच्या आधारावर सरकार निवडून येते. म्हणून लोक त्या सरकारला मान्यता देतात. त्यास अधिकृत सरकार असे मानतात. राजकीय पक्ष लोकातील मतभेद कमी करतात आणि इतर महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडतात. परंतु पुढील निवडणूक प्रसंगी पक्षाला जनता दरबारी जावे लागते. त्यांच कार्याची माहिती जनतेला द्यावी लागते. त्यामुळे राजकीय सहभाग वाढण्यास मदत होते.

### ७.२.८ राजकीय सहभागात दबावगटाची भूमिका

आधुनिक काळात दबावगट ही एक अत्यंत प्रभावी व महत्वपूर्ण राजकीय शक्ती मानली जाते. पूर्वीचे राजकारण एखाद्या व्यक्तिचा राज्यकारभार असे. आता लोकशाहीच्या उदयामुळे आपल्या विविध मागण्या पुढे घेऊन समाजातील विविध स्तरांतील लोक राजकीय सहभाग घेवू लागले. हितसंबंधी गट सर्व प्रकारचे दबाव शासनावर आणून आपल्या मागण्या मान्य करुन घेऊ लागले. यासंदर्भात आल्ड्खेड डी गाझा यांनी म्हटले आहे की, '' संपूर्ण राजकीय प्रक्रिया ही हितसंबंधी गटाचे राजकारण झालेली आहे. या दबावगटाचे आज राजकारणात महत्व वाढले आहे.''

- राजकीय प्रक्रियेमध्ये राजकीय पक्ष प्रत्यक्षरित्या सहभागी होऊन महत्वाची भूमिका बजावतात त्याचप्रमाणे इतर अनेक सामाजिक, आर्थिक व्यावसायिक, धार्मिक व सांस्कृतिक गट आपल्या सभासदांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी शासनावर दबाव आणून अप्रत्यक्षरित्या राजकीय प्रक्रियेत सहभागी होत असतात.
- सामाजिक जीवनात गट स्थापन करण्याची प्रक्रिया फार पूर्वीपासून चालू आहे. वांशिक सामाजिक, आर्थिक, आधारावर आधारलेले वेगवेगळे गट समाजात तयार झालेले आहेत. सामाजिक स्तरावर आधारलेले कुटूंब, जाती यासारखे गट तर संपत्तीच्या आधारावर निर्माण झालेले गरीब-श्रीमंत असे गट, श्रेष्ठ वर्ग-कनिष्ठ वर्ग असे गट समाजात पूर्वीपासून पडलेले आहेत या गटात जनता सहभागी होते.
- दोनशे वर्षपूर्वी दबावगटांची भाषाच नव्हती. फक्त संसदेच्या किंवा कायदेमंडळाच्या सभागृहातील प्रतिनिधी कोणकोणत्या हितसंबंधाचे प्रतिनिधीत्व करतात एवढे जाणून घेणे पुरेसे होत असे. परंतु आज प्रत्येक खासदार हा केवळ विशिष्ट समूहाचा प्रवक्ता ठरला असून ते समूहच त्यांना आपले प्रतिनिधी म्हणून केव्हा कोणती भूमिका घ्यायची हे बजावत असतात. म्हणून आज दबावगटाला कायदेमंडळाच्या पाठीमागची कायदेमंडळे असे स्वरूप प्राप्त झाले आहे. अमेरिकन राजकीय व्यवस्थेत कायदेमंडळाचे तिसरे सभागृह म्हणून दबावगआंना ओळखले जाते. डॉ. फायनर यांनी दबावगटाचे वर्णन 'निनावी साम्राय' असे केले आहे.
- जगातील वेगवेगळ्या राजकीय व्यवस्थेत दबावगटांना वेगवेगळ्या कारणांनी महत्व प्राप्त झाले आहे. इंग्लंड आणि अमेरिका या देशांतील दबावगट तेथील दोन्ही पक्षांवर दबाव ठेवून असतात. स्वित्झर्लंडच्या बहुपक्षीय राज्यव्यवस्थेत दबावगट एकेका पक्षाशी संलग्न असतात. डॉ. फायनर म्हणतात की, 'जेथे राजकीय पक्ष तत्वतः आणि संघटनात्मकदृष्ट्या कमकुवत असतात तेथे दबावगटांची भरभराट ही होणारच. जेथे राजकीय पक्ष बलवान असतात तेथे दबावगटांवर नियंत्रण बसणरच. इंग्लंडमध्ये राजकीय पक्ष तत्वतः व संघटनात्मकदृष्ट्या प्रबळ आहेत. त्यामुळे इंग्लंडमधील दबावगट अमेरिकेतील दबावगटापेक्षा कमी प्रभावी आहेत. इंग्लंडमधील राजकीय पक्ष हे मोठ्या प्रमाणावर हितसंबंधाचा संयुक्त आघाड्या आहेत.''
- इंग्लंड आणि अमेरिका या दोन्ही राजकीय व्यवस्थेमधील दबावगटांचे महत्व व भूमिका हुबेहुब सारख्यात असतात असे नाही. अध्यक्षीय आणि संसदीय शासनपद्धतीतील तफावतीचा परिणाम दबावगटांचा भूमिकांवर पडल्यावाचून राहत नाही. अमेरिकेत इंग्लंडप्रमाणे सरकारकडे कायदेविषयक पुढाकाराचा अधिकार नसतो. इंग्लंडचा प्रधानमंत्री कायद्याच्या निर्मितीबाबत जेवढी निर्णायक भूमिका पार पाडतो तेवढी अमेरिकेच्या राष्ट्रपतींना शय नसते. कॉंग्रेसचीच

भूमिका त्यापेक्षा प्रचंड व्यापक असते. अमेरिकेचे सरकार सत्ताविभाजनाच्या सिद्धांतावर आधारित असल्यामुळे असे होणे स्वाभाविकच आहे तरी पण राष्ट्रपती व काँग्रेस यांच्यामध्ये सहमती असल्याखेरीज कायदामंजूर होण्याची शक्यता कमीच असते. त्यामुळे अमेरिकेत काँग्रेसच्या सभासदांना व्यक्तिशः आणि काँग्रेस अंतर्गत समित्यांना आपल्या प्रभावाखाली घेण दबावगटांसाठी गरजेचे असते. अमेरिकेच्या दबावगटांचे आणखी एक वैशिष्ट्ये असे की, विविध दबावगट प्रतिनिधी आणि काँग्रेसच्या दोन्ही सभागृहाचे सभासद यांच्यात सामाजिक संवादाचे नेहमीचे मार्ग अभावानेच असल्यामुळे दबावगट आपल्या व्यावसायिक प्रतिनिधीकडून खासदारांशी संपर्क ठेवतात आणि हे प्रतिनिधी सर्व रचनात्मक मार्गाचा अवलंब करुन आपल्या सभासदांचे हितसंबंध सुरक्षित करुन देतात. हे प्रतिनिधी दबावगटाच्या वतीने म्हणजेच लॉबीइंग पद्धतीने शासनाला प्रभावीत करण्याचा प्रयत्न करतात.

- भारतातील आणि महाराष्ट्रातील दबावगटांचा विचार केला असता असे म्हणता येईल की दबावगट शासनाला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक कार्याची जाणिव आणि जबाबदारी समजावून देण्याची भूमिका पार पडतात. उद्योगपती, व्यापारी, शेतकरी, कर्मचारी, कामगार, शिक्षक विद्याथी, महिला अशा विविध गटांचे हितसंबंध जोपासून समाजव्यवस्थेत समतोल साधण्याचे कार्य सरकारला करावे लागते. ज्या हितसंबंधी गटाकडे शासनाचे दुर्लक्ष होते, त्या गटाकडून शासनावर दबाव आणला जातो. शासनाला जागे केले जाते. देशाच्या प्रशासनात सातत्य, कार्यक्षमता आणि स्थैर्य निर्माण करण्यासाठी दबावगटांची गरज असते. दबावगटांचा प्रभाव हा त्यांच्या सूत्रावर आणि कार्यावर अवलंबून असतो. भारतातील कामगार संघ, व्यापारी संघटना, विद्यार्थी संघटना, कर्मचारी संघटना, शिक्षक संघटना या आकाराने मोठ्या असून त्यांच्याकडे विपुल साधन सामग्री असते. हितसंबंधी गट जेवढे आर्थिक दृष्ट्या संपन्न असतात तेवढे ते शासनावर अधिक प्रभाव पाडू शकतात त्यामुळे त्या संघटना अधिक प्रभावी ठरतात. दबावगटाला कुशल नेतृत्व लाभले तर दबावगट अधिक चांगल्या प्रकारे शासनावर प्रभाव पाडू शकतात. त्यामुळेच भारतातील कर्मचारी, कामगार, शिक्षक, विद्यार्थी यांच्या संघटना प्रभावीपणे कार्य करुन आपल्या मागण्या मंजूर करुन घेतात. पाश्चात्य देशात दबावगटांना जेवढे महत्व दिले जाते. तेवढे महत्व भारतात दिले जात नाही. अजूनही भारतातील राजकारणात दबावगटांचे कार्य मर्यादित आहे.
- आजची राजकीय व्यवस्थाच गटाधिष्ठीत बनली आहे. लोकांनाही आपल्या गरजा व्यक्ति सामर्थ्यातून पूर्ण करता येत नाहीत म्हणून दबावगटांचा आधार घेऊन आदान प्रक्रिया सुरु होते. त्यामुळे आजही दबावगटाचे खूपच महत्व वाढले आहे. आज राजकीय व्यवस्थेत निरनिराळ्या वर्गाच्या हितसंबंधाना आधार

मिळाला आहे. त्याचेही श्रेय दबावगटांनाच द्यावे लागते त्यामुळे आजच्या राजकीय व्यवस्थेला लोककल्याणकारी राज्याचे स्वरुप हे प्रामुख्याने दबावगटामुळे प्राप्त झाले आहे. हे मान्यच करावे लागते. आज दबावगट हे केवळ आवश्यक नाहीत तर फायदेशीर आहेत अशी भूमिका घेतली जात आहे. दबावगटामुळे धोरण ठरविण्याच्या प्रक्रियेतून अधिकाधिक लोकांना सहभाग घेता येतो. सरकार आणि लोक यांतील सुसंवाद अधिक मोठ्या प्रमाणात साध्य झाला आहे. राजकीय पक्षांना पूरक असे स्वरूप आज दबावगटांना प्राप्त झाले आहे. राजकीय पक्ष सर्व कामे करु शकत नाहीत. अशी कामे दबावगट पार पाडतात.

## ७.२.९ लोक चळवळी -

लोकशाही स्वीकार केलेल्या राष्ट्रात नागरिकांना स्वातंत्र्यांचा अधिकार प्राप्त झाला. या स्वातंत्र्याचा परिणाम काही नागरिकांनी अधिकाधिक संपत्ती कमविण्यासाठी केला. त्यातून समाजात श्रीमंत व गरीब असे दोन वर्ग निर्माण झाले या दरम्यान इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीतून भांडवलदार व कामगार अशी समाजाची विभागणी झाली भांडवलदारांनी विविध युत्या योजून अधिकाधिक नफा मिळविण्याचा प्रयत्न केला. आपल्या मालाला हक्काची वसाहत व बाजारपेठ मिळावी या हेतूने साम्राज्यवादी धोरणाचा स्वीकार करण्यात आला. इंग्लंड, पोर्तुगीस, फ्रान्स या राष्ट्रांनी जगातील अनेक राष्ट्रावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले आपल्या हितासाठी साम्राज्य स्थापित केलेल्या देशावर अन्याय व अत्याचयाराला सुरुवात केली. तेव्हा या साम्राज्यवादाच्या जोखडातून स्वतःची सुटका करण्यासाठी तेथील जनतेने आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. आपल्या भारत देशात अहिंसेचे पुजारी असलेल्या मं. गांधीनी शांततेचा, सविनय कायदेभंगाचा मार्ग स्वीकारला. ब्रिटिशांच्या साम्राज्याला विरोध करण्यासाठी सत्याग्रह, असहकारच्या मार्गात संप, हरताळ, उपोषण, घेराव, धरणे, बहिष्कार, हिजरत इत्यादी मार्गाचा अवलंब करण्यात आला. यात देशातील अनेक सहभागी झाले. समाजातील ज्या व्यक्तिंना म. गांधीचा हा मार्ग मान्य नव्हता त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतात प्रादेशिकता, भाषिकता, जातीयता, धर्माच्या नावावरुन विविध चळवळी झाल्या. या चळवळीतील लोकांनी राजकीय सहभाग घेतलेला आहे. हिंदीला राष्ट्रभाषेचा दर्जा देण्याच्या बाबतीत विचार सुरु होता. याला दक्षिण भारतीय लोकांनी विरोध केला. या विरोधासाठी झालेल्या चळवळीत मोठ्या प्रमाणात युवक वर्ग सहभागी झाला. सध्या पाणी प्रश्न, पर्यावरणाच्या समस्या संदर्भात लोक जागृत झालेले आहे. देशातील विविध अशासकीय संघटना स्वयंस्फूर्तपूर्ण यात कार्य करीत आहे. या चळवळीची परिणामकारकता वाढविण्यासाठी जास्तीत जास्त लोकांना सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न केला जातो. संयुक्त महाराष्ट्राच्या संदर्भात झालेल्या चळवळीत अनेक लोकांनी आपला सहभाग नोंदविला होता.

देशातील अनेक सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात जसे अस्पृश्यता निवारण, जातीयता नामांतराचा प्रश्न याबाबतीतही लोक चळवळी झाल्या. त्याचाच परिणाम चळवळ जितकी व्यापक व तीव्र तितके त्याला यश अपेक्षित आहे. भारताप्रमाणे जगातील अन्य देशातही सामाजिक, धार्मिक, अर्थिक प्रश्नांवरुन लोक चळवळी झाल्या. काही देशात लोक चळवळीतून

सत्तांतर घडून आले. लोक चळवळीतील जनतेचा सहभाग किती प्रमाणात आले त्यावर त्याची यशस्वीतता अवलंबून असते.

## ७.३ सारांश

प्रत्येक राज्यातील व्यवस्थेत राजकीय सहभागाला महत्व असते. राजकीय व्यवस्थेच्या सातत्यासाठी व स्थिरतेसाठी जनतेच्या राजकीय सहभागाला प्रोत्साहन दिले जाते. सत्तास्थानी असलेल्या गट अनेकांच्या राजकीय सहभागासाठी सतत प्रयत्नशील असतात. परंतु लोकशाही असलेल्या अनेक देशात राजकीय सहभाग कमी आहे. सर्व प्रकारच्या राजकीय व्यवस्थेत सत्तेला सहमती आणि असहमती दर्शविणाऱ्या, सर्व क्रिया-प्रतिक्रियांची सर्व पातळीवरील सर्व मार्गाने होणारा राजकीय सहभाग असतो. राजकीय सहभागात मतदान करणे, दबावगटाचे सभासदत्व स्वीकारणे, निर्वाचित प्रतिनिधीशी संपर्क साधणे, राजकीय पक्षाचे सभासदत्व स्वीकारणे व प्रचार कार्यात सहभागी होणे आदी बाबींचा समावेश होतो. राजकीय सहभाग व्यक्तिच्या उद्देशाव अवलंबून असतो.

राजकीय सहभाग वाढला कारण राज्याचे कार्यक्षेत्रे वाढले, कल्याणकारी राज्याच्या कल्पनेमुळे राज्याचे कार्यक्षेत्रे वाढले त्या प्रमाणात राजकीय सहभाग क्षेत्र वाढले. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे सत्तेच्या अनेक पायऱ्या निर्माण झाल्या. त्या पायऱ्यावर बसण्याच्या स्पर्धेतून राजकीय सहभाग वाढला.

राजकीय सहभागाचे क्षेत्र वाढले. परिणामः त्याच्या अभ्यासाची आवश्यकता वाढली. राजकीय सहभाग का वाढला? वाढलेल्या सहभागाचा राजकीय प्रक्रियेवर काय परिणाम झाला? याचा अभ्यास एकूण राजकीय प्रक्रिया समजण्यासाठी आवश्यक झाला. याचसाठी अनेक पद्धतीद्वारे राजकीय सहभागाचा व मतदान वर्तणुकीचा अभ्यास होताना दिसत आहे.

## ७.४ सरावासाठी प्रश्न

१. राजकीय सहभागाचा अर्थ स्पष्ट करुन त्याचे महत्व स्पष्ट करा.
२. राजकीय सहभागाची व्याख्या सांगून त्याची क्रिया विशद करा.
३. रॉबर्ट ढालने केलेले राजकीय सहभागाचे विश्लेषण सांगा.
४. राजकीय सहभागात राजकीय पक्षाची असलेली भूमिका सोदाहरण स्पष्ट करा.
५. राजकीय सहभागात दबावगटाचे असलेल्या स्थानाचे परीक्षण करा.
६. राजकीय सहभागाच्या विविध साधनांची सविस्तर चर्चा करा.
७. राजकीय सहभागात नेतृत्वाचे असलेले महत्व सांगा.
८. राजकीय सहभागातील लोक चळवळीची भूमिका सांगा.

## ७.५ संदर्भ सूची

१. डॉ. शुभदा रावळ (२००४) तौलानिक राज्यशास्त्र, श्री विद्या प्रकाशन, पुणे
२. बी. वाय. कुलकर्णी (राजकीय समाजशास्त्र), विद्या प्रकाशन, नागपुर
३. प्रा. तिजारे डॉ. पांढरीपांडे, डॉ.पेशवे(१९८१), आधुनिक राजकीय विश्लेषण, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर
४. डॉ. अलीम वकील, डॉ. जोत्सना सोनश्वासकर, (२०१५), राजकीय समाजशास्त्र, प्रतिमा प्रकाशन, पुणे

-----------

# ८

# घटक ८ - राजकीय संघर्ष आणि सहकार्य

**अनुक्रमाणिका**


८.० उद्दिष्टे

८.१ प्रास्ताविक

८.२ विषय-विवेचन

- ८.२.१ संघर्षाचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये
- ८.२.२ संघषाचे प्रकार
- ८.२.३ संघर्ष समाप्तीचे मार्ग किंवा संघर्ष सोडविण्याच्या पध्दती
- ८.२.४ सहकार्य-अर्थ व व्याख्या, वैशिष्ट्ये
- ८.२.५ राष्ट्रा-राष्ट्रातील सहकार्य वाढण्याची कारणे
- ८.२.६ आंतरराष्ट्राय सहकार्याचे प्रकार
- ८.२.७ संघर्ष आणि सहकार्य यातील फरक

८.३ सारांश

८.४ सरावासाठी स्वाध्याय

८.५ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ८.० उद्दिष्टे

ह्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास :

- संघर्ष म्हणजे काय ते सांगता येईल
- संघर्षाच्या प्रकाराची माहिती होईल.
- संघर्ष सोडवणूकीच्या पध्दती सांगता येतील.
- सहकार्य म्हणजे काय ते सांगता येईल.

- सहकार्याच्या प्रकाराचे वर्णन करता येईल.
- संघर्ष आणि सहकार्य यातील फरक स्पष्ट करता येईल.

## ८.१ प्रास्ताविक

आज जगात राष्ट्रराज्य व्यवस्था अस्तित्वात असून त्यांच्यात परस्परसंबंध प्रस्थापित झाले आहेत. हे संबंध संघर्षात्मक किंवा सहकार्यात्मक आहेत. ज्यावेळेस राष्ट्र-राज्यातील संबंध हे शत्रुत्वाचे असतात त्यावेळी अशा राष्ट्रात-राज्यात शत्रुत्वाचे संबंध असतात. ज्यावेळेस संबंध मित्रत्वाचे असतात त्यावेळेस संबंध हे सहकार्यात्मक आढळतात. ज्या राष्ट्र-राष्ट्र-राज्यांचे हितसंबंध परस्परपूरक असतात. त्यांच्यात सहकार्य प्रस्थापीत होते. अशी राष्ट्र-राज्ये लष्करी, आर्थिक किंवा प्रादेशीक स्वरुपाचे गट स्थापन करुन आपल्या हितसंबंधाचे सरक्षण सामुहिकरित्या करण्याचा प्रयत्न करतात. राष्ट्रे आपल्या राष्ट्रीय हितांची जुळवणी इतर राष्ट्रांच्या हिताशी, प्रादेशिक हिताशी किंवा आंतरराष्ट्रीय हिताशी करत असतात. त्यामुळे राष्ट्र-राज्यात सहकार्य प्रस्थापीत होत असते. परंतू ज्यावेळेस राष्ट्रांचे हितसंबंध परस्परविरोधी असतात त्यांच्यातील हितसंबंधाच्या विरोधामुळे संघर्ष निर्माण होतो. आंतराष्ट्रीय व्यवस्थेतील राष्ट्राच्या हितसंबंधात साम्य आढळत नाही. त्यांच्या राष्ट्रीय हितात परस्पर विरोध असतो त्यामुळे संघर्ष निर्माण होतो. ज्या राष्ट्राचे हितसंबंध परस्परविरोधी असतात त्यांच्यात संघर्ष होणे स्वाभाविक आहे जसे की काश्मिरच्या प्रश्नावरुन भारत व पाकिस्तान याच्यांत संघर्ष आहे. शिवाय जेरुसलेमच्या प्रश्नावरुन इस्राईल व पॅलेस्टाईन यांच्यात संघर्ष आहे. फॉकलंडच्या प्रश्नावरुन इंग्लड आणि अर्जेटिनाचे हितसंबंध परस्परविरोधी आहेत त्यामुळे त्यांच्यात अनेक दशकापासून संघर्ष पाहावयास मिळतो. राष्ट्र-राज्यामधील संघर्ष हा फक्त द्विस्तरीयच असतो, असे नाही. आज जागतीक व्यवस्थेतील राष्ट्रात परस्परविरोधी हितसंबंधामुळे बहुपक्षीय पातळीवरही संघर्ष दिसून येतो. नव-आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत विकसीत असलेली उत्तर गोलार्धातील उत्तर राष्ट्रे व अविकसीत व विकसनशील असलेली दक्षिण गोलार्धातील दक्षिण राष्ट्रे यांच्यात दक्षिण-उत्तर संघर्ष पाहावयास मिळतो. हा संघर्ष जागतीक व्यापाराच्या सर्व सहमतीची नियमावली तयार करण्याच्या प्रश्नावरून जागतीक व्यापार संघटनेच्या व्यासपीठावर पाहावयास मिळतो. जागतीक व्यापार संघटनेत असलेली विकसीत राष्ट्रे व विकसनशील राष्ट्रे यांच्या हितसंबंधात पर्यावरणाचे संरक्षण, कामगाराचे संरक्षण, मानवी हक्क, शेतीला दिले जाणारे अनुदान, बौद्धीक मालमत्ता या मुद्यावरुन असणारे हितसंबंध परस्परविरोधी आहेत. त्यामुळे त्यांच्यात बहुपक्षीय संघर्ष पाहावयास मिळतो. या संघर्षामुळेच जागतीक व्यापार संघटनेच्या 'सिएटल' व 'कॉनकून' येथे झालेल्या मंत्री परिषदेच्या बैठका अपयशी ठरल्या आहेत.

## ८.२ विषय- विवेचन

### ८.२.१ संघर्ष, अर्थ, व्याख्या व वैशष्टिचे :

संघर्ष ही आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवस्थेतील राष्ट्रांना अहितकारक असणारी घटना आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारामध्ये विविध राज्याची उद्दिष्टे व धोरणे परस्पर हितसंबधाच्या विरूद्ध असतात त्यामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण होत असतो. जेव्हा एकाचे उद्दिष्टाच्या प्राप्तीसाठी दोन किंवा दोनपेक्षा अधिक राष्ट्रे प्रयत्नशील असतात, तेव्हा त्याच्यात संघर्ष निर्माण होतो. संघर्ष म्हणजे केवळ स्पर्धा नसते. संघर्ष या संकल्पनेत एक व्यक्तिसमुह दुसऱ्या तशाच प्रकारच्या व्यक्तिसमुहाच्या जीवनमुल्याशी व पद्धतीशी विरोध करतात, त्यांना नष्ट करण्याचा व स्वःतचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. संघर्षाच्या व्याख्या निरनिराळ्या विचारवंतानी केल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे –

- हेराल्ड लास्वेलच्या मते ''संघर्ष ही जाणीवपूर्वक केलीली स्पर्धा असून अन्य मूल्यांच्या प्राप्तीसाठी होणाऱ्या प्रयत्नांमधून त्याची निर्मीती होते.''
- जोसेफ फ्रॅकंलेच्या मतानुसार ''संघर्ष ही अशी परिस्थिती आहे की ज्यात दोन व्यक्ती, गट अथवा दोन राष्ट्रे परस्पर विरोधी कृती करण्याचा आणि आपले हितसंबंध साधण्याचा प्रयत्न करतात.''
- दोन व्यक्ती, गट किंवा राज्य यांच्या वैयक्तिक इच्छा, आकांक्षा, अपेक्षा व मुल्ये वेगवेगळी असतात, त्यांच्यात परस्पर विरोधही असतो परंतू ज्यावेळेस यासाठी काही राष्ट्रे पराकोटीचा आग्रह धरतात तेव्हा त्यांच्यात संघर्ष निर्माण होतो.

**संघर्षाची वैशिष्ट्ये**

संघर्षाचा अर्थ व व्याख्या म्हणजे काय हे समजून घेतल्यानंतर संघर्षाची काही वैशिष्ट्ये त्या आधारावर सांगता येतील.

१) **राष्ट्रीयहित संरक्षणासाठीचा प्रयत्न** : प्रत्येक राष्ट्राचे परराष्ट्र धोरण व आंतरराष्ट्रीय धोरण हे राष्ट्रीय हितावर निर्धारीत होत असते. परंतू प्रत्येक राष्ट्राचे हितसंबंध आणि उद्दिष्टे ही वेगवेगळी असल्यामुळे त्याच्या हितसंबंधात फरक आणि विरोध असतो. प्रत्येक राष्ट्र आपल्या हिताचे रक्षण करण्याचा प्रयत्न करते. राष्ट्रांतील हितसंबंधातील विसंवाद मुळे संघर्ष निर्माण होत असतो.

२) **जाणीवपूर्वक निवडलेला मार्ग** : आंतरराष्ट्रीय राज्यव्यवस्थेत राष्ट्रे संघर्ष किंवा सहकार्याचा मार्ग जाणीवपूर्वक निवडत असतात. राष्ट्राराष्ट्रात असलेले हितसंबंध हे परस्परपूरक

किंवा परस्पर विरोधी असतात. आपल्या हितसंबधाच्या सरक्षणासाठी सहकार्याचा मार्ग निवडायचा की संघर्षाचा हे राष्ट्रानी स्वत: ठरवावे लागत असते. काही राष्ट्रे आपल्या हितसंबंधाच्या सरक्षणासाठी संघर्षाचा मार्ग स्विकारतात जसे की चीनने आपल्या शेजारी राष्ट्राशी असलेले सीमाविवाद सोडविण्यासाठी संघर्षाचा व आक्रमक धोरणाचा पुरस्कार केला. त्यामुळेच चीनचे भारत व रशिया सोबतही संघर्षाचे वातावरण काही काळ राहिले आहे. परंतु काही राष्ट्रे आपल्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी सहकार्याचा मार्ग स्विकारतात. आपल्या हितसंबंधाची जुळवणी इतर राष्ट्राच्या हितसंबंधाशी करतात. व त्यातून मार्ग काढतात जसे भारताने बांग्लादेशाशी सीमाविवाद सोडविण्यासाठी सहकार्याचा मार्ग स्विकारला व २०१५ मध्ये परस्पर सहकार्याद्वारे हा सीमाविवाद सोडवला.

३) **हिंसक व अहिंसक कृत्यांची योजना** : संघर्ष करणारी राष्ट्रे प्रतिस्पर्धी राष्ट्राला दूर्बल करण्यासाठी, पराभूत करण्यासाठी सतत हिंसक व अहिंसक कृत्ये घडवून आणत असतात व इतरांच्या तुलनेत आपली बाजु बळकट व मजबूत करण्याचा प्रयत्न करतात. हिंसक कृत्यामध्ये प्रत्यक्ष सशस्त्र चकमकीचा तर अहिंसक कृत्यांमध्ये मानसशास्त्रीय तंत्राच्या आधारे प्रतिस्पर्ध्यावर दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. शीत युध्दाच्या काळात अमेरिका व सोव्हिएत रशियाकडून या तंत्राचा वापर करण्यात येत होता.

४) **भिन्न स्वरूप**: संघर्षाचे स्वरूप हे संघर्षाचा हेतू व त्याची उद्दिष्टे यावरून कळते. त्यावरुनच संघर्षाचे गांभीर्य व व्याप्ती ठरते संघर्षाचे कारणावरून ह्या बाबी स्पष्ट होतात. काही संघर्ष भुप्रदेशावर नियंत्रण, सीमावाद, फुटीरवादातून निर्माण होतात तर काही संघर्ष देशांतर्गत शासनावर नियंत्रण प्रस्थापीत करण्याच्या हेतूने होतात. काही संघर्ष धार्मिक, आर्थिक, वांशिक किंवा सांस्कृतिक असतात. शिवाय संघर्ष हे स्थानिक, प्रादेशिक किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरचेही असू शकतात. परंतू काही संघर्ष विभागीय असले तरी त्यांचा प्रभाव जगातील इतर प्रदेशावर व राष्ट्रावरही पडता असतो जसे की इस्त्राईल व पॅलेस्टाइन मधील संघर्ष हा केवळ द्विपक्षीय किंवा विभागीय स्वरुपाचा नाही. त्याचा प्रभाव जगातील इतर राष्ट्रावरही पडतो आहे.

५) **संघर्षातून सहकार्याची प्रतिक्रिया** : अनेक वेळा संघर्षातून सहकार्याची प्रतिक्रिया सुरु होत असते. संघर्ष करणारी राष्ट्रे संघर्षाच्या सततच्या समस्येला कंटाळून त्याच्यातील वाद सोडविण्याचा प्रयत्न करतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर जर दोन राष्ट्रात संघर्ष निर्माण होत असेल तर त्याचा प्रभाव इतर राष्ट्रावरही पडत असेल तर इतर राष्ट्रे समान हितसंबंध असणारी विषय शोधून आपसात सहकार्य करण्यासाठीचा प्रयत्न करतात.

शीतयुद्धाच्या काळात अमेरिका व सो. रशिया याच्यातील संघर्षामुळेच शांततावादी राष्ट्रानी आपआपसात सहकार्य निर्माण करण्यासाठी अलिप्ततावादी चळवळीची स्थापना केली. पुढे यातूनच या राष्ट्रात दक्षिण–दक्षिण सहकार्य ही भावना वाढीस लागली. अनेकदा राष्ट्रे आंतरराष्ट्रीय स्वरुपाच्या संघर्षाविरुद्ध एकत्र येऊन परस्परांना सहकार्य करतात. आज आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरूद्ध एकत्र येऊन त्याचा प्रतिकार करण्यासाठी परस्पराना सहकार्य करत आहेत.

६) **संघर्षातून संकटाची निर्मीती** : आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत जो संघर्ष निर्माण होतो त्यातून अनेकदा संकटे, आरिष्टे (crisis) निर्माण होतात, त्याचा परिणाम संबंधीत राष्ट्राच्या व जगातील अनेक राष्ट्राच्या दैनंदिन जीवनावर व लोकांवर असतो. जेव्हा १९७२ मध्ये इस्त्राईल व अरब राष्ट्रे याच्यात संघर्ष सुरु होता तेव्हा अरब राष्ट्रानी 'तेल कुटनितीचा' (Oil Diplomacy) चा वापर केला व तेलाचा पुरवठ्यात कपात करण्याचा निर्णय घेतला त्याचा परिणाम जागतीक अर्थव्यवस्थेवर झाला. त्यातूनच जगात तेलाचे संकट निर्माण झाले होते. शीत युद्धाच्या काळात रशिया व अमेरिका ह्या दोन राष्ट्रातील संघर्ष हा प्रदिर्घ काळ होता. त्यातून या काळाखंडात जगात अनेक वेळा. संकटजन्य परिस्थिती निर्माण झाली यात १९५० चे कोरियन संकट, १९६२ चे क्युबा संकट, १९७८ चे अफगाण संकट, प्रमुख होत. आज जागतीकिकरणाचे नवीन युग सुरु आहे. या व्यवस्थेत राजकीय प्रश्नापेक्षा आर्थिक संघर्ष अधिक निर्माण होत आहेत, त्यातून अनेक आर्थिक संकटाची निर्मीती होत आहे. आज अनेक राष्ट्रात त्याच्यातील चलन विनिमय दरावरुन वाद आहेत. नवीन जगातील इतर राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेवर होतात. चीनने २०१५ मध्ये त्याच्या युआन चलनाचे अवमुल्यन केल्याने अनेक राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत मोठी घसरण झाली. त्यातून जगातील काही राष्ट्रात 'आर्थिक संकट' निर्माण झाले होते.

७) **संघर्षातून युद्धनिर्मीती होतेच असे नाही** : प्रत्येक संघर्षातून युद्ध होत असते असे नाही. अमेरिका व रशिया याच्यात विचार सरणीच्या आधारावर संघर्ष होता. परंतू प्रत्यक्षात मात्र या दोन्ही राष्ट्रात शस्त्र संघर्ष होऊन मोठे युद्ध झाले नाही. बहुतांश संघर्ष हे चर्चेच्या आणि शांततेच्या मार्गाने सोडविले जातात. असेच शीतयुद्धाच्या काळात झाले अमेरिका व रशिया या दोन्ही राष्ट्रांनी शीतयुद्धाच्या काळात परस्परातील संघर्ष चर्चेद्वारे व शांततेच्या मार्गाने सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्मीतीमुळे सहकार्याच्या माध्यमातून संघर्ष सोडविण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. त्यात संयुक्त राष्ट्राला काही संघर्ष सोडविण्यात यश सुद्धा प्राप्त झाले आहे.

## ८.२.२ संघर्षाचे प्रकार:

संघर्षाच्या प्रकारांचे वर्णन खालील प्रकारे करता येईल.

१) भुप्रदेशावर नियंत्रण मिळविण्यासाठीच्या उद्देशात झालेले संघर्ष : अनेकदा आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत भुप्रदेशावर नियंत्रण प्रस्थापीत करण्याच्या हेतून दोन किंवा दोनपेक्षा अधिक राष्ट्रात संघर्ष पाहावयास मिळतो. या उद्दिष्टांसाठी राष्ट्रे तडजोड करण्यास तयार नसतात आणि यामुळे राष्ट्रराज्य व्यवस्थेतील बहुतांश संघर्ष हे भुप्रदेशावर ताबा मिळविण्यासाठी झालेली आहेत. इ. स. १८७१ मध्ये जर्मनीने फ्रांसच्या ताब्यातील आल्येस व लॉरेन्स या प्रदेशावर ताबा मिळविला होता. हे भुप्रदेश मिळविणे फ्रान्सच्या परराष्ट्र धोरणाचे आणि राजनयाचे एकोणीसाव्या व्या शकताच्या उत्तरार्धातील प्रमुख उद्दिष्ट होते. पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाल्यानंतर फ्रान्स ने हे प्रदेश परत मिळवले होते. जगातील अनेक राष्ट्रात भुप्रदेशावर ताबा व नियंत्रण प्राप्त करण्याच्या हेतूने संघर्ष झाले आहेत. काश्मिरच्या प्रश्नावर भारत-पाकिस्तान, कुवैतच्या प्रश्नावरुन इराण-इराकचा संघर्ष, फॉकलंड बेटावरून इंग्लड व अर्जेटिनातील संघर्ष, शिवाय प्रशांत महासागरातील काही बेटावर ताबा व नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशाने चीन व फिलीपाईन्स, जपान, मलेशीया, व्हिएतनाम या राष्ट्राशी संघर्ष आहे.

२) **सीमावाद**: जगातील बहुतांश राष्ट्रामध्ये त्यांच्यातील सीमा, राष्ट्रीय सरहद्दी ठरविण्यावरुन वाद-विवाद झाले आहेत आणि त्यातूनच संघर्ष उद्‌भवली आहेत. एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रातील सीमे अंतर्गत भुप्रदेशावर हक्क सांगतो. यासाठी पूर्व परस्पराच्या इतिहासाचे संदर्भ दिली जातात. अनेकदा राष्ट्राच्या भूसीमा व सागरी सीमारेषेवरुन वाद आहेत. भुसीमेवरुन जगातील अनेक राष्ट्रात द्विपक्षीय वाद आहेत. भारत-पाकिस्तान, भारत-चीन, इस्त्राईल, पॅलेस्टाईल, इराण-इराक, पेरु-इक्काडोर, चीन-रशिया ही सीमावादीच काही उदाहरणे आहेत. काही द्विपक्षीय राष्ट्रातील सीमावादामुळे केवळ दोन देशातील शांतताच भंग पावली आहे असे नाही तर त्यातून विभागीय सुरक्षितता सुद्धा धोक्यात आली आहे. इस्त्राईल व पॅलेस्टाईनमधील यातील द्विपक्षीय संघर्षाचा परिणाम संपूर्ण पश्चिम आशियाई राष्ट्रावर होतो आहे.

३) **फुटीरतावादी चळवळीतून निर्माण झालेले संघर्ष** : एखाद्या राष्ट्रातील काही प्रदेशावर सतत अन्याय होत असेल किंवा एखाद्या भूप्रदेशातील विशिष्ट धर्माच्या किंवा वंशाच्या लोकामध्ये वेगळे राष्ट्र निर्माण करण्याची इच्छा असेल तर फुटीरतावादी तत्वानुसार तेथे संघर्ष निर्माण होतो. श्रीलंकेतील तामीळ लोकांनी आपले वेगळे स्वायत्त राज्य असावे यासाठी श्रीलंकन सरकारविरुध्द संघर्ष केला होता. सन १९१२ मध्ये युगोस्लवियाचे

विघटन झाल्यानंतर सर्बिया लोकांचे एक राष्ट्र स्थापन करण्यासाठी संघर्ष केला यासाठी या क्षेत्रातील इतर वंशाच्या लोकाची मोठ्य प्रमाणात हत्या करण्यात आली. रशिया मधील मुस्लीम बहुल चेचन्य प्रांताने सुद्धा रशियन संघातून बाहेर पडण्यासाठी संघर्षाचा मार्ग स्विकारला आहे त्याला रशियाने वारंवार दडपणाचा प्रयत्न केला आहे. या चेचेन बडखोर व रशियन लष्कर यातील संघर्षात हजारो लोक मारले गेले आहेत.

४) **वांशिक संघर्ष** : वंशाच्या आधारावरील संघर्षात आज अनेक राष्ट्रे होरपळत आहेत. प्राचीन काळापासूनच आपल्या वंशाच्या संरक्षणासाठी त्यांच्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी संघर्ष झाली आहेत. वांशिक संघर्षाची अनेक कारणे आहेत. यामध्ये शासनावर नियंत्रण प्रस्थापीत करणे, आपली स्वतंत्र ओळख जोपासणे, शासनाद्वारे होणारा भेदभाव, इतर वंशाचा द्वेष, आर्थिक लाभ, राजकीय व इतर अधिकाराची प्राप्ती इ. होत. जगातील अनेक राष्ट्रात आज वांशिक संघर्ष पाहावयास मिळतो. श्रीलंकेत तामिळ व सिहली यांच्यात बऱ्या काळापासून वांशिक सर्बियन वंशाच्या राष्ट्रनिर्मितीसाठी झाला. रुवाडामध्ये हूतू व तुत्सी यांच्यात राजकीय सत्ता प्राप्ती साठी संघर्ष आहे. वांशिक संघर्षामुळे प्रादेशिकवाद आणि संकुचीतवाद वाढला आहे. त्यातून अल्पसंख्याक, इतर वंश आणि मुले, महिलाच्या सुरक्षेच्या व अधिकाराचा प्रश्न गंभीर बनला आहे. या वांशिक संघर्षातून अनेकदा मानवी हक्काचे ही मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होत आहे.

५) **धार्मिक संघर्ष**: धर्म हा राष्ट्राच्या संघटनात्मक बांधणीला आकार देणारा घटक आहे. परंतु अनेक राष्ट्रासाठी मात्र संघटनापेक्षा विघटनात्मक शक्ती म्हणून धर्माने कार्य केले आहे. मागील काही वर्षात धार्मिक असहिष्णूता, धार्मिक मुलतत्ववादाचा अतिरेकी आग्रह, संकुचीतपणा यामुळे धार्मिक संघर्षाचे प्रमाण वाढले आहे. धार्मिक श्रेष्ठत्वाची भावना, धर्माची स्वतंत्र ओळख जोपासणे, धार्मिक मूलतत्वाचा आग्रह याच्या आधारावर अनेक देशात धार्मिक चळवळी निर्माण झाल्या आहेत. आज इराण, अफगाणीस्तान, इजिप्त, सिरिया, लेबनान, जार्डन यासारख्या राष्ट्रामधून धार्मिक मूलतत्ववादी चळवळी आकारास आल्या आहेत. या चळवळीनेच आज आय.एस. आय. सारख्या दहशतवादी संघटनेला जन्म दिला आहे. या संघटनेने सिरिया सारख्या राष्ट्रात मोठा संघर्ष घडवून या प्रदेशातील प्रांतावर आपले वर्चस्व प्रस्थापीत केले आहे. ही संघटना धर्माच्या आधारावर समाज आणि राज्यवस्था निर्माण करण्यासाठी हिंसात्मक मार्गाचा अवलंब करीत आहे. यामुळे अनेक मध्यपूर्वेतील राष्ट्रात संघर्षजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. जगाला आज दहशतवादासारख्या मोठ्या समस्येने ग्रासले आहे. त्या समस्येचे मुळ देखील धार्मिक संघर्षात आहे. धर्माधर्मातील परस्परद्वेष हा मागील काही वर्षात इतका वाढला आहे की, भविष्यातील महायुद्धे ही धर्माच्या आधारावर लढली जातील असे भविष्य

वर्तविले जात आहे. साम्यूअल पी. हटिंग्टन त्यांच्या 'क्लॅश ऑफ सीव्हीलायझेशन' या ग्रंथात म्हणतो की, भविष्यातील आंतरराष्ट्रीय राजकारण हे संस्कृती केंद्रित होईल, त्या आधारावर जनता व राष्ट्रे संघटीत होतील त्यातूनच त्यांचा सहकार्याचा व संघर्षाचा आधार ठरेल.

६) **आर्थिक संघर्ष** : आर्थिक हितसंबंधाच्या मुद्यावरुन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत अनेकदा राष्ट्राराष्ट्रात व गटागटात संघर्ष निर्माण होतो आहे. शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर जगात आर्थिक उदारीकरण आणि जागतिकिरणाच्या प्रक्रियेतून आर्थिक स्पर्धा तीव्र बनली आहे. त्यामुळे आर्थिक स्वरुपाच्या संघर्षाचे प्रमाण वाढले आहे, आज जगात राष्ट्रा-राष्ट्रातील आर्थिक विकासासाठीची असलेली स्पर्धा, जागतीक व्यापारावर नियंत्रण प्रस्थापीत करण्याची इच्छा, व्यापारावरील गुणात्मक व मात्रात्मक, बंधने, चलन विनिमयाचा दर इ. कारणावरुन अनेक राष्ट्रात वाद संघर्ष सुरू आहे. १९९५ चे अमेरिका व जपानमधील व्यापार युद्ध, अमेरिका व चीनमधील पेटेंट व पायरसीच्या मुद्यावरुनचा संघर्ष किंवा जागतीक व्यापार संघटनेतील जागतीक व्यापाराचे सामान्य नियम ठरविण्यावरुनचा विकसीत राष्ट्रे व विकसनशील राष्ट्रे यात संघर्ष आहे. आज जगाच्या अनेक भागात विभागीय असे व्यापार संघ स्थापन झाले आहेत. त्यांच्यातही संघर्ष आढळतो उदा. युरोपियन महासंघ व नाफ्टा यांच्यातील संघर्ष.

७) **देशांतर्गत शासनावर नियंत्रण प्रस्थापीत करण्यावरुन निर्माण होणारा संघर्ष**: आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत राष्ट्रे आज इतर राष्ट्रात व शेजारी राष्ट्रात आपल्या हितसंबंधाना अनुकूल असे सरकार सत्तेवर यावे यासाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे प्रयत्नशील राहतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रे आपल्या शेजारी राष्ट्रात आपल्या हितसंबंधाना अनूकूल शासन प्रस्थापीत करण्याचा आणि प्रतिकूल शासन पाडण्याचा प्रयत्न करीत असते. प्रतिकूल शासन पाडण्यासाठी शासनविरोधी गटाना दुसऱ्या राष्ट्राकडून आर्थिक, राजकीय व नैतिक समर्थन दिले जाते. शीत युद्धाच्या काळात अमेरिका आणि सोव्हिएत रशिया कडून आपल्या विचारसरणीला अनुकूल शासन प्रस्थापीत करण्यासाठी व विरोधी सरकारांना पाडण्यासाठी या महासत्तांनी इतर राष्ट्रात लष्करी हस्तक्षेप केल्याची उदाहरणे आहेत. सोव्हिएत रशियाने १९६८ मध्ये चेकास्लोव्हाकिया, १९७९ मध्ये अफगाणिस्तान मध्ये तर अमेरिकेने १९८३ मध्ये ग्रेनडा, १९९८ मध्ये पनामा, १९६५ ला डोमिनकन गणराज्य, १९९४ ला हैती व २००३ मध्ये इराकमध्ये अमेरिकने सैन्य पाठवून हस्तक्षेप केला होता.

## ८.२.३ संघर्ष समाप्तीचे मार्ग किंवा संघर्ष सोडविण्याच्या पध्दती:

आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत राष्ट्राष्ट्रात संघर्षाचे अस्तित्व अपरिहार्य आहे. या व्यवस्थेत राष्ट्राराष्ट्रात सतत लहानमोठे संघर्ष चालू राहतात. एखादा संघर्ष जर दिर्घकाळ चालत राहिला तर त्यातून मोठे युध्द किंवा हिंसाचार निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणून संघर्ष दिर्घकाळ राहणे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय हितासाठी योग्य नाही. असे संघर्ष राष्ट्राच्या विकासाला बाधा निर्माण करतात. त्याचे अनेक वाईट परिणाम राष्ट्रावर व आंतरराष्ट्रीय समुदायावर होतात म्हणून असे संघर्ष सोडविणे आवश्यक आहे. संघर्ष सोडविण्यासाठी विविध मार्गाचा व पध्दतीचा अवलंब केला जातो. ते खालील प्रमाणे आहेत.

१) **सत्ता संतूलन**: राष्ट्रा-राष्ट्रामधील संघर्ष सोडविण्याचा सत्ता संतूलन हा पारंपारीक मार्ग आहे. यात आक्रमक राष्ट्राचे सामर्थ्य अथवा त्याच्या गटातील राष्ट्रांची संख्या वाढु नये म्हणून इतर राष्ट्रांच्या मार्फत दोन्ही राष्ट्राची किंवा गटांची सत्ता संतुलीत ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. सत्ता समतोल हे आंतरराष्ट्रीय राजकारणातील संघर्ष टाळून स्थिरता निर्माण करणारे तंत्र आहे. स्थापित आंतरराष्ट्रीय व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न जर एखाद्या राष्ट्राकडून होत असेल तर इतर देश एकत्र येऊन त्याला प्रतिशह देतात व स्थापीत व्यवस्था टिकवतात. अशा प्रकारे स्थैर्य व शांतता टिकवण्याचा हा मार्ग आहे. आज अमेरिका अनेक राष्ट्रात समतोल साधण्याचा प्रयत्न आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत करत असते.

२) सामूहिक सुरक्षितता: आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत जर एखादे राष्ट्र आक्रमक होऊन दुसऱ्या राष्ट्राशी संघर्ष करत असेल तर आंतरराष्ट्रीय समुदायातील इतर राष्ट्रे एकत्र येऊन आक्रमक राष्ट्रा विरुध्द सामुहिक कार्यवाही करतात. यासाठी युनोसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेमार्फत आक्रमक राष्ट्राविरुध्द सामुहिक सुरक्षिततेचा उपाय अमलात आणला जातो. या व्यवस्थेत संघर्षास कारणीभूत राष्ट्राविरूध्द सामूहिक कारवाई केली जाते. संघर्ष आणि युध्द टाळून आंतरराष्ट्रीय शांतता, राष्ट्रीय स्वातंत्र्य, लहान राष्ट्राचे सार्वभौमत्व तसेच प्रादेशीक ऐक्य टिकविण्यासाठी ही एक महत्त्वाची व्यवस्था आहे. सामुहिक सुरक्षेमुळेच राष्ट्रे आक्रमण करण्याचे धाडस करत नाहीत. १९९१ मध्ये इराकने कुवैत विरूध्द संघर्ष उभा केला होता. त्यावेळी संयुक्त राष्ट्रसंघाव्दारे इराकविरुध्द सामुहिक कारवाईचा मार्ग स्विकारण्यात आला होता.

३) **नि:शस्त्रीकरण:** राष्ट्रा-राष्ट्रात संघर्ष हे शस्त्र स्पर्धा, शस्त्रास्त्राची वाढ यामुळे होतात. म्हणून शस्त्रास्त्रे नष्ट झाली तर संघर्ष समाप्त होतील. यासाठी शस्त्रास्त्रे नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. शस्त्रास्त्राची निर्मिती राष्ट्रे परस्पराच्या भितीतून करतात व

त्याची साठवणूक करतात.  त्यात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अनेक प्रकारची महाविनाशक अशी शस्त्रास्त्रे निर्माण झाली आहेत. जागतीक विनाशाची जी शस्त्रास्त्र आहेत त्याचा वापर झाला तर मानव जातीचे अस्तीत्व धोक्यात येऊ शकते. म्हणून राष्ट्रांना आता नि:शस्त्रीकरणाचे महत्व कळाले आहे. यातून आज अनेक राष्ट्रांनी जागतीक स्तरावर नि:शस्त्रीकरणाचा मार्ग स्विकारला आहे. अण्वस्त्राचे नि:शस्त्रीकरण करण्यासाठी राष्ट्रानी परस्परात आंशिक परमाणू परिक्षण प्रतिबंध संधी १९६३, परमाणू अप्रसार संधी – १९६८, रशिया व अमेरिका यातील साल्ट व स्टार्ट करार, सर्वसमावेशक आण्विक परिक्षण प्रतिबंध करार (१९९६) केले  आहेत.

४)   **हस्तक्षेप** :  संघर्ष होऊ नये म्हणून आक्रमक राष्ट्राविरूध्द इतर राष्ट्रे केवळ बघ्यांची भूमिका न घेता संघर्षात प्रत्यक्ष सहभागी होऊन करतात. प्रामुख्याने मोठी राष्ट्रे आपल्या मित्र राष्ट्राच्या मदतीसाठी प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष हस्तक्षेप करतात. संघर्ष टाळण्यासाठी, आपल्या हितसंबंधांना अनुकुल शासन शेजारी राष्ट्रामध्ये प्रस्थापित करण्यासाठी आणि प्रतिकुल शासन पाडण्यासाठी हस्पक्षेप केला जातो. सोव्हिएत रशियाने चकोस्लोव्हीया, अफगाणीस्तान मध्ये तर अमेरिकने ग्रेनाडा, पनामा हैती, डोमिनिकम गणराज्य, इराकमध्ये हस्तक्षेप केला होता. अनेकदा ही मोठी राष्ट्रे जागतील एखाद्या राष्ट्रातील घटकामुळे त्यांच्या सुरक्षेला धोका निर्माण होत असेल तर इतर  राष्ट्रात हस्तक्षेप करतात. उदा. अमेरिकेवर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर अमेरिकेने अफगानीस्तानामधील तालीबान राजवट समाप्त करण्यासाठी हस्तक्षेप केला होता. त्यामुळे पुढे होणारे अनेक संघर्ष टळले होते.

५)   **प्ररोधन किंवा प्रतिरोधकता**: दोन देशातील संघर्ष टाळण्याचा हा एक वेगळा मार्ग आहे. प्ररोधन हे धाक निर्माण करणारे तंत्र आहे. ज्यामुळे प्रतिपक्षाला आक्रमण किंवा युद्धाचे धाडस करण्यापासून परावृत्त केले जाते. परस्पविरोधी राष्ट्रे अथवा गट हे परस्परांना प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरित्या प्ररोधन करतात अथवा धाक दाखवतात, प्रचारतंत्राचा वापर करतात, वेगवेगळ्या घोषणा करतात. यामुळे प्रतिस्पर्धी राष्ट्रांच्या मनात भिती निर्माण होते. शीतयुध्दकाळात दोन्ही महासत्तांना अण्वस्त्र युध्द झाल्यास परस्पर विनाशाची खात्री झाल्यामुळे प्रथम हल्ला करण्याचे धाडस कुणीच केले नाही. शीतयुध्दाच्या काळात दोन्ही महासत्तामध्ये प्रत्यक्ष संघर्ष किंवा युध्द झाले नाही. याला आण्विक प्ररोधन असे म्हणतात.

६)   **राजनय**: राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष नियंत्रणाचा हा सर्वात प्रभावी असा मार्ग आहे, ज्या दोन राष्ट्रात काही करणामुळे संघर्ष निर्माण झाला असेल, तो संघर्ष मिटविण्यासाठी राष्ट्रे

चर्चेला, तडजोडीच्या व वाटाघाटीच्या माध्यमातून मार्ग काढत असतात. दोन्ही देशाचे राजदूत, परराष्ट्रमंत्री व शासनप्रमुख यांनी गांभीर्याने विचारपूर्वक वाटाघाटीच्या माध्यमातुन चर्चेव्दारे प्रश्न सोडविला तर संघर्ष टाळता येतो. वाटाघाटी व चर्चेच्या माध्यमातून संघर्षावर कायम स्वरुपी तोडगा निघू शकतो याची जाणीव आज बहुतांश राष्ट्रांना झाली आहे. त्यामुळेच व्दिपक्षीय व बहुपक्षीय पातळीवरचे संघर्ष सोडविण्यासाठी राजनयाच्या माध्यमातुन प्रयत्न होतांना दिसतात.

## सहकार्य (Co-operation)

ॲरिस्टॉटल म्हणतो की, 'मनुष्य हा समाजशील प्राणी आहे तो समाजाशिवाय राहू शकत नाही' एकटी व्यक्ती ही इतरांना सहकार्याशिवाय आपले व्यवहार करु शकत नाही व आपल्या गरजाही पूर्ण करु शकत नाही, मानवी जीवन हे परावलंबी आहे. हेच तत्व राष्ट्राच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय समुदायात राष्ट्राला लागु पडते. आजच्या जागतीक व्यवस्थेत कोणत्याही राष्ट्रला इतर राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागते. राष्ट्राचे हे परस्वरावलबन त्यांना सहकार्यासाठी भाग पाडते. दिवसेंदिवस मानवी गरजा मध्ये वृध्दी होत आहे. त्यामुळे राष्ट्रराष्ट्रात परस्वरावलबन ही वाढत आहे. राष्ट्रे जागतीक व्यवस्थेत त्यामुळेच परस्पराच्या गरजापूर्तीसाठी एकमेकांना सहकार्य करतात. त्यामुळेच आज जागतीक व्यवस्थेत विकासाची ही अवस्था प्राप्त झाली आहे. प्राचीन काळापासून राष्ट्रराज्यात ही परस्पर सहकार्याची भावना आहे. राष्ट्रराज्याच्या विकासाबरोबरच त्यातील सहकार्याची भावना व प्रक्रियाही वाढत गेली. दुसऱ्या महायुध्दानंतर जी संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मीती करण्यात आली. त्याचा उद्देश जागतीक शांतता व सहकार्य हाच होता. परंतु शीतयुध्द सुरू झाल्याने व त्यात बहुसंख्ये राष्ट्रे ओढल्या गेल्याने राष्ट्राराष्ट्रात शस्त्रस्पर्धा, शस्त्रास्त्राच्या वाढता व्यापार, लष्करी संघटनाची निर्मिती यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात तणाव वाढला, त्यातून भिती, असुरक्षीतता व अविश्वास निर्माण झाला त्यामुळे सहकार्याची भावना मागे पडली. ज्या संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य यासाठी करण्यात आली होती. त्या संघटनेचे व्यासपीठ संघर्षाचे केंद्र बनले होते. परंतू शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी नवीन युगाची सुरवात झाली. शीत युध्दाच्या समाप्तीनंतर ज्या सामंज्यस्याची व तणावशैथिल्य वातावरणाची निर्मिती झाली ती राष्ट्रात परस्पर विश्वास निर्माण करण्यास कारणीभूत ठरली. यातून जगातील व्यवस्थेत अनेक राष्ट्रांनी परस्परांशी सहकार्यासाठीचे विविध प्रकारचे करार करुन नवीन जागतीक व्यवस्थेला आकार दिला आहे.

## ८.२.४ सहकार्य-अर्थ, व्याख्या व वैशिष्ट्ये

संघर्ष आणि सहकार्य ह्या राष्ट्रराष्ट्रामधील क्रिया प्रतिक्रिया असतात. आंतराष्ट्रीय राजकारणात संघर्षाच्या अस्तित्वाबरोबर सहकार्याची प्रक्रियाही सुरू असते. म्हणून संघर्षाप्रमाणेच सहकार्य देखील राष्ट्रांमधील परस्पर संबंधाचे महत्वाचे वैशिष्ट्ये आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात एखादा संघर्ष दिर्घ काळ भिजत ठेवणे कोणत्याही राष्ट्राच्या विकासासाठी योग्य नाही. त्यामुळे राष्ट्रे संघर्षातून मार्ग काढण्यासाठी सहकार्याचा मार्ग स्विकारतात. अशा प्रकारे सहकार्याचा संबंध हा संघर्षाच्या व्यवस्थापनाशी आहे. संघर्षाप्रमाणेच सहकार्याचा मार्ग देखील जाणीवपूर्वक निवडल्या जातो. सहकार्य म्हणजे समान हितसंबंध असणारे दोन किंवा दोनपेक्षा अधिक राष्ट्रांनी परस्पर हितसंबंधाना पुरक अशी कृती करणे होय. समान हितसंबंधाच्या रक्षणासाठी व आपले राजकीय, आर्थिक, सांस्कृतीक आणि व्यापारविषयक गरजा पूर्ण करणे या उद्दीष्टाच्या पूर्तीसाठी सहकार्याचा मार्ग स्विकारणे यालाच सहकार्य म्हणतात. सहकार्यामध्ये परस्पर हितसंबंधाना पूरक अशा कृत्यांचा विनीयम होत असतो. परस्परांच्या गरजा आणि प्रसंग ओळखून एकमेकांना मदत करणे म्हणजे सहकार्य करणे होय.

### सहकार्याची वैशिष्ट्ये

सहकार्याची काही ठळक वैशिष्टे पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) **राष्ट्रांच्या जीवनातील दैनंदिन गरजापूर्तीसाठी आवश्यकता**: ज्या प्रमाणे समाजात प्रत्येक व्यक्ती स्वयंपूर्ण असू शकत नाही तसेच राष्ट्राचे असते. प्रत्येक राष्ट्र आज स्वयंपूर्ण असू शकत नाही. त्याला त्याच्या दैनंदिन गरजापूर्तीसाठी इतर राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागते. जसे भारताला आपल्या इंधन व उर्जेची गरज पूर्ण करण्यासाठी आखाती राष्ट्रावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे या राष्ट्राशी असणारे संबंध भारताला सहकार्याचे आणि मैत्रीचे ठेवावे लागतात. परस्परावलंबित्वामुळे सहकार्याची गरज असते. राष्ट्रे परस्परात मदत व सहकार्य घेतल्याशिवाय आपले दैनंदिन व्यवहार पूर्ण करु शकत नाहीत.

२) **आदर्शवादी तत्व**: राष्ट्राराष्ट्रातील सहकार्याचेतत्व आंतरराष्ट्रीय संबंधातील आदर्शवादी तत्वज्ञानावर आधारीत आहे. आदर्शवादी दृष्टीकोन आंतरराष्ट्रीय राजकारणात नैतिकता, शांतता व सहकार्य याचा पुरस्कार करते. शांतता व सहकार्याची व्यवस्था स्थापन करण्यासाठी आदर्शवादी आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेचा आग्रह धरतात. वास्तवादी दृष्टीकोणाचे समर्थक आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेसाठी संघर्ष आवश्यक असल्याचे मानतात तर आदर्शवादी दृष्टीकोणाचे समर्थक सहकार्यावर आधारीत विश्वराज्य निर्मिती करण्याचे आवश्यक मानतात.

३) **संघर्षाच्या व्यवस्थापनाशी संबंधीत तत्व**: सहकार्याचा संबंध हा संघर्षाच्या व्यवस्थापनाशी आहे. संघर्ष सोडविण्याचा विश्वास पूर्ण मार्ग म्हणून राष्ट्रे सहकार्याचा स्विकार करतात. सहकार्याच्या माध्यमातून राष्ट्रे परस्परातील संघर्ष सोडवत असतात. राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष हे चर्चेने व सहकार्याच्या माध्यमातूनच सोडवावे, यासाठी संयुक्त राष्ट्रसंघासारखे व्यासपीठ तयार करण्यात आले आहे. अनेक राष्ट्र आज परस्परातील संघर्ष चर्चेने आणि सहकार्याने सोडविण्याला प्राधान्य देत आहेत. भारताने आपल्या शेजारी राष्ट्राशी विशेषत: बांग्लादेश व चीनशी असलेले वाद चर्चेने व सहकार्याने सोडविण्यास प्राधान्य दिले आहे.

४) **तणाव व संघर्ष शिथीलनासाठी**: राष्ट्राराष्ट्रामध्ये हितसंबंधातून तणाव संघर्ष निर्माण होतात. ते दुर करण्यासाठी एक अतिशय महत्वाचा मार्ग म्हणजे सहकार्य होय. सहकार्यातून तणाव व संघर्षाची तिव्रता कमी होण्यास मदत होते. शीत युध्दाच्या काळात अमेरिका व सोव्हियत रशिया या दोन राष्ट्रात शहप्रतिशह याचे राजकारण होते, दोन्ही राष्ट्रात शस्त्रास्त्र स्पर्धा, लष्करी संघटनाची निर्मिती यामुळे तणाव वाढला होता. हा तणाव कमी करण्यासाठी 'तणाव शिथीलनाचे' धोरण दोन्ही राष्ट्रानी स्विकारले होते. हे त्यांचे धोरण सहकार्यावर आधारित होते. यामुळे अमेरीका व सो. रशिया, अमेरिका-चीन, पश्चिम युरोप-पूर्व युरोप यांच्यातील सहकार्य वाढले.

५) **सहकार्य हा जाणीवपूर्वक स्विकारलेला मार्ग:** जागतीक व्यवस्थेतील राष्ट्रांना इतर देशांना वेळोवेळी वेगवेगळ्या प्रकारचे सहकार्य करावे लागते. संघर्षाप्रमाणेच सहकार्य हा देखील राष्ट्रावर स्विकारलेला मार्ग जाणीवपूर्वक स्विकारण्यात आलेला मार्ग असतो. एखाद्या वादावर, समस्येवर संघर्षाचा मार्ग स्विकारायचा की सहकार्याचा हा संबंधीत राष्ट्राच्या राजकीय इच्छाशक्तीचा भाग असतो. यासंबंधी राष्ट्रे आपल्या हितसंबंधाच्या संरक्षणाच्या दृष्टिकोणातून निर्णय घेत असतात.

६) **परस्पर विकासासाठी सहकार्य**: एखादा संघर्ष जर दिर्घ काळ राहिला तर त्याचे परिणाम संबंधीत राष्ट्राच्या विकासावर होत असतात. राष्ट्रांना संघर्षामुळे सरंक्षणावर मोठा निधी खर्च करावा लागतो. त्यामुळे आर्थिक आणि सामाजीक विकासासाठी पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकत नाही. सहकार्यामुळे संघर्ष सुटण्यास मदत होते आणि आर्थिक व सामाजीक विकासाला गती मिळते. राष्ट्राराष्ट्रातील आर्थिक, औद्योगिक, तांत्रिक सहकार्यामुळे परस्पराच्या विकासाला सुध्दा हातभार लागत असतो.

६) **विविध प्रकारचे सहकार्य**: राष्ट्रांमध्ये किंवा विविध संघटनामध्ये परस्पर असणारे सहकार्य केवळ राजकीय स्वरुपाचे असते असे नाही. सहकार्यासाठी नवनवीन क्षेत्रे

शोधण्यात येत असतात. आज आंतरराष्टीय व्यवस्थेतील राष्ट्र व संघ परस्परात देशातील गुन्हेगार, वाढता दहशतवाद थांबविणे, मादक द्रव्याचां व चोरट्या वस्तुच्या व्यापारावर प्रतिबंध इ. सारख्या विषयाबरोबरच अंतराळ, वैद्यकीय मदत, पर्यटन, सांस्कृतीक क्षेत्रात देवाणघेवाण यासाठी परस्परात सहकार्याचे करार केले जात आहेत.

### ८.२.५ राष्ट्रा-राष्ट्रातील सहकार्य वाढविण्याची कारणे:

आंतरराष्ट्रीय राष्ट्रराज्य व्यवस्थेत परस्परात सहकार्याची प्रक्रिया दिवसेंदिवस वृध्दींगत होत आहे. हे आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढण्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे सांगता येतील.

१) **राष्ट्रांच्या गरजापूर्तीसाठी** : आज मानवाच्या गरजा प्रचंड वाढल्या आहेत. लोकसंख्याही वाढत आहे. त्यांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी, सुखसमृध्दीसाठी इतर राष्ट्राकडून मदत व सहकार्य घ्यावे लागते. त्यामुळे राष्ट्रे परस्परात सहकार्य घडवून आणतात. आज जगातील प्रत्येक राष्ट्राला आपल्या देशातील नागरीकांच्या गरजांची पूर्तता करावी लागते, त्या गरजा आपल्याच राष्ट्रातून पूर्ण होतील असे नसते, तेव्हा अश्या गरजांची पूर्तता करण्यासाठी इतर राष्ट्रावर अवलंबून राहावे लागते. हेच परावलबंन राष्ट्रांना इतर राष्ट्राशी सहकार्य करण्यासाठी भाग पाडत आहे.

२) **शीत युध्दाची समाप्ती**: दुसऱ्या महायुध्दानंतर जगात अमेरिका व रशिया या दोन राष्ट्रात शीतयुध्द निर्माण झाले. जवळपास ४० वर्ष ही शतीयुध्दाची व राष्ट्रात तणावाची होती. पुढे आपसातील प्रश्न सोडवून परस्पराचे सहकार्य घेण्याची भावना एक गरज म्हणून पुढे आली. विघटनाच्या जागी एकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली, संघर्षाचे वातावरण समाप्त होवून त्याजागी सहकार्यचे वातावरण निर्माण झाले. शीतयुध्दातील तणाव, भिती व अविश्वासाचे राजकारण संपुष्टात आल्याने शीतयुध्दोत्तर काळात सहकार्याचा मार्ग मोकळा झाला. त्यामुळे अमेरिका व सो. रशिया बरोबरच पूर्व व पश्चिम युरोपीयन राष्ट्रे, अमेरिका-चीन, रशिया-चीन या राष्ट्रात सुध्दा सहकार्याची भावना व सहकार्याची प्रक्रिया वाढीस लागली. या राष्ट्रात आर्थिक , व्यापार विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, सांस्कृतीक इ. क्षेत्रात परस्पर सहकार्य वाढीस लागले आहे.

३) **आर्थिक विकास व सहकार्याला प्राधान्य**: शीत युध्दोत्तर काळात राष्ट्रानी आर्थिक विकासाला प्राधान्य दिले आहे. आर्थिक हितसंबंधाचे संवर्धन करण्यासाठी राष्ट्रे त्यांच्या परराष्ट्र धोरणात अग्रक्रम देत आहेत. अमेरिकेने आपल्या परराष्ट्र धोरणात ‘आर्थिक राजनयाला’ प्राधान्य दिले आहे. राष्ट्रानी आर्थिक विकासाला प्राधान्य दिल्यामुळे असा विकास साध्य करण्यासाठी विविध राष्ट्राकडून मदत घेत आहेत. त्यातुन त्याच्यात सहकार्याची

भावना वाढत आहे. आज भारताला त्याच्या विकासासाठी उर्जेची गरज आहे आणि ती प्राप्त करण्यासाठी भारताने नेपाळ, भुतान या राष्ट्रासोबत जलशक्ती निर्मितीबाबतचे करार केले आहेत.

४) **लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेतून सहकार्य वाढले**: जागतीक व्यवस्थेतील राष्ट्रे लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेमुळे आणि लोकशाही शासनावरील वाढत जाणाऱ्या विश्वासामुळे संपूर्ण जगात सहकार्याची भावना वाढीस लागण्यास अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. सो. संघाच्या विघटनानंतर पूर्व युरोपातील पोलंड, हंगेरी, रुमानिया, बल्गेरिया सारख्या साम्यवादी राष्ट्रानी लोकशाही शासनपध्दती स्विकारली. शिवाय अनेक देशात लष्करी हुकुमशाही शासन पध्दती होत्या अश्या राष्ट्रात सुध्दा लोकतंत्रात्मक सरकारे अस्तित्वात आली. विविध राष्ट्रातील ही लोकशाहीकरणाची प्रक्रिया आर्थिक विकासावर आधारीत होती यातून आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढीस मदत झाली आहे.

५) **एकीकरणाची प्रक्रिया**: शीतयुध्दानंतर जागतीक व्यवस्थेतील राष्ट्रात एकीकरणाच्या प्रक्रियेने जोर धरला आहे. याची सुरूवात पूर्व व पश्चिम जर्मनीच्या एकीकरणाने झाली. युरोपीयन राष्ट्रांचे एकीकरण होऊन 'युरोपियन युनियन' ची स्थापना झाली. दक्षिण आशियाई राष्ट्रातील सार्क देशानी साफ्टाची प्रक्रिया सुरू केली आहे. वाढत्या आंतरराष्ट्रीय सहकार्यामुळेच एकीकरणाला गती मिळाली आहे. एकीकरणाच्या प्रक्रियेमुळे राष्ट्राराष्ट्रात विश्वास निर्माण झाला असून सहकार्यांची प्रक्रियाही वाढली आहे.

६) **जागतीकीकरण**: जागतीकीकरणाच्या प्रक्रियेमुळे राष्ट्राराष्ट्रातील परस्परावलबित्व वाढले असून या प्रक्रियेपासून अलिप्त राहणे शक्य नसल्याची जाणीव राष्ट्रांना झाली आहे. त्यामुळे राष्ट्रे परस्परातील मतभेद बाजूला ठेवून आर्थिक आणि व्यापारी सहकार्यासाठी प्रयत्नशील आहेत. जागतीकीकरणाच्या प्रक्रियेने आंतरराष्ट्रीय सहकार्याला गती दिली आहे. जागतिकीकरण ही राष्ट्रांमधील आर्थिक, सामाजिक, व्यापारी, सांस्कृतीक विज्ञान, तंत्रज्ञान, इ. क्षेत्रातील सहकार्य घनिष्ठ करुन परस्परावलंबी विश्वाची निर्मिती करणारी प्रक्रिया आहे. यामुळे जगात सहकार्याची भावना वाढीस लागत आहे.

७) **विभागीय व्यापार संघाची वाढती भूमिका:** नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत विविध राष्ट्रात प्रांतीय आधारावर विविध व्यापार संघाची निर्मिती झाली आहे. यातील युरोपीयन महासंघ, आसियान, नाफ्टा, साफटा, एपेक, आफ्रिकन महासंघ, मर्केसुर या सारख्या व्यापार संघाची आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्वाची भूमिका आहे. राष्ट्रे आतंराराष्ट्रीय हिताबरोबरच प्रांतीय हितसंबंधाचा विचार करत आहेत. त्यामुळे प्रांतीय स्तरावर राष्ट्राराष्ट्रात सहकार्याची भावना वाढत आहे.

८) **संयुक्त राष्ट्रसंघटनेचे वाढलेले महत्व**: दुसऱ्या महायुध्दानंतर जगातील राष्ट्रात आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. परंतू शीत युध्दाच्या काळात युनो ही संघर्षाचे व्यासपीठ बनले होते. शीत युध्दाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता, निशस्त्रीकरण, पर्यावरण, संरक्षण यांची जाणीव वैश्विक बनली आहे. या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी राष्ट्रे युनोच्या माध्यमातुन परस्परांना सहकार्य करण्यास तयार आहेत.

९) **आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा वाढता धोका**: आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढण्यास दहशतवादाचा वाढता धोका हे देखील सहायक ठरला आहे. हजारो निरपराध बालक, महिला, वृद्ध, आजारी अशा कोणत्याही नागरिकांचा मानवी दृष्टीकोनातून विचार न करता, त्यांचे अपहरण, निघृण हत्या व मोठे स्फोट घडवून मानव व वित्तहाणी करून दहशत निर्माण करण्याच्या दहशतवादी कारवायामुळे संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे. त्यावर त्वरीत योग्य कारवाई करुन शांतता निर्माण करणे आवश्यक आहे. यासाठी राष्ट्राराष्ट्रात परस्परात सहकार्य निर्माण होणे आवश्यक आहे. त्याशिवाय दहशतवादाचा मुकाबला करता येत नाही. आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा धोका असणाऱ्या अमेरिका, चीन, रशिया, भारत, मध्य आशियाई राष्ट्रे यांनी दहशतवादाचा सामना करण्यासाठी द्विपक्षीय व बहुपक्षीय पातळीवर करार केले आहेत. दहशतवादाचा सामना करण्यासाठी संयुक्त प्रयत्न करणे आवश्यक आहे व त्यासाठी राष्ट्राराष्ट्रात परस्परात सहकार्य असणे आवश्यक आहे.

## ८.२.६ आंतरराष्ट्रीय सहकार्याचे प्रकार

आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत असणाऱ्या राष्ट्रात विविध प्रकारचे सहकार्य स्थापीत होत आहे. यातील काही आंतरराष्ट्रीय सहकार्याचे प्रमुख प्रकार खालील प्रमाणे सांगता येतील.

१) **राजकीय सहकार्य**: राष्ट्रे परस्परांना विविध राजकीय स्वरूपाचे सहकार्य देत असतात. असे सहकार्य व्दिपक्षीय किंवा बहुपक्षीय असते. पहिल्या व दुसऱ्या महायुध्दाच्या काळात युरोपीयन राष्ट्रे मित्र राष्ट्र असणाऱ्या राष्ट्रांना राजकीय सहकार्य देत असत. शीतयुध्दानंतर खऱ्या अर्थाने राजकीय सहकार्याचा मार्ग मोकळा झाला. नवीन जागतीक व्यवस्थेत इराक विरूद्ध केलेली सामुहिक सुरक्षेची कार्यवाही हे राष्ट्राराष्ट्रातील परस्पर सहकार्याचे महत्वाचे उदाहरण आहे. या मोहिमेत चाळीस पेक्षा अधिक राष्ट्रांच्या सैन्याचा समावेश होता. आज राष्ट्रे दहशतवादाचा सामुहिकरित्या सामना करण्यासाठी परस्पराना सहकार्य करीत आहेत. हे राजकीय सहकार्याचेच उदाहरण आहे.

२) **आर्थिक सहकार्य:** जागतिकीकरणाच्या प्रकियेबरोबर राष्ट्रे आर्थिक हितसंबंधाच्या संरक्षणाला महत्व देत आहेत. त्यामुळे राष्ट्राराष्ट्रात आर्थिक सहाकार्यात वाढ झाली आहे. परस्परविरोधी विचारसरणी असलेली अमेरिका व चीन सारखी राष्ट्रे जागतिकीकरणामुळे आर्थिक सहकार्यासाठी जवळ येत आहेत, आज या दोन्ही राष्ट्रातील व्यापार शभर अब्ज डॉलरच्या वर पोहचला आहे. आर्थिक सहकार्यासाठी राष्ट्रे परस्परातील वाद काही काळ बाजूला ठेवत आहेत. भारत व चीन या राष्ट्रांनी हा मार्ग स्विकारलेला आहे. राष्ट्राराष्ट्रात आर्थिक सहकार्य वाढविण्याचे ते एक उत्तम व्यासपीठ आहे. वाढत्या आर्थिक सहकार्यामुळे राष्ट्रांमधील राजकीय संघर्ष सुटण्यास व विश्वासाचे वातावरण निर्माण होण्यास मदत होते.

३) **द्विपक्षीय पातळीवरील सहकार्य**: राष्ट्रराज्य व्यवस्थेत द्विपक्षीय पातळीवर मोठ्या प्रमाणात विविध प्रकारच्या राजकीय, आर्थिक व्यापारविषयक, सांस्कृतिक इ. क्षेत्रातील सहकार्यात वाढ होते. आज राष्ट्रे दुसऱ्या देशातील विद्यार्थ्यांना आपल्या राष्ट्रात शिक्षण घ्यावे यासाठी विविध सुविधा व सवलती प्रदान करत आहेत. राष्ट्रात सांस्कृतिक सहकार्य वाढावे यासाठी राष्ट्रे परस्परांच्या राष्ट्रात 'सांस्कृतीक महोत्सवाचे' आयोजनही करतात.

याशिवाय आज आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत राष्ट्रा राष्ट्रात औद्योगिक, तांत्रीक, प्रासंगीक, बौद्धीक, सैनिकी, पर्यटन विषयक सहकार्यही वाढत आहे. अशी नवनवीन सहकार्याची विविधे क्षेत्रे आज विस्तारलेली आहेत.

## ८.२.७ संघर्ष व सहकार्य यातील फरक

आंतरराष्ट्रीय राजकारण हे संघर्ष व सहकार्य याचा खेळ आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण हे संघर्षाचे व सहकार्याचे राजकीय मिश्रण आहे. संघर्ष आणि सहकार्य हे सातत्याने घडत असतात. या दोन्ही तत्वात काही फरक आहे. संघर्षाचे तत्त्व हे शक्तीच्या व वास्तववादी सिद्धांतावर आधारीत आहे. वास्तववादयांच्या मते संघर्ष ही आंतरराष्ट्रीय राजकारणातील अपरिहार्य बाब आहे. सहकार्याचे तत्व आदर्शवादी तत्वाज्ञानावर भर देते व जगातील राष्ट्रराष्ट्रात संघर्ष संपुष्टात येऊन त्यांच्यात सहकार्याची भावना वाढीस लागेल व त्यातून विश्वराज्याची निर्मीती होईल असे वाटते. जगात परस्परविरोधी हितसंबधामधून राष्ट्राराष्ट्रात सहकार्य निर्माण होते.

संघर्षामुळे राष्ट्रे परस्परावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतात यासाठी राष्ट्रे परस्पराविरोधी कृत्ये करतात तर सहकार्यात राष्ट्रे परस्परात विश्वासपूर्ण वातावरण निर्मीती करण्यासाठी परस्परपुरक कृत्ये करतात.

जेव्हा एकच गोष्ट प्राप्त करण्यासाठी दोन राष्ट्रामध्ये असलेल्या स्पर्धेतून संघर्ष निर्माण होतात. जेव्हा दोन राष्ट्रांना शत्रु समान असतो तेव्हा समान शत्रू विरूध्द राष्ट्रे एकत्र येऊन राष्ट्रे यांच्यात सहकार्याचे संबंध करतात.

राष्ट्राराष्ट्रातील संघर्षातून तणाव वाढतो तर सहकार्यातून तणाव कमी करण्याचा, तणाव शिथिलता आणण्याचा प्रयत्न होत असतो. संघर्ष हा राष्ट्रीय विकासात अडथळा आहे. कारण संघर्षामुळे राष्ट्रांना संरक्षण निधीवर मोठा खर्च करणे आवश्यक बनते तर सहकार्यामुळे राष्ट्रीय आहे. द्विपक्षीय पातळीवरील राजकीय आणि आर्थिक सहकार्य वाढल्यामुळे जुने संघर्ष सुटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राजकीय स्वरुपाच्या संघर्षावर राष्ट्रांनी चर्चेचा व सहकार्याचा मार्ग स्विकारल्याचे संघर्षावर तोडगा निघणे शक्य झाले आहे. भारत व बांग्लादेश या दोन राष्ट्रानी सीमावाद चर्चेच्या व सहकार्याच्या माध्यमातून सोडविला आहे.

४) **विभागीय पातळीवरील सहकार्य**: विभागीय पातळीवर विविध प्रकाराच्या आर्थिक व व्यापारी संघाची होणारी स्थापना व त्यांची वाढती भूमिका यावरून हेच दिसते की आज राष्ट्रे या विभागीय व्यापार संघाच्या माध्यमातून विभागीय सहकार्यावर भर देत आहेत. आज जगात युरोपीयन युनियन, नाफ्टा, साफ्टा, आसियान, मर्केसुर ऐपक, आफ्रिकन महासंघ या सारखे विभागीय व्यापार संघ निर्माण झाले आहेत. हे व्यापार संघ आपआपल्या व्यापार संघातील राष्ट्रात व्यापारी सहकार्य वाढविण्यास भर देत आहेत. या व्यापार संघाचा अनेक राष्ट्राच्या आर्थिक विकासात महत्वाचा वाटा आहे. उदा. मलेशिया, इंडोनेशिया, थायलंड, सिंगापूर सारखी राष्ट्रे, 'एशियन टायगर्स' म्हणून ओळखली जात. त्यांच्या आर्थिक विकासात आसियान या व्यापार संघटनेची महत्वाची भूमिका आहे.

५) **आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य**: १९९० च्या दशकानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवरील राष्ट्रात सहकार्याची वाढ झाली आहे. आज नवीन जागतीक व्यवस्थेत सर्व राष्ट्रामध्ये काही सामाईक हितसंबंधाचे मुद्दे आहेत. त्यावर जगातील अनेक राष्ट्रे एकत्र येत आहेत. जसे की पर्यावरण संरक्षण, आंतरराष्ट्रीय दहशतवाद, मानवी हक्काचे सरक्षण, नि:शस्त्रीकरण याबाबत असणारी जाणीव ही वैश्विक बनत आहे. त्यासाठी राष्ट्रे आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य करतांना दिसतात. पर्यावरण सरक्षणाच्या उद्देशाने व जागतीक उष्माकांची समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रे विविध प्रकारच्या पर्यावरण परीषदा (जसे की १९९२ ची रिओ-द-जनेरो परिषद, १९९७ ची क्युटो परिषद) च्या माध्यमातून एका जागतीक व्यासपीठावर एकत्र येत आहेत व अशी समस्या सोडविण्यासाठी परस्पर सहकार्याची भूमिका घेत आहेत.

६) **शैक्षणिक व सांस्कृतीक सहकार्य**: नवीन आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत आज राष्ट्रे विविध प्रकारच्या सहकार्याला प्राधान्य देत आहेत. अश्या सहकार्यामुळे राष्ट्रात अधिक जवळीकता वाढत आहे. विकासाला चालना मिळते. संरक्षण निधीवर कपांत करून तो निधी आर्थिक व सामाजिक विकासावर खर्च करता येतो.

संघर्षाचा संबंध राष्ट्रांमधील सत्ता प्राप्तीसाठी चाललेल्या स्पर्धेशी आहे तर सहकार्याचा संबंध संघर्षाच्या व्यवस्थापनाशी आहे.

## ८.३ सारांश

आंतरराष्ट्रीय राजकारण हे संघर्ष आणि सहकार्याचे राजकीय मिश्रण आहे. संघर्ष व सहकार्य राष्ट्रामधील परस्पर संबंधाची दोन मुख्य वैशिष्ट्ये आहेत. जर राष्ट्राराष्ट्रामधील संबंध स्पर्धात्मक शत्रुत्वाचे असतील तर त्याच्यात संघर्ष असतो. राष्ट्रांतील हितसंबंध व उद्दिष्टे परस्परविरोधी असतील तर त्यांच्यात संघर्ष निर्माण होतो. संघर्ष हा जाणीवपूर्वक निवडलेला मार्ग असतो, त्यासाठी हिंसक किंवा अहिसक कृत्याचा वापर केला जातो, संघर्षाचे स्वरुप हे भिन्न भिन्न असते. परंतु प्रत्येक संघर्षातून युद्ध झाले नाही. संघर्ष हे विविध प्रकारचे असतात. अनेक राष्ट्राराष्ट्रातील संघर्ष भुप्रदेशाच्या मालकी हक्कावरून, सीमाविवाद, फुटीरतावादी चळवळीतून, देशातंर्गत शासनावर नियंत्रण स्थापीत करण्यावरुन, आर्थिक कारणावरुन, वांशिक कारणावरुन, धार्मिक कारणावरुन इ. कारणावरुन होतात. असे संघर्ष सोडविण्यासाठी सत्ता समतोल साधने, सामुहिक सुरक्षितता, नि:शिस्त्रीकरण, प्ररोधन, राजनय, हस्तक्षेप या सारख्या साधनाचा वापर करता येतो.

राष्ट्रामध्ये संघर्षाबरोबरच सहकार्याचीही भावना असते. राष्ट्राराष्ट्रात विश्वास निर्माण होण्यासाठी सहकार्य आवश्यक आहे. सहकार्य म्हणजे समान हितसंबंध असणाऱ्या दोन व्यक्ति किंवा राष्ट्रांनी केलेले परस्पर हितसंबंधाना पुरक कृत्य असते. सहकार्याचे तत्व आदर्शवादावर आधारीत आहे व हाही जाणीवपूर्वक स्विकारलेला मार्ग असतो. आज राष्ट्रांना विकासासाठी परस्पर सहकार्य आवश्यक आहे. आंतररष्ट्रीय व्यवस्थेत अनेक कारणामुळे राष्ट्रात सहकार्य वाढत आहे. हे सहकार्य राजकीय, आर्थिक, द्विपक्षीय, बहुपक्षीय, विभागीय, आंतरराष्ट्रीय, तांत्रीक, औद्योगीक शैक्षणिक व सांस्कृतिक अशा विविध प्रकारचे असते.

## ८.४ सरावासाठी स्वाध्याय

१. संघर्षाचा अर्थ स्पष्ट करा?

२. संघर्षाची वैशिष्ट्ये सांगा?

३. संघर्षाचे विविध प्रकार स्पष्ट करा.

४. संघर्ष निवारण्याच्या विविध पद्धतीचे वर्णन करा?

५. सहकार्याचा अर्थ व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

६. आंतरराष्ट्रीय सहकार्यास प्रोत्साहित करणाऱ्या कारणांची चर्चा करा.

७. सहकार्याच्या प्रमुख प्रकारांची चर्चा करा.

८. संघर्ष व सहकार्य यातील फरक स्पष्ट करा.

## ८.५ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. अमृतकर, डॉ. प्रशांत: आंतरराष्ट्रीय संबंध., चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

२. रायपुरकर, डॉ. वसंत: आंतरराष्ट्रीय संबंध., श्री. मंगेश प्रकाशन– नागपूर, २००६

३. देवळाणकर, डॉ. शैलेन्द्र: आंतरराष्ट्रीय संबंध., विद्या बुक पब्लिशर्स – औरंगाबाद, २०११

४. कुलकर्णी, डॉ. वि. जी. सोमवंशी प्रा. के: आंतरराष्ट्रीय संबंध–कैलास पब्लिकेशन्स– औरंगाबाद, २००४

५. तोडकर, डॉ. बी. डी. : आंतरराष्ट्रीय संबंध–महत्वाच्या संकल्पना– डायमंड पब्लिकेशन्स, पूणे, २०१२


-----------

# ९

# घटक ९ - राजकीय स्थैय आणि बदल

**अनुक्रमाणिका :**

९.० उद्दिष्टे
९.१ प्रास्ताविक
९.२ विषय-विवेचन
 ९.२.१ राजकीय स्थैर्य
 ९.२.२ राजकीय बदल
 ९.२.३ क्रांती सिद्धांत
९.३ सारांश
९.४ सरावासाठी प्रश्न
९.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ९.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला :

१) राजकीय स्थैर्य म्हणजे काय हे स्पष्ट करता येईल.

२) राजकीय स्थैर्याचे प्रकार सांगता येतील.

३) राजकीय स्थैर्याचे अवलंबित्व स्पष्ट करात येतील.

४) राजकीय बदलाचा अर्थ स्पष्ट करता येईल.

५) राजकीय बदलाची कारणे सांगता येतील.

६) क्रांती सिद्धाताचे वर्णन करता येईल.

## ९.१ प्रास्ताविक

राजकीय व्यवस्थाच्या महत्वपूर्ण अनेक वैभिष्ट्यांपैकी राजकीय स्थैर्य हे एक वैशिष्ट आहे. राजकीय स्थैर्य असेल तर व्यवस्थेला टिकाऊपणा येतो. राजकीय व्यवस्थांची क्षमता कशा स्वरूपाची आहे यावर राजकीय स्थैर्य अवलंबून असते. स्थिरतेचा महत्वाचा घटक राज्यघटना आहे. केवळ राज्यघटना अस्तित्वात येऊन स्थैर्य लाभत नाही तर तेथील जनमत व त्यांचा विकास लोकशाही संस्थात्मक रचनाच्या संदर्भात झालेला आहे वा नाही यावर भवितव्य अवलंबून असते राज्यव्यवस्थेमध्ये राजकीय भरतींची प्रक्रिया नियमित व शांततापूर्व पध्दतीने घडून आली तर प्रश्नांची सोडवणूक सनदशीर मार्गाने होते. राजकीय संस्थाचे आणि तिच्या अंतर्गत असलेल्या इतर संस्थाचे संस्थीभवन घडून येणे आणि राजकीय मूल्यांचा स्वीकार करून त्या व्यवस्थेत पाठबळ प्राप्त करून देणे या घटकांना विशेष महत्व असते.

द्वितीय महायुध्दानंतर जगातील बहुतांश राष्ट्राची साम्राज्यवादातून मूक्तता झाली विशेष आफ्रो-आशियाई देशांची संख्या अधिक होती. अनेक राष्ट्रांनी लोकशाहीचा स्विकार केला यामधील भारताचा अपवाद वगळल्यास राजकीय स्थिरता टिकू शकली नाही. बहुतांश देशांमध्ये लोकशाहीचा विलय होऊन इतर प्रणालीनी वर्चस्व निर्माण केलेत आणि स्थैर्य नामशेष झालेत. स्थैर्य न टिकण्यामागील कारण मिमांसाची चर्चा राजकीय विश्लेषकामध्ये होऊ लागली. स्थिरतेच्या दृष्टिने कोणते महत्वपूर्ण घटक ठरतात यावरील चर्चेत विकासाचा मुद्दा गवसला सोबतच स्थिरतेकरीता राजकीय संस्कृती व राजकीय सामाजिकीकरण या महत्वपूर्ण असल्याचा निष्कर्ष राजकीय विश्लेषकांनी मांडला स्थिरतेबाबत विकास संकल्पना जवळची असल्याचे अभ्यासक नोंदवितात. राजकीय स्थिरतेच्या आधारावरच राजकीय व्यवस्थेची क्षमता जोखल्या जात असते.

## ९.२ विषय-विवेचन

### ९.२.१ राजकीय स्थैर्य

राजकीय स्थैर्याची कल्पना ही अन्य राजकीय व्यवस्थांपेक्षा लोकशाही व्यवस्थांचा संदर्भात अधिक महत्वाची मानल्या जाते.

लोकशाही व्यवस्थेच्या संदर्भात स्थैर्याचे तीन प्रकार लक्षात घेतले जातात.

१)      राजकीय स्थैर्य राजवटीच्या स्थैर्याच्या बाबतीत दोन महत्वपूर्ण गोष्टी आहेत. एक म्हणजे दीर्घकाळ टिकून राहलेली राज्यघटना व त्या आधारावरील व्यवस्थेचे स्थैर्य दुसरे म्हणजे राज्यासमोर कशाही प्रकारची तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झालेली असली तरी ती व्यवस्था टिकून राहण्याची त्या राजवटीची प्रवृत्ती किंवा क्षमता होय. स्थैर्य नसेल तर लोकशाही संपुष्टात येऊ शकते.

राजकीय स्थैर्य असेल तर असे म्हणता येते की, त्या राजवटीमध्ये दीर्घकाळ टिकून राहण्याची क्षमता आहे. इंग्लड याचे प्रातिनिधीक उदाहरण आहे. एखाद्या व्यवस्थेची स्थिरता म्हणजे त्या व्यवस्थेतील वैशिष्टये किती दीर्घकाळ टिकून राहिली हे पाहणे होय. बरेचदा घटनात्मक बदल अथवा दुरुस्त्या कराव्या लागतात. परंतु असे होत असेल तरी घटनेने निर्माण केलेली मूलभूत चौकट तशी कायम राहू शकते. भारतीय संविधानातील विशोधनांवर दृष्टिक्षेप टाकल्यास याचा प्रत्यय येतो. या प्रारूपात राजवटीचे मूळ स्वरूप नाहिसे होत नाहीत. व राज्यव्यवस्था स्थिर राहतात. सर्वकष राजकीय व्यवस्था मधिल स्थिरता दिर्घकाळ राहते असे म्हणने धाडसाचे ठरेल १९१७ ते १९९० मधील रशीयातील राजकीय व्यवस्थेचे स्थैर्य सर्वकष राजकीय व्यवस्थेच्या स्थिरतेचे उदाहरण म्हणून पूर्वी मांडले जायचे. परंतु विद्यमान प्ररिप्रेक्ष्यात त्याला गृहित धरता येत नाही.

२.      शासकीय स्थैर्य शासकीय किंवा प्रशासकीय अधिकारी व्यक्ती कीती काळ अधिकारपदी राहतात हे पाहून शासकीय स्थैर्याचे मोजमाप करता येते. जॅक्सन व स्टीन या संदर्भात म्हणतात सनदशीर शासन म्हणून मान्यता असणारा, शासनाचे लष्करी सत्तेवर नियंत्रण असणारा व शासन मूल्य वाटपाच्या बाबतीत कार्यक्षम असणाऱ्या शासनाला स्थिर शासन म्हटल्या जाते.

शासकीय स्थैर्याचा अभ्यास शासन-प्रशासनाच्या पातळीवर करता येतो. साधारणतः प्रशासनाची चौकट विस्कळीत होत नाही ती स्थिरता आणि सातत्य राखून असते परंतु शासन प्रणालीत बदलाव येऊ शकतो. उदा. मुदतपूर्व सरकारचे विसर्जन वा घटकराज्यात बरखास्त करण्यात आलेले शासन.  भारतात घटक राज्यांच्या तुलतेन केंद्रीय पातळीवर स्थैर्य अधिक राहिलेत. देशातील विविध राज्यामध्ये घटनेचे ३५६ वे कलम लागू करून सरकारे मुदतपूर्व विसर्जीत करण्यात आली त्यामुळे राज्यात मुदतपूर्व निवडणुका बऱ्याच प्रमाणात झाल्यात मंत्रीमंडळातील मंत्र्यांनी राजीनामे दिलेत वा काढून टाकलेत यामुळे शासन अस्थिर झाल्याचा प्रकार मात्र दुर्मिळ आहे. त्यामळे शासकीय स्थैर्य लोकशाहीत आढळते तुलनेत सर्वकष व लष्करी राजवटीमध्ये लोकक्रांती घडून आल्यास शासन स्थैर्य नाहीसे होऊन राजकीय पोकळी निर्माण होताना दिसते. अलिकडे पश्चिम आशिया वा

आफ्रिका देशांमधील राजकीय अस्थैर्य लक्षात घेतल्यास शासन संरचनेचा कोसळलेला डोलारा लक्षात येतो. अरब स्प्रिंग, जस्मिन क्रांती यामुळे पश्चिम आशियातील शासकीय स्थैर्य कोसळलेले आहे. लोकशाही प्रणालीत सरकारामधील बदल वा सत्तातरण घटनात्मक रितीने घडून येते केवळ सत्तेचे हस्तांतरण ही औपचारीकता घडताना दिसते.

३) सामाजिक स्थैर्य सामाजीक स्थिरतेच्या बाबतीत निश्चित निकष सांगणे अवघड मानले जाते. यांचे कारण म्हणजे प्राचीन ते आधुनिक या सर्वच कालखंडात हिंसाचार, राजवटी उलथवून लावणे या गोष्टींची भरमार असल्याचे दिसून येते. जनसमूहांच्या वाढत चाललेल्या मागण्या अथवा अपेक्षा यांची योग्य तऱ्हेने परिपुर्ती झालेली नसेल किंवा समाजातील विविध गटांमध्ये सामंजस्याची भावना नसेल. समाजातील आर्थिक तांत्रिक बदलामुळे समाजासमोर जी आव्हाने म्हणून येतात त्यांच्याशी जुळवून घेणे व त्याला सामोरे जाण्याची क्षमता नसेल तर समाजाच्या स्थिरतेचे सुरुंग लागण्याची शक्यता अधिक राहते. त्यावरील नियंत्रण प्रस्थापित होणे गरजेचे आहे. आफ्रिका खंडातील सोमालीया, युगांडा वा पश्चिम आशियातील सामाजिक व्यवस्था अस्थैर्याच्या गर्तेत गूरफटल्या गेली आहे. पश्चिम आशियातील भागातून युरोपमध्ये मोठ्या प्रमाणात निर्वासीतांचे लोंढे जाणे हे सामाजिक अस्थिरता विषद करणारी बाब आहे.

बऱ्याचदा समाजाच्या स्थिरतेचा संबंध राजकीय व्यवस्थेतील आदान प्रक्रियेशी जुळलेला असतो. लोकांच्या मागण्यांचे रूपांतर करण्याची प्रक्रिया निटपणे व्यवस्थीत होते किंवा नाही यावरही समाजाचे स्थैर्य अवलंबून असते. इंग्लड हे त्याचे प्रतिनिधीक व वस्तुदर्शक उदाहरण आहे. एकंदरीत राजवटीबद्दलची स्थिरता नसेल, किंवा विरोध असेल तर समाजात क्रांतीची शक्यता असते. शासनाची स्थिरता नसेल तर शासनाच्या धोरणावर व कार्यक्षमतेवर परणाम होईल. आणि सामाजिक स्थिरता नसेल तर लोकांमध्ये असंतोष निर्माण होत असतो. अतंतः राजकीय व्यवस्थेला धोका उत्पन्न होण्याची शक्यता वाढते.

राजकीय व्यवस्था ही अनेक संरचना व भूमिकांनी बनलेली असते. राजकीय व्यवस्थैचे कार्य अतिशय सुचक पध्दतीने कार्यान्वित राहावे याकरीता राजकीय व्यवस्थांच्या सर्वच घटकामध्ये संतुलन असणे आवश्यक असते. संतुलनाचा संबंध स्थिरतेशी निगडीत आहे. राजकीय स्थैर्याची संकल्पना अंतर्गत बहिर्गत घटकांच्या परिस्थितीवर अवलंबून असते. परंतु तिची परिणामकारकता व्यवस्थेतील दृढीकरण व लोकमानस यावरही अबलंबून असल्याचे जाणवते. उदा. ब्रिटनच्या अंतरगांत आणि जागतिक पातलीवर फार मोठे बदल होऊन सुध्दा राजेशाही कायम राहीलेली आहे. अलिकडे तर सर्वाधिक

कार्यकाळ पदावर राहिलेली रार्णा म्हणून ब्रिटनने कौतुक सोहळा आयोजित केला. याचा अर्थ ब्रिटनच्या राजकीय स्थैर्यावर परिणाम न होता ती कायम आहे असे असले तरी संस्थात्मक रचनाना बदलणाऱ्या परिस्थितीनुरुप बदलावे लागते अन्यथा असंतोष निर्माण होतो. ब्रिटनच्या साम्राज्ञीचे पद वा राजेशाहीची स्थिरता जशी तेथील लोकमतावर टिकून आहे त्याचप्रमाणे लोकमताला राणीने दिलेल्या प्रतिसादावरही तिचे स्थैर्य अवलंबून राहिले असल्याचे निदर्शनास येते. अनेक कारके राजकीय स्थैर्याला कारणीभूत ठरतात हा यामधील निष्कर्ष आहे.

## राजकीय स्थिरतेचे अवलंबित्व

(अ) क्रांतीचा अभाव ह्नः ॲरिस्टाटलने क्रांती घडून येण्यासंदर्भात विभीन्न घटकांची चर्चा केली आहे व त्यावर राज्याने नियंत्रण ठेवल्यास क्रांती घडत नाही. राजकीय स्थैर्य क्रांतीच्या अभावाचे लक्षण आहे. राज्यव्यवस्थेत अंतर्गत भांडणे, द्वेषमुलक प्रचार, असहिष्णू वातावरण, बुध्दिजीवी वर्गाचा अधिक्षेप त्याच्या हत्या, लोकप्रिय नेतृत्वाची हत्या, संघटित हिंसाचार, राज्यपुरस्कृत हिंसाचार वैमनस्य पसरविणारी भाषणे आणि दंगली टाळल्यास राजकीय स्थैर्य कायम राहते.

(ब) राज्यघटनेचा अभाव : राज्यव्यवस्थेला सुचारू रूप देणारी राज्यघटना अस्तित्वात असेल व ती लोकशाही संकेताना घेऊन राबविली जाणार असेल तर अस्थैर्य निर्माण होत नाही. राज्यघटनेतील तरतुदी समावेशक नसतील वा राज्यघटनेऐवजी दमन यंत्रणा वा सर्वकष कायदे उदयास आलेले असतील तर राजकीय स्थैर्य टिकाव धरू शकणार नाही.

(क) कायदाह्न-सुव्यवस्था उल्लघनाचा अभावः साधारणतः लोकशाही प्रणालीत घटनेने नागरीकांना शासन निर्णय वा कायद्याच्या बाबतीत निषेध व्यक्त करण्याची साधने उपलब्ध करून दिलेली आहेत. राजकीय व्यवस्थेत सातत्याने निषेध पूर्ण साधनांचा वापर होत असेल तर राजकीय स्थिरता कोसळण्याची प्रक्रिया सुरू होऊ शकते. त्यामुळे राज्यव्यवस्था संचालीत करणाऱ्या राज्यकर्त्यांनी खबरदारी पाळणे आवश्यक आहे. पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका ही त्याची उदाहरणे होत. भारतातही वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या वतीने रस्त्यावर उतरून कायदा सुव्यवस्थेला बाधक ठरतील असे निषेध मोर्चे, आंदोलने उभी केली जातात ते स्थैर्याच्या दृष्टिने विघातक आहे. राज्यकर्त्याद्वारे निर्मीत कायदेप्रणाली सर्वव्यापक आणि निकोप असावयास हवी.

(ड) शासकीय संस्थाचा विकास : राजकीय स्थैर्य ज्या शासन संस्थावर अवलंबून आहे त्यांचा नितीगत, धोरणात्मक व लोकशाही मूल्यात्मक विकास घडून येणे गरजेचे

आहे. विधीमंडळ, कार्यपालिका, न्यायपालीका, प्रसारमध्यमे यांच्या सोबतच लोकसंस्थात्मक जाळे कृतीप्रवण राहताना निश्चितपणे लोकशाही टिकविण्यास तिचा उपयोग व्हायला हवा. अलिकडच्या दशकात न्यायीक सक्रियते ऐवजी माध्यमांची सक्रियता वाढीस लागलेली आहे व तिचा परिणाम मागासदेशातील लोकशाहीवर पडू लागलेला आहे. ही स्थिती स्थैर्याला अनूकूल मानता येणार नाही. विशेषतः प्रत्येक संस्थेने निहीत कार्याला प्रमाणीत ठेवून कृती करायला हवी अन्यथा शासकीय संस्थाचा विकास एकांगी ठरेल व स्थैर्य कोसळून पडू शकते. शासकीय संस्थातील एकवाक्यता आणि लोकशाही मूल्यांचा विकास ही जाणिव राखून शासकीय संस्थांचा विकास व्हायला पाहिजेत.

(इ) वैगुण्यात्मक लक्षणाचा अभाव : राजकीय व्यवस्थांना आलेला आकार सामाजिक व्यवस्थेचे अभिरूप आहे. त्यामुळे समाज व्यवस्थेत असणारे वैगुण्य स्थैर्याला हानी पोहचविण्याची शक्यता आहे. जागतिक पातळीवरील धार्मिक विद्वेश, वंशवाद, रंगवाद, अभिजन-सामान्य, श्रीमंत-गरीब, वर्णश्रेष्ठत्व व भारतातील जातीवाद, प्रदेशवाद, भाषावाद, लिंग-विषमता, धार्मिक असहिष्णूता, स्पृश्य-अस्पृश्य, निम्नजातीतील विषयीचा अनुदार दृष्टिकोन ही घटके सामाजिक वैगुण्य म्हणून कार्य करतात यावर नियंत्रण असणे राजकीय स्थैर्याच्या दृष्टिने आवश्यक आहे.

वस्तुतः घटनेप्रती एकमत, सर्व संस्कृतीचा आदर, परमसहिष्णूता, अहिंसा विषयक धारणा, शांततेवरील प्रतिबध्दता, कायद्याचे पालन, मैत्रीभाव या बाबी स्थैर्याला पोषक आहे. लोकशाही देशांमध्ये ही घटके जोपर्यंत अस्तित्वात आहे तोपर्यंत स्थैर्य कायम असेल. राजकीय स्थैर्याच्या संदर्भात जॅक्सन व स्टीन या विचारवंतांनी सहा दृष्टिकोन मांडून त्याचा उहापोह केलेला आहे.

१) ऐतिहासिक दृष्टकोन : ज्या देशात भूतकाळात राजकीय स्थैर्य होते. त्या देशात वर्तमानकाळातही राजकीय स्थैर्य निर्माण होण्याची शक्यता असते. भुतकाळात राजकीय क्षेत्रात जे जे वाद निर्माण झालेले असतील. ते कशा रितीने सोडविलेले होते याचे ज्ञान व माहिती असल्यास त्यानुसार वर्तमान काळात त्या रितचिा उपयोग केला जाऊ शकतो व तो यशस्वी ठरू शकतो. हा दृष्टिकोन मात्र सर्वमान्य राहिलाच असे नाही. जगातील ज्या ज्या देशामध्ये राजकयि अस्थैर्य आहे त्या ठिकाणी राजकीय स्थिरता होती असे बव्हंशी देशांबाबत म्हणता येते. इतिहास काळातील घटना गृहीत धरून विद्यमान संदर्भात भाष्य करनारा हा दृष्टिकोन आहे. भारत, ग्रीस हे त्याचे प्रतिनिधीक उदाहरण आहे.

२. आर्थिक दृष्टीकोनः आर्थिक समतोल पर्यायाने समाजव्यवस्थेत आर्थिक विषमता नसेल तर राजकयि स्थैर्य टिकून राहते. इंग्लड मधील राज्यव्यवस्था तसेच युरोपातील स्वित्झर्लंड, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, कॅनडा हे देश आर्थिक विकासांवर आघाडीवर असल्यामुळे अनेक शतकाहून अधिक काळ स्थिरता टिकवून आहेत. विकसनशील देश वा मागास देश आर्थिक गतीला प्राधान्य देण्यामागील हेच कारण आहे. आर्थिक विकास व राजकीय स्थैर्य यांचा सहेतूक संबंध निश्‍चित दिसतो. त्यामुळे हा दृष्टिकोन राजकीय स्थैर्याला कारणीभूत असल्याचे विश्लेषक म्हणतो.

मात्र या मुद्यावर वैचारीक मतभेदाची तिव्रता आर्थिक आहे. सॅम्युअल हटिग्टंन याच्या मते आर्थिक दृष्ट्या गरिब असलेल्या राष्ट्रात हिंसाचार व अस्थिरता कमी आढळते. उलट आर्थिक दृष्टया विकसीत राष्ट्रात हे प्रमाण अधिक आहे. लिपसेटच्या मते आर्थिक प्रगतीची पातळी, औद्योगीकरण, शिक्षण, नागरीकरण यांचा संबंध देशाच्या अंतर्गत राजकीय स्थिरतेशी असतो. या प्रकारचे मत कार्ट राईट यानेही व्यक्त केले आहे. डीन न्युबर वेगळी मांडणी करताना म्हणतो की राजकीय स्थिरता व सामाजिक-आर्थिक विकासाचे प्रमाण यात निश्‍चित संबंध असतोच असे नाही.

३. कायदाधिष्ठीत दृष्टीकोन : कायद्याच्या प्रस्थापनेमुळे लोक राजवटीचा स्विकार करतात त्यामुळे राजकीय स्थिरता निर्माण होत असल्याचे प्रतिपादन हा सिध्दांत करतो. कायद्याचे राज्य म्हणजेच संविधानिक राज्य होय.

ॲरिस्टॉटल, हाब्ज, लॉक, रूसो यांच्या तत्वज्ञानात हा सिध्दांत आढळतो. कायदा जोपर्यंत अधिष्टीत आहे आणि त्या व्यवस्थेतील जनतेला तो मान्य आहे तोपर्यंत राजकीय व्यवस्थेचे स्थैर्य टिकून असते. स्थैर्य राखण्याची क्षमता घटनेत आहे हे अनुभवांती आपण मान्य करतो. २६ जानेवारी १९५० रोजी भारताने कायद्याचे राज्य मान्य केले अदयापपावेतो ते टिकून आहे याचा अर्थ लोकमान्यता कायद्याचे अधिष्ठान असून स्थिरतेशी संबंधीत आहे.

इतर दृष्टिकोनाप्रमाणेच हा दृष्टिकोन खारीज करणारे विचारवंत आहेत. लुसीयन पायच्या मते कायद्याच्या प्रस्थापनेमुळे वाद कमी होण्यापेक्षा ते मात्र वाढतात. कायद्यांची अंमलबजावणी करणाऱ्या व्यक्तींना लोकांची मान्यता नसेल तर कायद्याने असंतोष सुध्दा निर्माण होऊ शकतो.

१९ व २०व्या शतकांमध्ये प्रारंभी हा दृष्टिकोन प्रभावी होता. दुवर्जर व हरमन्स यांनी अनेक पक्ष पध्दती व राजकीय अस्थैर्य यांचा संबंध जोडलेला आहे. ज्या देशांमध्ये

समीश्र सरकारे असतात त्या ठिकाणी एकी राहू शकत नाही. परिणामी राजकीय अस्थिरता निर्माण होते. अनेक पक्ष पध्दती व राजकीय अस्थैर्य याचा पारस्पारीक संबंध नाही असे म्हणता येत नाही. जपान व भारतामधील बऱ्याच सरकारांनी आपला कार्यकाल पूर्ण केला नाही. या देशांमध्ये अनेक पक्ष पध्दती आहेत. भारतात १९८९ ते २०१४ हा कालखंड अस्थिर व टांगती तलवार असणारा गोंधळाचा कालखंड मानला जातो. तुलनेत बहुपक्ष पध्दती असूनही स्वित्झलँड मध्ये प्रमाणशिर प्रतिनिधित्वामुळे सरकारे नियत कार्यकाल बिना अडथळ्यांनी पूर्ण करतांना दिसतात. तर स्विडन, ब्रिटन या देशांमध्ये संमिश्र सरकारांची कारकीर्द यशस्वी राहीली. १९९९ ते २०१४ या कालखंडातील भारतातील संमीश्र सरकारांनी आपला कार्यकाल पूर्ण केला. त्यामुळे बहुपक्ष प्रणाली घटना असूनही अस्थैर्याला जबाबदार आहे हे विधान पूर्णपणे सत्य मानता येत नाही. उलट विद्यमान व्यवस्थेत कायद्याच्या राज्यावर लोक निष्ठा अधिक आहेत.

४. राजकीय दृष्टिकोनः राज्यव्यवस्थांच्या प्रती नागरीकांचा विश्वास, निष्ठा कशा स्वरूपाच्या आहेत यावरून राजकीय दृष्टिकोन तपासता येतो. विशेषतः त्या त्या देशाच्या राजकीय संस्कृती व राजकीय सामाजिकीकरण कशा स्वरूपाचे आहे यावरून राजकीय स्थैर्य निश्चित होते. लोकशाही प्रती नितांत निष्ठेमुळे ब्रिटनमधील राजपदाला सिमीत करण्यात आले आणि लोकशाहीचा विकास घडून आला. अमेरिकेतील राज्यक्रांतीने ब्रिटनची सुव्यवसथा नाकारून लोकशाहीची कास धरली तर जर्मनी, इटली, स्पेन या सर्वकष व्यवस्थाचा पूर्णतळ क्षय झाल्यानंतर लोकशाही मुल्यांची उभारणी झाली याचा अर्थ परिस्थितीनुरूप लोकभावना बदलल्या तरी मूलभूत प्रेरणा कायम राहतात, राजकीय व्यवस्थांच्या प्रती कायम असणाऱ्या या भावनांनाच राजकयि संस्कृती म्हटल्या जाते. राजकीय संस्कृती विकास पावणे आणि ती परिपक्व बनणे राजकीय स्थैर्याला मददगार आहे. बुध्द कालखंडात गणराज्ये होती. मोठ्या साम्राज्य निर्मितीच्या कालखंडात व परकीय सत्तांच्या वावटळीत ती मोडीत निघाली. ब्रिटीश राज्यसत्तेच्या काळात लोकशाहीविषयी क्रमशः चर्चा व संस्थात्मक रुपात ती मिळू लागली तर घटनात्मक स्विकारानंतर तिला बळकटी मिळाली. भारतातील जनतेने तिचे अभूतपूर्व स्वागत केले आणि ती टिकविण्याच्या दृष्टिने प्रयत्नरत राहिलेत यामध्ये रूजलेल्या राजकीय संस्कृतीचा प्रत्यय येतो. त्यामुळे राजकीय स्थिरतेला राजकीय दृष्टिकोन कारणीभूत असल्याचे म्हणता येते.

५. सांस्कृतिक दृष्टिकोन : समाजमूल्य व्यवस्था व राजकीय मूल्यव्यवस्था सारखी असेल तर राजकीय स्थैर्य टिकाव धरून राहते. विविधता, समिश्रता जोपासणारी राष्ट्रे

आजही राजकीय स्थैर्य टिकवून आहेत. भारत, अमेरिका त्याची उदाहरणे होत. दुसऱ्या बाजूला एकात्म असणारी राष्ट्रे स्थैर्याला सहाय्यभूत ठरलीत. त्यातूनच एक राष्ट्र एक राज्य संकल्पना अविश्कृत झाली. एकात्मता वा सहिष्णूता या दोन्ही बाजू सांस्कृतिक रचनेच्या बाबतीत राजकीय स्थैर्याला पूरक आहे.

अन्य दृष्टिकोनावरील टिकेप्रमाणेच यावरही टिका झालेली आहे. बहुविविधता असणाऱ्या देशांमध्ये कालांतराने वैरत्वाच्या भावना वेगवेगळ्या घटनामुळे वाढीस लागतात. भारत, चीन, इंग्लड, अमेरिका, फ्रान्स या देशांमधील वांशिक वा बहुसंख्य-अल्पसंख्य यामधील तीव्र झालेले संघर्ष लक्षात घेतले तर सांस्कृतिक दृष्टिकोन परिपूर्ण आहे असे म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे ज्या देशामध्ये एकात्म संस्कृती आहे त्या देशामध्येही विकासाचे परिणाम, लाभ, सुविधा यामुळे असमतोलावरून असंतोष खदखदत आहे तर धार्मिक दृष्ट्या एकात्मता बाळगणाऱ्या अरबस्थानात जिवघेणी स्पर्धा सुरू असून लक्षावधीना आपल्याच भूमितून निर्वासित व्हावे लागले असून, अरबस्प्रिंग, जस्मिन क्रांती यामुळे पश्चिम आशियातील मुस्लिम बहुल देश राजकीय अस्थैर्याच्या गर्तेत ढकलल्या गेले आहेत.याचा अर्थ सांस्कृतिक दृष्टिकोन राजकीय स्थैर्याला सहाय्यभूत ठरत असला तरी तो अस्थैर्याला तेवढाच पूरक असल्याचे टिकाकारांची टिका अमान्य करता येत नाही.

६. समाजशास्त्रीय दृष्टिकोन : समाजातील घटकामध्ये सामाजिक बंध दृढ स्वरूपाचे असतील तर राजकीय स्थिरता वाढण्यास मदत होते. समाज व्यवस्थेमध्ये संघटनात्मक जीवन विकसीत झाले पाहिजे. ज्या समाजव्यवस्थेत हे घडवून येते तेव्हा या दृष्टिकोनातून राजकीय स्थैर्य लाभते. दक्षिण आफ्रिकेतील टोळी सदृश्य व्यवस्था त्याची उदाहरणे आहेत. एकाच देशामध्ये संघटनात्मक जीवनाला पोशक वातावरण निर्माण होते. युरोप मध्येही घडून आले आहे. पोलिस लोकांचे राज्य वा झेक प्रजासत्ताक या दृष्टिकोनाला जवळची उदाहणे आहेत.

असे असले तरी समान संघटीत जीवन राजकीय स्थैर्याला अनुकूल राहिल असे ठामपणे म्हणता येत नाही. मानवी जीवन प्रत्येक वेळी वेगवेगळ्या वर्तनावर कृतीशिल राहते. एकाच संघटीत गटामध्ये धार्मिक, अनुभवप्रामान्यवाद, बुध्दजीवी, रूढीपरंपरा यावरून संघर्ष असून शकतात त्यावरून हिंसाचार उग्र झाल्यास अस्थैर्याच्या गटामध्ये फेकल्या जाण्याची शक्यता बळावते. आफ्रिका देशातील सोमालिया, टांझानिया, युगांडा हे त्याचे उदाहरणे होत. त्यामुळे हा दृष्टिकोन अनूकूल वा प्रतिकूल राहू शकतो असा याचा अन्वयार्थ आहे.

राजकीय स्थैर्य राज्य शास्रातील एक महत्वपूर्ण संकल्पना आहे. मानवी समुदाय एका राजकीय व्यवस्थेत रूपांतरीत होताना त्याला स्थैर्याची गरज भासली. मुळातूनच मानवाने आपली भटकंती सोडून स्थिर जीवन जगण्याला प्रारंभ केला तेव्हाच विशिष्ट नियमावलीचे नियंत्रण स्विकारले पुढे जाऊन त्यातूनच राजकीय व्यवस्था या आकारास आल्यात या राजकीय व्यवस्था मानवी विकासाच्या दृष्टिने स्थिर असणे अत्यंत निकडीचे असल्याचे विदयमान घटनावरून लक्षात येते. मानवी हक्कांना सुरक्षित करावयाचे असेल शांतता सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी राजकीय स्थैर्य महत्वपूर्ण आहे. राज्य–व्यवस्थामधिल अस्थिरता मानवी विकासाला घातक ठरतात. त्यामुळेच स्थैर्य संकल्पनेचे ओचित्य कायम आहे.

## ९.२.२ राजकीय बदल

बदलाची संकल्पना सर्वच क्षेत्राशी निगडीत आहे व ती सातत्यपूर्ण असून निरतंरता तिचा स्थायी भाव दिसून येतो. बदल समाज जिवनात गतिमानता राखून असते. समाज कधीच स्थिर नसतो. समाजातल्या विभीन्न क्षेत्रातील स्थित्यंतरानाच राजकीय परिवर्तन असे म्हटले जाते. परिर्वनाची प्रक्रिया सतत चालणारी प्रक्रिया आहे तिला अंत नसतो. परिवर्तनाचे घटक प्रत्येकच ठिकाणी सारखेच असतील असे नाही, प्रत्येक घटकांचा प्रभाव कमी जास्त असू शकतो. परिवर्तनाची वैशिष्टये प्रत्येक देशात सारखी नसतात. समाज व्यवस्था तेथील लोकधारणा, मूल्ये, परंपरा यांचा परिणाम परिवर्तनावर होताना दिसतो. त्यामुळे देशकाल परिस्थितनुसार त्यांची कारणेही वेगवेगळी राहताना आढळतात.

राजकीय परिर्वनाचे प्रमुख घटक वा साधने म्हणून राजकीय सुधारणा, क्रांती, श्रेष्ठ व्यक्ती, विचारसरणी, राजकीय पक्ष, राजकीय संस्था इ. समावेश करता येईल. या विभीन्न घटकांना लक्षात घेऊनच विविध देशातील राजकीय परिवर्तनाच्या संकल्पनेस महत्वाचे स्थान आहे.

### संकल्पना :

राजकीय बदल या संकल्पनेत विकास, विनाश, आधुनिकीकरण या तीनही गोष्टी अभिप्रेत आहेत. क्रांती हाही बदलच असतो परंतु त्यात एक प्रकारच्या व्यवस्थेचा विनाश व त्यावेळी दुसऱ्या व्यवस्थेची निर्मिती असा अर्थ अभिप्रेत असतो. विकास या शब्दात अधिक प्रगत व्यवस्थेकडे वाटचाल असा अर्थ अभीप्रेत असतो. आधुनिकीकरण ह्या शब्दात सुध्दा प्रगती असा अर्थ घेतला जातो. परंतु आधुनिकीकरण ही संकल्पनाच वेगळी अहे.

राजकीय बदल या संकल्पनेत मात्र राजकीय विनाश असा अर्थ करावा लागतो. सॅम्यअल हटिंग्टनच्या मते बदलत्या मागण्यांची पूर्तता करण्यात राजकीय व्यवस्था जेव्हा अकार्यक्षम ठरते तेव्हा बदलत्या परिस्थितीत ती स्वतःचे सातत्य टिकवून धरण्यास समर्थ ठरत नाही व अशा वेळी ती व्यवस्था कोसळण्याची शक्यता निर्माण होते संस्था जशा प्रगत पावतात किंवा परिपक्व होतात तशाच त्या कमकुवत होतात व नामशेष सुध्दा होतात. राजकीय बदल हा अधोगतीच्या दिशेने सुध्दा जाऊ शकतो.

राजकीय व्यवस्थेतील अधिकार वाटप, संरचना, भूमिका, नेतृत्व, मूल्ये कार्यपध्दती, कार्यक्षेत्रातील वाढ, राजकीय व्यवस्थेची वैशिष्टये व स्वरूप या प्रत्येकात किंवा एकाचवेळी अनेकात होणारा बदल हा राजकीय बदल म्हणूनच विचारांत घ्यावा लागतो. नवीन संस्थांची निर्मिती म्हणजे राजकीय बदल असा अर्थ नेहमीच घेता येणार नाही. उदा. विद्यार्थी संघटना, शेतकरी संस्था अशा संस्थांमुळे तणाव वाढून राजकीय व्यवस्थेच्या कार्यपध्दतीमध्ये होणारा बदल राजकीय बदल असेल. केव्हा केव्हा अशा तणांवामुळे राजकीय व्यवस्थेत धोरणात्मक बदल करावा लागत असतो. त्याचप्रमाणे प्रत्येकच सामाजिक बदल हा राजकीय बदल राहीलच असे नाही. परंतु त्याचा परिणाम होऊन राजकीय बदल संभवू शकतो.

राजकीय व्यवस्था ही समाजाचेच अविभाज्य अंग असते. समाजरचनेत बदल हे नित्याचेच असतात. ह्या बदलांचा राजकीय व्यवस्थांवर काही ना काही प्रभाव पडतो व बदल घडून येतात. समाज आधुनिक स्वरूपाचा परंतु राजकीय व्यवस्था जुन्या प्रकारची असे सहसा संभवू शकत नाही. अशा स्वरूपाची स्थिती असेल तर तणाव निर्माण होतात व तणावापासून व्यवस्थेला वाचविण्यासाठी राजकीय व्यवस्थेत बदल करणे क्रमप्राप्त ठरते. विकसनशिल देशात अशी बदल प्रक्रीया मोठ्या प्रमाणात आढळते. ती नेहमीच सुरु असते. आधुनिक काळात संसूचन माध्यमामुळे ह्या बदलाची शिघ्रता व प्रमाण विशेष दिसते. प्रत्येक देशाच्या कालखंडात राजकीय व्यवस्थांच्या संदर्भात बदल झालेले दिसून येतील. जस जसे आधुनिकीकरण वाढत जाते त्या प्रमाणात बदल संभवत असतो त्यामुळे बदल, विकास व आधुनिकीकरण यांचा समुह संबंध आहे.

उद्रेक हा सुध्दा राजकीय बदलाला चालना देत असतो. राजकीय निदर्शने व निषेध चळवळी ह्यामुळे राजकीय व्यवस्थेला धक्के पोहचतात. त्यातून राजकीय व्यवस्था मोडकळीस येत असतात. धार्मिक चळवळींचा असा परिणाम प्रकर्षाने दिसत असतो. एफ.डब्ल्यु. रिग्ज यांच्या मताप्रमाणे विकास हा विनाशाचा सापळा ठरू शकतो. पश्चिम आशियातील आयसीस संघटना उद्रेक संघटना म्हणूनच कुप्रसिध्द ठरत आहे. तिला

आधुनिकीकरण आणि तांत्रिक प्रगतीतून येणारी मुल्य  व्यवस्था मान्य नाही. त्यामुळेच अरबस्थानातील राजकीय व्यवस्था गटांगळ्या खाताना दिसत आहेत. धर्मांध राजवटी आधुनिकीकरण वा विकासाला विनाशक ठरतात त्यामुळे उद्रेक व्यवस्था विघातक बदलाला जबाबदार ठरत असल्याचे लक्षात येते.

## राजकीय बदलाची कारणे :

### १. सामाजिक संघटन व राजकीय बदलः

जुन्या वर्तणूक प्रकारांचा त्याग करणे व नवीन आणि स्थिर अशा नवीन वर्तणूक प्रकाराचा स्विकार करणे ह्या दोन टप्प्यातून सामाजिक संघटन घडत असते. असे कार्ल डॉइश म्हणतो. सामाजिक, आर्थिक मानसिक स्वरूपाच्या जून्या पध्दती कमकुवत ठरत जात असतात व नवीन प्रकारच्या बदलासाठी सामाजिकरण व वागणुकीसाठी लोक तयार होत असतात.

सामाजिक संघटन ही एक सामाजिक बदलाची विशाल प्रक्रीयाच होय. संसूचन माध्यमात बदल, आर्थिक-सामाजिक क्षेत्रात बदल, भौतिक परिसरातीत बदल, लोकसंख्येत बदल, तंत्रविषयक बदल ह्या सर्वांमुळे व्यवस्थापन बदल होत असतात. नवीन रस्ते बांधणे, घरे बांधणे, उदयोग धंदे, शिक्षण संस्थाची उभारणी, उत्पादन-वितरण व्यवस्थेत बदल, समाजिक स्थलांतर, लोक सवयीमध्ये बदल, दृष्टिकोन बदल अशा सर्व सामाजिक बदलाचा प्रभाव पडून राजकीय बदल घडून येणे हे कितीतरी स्वाभाविक ठरते.

कार्ल ड्वाईश यांच्या मते नित्य वाढत जाणारा नागरी समाज, व्यापार करणारा वर्ग, दलाल, कामगार, सुशिक्षित पांढरपेशे लोक, रेडीओ व टी. व्ही ऐकणारे पाहणारे संगणक, मोबाईल यांचा वापर करणारे, नवनव्या साधनांचा उपयोग करणारे, पर्यटकवर्ग, स्वयंसेवी संस्थांचा समूह ह्या सर्वांचा राजकीय प्रक्रियेतील सहभाग वाढत आहेत त्याचा तणाव राजकीय धोरण प्रक्रियेवर राजकीय संस्थांवर होऊन राजकारणात दर्जात्मक बदल संभवत असतात. राजकीय व्यवस्था आपली क्षमता सतत वाढविण्यासाठी प्रयत्नशिल असते. त्यासाठी सर्वप्रकारांच्या स्तरामधील लोकांना सहभागाची संधी देत असते. लिखीत स्वरूपाची कार्यपध्दती व संसुचन माध्यमांच्या वापर केला जात असतो. लोकांचा राजकीय प्रक्रियेत सहभाग वाढतो. निदर्शने, दंगली, चळवळी, संप, उठाव, सभा, मिरवणूका, वृत्तपत्र, रेडिओ, टी.व्ही. अलिकडील प्रभावी हत्यार संगणक, मोबाईल या माध्यमांचा उपयोग केला जातो. त्याचा परिणाम म्हणून मतदानाचे प्रमाण वाढत असते. निष्ठा विषयक बदल सुध्दा घडतात. शासन-लोक यांचा निकट संपर्क प्रस्थापित होत

असतो. अर्थात ह्या बदलांची दिशा नेहमी एकच असते असे नाही. ज्या प्रमाणात सामाजिक संघटन प्रक्रिया होत असेल त्या प्रमाणात राजकीय बदल घडत असतात. युरोपिय देशात विकसनशील देशात जुन्या व्यवस्था मोडत असताना आढळतात. परंतु नव्या व्यवस्था स्थिर होताना दिसत नाही याचे कारण सामाजिक संघटन प्रक्रिया तितक्या प्रबल नाहीत.

२. व्यक्ती व राजकीय बदल : राजकीय धोरण ठरविण्याची प्रक्रिया तशी सामूहीक प्रक्रिया असते. तरी पण त्यात व्यक्तीला फार महत्व असते. धोरण ठरवितांना व्यक्तीच्या इच्छांचे प्रतिबिंब त्यामध्ये पडते. त्याचप्रमाणे नेतृत्व हेही महत्वपूर्ण घटक आहे. लोकांकडून आलेल्या मागण्यांना निर्णयात रूपांतरीत करावे लागते. त्याकरीता कौशल्याची गरज भासते. शिवाय निर्णयाला कमीत कमी विरोध होईल याकडे लक्ष्य द्यावे लागते. या प्रक्रियेत व्यक्तीला व्यक्तीत्व पनाला लावणे आवश्यक आहे. याचा अर्थ व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव राजकीय बदल घडवून आणण्यात फार मोठा वाटा दिसून येतो. इंदिरा गांधी यांचे बँकाच्या राष्ट्रीय करणाचे धोरण व आणिबाणीचा निर्णय तसेच नरेंद्र मोदी यांनी स्वतःच्या छबी वर घडवून आणलेले सत्तांतरण या व्यक्तीगत नेतृत्वाशी निगडीत आहे. राजकीय पक्ष सत्ता प्राप्तीच्या दृष्टिने महत्वपूर्ण ठरणाऱ्या समोहक व्यक्तीकडे सुत्रे सुपूर्द करीत असतात. तेव्हा व्यक्ती व राजकीय बदल यांचा धनिष्ठ संबंध असल्याचे स्पष्ट होते.

साधारण व्यक्तीच्या वर्तणूकीत बदल झाल्यास राजकीय बदलावर प्रभाव होतो असेही दृष्टीपथास येते. खेड्यातून मोठ्या शहरात जर स्थलांतरण झाले तर राजकारणावर परिणाम होतो. पश्चिम आशियातील वांशिक संघर्षामुळे लोक मोठ्या प्रमाणात युरोपात निर्वासित होऊ लागलेले आहे. कुटुंबाचे निर्वासितीकरण त्या त्या देशांच्या राज्यव्यवस्थेवर परिणामदर्शक आहे हे मात्र दिसून येते.

## ३. कल्पना व राजकीय बदल

राजकारणात कल्पना व विचार प्रणाली यांना तर खुपच महत्वाचे स्थान आहे. कल्पनांची निर्मिती करून राजकीय नेते राजकीय बदल घडवून आणू शकतात. धर्मनिरपेक्षता, साम्यवाद, नाझीवाद, राष्ट्रवाद अशा विचारसरणीचा उपयोग संपूर्ण राजकीय बदल घडवून आणण्यास कारणीभूत ठरल्याचे आपणास आढळते. कामगार योजना, गरीबी हटाव, अन्नधान्य सुरक्षा, राजीव गांधी जीवनदायी योजना. सबका साथ सबका विकास, अच्छे दिन अशा कल्पनाचाही उपयोग करुण राज्यकर्त्यांनी आपली सत्ता टिकविली वा

प्राप्त केली स्वातंत्र्य, समता, बंधूता लोकांचे हक्क, मानवी अधिकार या कल्पना राजकीय बदलाला प्रेरक आहेत. जागतिक पातळीवरील बदल लक्षात घेतले तरी कल्पना, प्रतिमा, प्रतिके, चिन्हे यांना अभूतपूर्व महत्व असल्याचे राजकीय बदलाच्या बाबतीत आढळते.

## ४. संस्था व राजकीय बदल

राजकीय संख्याचा राजकीय बदल घडवून आणण्यात मोठा वाटा असतो. कायदेमंडळाची सभागृहे, सभागृहा कडून पारित झालेली कायदे, राजकीय पक्ष, दबाव गट, लोकपाल, पंचायती संस्था ग्रामसभा, या सर्वांमुळे लोकांच्या प्रवृत्तीत व क्रियाशिलतेत बदल घडवून आणेलेला आहे. न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार हा सुध्दा ठरलेला आहे. संविधान हा सुध्दा प्रभावी घटक आहे.

राजकीय स्थैर्याप्रमाणेच राजकीय बदल हे सुध्दा राज्यव्यवस्थेचे महत्वपूर्ण तत्व आहे. राजकीय व्यवस्थेत बदल नसेल तर कालांतराने साचलेपणा निर्माण होईल व क्रांतीची शक्यता आकारास येईल परिणामी राजकीय व्यवस्था अस्थिर बनेल त्यामुळे राजकीय व्यवस्थेसमोर दोन्ही बाबी महत्वाच्या आहेत. एक तर तिचे सातत्य राखून स्थैर्य देणे व दुसरे म्हणजे तिची परिवर्तनशिलता वैधानिक चाकोरीत कायम राखणे. आधुनिकीकरणाचा वेग सध्याच्या कालखंडात तिव्र आहे याचेही पडसाद राजकीय व्यवस्थेवर उमटतांना दिसतात या पार्श्वभूमीवर राजकीय व्यवस्थेला बदल राखून स्थैर्य कायम ठेवणे आवश्यक असते. एका अर्थाने स्थैर्य व बदल राजकीय बदल राजकीय व्यवस्थेचा संदर्भात परस्परपुरक तत्व असून त्याची सांगड घालणाऱ्या नेतृत्व व लोकमाणसांवर राजकीय व्यवस्थेची क्षमता कशी आहे यावरुन मात्र स्थैर्य व बदल अवलंबून असतात.

## ९.२.३ क्रांती सिध्दांत

क्रांती ही केवळ राजकीय बदलापूर्ती मर्यादित राहत नाही. तर समाजाच्या सर्वच क्षेत्रात मूलभूत बदल घडवून आणणारी असते. क्रांती आणि परिवर्तन यात अंतर आहे. परिवर्तन ही बदलाची प्रक्रिया मानली जाते. परंतु क्रांती द्वारे होणारा बदल हा तडकाफडकी होतो. तात्पर्य परिवर्तनाची प्रक्रिया उत्क्रांती वादी आहे. तर क्रांती अमानूष संदर्भाशी निगडीत आहे. याचे कारण क्रांतीची प्रक्रिया हिंसात्मक मार्गाने घडून येते. प्रस्थापित राजकीय व्यवस्था, तिची रचना व तिची ध्येयधोरणे हिंसात्मक मार्गाने बदलणे त्यासोबतच

नवीन धोरणाचा अवलंब करुन इतर सामाजिक संस्थामध्ये अमूलाग्र बदल घडवून आणणे क्रांतीचे ध्येय असते. क्रांती विशिष्ठ विचारसरणीवर वा विशिष्ठ तंत्राचा अवलंब करुन घडवून आणली जाते. त्यामुळेच क्रांती हा शब्द जगाच्या राजकारणात परिचित ठरलेला आहे. हिसांचाराचा मोठ्या प्रमाणात वापर व विशिष्ठ राजकीय व्यवस्थेचा नाश हा अर्थ क्रांती मध्ये अभिप्रेत असतो. हिंसाचाराला लोकमान्यता नसते परंतु क्रांती तत्वाला हिंसा मान्य असते यामुळे क्रांतीला वैध दर्जा मिळालेला नाही. केवळ राजकीय सत्ता प्राप्त करणे व राजकीय हेतूच्या पूर्तीकरीता क्रांतीचा उपयोग होतो. राजकीय संदर्भच त्याला सहाय्यभूत नसून आर्थिक धार्मिक सामाजिक घटकांच्या प्रभावातून क्रांती घडविल्या जाते.

क्रांती संकल्पना : क्रांतीची संकल्पना राज्य शास्त्रात इ.स.१६०० शतकात आली. तत्पूर्वी ही संकल्पना खगोल शास्त्रशी निगडीत होती. कोपरनिकसचा ग्रथ ऑन दी रिव्होल्यूशन ऑफ द सिलेस्टयल स्फीयरस यामध्ये क्रांती शब्दाची मांडणी असते. त्यापूर्वी फ्रेंच भाषेतून हा शब्द १३९० मध्ये इंग्रजी भाषेत दाखल झाला. राज्य शास्त्रात या शब्दाला नकारात्मक स्वरूपात वा विध्वसंक या अर्थाने गृहित धरण्यात आला. कार्ल मार्क्सने (१८१८ह्न१८८३) क्रांतीला सकारात्मक स्वरुपात विशद करुन इतिहासाचे इंजीन या शिर्षकातर्गत मांडलेले आहे. साधारणतः प्रस्थापित राज्यव्यवस्थेला उचलून फेकून देऊन त्याच्या जागी सामाजिक, राजकीय, आर्थिक संबंधाचे अधिष्ठान करणे हा अर्थ क्रांतीचे समर्थक व्यक्त करतात.

जैक ग्लेडस्टोन या संदर्भात म्हणतो राजकीय सत्तामध्ये परिवर्तन आणणारा हा घटक असून समाजातील औपचारिक व अनौपचारीक संस्थाच्या संघटनव्यवस्थेतून त्याची निर्मिती होत असते.

सॅम्यूअल हटिंग्टन यांनी (पोलिटिकल आर्डर इन चेजींग सोसायटी) या ग्रंथात मांडणी करताना म्हटले आहे. क्रांती मुळे देशातील मूलभूत संरचनावर आघात होतो. तेथील मूल्ये, प्रतिके संपूष्टात आणून नव्या संरचनाची निर्मिती होते.

कोदेन यांनी (थेअरिज ऑफ रिव्हॉल्यूशन) क्रांती म्हणजे समाज जीवनातील अमूलाग्र परिवर्तनांची प्रक्रिया होय.

क्रांती संदर्भातील विवेचन लक्षात घेतल्यास मूलभूत वा अस्तित्वात असलेल्या संरचनेत बळपूर्वक बदल घडवून आणणे व त्याकरिता हिंसाचाराच्या मार्गाचा खुला वापर करणे अभिप्रेत आहे. कार्ल मार्क्स क्रांती शब्दातून सकारात्मक अर्थ शोधत असला तरी

त्याला हिंसा, रक्तपात, विनाश मान्य आहे. मात्र रक्तरंजित क्रांती सकारात्मक आहे. हे मान्य करणे अवघड आहे.

## क्रंाती संदर्भातील विचार धाराः

जैक ग्लेडस्टोन या विचारवंताने क्रांती संदर्भातील मांडणी चार भागात वर्गीकृत केली आहे. या गटातील विचारवंत विशिष्ट मतप्रणालीचे समर्थन करीत असल्यामुळे ती एका अर्थाने दृष्टिकोनाच्या कक्षेत मोडणारी आहेत.

१. वर्णनात्मक क्रांती दृष्टिकोनः या गटामध्ये मोडणाऱ्या विचारवंतामध्ये गुस्टाव ली बोन, पिटीरीम, सोरोकिन यांचा समावेश आहे. क्रांतीची वर्णनात्मक पध्दती माडंताना सामाजिक मानस शास्त्रीय स्वरूप या अर्थाने शब्दबध्द केले आहे. क्रांतीच्या संदर्भातील वर्णनावर भर असून इतिहासकाराप्रमाणे ते विश्लेषण न करता केवळ क्रांतीच्या बाह्य घटकाशी चर्चा करून ढोबळमानाने लिखाण करण्यावर भर आहे.

२. सामाजिक व्यवहार पध्दतीः सामाजिक व्यवहार पध्दतीमध्ये तीन श्रेणीबध्द विचारवंताचा समावेश आहे. क्रांती तत्वाला सामाजिक व्यवहार कारणीभूत असल्याचे मांडताना क्रांती केव्हा व का? घडून येते या विषयीची मिमांसा तीन श्रेणीत केली आहे. ज्यामध्ये मानस शास्त्रीय समाज शास्त्रीय व राज्य शास्त्रीय तत्वे अंतर्भूत आहेत. या पध्दतीच्या समर्थकामध्ये टेड.आर. गुरर, पीके.फाइरब्रांड, डेनरन, मारिसन इ. चा समावेश आहे. सामाजिक व राजकीय असंतोषामुळे क्रांती घडत असल्याचे त्यांनी नमूद केले. समाजाकडून येणाऱ्या वेगवेगळ्या मागण्याची पूर्तता होत नसेल तर समाजात उद्रेक निर्माण होतो व क्रांती घडते. समाजव्यवस्थेतील धारणावर क्रांती अवलंबून असल्याचे निदान विश्लेषणात्मक स्वरूपात हा दृष्टिकोन मांडतो.

३. मार्क्सवादी दृष्टिकोनः या सिध्दांतकर्त्यानी सामाजिक व्यवहार पध्दतीवर कठोर टिका करून क्रांती मागील कारणांची स्वतंत्र चिकित्सा केली आहे. या सिध्दांतकर्त्यांमध्ये स्कोप्योल, बैरगंटन मूर, जैफरी पेगे यांचा समावेश आहे. मार्क्स प्रमाणेच विचारवंत वर्गसंघर्षाला प्रमाण मानतात समाजातील आर्थिक भेदभावाची निती क्रांतीला प्रोत्साहीत करीत असल्याचे मत दर्शवितात. कृषीह्व– राज्य संघर्ष, राज्य व अन्य अभिजात वर्गामधील संघर्ष अंतर्गत राजकीय परिवर्तन, राजकीय परिवर्तनात वाटा न मिळणे, सैनिकी प्रतिस्पर्धा यामुळे क्रांती घडून येते. स्कोप्योल या संदर्भात (स्टेट ॲन सोशल रिव्होल्यूशन) ग्रंथात म्हणतो समाजातील वर्गामध्ये येणारे तात्कालिन वा अमुलाग्र परिवर्तन म्हणजे क्रांती होय.

४.  जनक्रांती दृष्टिकोन : बहुसंख्य लोकांना प्रस्थापित राजवट आशा आकांक्षाची पूर्तता करणार वाटत नसेल तर संविधानीक वा अवैधानीक मार्गाचा अवलंब करून प्रस्थापित रचनेत बदल घडवून आणतात ही कृती क्रांती सदरात मोडणारी आहे. सामाजिक रचना वा वर्गसंघर्ष यामुळेच क्रांती घडत असेल तर १९८० च्या दशकात आलेले परिवर्तन कुठल्या प्रकारात मोडणारे आहे याची चर्चा होऊ लागली रशिया जर्मनी या युरोपातील साम्यवादी राजवटी कोसळल्या व नव्या व्यवस्था निर्माण झाल्यात तर दुसऱ्या बाजूला अफगाणिस्तान, इराक, सिरीया, लिबिया या देशामध्ये झालेले किंवा होत असलेले संघर्ष लक्षात घेतले तर जनक्रांतीचा डोंब उसळलेला दिसून येतो. इजिप्तमधील अरबस्प्रिंग जनतेच्या विराट दर्शनाचे प्रदर्शन होते. होस्नी मुबारक यांना राजवट सोडावी लागली. दुसऱ्या बाजुला लोक शाही देशामध्ये मतपिढीच्या माध्यमातून झालेले राजसत्ता परिवर्तन जनक्रांतीचा दृष्टीकोन दर्शविणारा आहे.

## क्रांतीचे प्रकारः

१.  महान क्रांतीः ज्या क्रांतीमुळे इतिहासाला कलाटणी मिळाली त्याचा समावेश यामध्ये होतो. १७८९ मधील फ्रान्स राज्यक्रांती, १९१७ मधील रूसी क्रांती, ईरान ची १९७९ची क्रांती या क्रांतीमुळे समाजाच्या आर्थिक, सामाजिक व राजकयि रचनामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आले.

२.  राजकीय क्रांती : राज्य व्यवस्थामध्ये घडून येणारी क्रांती राजकीय क्रांती होय, इजिप्त मधिल क्रांती २०१२.

३.  सामाजिक क्रांतीः आर्थिक व सामाजिक व्यवस्थेमध्ये घडून येणारे परवर्तन सामाजिक क्रांतीच्या कक्षेत मोडणारे आहे.

४.  अभिजात क्रांतीः समाजातील प्रतिष्ठीत वर्गाकडून लोकांना एकत्रित करून घडवून आणल्या जाणाऱ्या क्रांतीच्या समावेश अभिजात क्रांतीमध्ये होतो.

५.  साम्यवादी क्रांतीः मार्क्सवादी विचारवंतानी म्हणजेच वर्गसंघर्षाच्या समाप्तीकरीता उग्रपणे लढल्या जाणाऱ्या व भांडवली व्यवस्थेचा निपात करुन साम्यवाद आणण्याचा प्रयत्न साम्यवादी क्रांतीचा भाग आहे.

६.  अयशस्वी क्रांतीः सत्तेच्या विरोधात लोकांचा उग्र संघर्ष करूनही परिवर्तन येत नाही तेव्हा क्रांती अयशस्वी झाली असे म्हटले जाते.

७. अहिसात्मक क्रांतीः हिंसेला प्रमान न मानता शांततापूर्ण पध्दतीने व्यवस्थेत वा सत्तेत परिवर्तन घडून आणणे अहिसात्मक क्रांतीचा भाग असतो. भारत, द.अफ्रिका, ब्रह्मदेश या देशामधील क्रांती.

८. सांस्कृतिक क्रांतीः जुन्या विचार परंपरा, विचारधार या ऐवजी नव्या विचार धारेची निर्मिती व परंपराचे निर्माण सांस्कृतिक क्रांतीचा भाग आहे. चीनमध्ये १९६६ ते १९७६ या दरम्यान घडलेली आतंरिक क्रांती सांस्कृतिक क्रांती आहे.

९. औदयोगिक क्रांतीः तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे समाज जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय रचनेत बदलाव येणे, भौतिकवादी व्यवस्थेची निर्मिती व केंद्रित व्यक्तीवाद औद्योगिक क्रांतीची निश्पत्ती आहे.

१०. वैज्ञानिक क्रांतीः १६व्या शतकात युरोपात वैज्ञानिक विचारधारांची निर्मिती होऊन विवेकवाद बुध्दीप्रामान्यवाद, तर्क शुध्दता याचा झालेला विकास वैज्ञानिक क्रांतीचा भाग आहे.

११. लिंग संबंध क्रांती : लिंग समानतेच्या दृष्टीने १९६०मध्ये पश्चिम देशामध्ये पुर्वेत्तर देशांमध्ये सहजतेने येऊ लागलेले भान व समतेच्या तत्वाची निर्मिती लिंग समानता क्रांतीला उत्तेजित करणारी आहे.

१२. हरीत क्रांतीः प्रचंड उद्योग रचनेच्या उभारणीमुळे मानवी अस्तित्वासाठी उभे झालेले संकट परतवून लावण्याकरीता उदयास आलेली क्रांती हरीत क्रांती होय.

क्रांतीची संकल्पना मानव उत्पत्तीच्या उदयापासून सातत्य राखून आहे. समाजरचना अस्तित्वात आल्यानंतर वा राजकीय व्यवस्थांची उभारणी झाल्यानंतर त्या शब्दाला वेगळा अर्थ प्राप्त होऊ लागला. सक्तीने वा दडपशाहीने बलाचा वापर करुन मूळ रचनेत बदलाव घडवून आणे हाच अनेकांच्या दृष्टीने क्रांतीचा अर्थ होय. परंतु क्रांती संदर्भातील वर्गीकरण आणि दृष्टीकोन तपासल्यास क्रांतीची संकल्पना अशिक रूपत का होईना परिवर्तनाच्या जवळ असलेली वाटते. ॲरिस्टॉटल ते आधुनिक विचारवंत यांनी क्रांतीचा मागोवा घेऊन केलेली चिकीत्सा क्रांतीच्या पैलूना प्रकाशित करणारी आहे. राज्य शास्त्रीय दृष्टीने क्रांतीची संकल्पना व्यवस्थापनाची विश्लेषणाकरीता महत्वपूर्ण आहे.

## ९.३ सारांश

राजकीय स्थैर्य हे राजकीय व्यवस्थेचे एक महत्वपूर्ण वैशिष्ट आहे. राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय स्थैर्य असेल तर त्या व्यवस्थेला टिकावूपणा येतो. तचिा विकास होतो. राजकीय स्थैर्य नसेल तर राजकीय व्यवस्थेचा विकास होत नाही. राजकीय स्थैर्यामध्ये शासकीय किंवा प्रशासकीय स्थैर्याचाही समावेश होतो. राजकीय बदल या संकल्पनेत विकास, विनाश आणि आधुनिकीकरण या तीन गोष्टी अभिप्रेत आहे. बदलाची संकल्पना सर्वच श्रेत्राशी निगडीत असते आणि ती सातत्यपूर्ण असून निरंतरता तिचा स्थायीभाव असतो. विासासाठी बदल हा आवश्यक असतो. बदल हा जगाचा नियम आहे. राजकीय बदलाची अनेक कारणे आहेत. यामध्ये सामाजिक संघटन व राजकीय बदल, व्यक्ती व राजकीय बदल, विचारधारा व राजकीय बदल संस्था व राजकीय बदल यांचा समावेश होतो. क्रांती आणि बदल यामध्ये फरक आहे. क्रांती ही केवळ राजकीय बदलापूर्ती मर्यादित राहत नाही. क्रांतीद्वारा होणारा बदल हा तडकाफडकी असतो. क्रांतीमध्ये हिंसा असते.

## ९.४ सरावासाठी प्रश्न

१) राजकीय स्थैर्याची व्याख्या स्पष्ट करा.

२) राजकीय स्थैय कोणत्या घटकावर अबलंबून असते स्पष्ट करा.

३) राजकीय बदल म्हणजे काय ?

४) राजकीय बदलाची कारणे स्पष्ट करा.

५) क्रांतीचा अर्थ स्पष्ट करा.

## ९.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) भोळे, भा.ल.(२००२) राजकीय सिद्धांत, नागपूर,पिंपळापूरे प्रकाशन

२) देवगांवकर, एस.जी.(२००९) राजकीय मानवशास्त्र, नागपूरः साईनाथ प्रकाशन.

---------------

# १०

# घटक १० - राष्ट्र, राष्ट्रवाद आणि विभक्त होण्याचा अधिकार

**घटक संरचनाः**

१०.० उद्दिष्टे
१०.१ प्रास्तावना
१०.२ व्याख्या
१०.३ राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये
१०.४ विभक्त होण्याचा अधिकार
१०.५ सारांश
१०.६ सरावासाठी प्रश्न
१०.७ संदर्भ ग्रंथ

---

## १०.० उद्दिष्टे

१) राजकीय स्थैर्य व्यवस्थाच्या विकासाला आवश्यक आहे याची समिक्षा करणे.

२) मानवी प्रगतीचा इतिहास राजकीय अस्थिरता संपून स्थैर्य आल्यानंतर कसा विकसित झाला याचा आढावा घेणे.

३) राजकीय स्थैर्य व राजकीय बदल या संकल्पनेची परस्पर पुरकता लक्षात घेऊन तिची चिकित्सा करणे.

४) राजकीय बदल आधुनिकीकरणाच्या संकल्पनेशी कितपत जवळची आहे या बाबतचे विश्लेषण करणे.

५) क्रांती सबंधी संकल्पना उलगडणे व तिच्या सकारात्मक व नकारात्मक बाबीसंदर्भात विवेचन करणे.

६) आधुनिक काळातील लोकशाही व्यवस्थेत राजकीय स्थैर्य, राजकीय बदल व क्रांतीची उपयुक्तता तपासून तिची त्यांची व्यवस्थेवरील परिणामकारकता तपासणे.

राष्ट्र,(Nation) राष्ट्रवाद (Nationalism) व विभरत वा स्वयंनिर्णयाचा अधिकार (Right of secession) -

## उद्दीष्टचे -

१) राष्ट्र निर्मीतीच्या इतिहास कालीन घटनांचा मागोवा घेणे.

२) आधुनिक काळात उदयास आलेल्या राष्ट्रवादाचे स्वरुप तपासणे.

३) राष्ट्रवादाचा विकास क्रम लक्षात घेऊन तिच्या परिणामाची समिक्षा करणे.

४) राष्ट्रीय भावना मानवी समुदायाच्या ऐक्याला कशी प्रोत्साहित झाली याविषयीची मिमांसा करणे.

५) स्वयंनिर्णयाच्या तत्वाने गुलामी संपुष्टात येण्यास मदत होऊन नवस्वतंत्र देशाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली.

## विषय प्रवेश -

युरोपात १६ व्या शतकाच्या अखेरीस राष्ट्र या संकल्पनेच्या दृष्टिने प्रभावी वंशानी स्वतंत्र राज्य निर्मितीच्या प्रयोगाला प्रारंभ केला. इतिहास काळातही ग्रीस, रोमन वंश त्यांची राज्ये त्यातून सूचित केले जाणारे श्रेष्ठत्व एका परिने राष्ट्र निर्मितीचा पायारंभ होताच त्यामुळे या शब्दाची उत्पत्ती लॅटिन भाषेतील समूह वाचक घटकाशी जोडली गेली आहे. लॅटिन भाषेतील नेटस (Natus) या शब्दापासून अर्वाचित Nation शब्दाची उत्पत्ती झालेली आहे. नेटस याचा अर्थ जन्म किंवा जाती असा होतो. वंशभिमान ही त्याचा विकसीत टप्पा आहे. वंश आधारित स्वतंत्र राजकीय व्यवस्था त्यालाच युरोपात राष्ट्र संबोधिल्या गेले. झेक, पोलीश नार्मन, ॲग्लोसक्सन, या वंशावळीनी स्वतंत्र स्थाने निर्माण कडून राष्ट्र संकल्पनेचा आधुनिक पाया घातला.

जर्मनीत १८ व्या शतकात नित्शे या तत्वज्ञानाने ‘राष्ट्र’ या संकल्पनेला नवा अर्थ प्राप्त करुन दिला. राष्ट्र हा लोकजीवनाचा आत्मा मानला गेला. लोकांनी राष्ट्र भावनेने पेटून उठले पाहिजे व आनंदाने स्वतःची आहुती देण्यास तयार असले पाहिजेत अशी या भावनेने चेतविले. नित्शेला राष्ट्रीयत्व जागृत करणारा पैगंबर म्हटल्या जाते. राष्ट्र संकल्पनेप्रतीच्या भावना लक्षात घेतल्यास त्यासंदर्भातील व्याख्यातून त्याची स्पष्टतः येते.

## १०.१ प्रस्तावना

नित्शे म्हणतो राष्ट्र नामक संकल्पना आत्मतत्वाने भारावलेली आहे. कुठल्या तरी समान सुत्राच्या आधारावर स्वतःचे राष्ट्र म्हणजेच राजकीय व्यवस्था निर्माण करणे हा राष्ट्राचा हेतू आहे. राष्ट्र निर्मितीची तृष्णा मानवामध्ये का निर्माण होते? याचे विषयी भिन्न भिन्न मतप्रवाह आहे तरी पण समान अर्थाने मात्र गुलामी त्यागणे, वर्चस्वाखाली न राहणे, स्वतःच्या लोकांचे संघटित राज्य असावे ज्यामध्ये शोषण, विषमता, भेदभाव, यांना जागा न राहता सर्वांनाच समान हक्कांची प्राप्तता होइल व वाटा मिळेल. या भावनेची तिव्रता राष्ट्र निर्मितीला पूरक ठरली. विदयमान राज्यव्यवस्थे मध्ये ही कुठल्यातरी घटकांच्या आधारावर राष्ट्रीयत्वाची मांडणी करण्यात येते व त्यातून संघटित लोकभावनेला आविष्कृत करण्याचा प्रयत्न केल्या जातो. देश, संस्कृती, परंपरा, अस्मिता, इतिहास टिकविण्याच्या वा तिचे उदात्तीकरण करण्याच्या हेतूनेच राष्ट्र नामक संकल्पना जगभरातच प्रचलित असलेली आढळते.

१८ व्या शतकाच्या कालखंडात जगातील सर्वच समूह, गट-तट यांना राष्ट्र संकल्पनेने भूरळ घातली. ती अजुनही आपला प्रभाव कायम राखून आहे. युरोप मध्ये या संकल्पनेने फार मोठी उलथा-पालथ घडवून आणली. त्यातूनच 'एक राष्ट्र एक राज्य' हा सिद्धांत उदयास आला. मध्य काळात धर्म वा सांस्कृतिक घटक याच संकल्पनेवर जेव्हा उच्छाद मांडताना दिसून येतात तेव्हा अराजक आणि भयवादाची स्थिती उत्पन्न झाल्याचे जाणवते. समूहाच्या एकात्मीकरणाला बळकटी देण्याच्या दृष्टिने जशी उपयोगिता आहे त्याचप्रमाणे मानवी सभ्यतेला गिळकृंत करण्याची क्षमता यामध्ये समाविष्ठ आहे. राष्ट्र ही संकल्पना आधुनिक काळात दुधारी राज्य ठरल्याचा सार्वत्रिक अनुभव आहे. जगातील प्रथम व द्वितीय महायुद्धाला वांशिक अहंगडाच्या राष्ट्र संकल्पनेचा पाया जबाबदार असल्याचे सर्वमान्य आहे, त्यामुळे ही तिची लोकभावना वैशिष्ट्य म्हणून लक्षात घेतले जाते त्याचप्रमाणे व्यवस्थांचे विच्छेदीकरण ही दुसरी बाजू आहे. राज्यशास्त्रात आलेल्या या आधुनिक संकल्पनेचे मात्र लोकभावनेवरील आकर्षण कायम दाखले असून सर्वच देशातील नेतृत्व याचा खुबीने वापर करताना दिसतात.

## १०.२ व्याख्या

बर्जेसच्या मते ''राष्ट्र म्हणजे जातीय एकतेच्या बंधनाने एक सूत्रात बांधली गेलेली अशी जनता की जी अखंड भौगोलिक वास्तव्य करते.''

गार्नेट या संदर्भात म्हणतो ''राष्ट्र म्हणजे सांस्कृतिक समानता असलेला समूह

असा सामाजिक समूह की, जो आपल्या मानसिक आणि वैचारिक जीवनाची तसेच अत्याचाराची एकता जाणीवपूर्वक काही चिकाटीने कायम ठेवतो.''

रॅम्से म्युर ने राष्ट्राची व्याख्या करताना म्हटले आहे ''ज्या लोकांत काही विशेष प्रेमसंबंध निर्माण झाल्यामुळे जे लोक आनंदाने एकत्रित राहतात व परस्परांपासून विभक्त केल्यास असंतुष्ट होतात. तसेच आपल्या प्रमाणे नसलेल्या इतर लोकांना गुलामगिरीत राहू इच्छित नाहीत त्यांना राष्ट्र म्हणावे.''

डॉ. ए.इ. झिरमन यांच्या मते ''राष्ट्र म्हणजे असा लोकांचा समूह की जो घनिष्ठता, अभिन्नता आणि प्रतिष्ठा या दृष्टिने संघटित आहे, तसेच एका निश्चित मातृभूमीशी संबंधित आहे.''

स्टॅजीनने राष्ट्रासंबंधी विचार व्यक्त करताना म्हटले ''राज्य ऐतिहासिक दृष्ट्या जनतेची अशी दृढ एकता आहे की, ज्याची निर्मिती समान भाषा, प्रदेश, आर्थिक जीवन तसेच मनोवृत्तीच्या स्वरुपात व्यक्त करता संस्कृतीच्या आधारा होते.''

राष्ट्राच्या बाबतीत मांडण्यात आलेल्या व्याख्यामध्ये रॅम्से म्युर व स्टॅलीन यांची व्याख्या व्यापक आहे. समान संस्कृती, परंपरा, इतिहास, भाषा, वंश, धर्म, यांच्या पैकी कुठल्या तरी आधारावर एकत्र येऊन आपल्या मातृभूमीशी अधिक आक्रमक असतो अशा समूहाची संकल्पना यामध्ये समाविष्ठ आहे. त्याचमुळे समूहांच्या आकर्षणाचा वा वेडगळपणाचा केंद्रबिदू, राष्ट्र असल्याचे दिसते. त्यातूनच प्रत्येक समूहाला स्थिर जीवन आपण करण्याकरिता विशिष्ठ प्रदेशाची अथवा भूभागाची आवश्यकता असते अनेक वर्षे एकाच ठिकाणी वास्तव्य करुन राहिल्यामुळे कळत नकळतपणे त्या भूभागाविषयी ममत्वाची भावना वाढीस लागते.

## १०.३ राष्ट्रवादाची वैशिष्ट्ये

राष्ट्रवाद आधुनिक काळातील संकल्पना आहे. जुन्या काळात राष्ट्रे वा राष्ट्रीयत्वाची भावना नसल्यामुळे राष्ट्रवाद निर्माण झालेला नव्हता. वस्तुतः राष्ट्रक –राष्ट्र–राष्ट्रवाद हा विकासाचा क्रम आहे. विशिष्ट घटकामुळे समुहात एकात्मता निर्माण होऊन आतंरिक अनुबंध दृढ होतात तेव्हा राष्ट्रक तयार होत असते. तिच्यातील स्वतंत्र होण्याची उर्मी राष्ट्र निर्मितीत उतरतो तर भावना राष्ट्रवादाचे प्रतिक असतात. राष्ट्रपतिच्या विशिष्ट राष्ट्रात वास्तव्य करणाऱ्या लोकांमध्ये आपण सर्व राष्ट्र आहोत व इतिहासापेक्षा वेगळे आहोत अशी भावना निर्माण होऊन आपले शासन राष्ट्राच्या सीमांतर्गत सार्वभौम असावे असेही

त्यांना वाटते या प्रवृत्तीलाच राष्ट्रवाद म्हटल्या जाते. माणसांना जोडणारे अनेक घटक समाजात असतात परंतु राष्ट्र हा मुख्यतः राजकीय घटक असतो व्यक्तीच्या निष्ठा त्याच्याहून राष्ट्राप्रती मोठी असली पाहिजे व त्याने संकुचित निष्ठाचा त्याग करावयास शिकले पाहिजेत हे राष्ट्रवादात अभिप्रेत असते. राष्ट्रवाद निर्माण करण्याकरीता पुरेसे प्रयत्न करावे लागतात. आर्थिक व तांत्रिक विकासाच्या एका विशिष्ट टप्यावर राष्ट्रवादाचा उदय होतो.

राष्ट्रवादाच्या संकल्पनेची चिकित्सा केल्यास याची काही प्रमुख वैशिष्ट्ये मांडली जातात.

१) राष्ट्रवादात प्रत्येकच राष्ट्रीय गटाला आपले स्वतंत्र्य स्थान अपेक्षित असते.

२) राष्ट्र निर्मिती इच्छूक गट स्वयं-निर्णयांची मागणी करीत असतो.

३) स्वातंत्र्याच्या भावनेला अधिक महत्व असल्यामुळे त्याकरीता प्राप्तीचे सर्व प्रकारचे प्रयत्न केले जातात.

४) धर्माप्रमाणेच राष्ट्रवादाप्रती लोकांच्या गाढ श्रद्धा असतात. धर्माला लोकजीवनात ज्याप्रमाणे स्थान आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रालाही असते.

५) राष्ट्राप्रती व्यक्तीची त्यागाची भावना परमोच्च असते. संकुचित समाजातील अन्य बाबी संकुचित वाटू लागतात व तो त्याकरीता आपले सर्वस्व अर्पण करण्याची तयारी ठेवतो.

६) राष्ट्रवाद मानसशास्त्रीय कृती आहे. त्यामुळे मनाचे नियंत्रणाचा कब्जा राष्ट्रीयत्वाच्या अमूर्त व काल्पनिक भावनेने व्यापलेला असतो त्या प्रभावातून मुक्त न होता व्यक्ती त्यातच रममाण होत असतो.

## राष्ट्रवादाचा विकास -

युरोपातील ज्यु, ग्रीक, रोमन लोक स्वतंत्र राष्ट्रीय वृत्तीचे होते. इतरांचा अधिक्षेप करणे व स्वतःच्या वंशश्रेष्ठत्वाचा अभिमान बाळगणे या प्रवृत्तीचे ते वाहक होते त्याच परंपरेने पुढे जर्मन वंशियाचा समावेश झाला इतराप्रतीची घृणा व स्वतःच्या वंश श्रेष्ठत्वाच्या अभिमानातूनच जगात द्वितीय महायुद्ध उभे राहिले. जर्मन वंशाच्या राष्ट्रवादापर्यत येण्या पूर्वी १६६२ च्या पोलंड च्या विभिन्नीकरणातून राष्ट्रवाद चेतविला गेला. जर्मनित नित्शे, बिस्मार्क यांची परंपरा उभी राहिली तर युरोप व त्यांच्या भूमिला खेटून असलेल्या देशांमध्ये राष्ट्रवादाचे लोण पसरले रिशेल्यु, तारोरॉ, बिस्मार्क, कोसूच, केमाल, जेफरसन ही राष्ट्रवादांच्या धुरिणांची यादी आहे. फ्रान्स, इंग्लड हे देश ही याला अपवाद राहिले नाहीत. १६ व्या शतकापासून राष्ट्रवादाचा वाटा युरोपात जोम घेऊ लागला तो १८ व्या शतकापर्यंत कायम राहीला व त्यातूनच युरोपात 'एक राष्ट्र-एक राज्य' या सिद्धांताची निर्मिती झाली.

इ.स. पूर्व कालखंड ते १० वे शतक राष्ट्रीय जागरणाचा कालखंड होता. मध्ययुगात मात्र धर्म सत्तेचे श्रेष्ठत्व निर्माण झाल्याने वेगवेगळ्या घटकांनी तयार होणाऱ्या राष्ट्रवादाला लगाम बसला परंतू चर्चने धर्म घटकावून एका पटीने समग्र राष्ट्रवादाला उचलून धरले होते. चर्च सत्तेचा प्रभाव १५ व्या शतकाच्या शेवटापर्यंत घडत होता. त्यानंतर मात्र आधुनिक एकजुटीच्या वेगवेगळे घटक राष्ट्रवादाला कारणीभूत ठरले आजच्या वर्तमान युगातही राष्ट्रवादाच्या भावना तिव्र आहेत यावरुन तिचे महत्व लक्षात येते. राष्ट्रवादाचा विकास मात्र अजुनही ठप्प झालेला नाही. चर्च प्रभावापूर्वीचा राष्ट्रवाद, मध्ययुगातील चर्चधिष्ठीत राष्ट्रवाद व आधुनिक राष्ट्रवाद या वर्गिकरणावर राष्ट्रवादाचा विकास पाहता येतो.

## राष्ट्रनिर्मितीचे घटक –

राष्ट्र निर्मितीकरीता उपयुक्त ठरणारे घटक म्हणून पुढील घटके विचारार्थ घेतली जातात.

### १) वांशिक ऐक्य (Unit of Race) –

वांशिक एक्य राष्ट्रनिर्मितीचा प्रबळ घटक आहे. आपण सर्व एकाच वंशाचे, ऐक्याचे लोक आहेत. या स्वरुपाची भावना समूहामध्ये दृढ ऐक्य निर्माण करायला सहाय्य करते. आपलया पूर्वजाबद्दल त्यांच्या काही निष्ठा व भावना असतात. त्यावरील विश्वासातून प्रखर ऐक्याची भावना विस्तारत जाते. बिस्मार्कने जर्मनीचे एकत्रिकरण करताना जर्मन भाषा, जर्मन लोक यांचा हिरहिरीने पुरस्कार करुन जर्मन लोकांमध्ये एकात्मतेची व सांघिकतेची भावना निर्माण केली त्यामुळीच पूर्वीचा प्रशिया एकत्रित जर्मन वंशात आकार घेउ शकला. हिटलरने तर वंशिभिमानाला खतपाणी घालून जगावर श्रेष्ठत्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्र निर्मितीला वंश हा घटक प्रखरतेने काम करीत असतो.

वांशिक एकतेच्या आधारावर राष्ट्र निर्माण होत असले तरी मात्र जगभर सर्वच देशांच्या राजकीय व्यवस्था वंशधारित निर्माण झालेला आहेत असे म्हणता येत नाही. भारत, कॅनडा, इंग्लड, रशिया, अमेरिका, चीन या देशांमध्ये विशिष्ट एकाच वंशाचे मिळून राज्य बनलेले नाही त्यामुळे वंश हा घटक राष्ट्र निर्मितीचा मूलभूत घटक ठरतो असे म्हणता येत नाही.

## २) भाषा, परंपरा आणि संस्कृतीची एकता (Unity of Language of Culture)

समान भाषा बोलणाऱ्या व्यक्ती परस्परांचे विचार जाणून घेऊ शकतात व त्यांच्यात आपलेपणाची भावना आकारास येते. सामान्यतः भाषा राष्ट्रातील लोकांमध्ये ऐक्य निर्माण करण्याचे एक महत्वपूर्ण साधन आहे. प्रशियाचा पंतप्रधान झाल्यानंतर बिस्मार्कने सर्वच राजदूताना जर्मन भाषेतच पत्र व्यवहार करण्याचा आदेश काढला होता, तत्पूर्वी फ्रेंच भाषेतून पत्र व्यवहार होत असे. भाषेसंदर्भात बिस्मार्कचे तत्वज्ञान होते की भाषेमुळे एकत्वाची आणि थेट संवादाची भावना संबंधित होत असते. सामान्यतः भाषामुळे लोकांमध्ये एक महान ऐक्य निर्माण होते कारण भाषेतूनच राष्ट्रीय साहित्याची निर्मिती होत असल्यामुळे राष्ट्र भावना उद्दीपीत व्हायला महत्वाची ठरते.

भाषेप्रमाणेच समान संस्कृती ही एक राष्ट्रीयत्वाची भावना तयार करण्यास उपयुक्त आहे. नवसमूहातील समान विचार, संस्कार आणि रीतिरिवाजाची समानता राष्ट्रवादाच्या भावनेला प्रोत्साहन देत असते. संस्कृती राष्ट्रनिर्मितीला त्यामुळेच पूरक मानल्या जाते. वंशाप्रमाणेच समान भाषा, संस्कृती राष्ट्र निर्मितीचा आधार ठरु शकतो असे मात्र पूर्णपणे मान्य करता येत नाही. भाषेच्या पलिकडे जात समूह विचार करतो. विशेषतः भारतातील बोलीभाषांची संख्या ३४१५ आहे. राजभाषा २२ तर भाषाची संख्या शेकडोनी आहे असे असून सुद्धा भारत राष्ट्र आहे. जर्मन, फ्रान्स, इटाली, वांशिक वा भावनिक दृष्ट्या एकात्म असले तरी त्या त्या देशात अन्य ही भाषा बोलणारे नागरिक आहेत. विशेषतः आधुनिकीकरणाचा वेग अधिक असतो व तुम्हाला जगातील इतर देशासमवेत चालावे लागते त्यावेळी विशिष्ट भाषाच राष्ट्र निर्मितीस पोषक ठरु शकते असे म्हणता येत नाही.

## ३) भौगोलिक घटक (Geographic Unity) -

एक राष्ट्र निर्माण होण्याकरीता लोक एकाच भूप्रदेशावर वास्तव्य करीत असले पाहिजेत. बराच काळ एकाच प्रदेशावर वास्तव्य केल्यामुळे त्या लोकांमध्ये आत्मियता निर्माण होते व त्यातून भूमीविषयीची अगाढ प्रेमाची भावना आकार घेते. मातृभूमीविषयी सर्वस्व वाहण्याची प्रेरणा निर्माण झाली की राष्ट्रभक्त लोक आत्यंतिक समृद्ध बनून जगू लागतात तेव्हा राष्ट्र सकल्पना अधिक प्रभावीपणे व्यक्त व्हायला लागते. कुठल्याही देशाची कल्पना भूप्रदेशाशिवाय करता येणे शक्त नाही. भौगोलिक प्रदेशासंबंधात म्हणता येइल की प्रदेश जर सलग असला तर अधिक चांगले. संरक्षण, आर्थिक विकास, लोकांच्या गरजा भागण्याची शक्यता अधिक असते. तिमोर मधून बाहेर पडलेला पूर्व

तिमोर, कोरियन युद्धात उत्तर व दक्षिण कोरिया असे झालेले विभाजन, रशियातून स्वतंत्र झालेले पंधरा देश, १९७१ च्या युद्धामुळे विलग झालेले पूर्व व पश्चिम पाकिस्तान ही उदाहरणे मातृभूमी विषयीच्या आत्यंतिक प्रेम भावनेतून विलग होऊन बनलेली राष्ट्र होय. तर १९८१ मध्ये पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी यांचे एकत्रिकरण होउन पूर्वीचा एकसंघ बनलेला जर्मन देश भौगोलिक एकतेचे उदाहरण होय. भौगोलिक क्षेत्र कितीही का असेना परंतु त्याच्या शिवायच राष्ट्र संकल्पना उदयास येऊ शकत नाही.

### ४)धार्मिक एकता (Unity of Religion) -

धार्मिक विचारांच्या समान धारातून ऐक्य निर्माण होत असल्याचे म्हटल्या जाते. धर्माने राष्ट्र निर्मितीला चालना दिल्याचे उदाहरण युरोप व अरब स्थानात अस्तित्वात आहे. गिलख्रिस्त या संदर्भात प्रतिपादन करताना म्हणतो ज्या ठिकाणी धार्मिक मतभेद तिव्र असतात त्या ठिकाणी राष्ट्रभावना मजबूत आणि चिरस्थायी बनू शकत नाही. जेथे वैचारिक मतभिन्नता आहे तिथे मात्र राष्ट्रीयत्व आकार घेत असते. धर्माचा प्रभाव मानणाऱ्या भटकंती नंतरच्या स्थिर जीवनाला प्रारंभ झाल्यानंतर निर्माण झाला. धर्माच्या भावना किती तिव्र टेकदार असतात त्या भारत-पाक फाळणी ने सिद्ध केला आहेत. धर्मरचनेने राष्ट्र निर्मितीला चालना दिली असे दिसून येते.

राष्ट्र निर्मितीचा व तिची अस्मिता जोपासण्याचा प्रयत्न करणारा घटक धर्माकडे बघितल्या जाते, परंतु धर्मापुढे असे राष्ट्र निर्माण होते त्याचप्रमाणे मानवी सकल्पनेला तिलाजंली देणारा घटक धर्म राहिलेला आहे धर्मा मुळे निर्माण होणारी एकात्मता पाकिस्तान मधून बांग्लादेश निर्मितीला उपयुक्त ठरली असती. युरोपात ख्रिश्चन राष्ट्रे असूनही एकसंघ ख्रिश्चन व्यवस्था आकार घेऊ शकली नाही. बौद्ध धर्माच्या प्रभावापुढे चीन ते जपान येथील संपूर्ण भूप्रदेश एकत्रत व एकसंघ ठरलेला नाही त्यामुळे या घटकामुळे एक्य निर्माण होऊन राष्ट्र निर्मितीला पूर्णतः सहाय्य ठरु शकलेले नाही.

### ५) समान हितसंबंध -

समान हितसंबंध एकत्रीकरणामुळे राष्ट्र निर्मिती उदयास येत असते, परकीय सत्तेच्या गुलामगिरीतून मुक्त होणे, अनेक देशानी इंग्लड, जर्मन, स्पेन, फ्रान्स, अमेरिका यांच्या जोखडातून मूक्त होत स्वातंत्र्य प्राप्त करीत राष्ट्राची निर्मिती केली. समान अर्थिक संबंधातून त्याचप्रमाणे सर्वांचे समान हित संबंध या भावनाही राष्ट्र निर्मितीला पोषक आहेत.

## ६) समान राष्ट्रीय आकांक्षा –

आपले स्वतःचे एक राष्ट्र असावे असे जेव्हा एखादया लोकसमुहाला वाटू लागते तेव्हा त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होते. याशिवाय लोक जर एकाच परकीय शासनाच्या अंतर्गत कार्य करीत असेल आणि सर्वांसाठी समान नियम असतील तर त्यांचा विरोध करण्यासाठी जेव्हा सर्व लोक तयार होतात तेव्हा त्यातून राष्ट्र भावना आकार घेते.

राष्ट्र निर्मितीकरीता कुठलाही एक घटक जबाबदार नाही. समूहाच्या आतंरिक भावना नेमक्या कुठल्या घटकापुढे उद्‌दीपत होतात यावरुन राष्ट्र आकारास येत असते. त्यापुढे राष्ट्र निर्मितीचा कुठलाही एक घटक प्रेरक नसून अन्य कुठल्याही घटकातून राष्ट्र आकार घेऊ शकते. जगातील स्वतंत्र राष्ट्रे कुठल्या न कुठल्या आंतरिक प्रेरणेतून उदयास आलेले आहे हे मात्र निश्चित.

## राष्ट्रवादाचे गुण (Merits of Nationalism)

१) राष्ट्रवादाच्या मुळे वसाहतवाद, साम्राज्यवाद, सरजामशाहीचा अंत होऊन चर्चचे प्रभुत्व नष्ट झाले व नवीन राष्ट्रराज्यांचा उदय झाला. अनेक वसाहती गुलामगिरीतुन मुक्त होऊन स्वतंत्र राजकीय जीवन जगू लागल्या.

२) राष्ट्र स्वतंत्र झाल्यामुळे राज्या–राज्यामध्ये समतेची भावना निर्माण होऊन परस्परावर प्रभाण टाकण्याची प्रवृत्ती संपुष्टात येते.

३) राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा विकास होत असल्यामुळे त्याग व देशभक्तीची भावना नागरिकांमध्ये निर्माण होते व त्यातून राष्ट्राची प्रगती आणि विकास साधल्या जातो.

४) ऐक्य भावनेचे दृढीकरण होऊन स्वसंरक्षणाची भावना विकसीत होण्याला मदत मिळते.

५) स्वतंत्र राष्ट्रीयता उदयास आल्यानंतर लोकांमध्ये शिस्त, अनुशासनप्रियता व सरकारशी सहकार्य करण्याची भावना निर्माण होते आणि शांतता, सुव्यवस्था व योजनाबद्ध विकास घडून येतो.

६) बर्जेस राष्ट्रवादाच्या बाबतीत म्हणतो हे आध्यात्मिक शांतीचे साधन असून ते राज्याला अधिक शक्तीशाली बनविणारे आहे.

## दोष –

राष्ट्रीयत्वाच्या भावनेने समान हितसंबंधी वर्गामध्ये वा समूहामध्ये ऐक्याची भावना दृढ केलेली असली तरी राष्ट्रवादाच्या आत्यंतिक उग्रपणाची दुसरी किनार लक्षात घेणे आवश्यक आहे. या संकल्पनेतील मुख्य दोष खालीलप्रमाणे आढळून येतात.

१) राष्ट्रीयत्वाची भावना संकुचित भावनेला बळकटी देत असते. केवळ स्वतःच्याच राष्ट्रापुरता विचार करण्याची मनोवृत्ती लोकांमध्ये निर्माण होऊन आंतरराष्ट्रीय जीवनाकडे दुर्लक्ष केल्या जाते.

२) राष्ट्रवाद साम्राज्यवादाला पुष्ट करीत असतो. बलिष्ठ राष्ट्राकडून दुर्बल राष्ट्रावर स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्याची मनोवृत्ती निर्माण होत असते.

३) आक्रमक राष्ट्रवादामुळे युद्धजन्य परिस्थिती उदयात येऊ शकते, त्यातून अस्थैर्य, अराजकता, अशांतता उद्‌भवण्याची शक्यता अधिक असते.

४) राष्ट्रीयत्वाच्या आत्यंतिक तिव्र जाणिवा व्यक्ती विकासाला मारक आहे. त्या सर्वस्वाचा त्याग करायला लावतात परंतु विवेकाला कोणतेही स्थान राहत नाही. त्यामुळे व्यक्ती विकासाला मर्यादा येतात.

५) कृत्रिम राष्ट्रवाद हा स्वतःच्या जात वा वंशावरुन वृथा अभिमान निर्माण करतो त्यातून इतराप्रती तुच्छता, घृणा, तिरस्काराच्या भावनेला जन्म देतो.

६) राष्ट्रवादात साम्राज्यवादी मनोवृत्ती सम्मिलीत आहे. तो व्यक्तिहीत, सहिष्णूता, सर्व समावेशकता, आंतरराष्ट्रीय बंधुत्व, मानवी कल्याण, वैश्विकता याला मारक आहे.

राष्ट्र, राष्ट्रवाद या संकल्पना आधुनिक राजकीय व्यवस्थेत विकास पावलेल्या आहेत एका बाजूला या घटकांनी युरोपातील काही वर्गसमूहामध्ये उर्जितावस्था निर्माण केली व पुढे चालून त्याचीच परिणती युद्ध विनाशात झाली. बेनडौकट अँडरस म्हणतो ''राष्ट्र हा कुंटुंब, जात याच्या प्रमाणेच देवताच्या नात्याने बांधलेल्या किंवा आधुनिक काळातील सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थाप्रमाणे एक धोरणाने वा मित्रत्वाच्या नात्याने बांधलेला समाज नाही. तो एक काल्पनिक समाज (खारसळलरश्र उेाींपळीूं) आहे. डॉ. नलिनी पंडीत म्हणतात, ''समाज जेव्हा पराभवाच्या गर्तेत सापडतो तेव्हा समाजाला राष्ट्रीयत्व हाच अखेरचा आधार वाटत असतो.'' यामध्येच राष्ट्रवादाची मिथके व तिच्या प्रतीची मनोवृत्ती स्पष्ट होताना दिसते.

## १०.४ विभक्त होण्याचा अधिकार (Right to Secession)

एखादया समूहात स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याची अभिप्रेरणा निर्माण होते व तो समूह त्या दृष्टिने पाऊल उचलायला लागतो त्यावेळी विभक्त होण्याचा म्हणजेच दुसऱ्या अर्थाने स्वयंःनिर्णय प्राप्त करण्याचा अधिकार होय. राजकीय व्यवस्थेत हा सिद्धांत म्हणून प्रतिष्ठित झाला 'एक राष्ट्र एक राज्य' सिंद्धात या नावाने तो ओळखल्या जातो. विभक्तीकरणाची प्रवृत्ती वरवर पाहता फुटीरपणाची वाटते परंतु त्या एकात्म भावनेचा संचय झालेला असून स्वातंत्र्याची मनिषा उराशी बाळगून कृती केली जाते.

एखादया लोकसमुहात राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली म्हणजे त्यांना स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची परवानगी दयावी या प्रतिपादीत सिद्धातांला विभक्त होऊन राज्य स्थापन करण्याचा वा एक राष्ट्र व एक राज्य सिद्धांत म्हटल्या जाते. हा सिद्धांत राज्यशास्त्रात विसाव्या शतकात फार मान्यता पावलेला असला तरी तो फार जुना आहे. १५२६ मध्ये फ्रान्सचा बर्गडीचा प्रदेश फ्रान्स पासून विभक्त करण्यात आला, त्याला बर्गडीच्या नागरिकांनी विरोध केला लोकांनी चळवळ उभी करुन फ्रान्समध्ये समाविष्ठ करण्यास बाध्य केले. १८१५च्या व्हिएन्ना कॉंग्रेसने स्वयं निर्मयाचा अधिकार मान्य केला. १८६० मध्ये इटाली व जर्मन छोट्या-छोट्या प्रदेशांनी एकत्रीत येऊन जर्मन व इटाली राष्ट्र निर्माण केले. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिकेच्या प्रेसींडेंट विल्सनने १८१५ मध्ये स्वयं निर्णयाचा अधिकार मान्य केला व दोस्त राष्ट्रानी त्याला मान्यता दिली. १९१९-२० मध्ये पॅरिसला भरलेल्या शांतता परिषदेने काही गुलाम राष्ट्रांना निर्णयाचा अधिकार दिला.

एका राष्ट्राचे एक राज्य असते अथवा राष्ट्रीय राज्ये असावित असे म्हणण्यात जॉन स्टुअर्ट मिल नावाचा विचारवंत प्रमुख आहे. तो म्हणतो, '' स्वतंत्र संस्थाची अशी आवश्यक अट आहे की शासन व राष्ट्र यांच्या सीमा समान असणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी राष्ट्रवादाची भावना प्रखरतेने अस्तित्वात असते तेथे स्वतःचे सरकार असावे असे त्या लोकांना वाटते. याचाच अर्थ असा की शासिताकडून सरकारसंबंधिचा प्रश्न निश्चित केला जावा.'' याच बाबत तो पुढे म्हणतो,''अनेक राष्ट्रे असलेल्या देशात स्वतंत्र संस्था टिकणेच अशक्य आहे.'' त्यामुळे राष्ट्रांना विभक्त होण्याचा अधिकार दिला पाहिजे. रॅम्से म्युर याने याचे समर्थन केले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन यांनी या सिद्धातांच्या समर्थनार्थ म्हटले की ''स्वयंनिर्णय हे काही एखादे सुभाषित नसून प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याच्या दृष्टिने अत्यावश्यक असे तत्व आहे. जर राजनीतिज्ञ वर्ग या तत्वाकडे दुर्लक्ष करतील तर ती गोष्ट त्यांच्या नाशाला कारणीभूत होईल.

स्वयंनिर्णयाचा अधिकार पुढील घटकाच्या समर्थनार्थ मांडण्यात येतो.

### १) सक्षम राजकीय व्यवस्थेची निर्मिती -

विभिन्न राष्ट्रीयत्व असलेल्या लोकांना एकाच राज्यात ठेवल्यास त्यांच्यात देशप्रेमाचा अभाव निर्माण होईल परिणामतः प्रभावी राजकीय व्यवस्था निर्माण होवु शकत नाही.

### २) जनतेच्या मनात असंतोष राहतो -

जर एकाच राष्ट्रीयत्वाची जनता विभिन्न राज्यात विभागल्या गेली असेल तर ते

समाधानी वृत्तीने जीवन जगू शकत नाही त्यांच्या मनात कायम असंतोष घर करुन राहतो त्यामुळे त्यांना तेथून विभक्त होऊन आपल्या समूहाचे, वर्गाचे वा अन्य एकात्म घटकाचे राष्ट्र निर्माण करावसे वाटत असते.

### ३) लोकशाहीची सुदृढता निर्माण होणे –

लोकशाहीच्या सुदृढीताकरणाकरीता राष्ट्राच्या आधारावर राज्याची निर्मिती करणे आवश्यक आहे. शांतता, सुव्यवहार व भेदभावाला स्थान राहत नसल्याचे मत याच्या समर्थनार्थ दिले जाते.

### ४) एकात्मता –

विभिन्नता असणाऱ्या देशांमधील लोकांमध्ये परस्पर द्वेषाची व वैमनस्याची भावना आकारास येत असते परिणामी असूया, घृणेचे विभिन्न प्रदर्शन होण्याची शक्यता राहते. एक राष्ट्र एक राज्य आकारास आल्यास समूह एकात्मता निर्माण होऊन संबंधित होण्याची शक्यता बळावते.

### ५) आंतरराष्ट्रीय उपयुक्तता –

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शांतता कायम करावयाची असेल व सुरक्षिततेला मदत होण्याकरीता स्वयंनिर्णयाची आवश्यकता आहे. जगातील गुलामगिरी नष्ट होऊन राष्ट्रवाद तयार होऊ शकतो.

### ६) अल्पसंख्याकांची समस्या संपुष्टात येते –

एक राष्ट्रीय राज्यामध्ये बहुसंख्या अल्पसंख्य असा भेदभाव राहत नाही त्यापुढे अल्पसंख्याकाच्या प्रश्नावरुन निर्माण होणारे वादळ संपुष्टात येते. एकाच वंशाचे वा धर्माचे असल्यास तेथील लोकांमध्ये आपुलकीची भावना मोठ्या प्रमाणात विकसीत होते.

स्वयं निर्णयाचा हक्क विसाव्या शतकातील अधिक आकर्षणाचा विषय राहिला त्यातूनच आशिया, आफ्रिका, युरोप खंडात मोठ्या प्रमाणात उलथापालथ घडून आली सोबतच त्याचे दुष्परिणामही जाणवू लागलेत. लॉर्ड ॲक्टन यांनी एका राज्यात अनेक राष्ट्रे असणे हितावह असते. असे प्रतिपादन करुन बहुराष्ट्रीय राज्याचे समर्थन केले आहे.

एक राष्ट्र एक राज्य या संकल्पनेतील दोष ढोबळमानाने सांगून त्यावर टिका केली आहे. स्वयंनिर्णयाच्या वा विभक्तंतेच्या संकल्पनेवरील आक्षेप पुढील प्रमाणे आहेत.

१) विश्वशांतीला घातक – उत्तर आधुनिक युगात एक राष्ट्र एक राज्य या संकल्पनेचे औचित्य संपुष्टात आल्यागत स्थिती आहे. छोटी सार्वभौम व संपन्न राष्ट्रे कुणाच्या तरी पाशवी सत्तेला बळी जाताना दिसतात. इराकचे कुवैतवरील आक्रमण याच गटात मोडणारे होते ज्यामुळे विश्वशांतीला मोठ्या प्रमाणात तडे जातात.

२) अनुचित सिद्धांत – व्यावहारिकतेच्या कसोटीवर हा सिद्धांत प्रमाणभूत ठरु शकत नाही. विभिन्न राष्ट्रीयत्व परस्परात इतके विलीन झालेले असते की त्यांना परस्परापासून दुभंगता येत नाही. लोकांमध्ये राष्ट्रीयत्व निर्माण झाले आहे काय? याची तपासणी करणारी तंत्रव्यवस्था अस्तित्वात नसल्याने त्यावर अव्यावहारिकेचा ठप्पा ठेवण्यात आला आहे.

३) लोकशाहीला घातक – एक राष्ट्रीयत्वाची भावना लोकशाही संकल्पनेच्या विरोधी आहे. एकात्म पद्धतीची भावना सर्वकष स्वरुपाची असते उलट लोकशाहीत विभिन्नता अतिशय पोषक स्वरुपात अस्तित्वात असते. मानवीय व भूतदया दृष्टिक्षेप विभिन्नतेत कायम राहतो त्यामुळे स्वयंनिर्णयाचा भाग लोकशाहीला घातक आहे.

४) दुर्बळ राष्ट्राची निर्मिती – राष्ट्रीयत्वाच्या आत्यंतिक उग्र भावनेमुळे एकाच राज्याचे अनेक राष्ट्र राज्यात रुपांतर होइल त्यामुळे राष्ट्राचे सामर्थ्य घटून राष्ट्राच्या विकासावर त्याचा परिणाम होइल. परस्परात द्वेष भावना निर्माण झाल्यामुळे कायम स्वरुपातील शत्रुत्वाची भावना तयार होइल. भारत–पाकिस्तानच्या विभाजनाने शत्रुत्वाची दरी बुजल्या गेलेली नसून ती सातत्याने युद्धात परावर्तित झालेली आहे त्यामुळे राष्ट्रवादाची भावना अघोरी स्वरुपाची ठरली आहे.

५) मर्यादित संकल्पना – या संकल्पनेच्या स्वतःच्या मर्यादा आहेत. स्वयंनिर्णयाचे तत्व प्रत्येक राष्ट्रात लावता येत नाही. राष्ट्राचे राज्यात रुपांतर करण्यापूर्वी त्या राष्ट्राची आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थिती सुदृढ असणे आवश्यक असते. याकडे दुर्लक्ष झाल्याने राज्याचे स्वातंत्र्य नाममात्र राहते व गरजा भागविण्यासाठी इतरावर अवलंबून राहावे लागते.

स्वयंनिर्णयाची अथवा विभक्त होण्याची संकल्पना राष्ट्रवादाच्या आधारावर राबविणे सहज आणि सार्वजनिक लागू होणारी संकल्पना नाही ज्या राष्ट्राने सामर्थ्य

आर्थिक, लष्करी, नेतृत्व मोठे असेल तर सामर्थ्यवान राहून स्वतःच्या गरजा भागविण्याची क्षमता निर्माण करील परंतु त्याच्यात इतराप्रती तुच्छतेचा, साम्राज्यवादी दृष्टिकोन विकसीत होता कामा नये. वरवर पाहता सिद्धांतातून आकर्षण निर्माण होत असले तरी हा सिद्धांत दुधारी स्वरुपाचा आहे.

## १०.५ सारांश

आधुनिक राज्यशास्त्रातील एक महत्वाची संकल्पना म्हणून राष्ट्र-राष्ट्रवाद याकडे बघीतल्या जाते. १६ व्या शतकात तांत्रिक प्रगतीने युरोप ची कुस बदलू लागली त्यातूनच राष्ट्रीयत्वाच्या भावनेने जोर पकडला. गुलामी त्यातून आस्मिता निर्माण करणारी ही अभिप्रेरणा होती. सोबतच शांतता, स्थिरता मिळण्याची ग्वाही होती, प्रथम, द्वितीय महायुद्धानंतर वसाहतवादातून, साम्राज्यवादातून अनेक देशाची मुक्तता झाली व तेथील राष्ट्रानी आपआपल्या स्वतंत्र राज्याचा पाय रचला. राष्ट्रवादाच्या संकल्पनेने गुलामीची भावना वाढू देण्यास मदत झाली. त्यामुळे ही संज्ञा जगभरातच औचित्यपूर्ण ठरली. जगभरात उदयास आलेली किमान दोनशे देशांचा पाया राष्ट्रीय भावनेतच आधारलेला असल्यामुळे आजही एकविसाव्या शतकात ही राष्ट्र-राष्ट्रवाद महत्व राखून आहे.

## १०.६ सरावासाठी प्रश्न

१) राष्ट्र संकल्पना स्पष्ट करुन तिच्या व्याख्या व अर्थ दया.

२) राष्ट्रवादाचा विकास मांडून राष्ट्र निर्मितीच्या आधारभूत घटकावर प्रकाशझोत टाका.

३) राष्ट्रवादाचा अर्थ सांगा? व तिच्या गुण दोषांची सोदाहरणसह चर्चा करा.

४) स्वयंनिर्णयाचा सिद्धांत मांडून त्याचे परिक्षण करा.

५) 'उग्र राष्ट्रवादाने जागतिक शांतता व सुव्यवस्थेला बाधित केले आहे.' भाष्य करा.

६) १६ व्या शतकातील राष्ट्रवादाने युरोपाला कलाटणी दिली' हे विधान तपासून त्याची समीक्षा करा.

**परिसर प्रयोग -**

- भारतातील बहुविविधता राष्ट्रीय ऐक्याचे उत्तम उदाहरण आहे मिमांसा करा.

- बहुविविधता लोकशाहीला पुरक असल्याची मांडणी करा.

## १०.७ संदर्भ ग्रंथ


१) महाराष्ट्रामधील राष्ट्रवादाचा विकास, नलिनी पंडीत, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, २०००.

२) निधर्मी राष्ट्रवादाचे शिल्पकार, ज.द. जोगीकर, राष्ट्रविचार साहित्य प्रकाशन पुणे, १९८०.

३) राजकीय सिद्धांतवाद, दि.वा. इन्दापवार, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९३

४) राजकीय सिद्धांताची मूलतत्वे, देशमुख /करणे, विद्या प्रकाशन, नागपूर, १९६५

५) आधुनिक राज्यशास्त्र, शांताराम भोगले, किताब महल, मुंबई १९८१


-------------